म. ग्रं. सं. ठाणे.
विषय
सं. क्र.

REFBK-0025979
REFBK-0025979

# अनुभवाची शिदोरी

डॉ० पु० ज० देवरस

REFBK-0025979

वसंत बुक स्टॉल

प्रकाशक
अरविंद तेंडुलकर
वसंत बुकस्टॉल
न. चिं. केळकर रोड,
हनुमान मंदिराजवळ,
दादर,
मुंबई ४०० ०२८.

© डॉ. पु. ज. देवरस

■
प्रथमावृत्ती
जुलै १९८९
■
मुख पृष्ठ
रविमुकुल

मूल्य : साठ रुपये

मुद्रक
सौ. शामला अनंत चिंचणीकर
माधुरी मुद्रण,
४४३, शिवाजीनगर,
पुणे ४११ ००५.

मुखपृष्ठ छपाई
ज्योति आर्ट प्रिंटर्स,
मुंबई,

प्रिय सौ. लक्ष्मी

स्वत:च्या आशा-आकांक्षा सोडून तू माझे घरकुल उभारलेस. माझे प्रवास आणि माझे लेखन यांची तू प्रेरणा होतीस. कष्टमय जीवनात तू सतत हसतमुख सोबत दिलीस.
आता जीवनाच्या सायंकाळी मला एकाकी करून निघून गेलीस !
तुझ्या पुण्यस्मृतीस ही कलाकृती प्रेमपूर्वक...

– पुरुषोत्तम देवरस

## परमपूज्य सौ. आईस अर्पण

■

सोनचाफा दरवळतो आहे, मनात तुझ्या स्मृतीचा ।
मिटेल का गंध कधी ओल्या मातीचा ।।

भेट झाल्यावर नेहमी म्हणायचीस
'अशाच नेहमी येत जा,'
आज सगळी जमलो आहोत
पण तू नाहीस, दैवाचा हा खेळ पहा !

गणपती, नवरात्र, दसरा, वाढदिवस,
आठवणीचे तुरे घेऊन बसले आहेत हे दिवस,

दिवसानंतर रात्र, रात्रीमागून दिवस जात आहे
आठवणींनी तुझ्या, मन व्याकुळ होत आहे

शोधू कुठे तुला अता, चांदण्याच्या भरलेल्या नभांगणात
मंद तेवणाऱ्या ज्योतिच्या प्रकाशात
की मन प्रसन्न करणाऱ्या थंडगार वायुलहरीत
की फळाफुलांना फुलविणाऱ्या, वसुंधरेच्या ममतेत

गेलीस तू भरल्या चुड्याने, सौभाग्यलेणी लेवून
लक्ष्मी या घरची, माऊली आमुची, वळता न पाहून

अशाश्वत हे जातसे, शाश्वता मीलना
आशीर्वाद असो तुझा अमुच्या जीवना

— तुझी विजू

## लेखकाचे मनोगत

| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |

'अनुभवाचे जग' हे पुस्तक १९८६ सालच्या ऑगष्ट महिन्यात प्रसिद्ध झाले. वाचकांनी पत्रे पाठवून पुस्तकाच्या आवडीबद्दल अभिप्राय व्यक्त केला. काही वाचकांनी याच मजकुराचे दुसरे पुस्तक लिहावे अशी आग्रहाची विनंती केली. माझ्या पत्नीने पत्रे वाचली व दुसरे पुस्तक लिहावे अशी गळ घातली. आज ती नाही; पण तिच्या स्मृतीस हे दुसरे पुस्तक 'अनुभवाची शिदोरी' अर्पण करीत आहे. कु. वनिता परब हिने माझे लिखाण टिपून घेतले. श्री. उमाकांत कीर यांनी फार कष्ट घेऊन भाषा तपासली. श्री. अरविंद तेंडुलकरांनी प्रकाशनाची जबाबदारी उचलली. या सर्वांना धन्यवाद. माझ्या या 'अनुभवाच्या शिदोरी' ला रसिकांनी गोड मानून घ्यावे एवढीच माझी विनंती आहे.

आनंदवन – १
साहित्य सहवास
बांद्रे (पूर्व)
मुंबई ४०० ०५१

– डॉ. पु. ज. देवरस

## प्रकाशकाचे दोन शब्द

जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक आणि संशोधक डॉ. पुरुषोत्तम जयकृष्ण देवरस यांच्या अनुभवी लेखणीतून प्रकट झालेला ' अनुभवाची शिदोरी ' हा रंजक ग्रंथ रसिकांना सादर करताना मला अत्यंत आनंद वाटतो.

डॉ. पुरुषोत्तम जयकृष्ण देवरस यांचा जन्म २० जुलै १९०९ रोजी मध्यप्रदेशातील बिलासपूर शहरी झाला. नागपूर विश्वविद्यालयातून त्यांनी एम. एस्‌सी. व एल्‌एल्. बी. डिग्री घेऊन, इंग्लंडच्या डरहॅम विश्वविद्यालयातून १९४० साली पीएच. डी. पदवी संपादन केली. प्रयाग हिंदी साहित्य संमेलनाचे ते १९२९ मधे साहित्यविशारद झाले.

पुण्यातील फर्ग्युसन कॉलेजमध्ये प्राणीशास्त्राचे प्राध्यापक, कृषिसंशोधन संस्था दिल्ली येथे कीटकशास्त्रज्ञ व मुंबईच्या हाफकिन संस्थेचे उपसंचालक अशा उच्च पदांची अधिकारसूत्रे त्यांनी सांभाळली व १९६० साली ते सेवानिवृत्त झाले.

कीटक, विषारी प्राणी व पर्यावरण या विषयांवर त्यांनी संशोधन करून दोनशेच्यावर प्रबंध प्रसिद्ध केले. या कार्यात त्यांनी फार मोठा नावलौकिक संपादन केला.

पहिल्या जागतिक सर्प परिषदेचे ते सन्माननीय अध्यक्ष झाले. त्याचप्रमाणे रॉकफेलर फेलोशिप व डॉ. भन्साली लेक्चर अॅवॉर्डचेही ते मानकरी ठरले. १९८० साली भरलेल्या पहिल्या अखिल भारतीय प्राणी–विज्ञान संस्थेच्या अधिवेशनात त्यांना सुवर्णपदक बहाल करण्यात आले.

युनायटेड नेशन्सची मानव पर्यावरण परिषद, ब्राझील येथील आंतरराष्ट्रीय विषारी प्राणीपरिषद, डब्लीन येथील प्रायोगिक प्राणीपरिषद, पॅसिफिक विज्ञान परिषद, जागतिक सर्प परिषद, जागतिक स्वास्थ्य संस्थेची प्लेग–कीटक परिषद, आदि कैक परिषदांना हजर राहून त्यांनी ३० वर्षे जगभर प्रवास केला.

इंडियन बुक ट्रस्ट, अॅकॅडेमिक प्रेस लंडन, न्यूयॉर्क, पर्गमन प्रेस, ऑक्सफोर्ड यांनी त्यांची सर्प व विषारी प्राण्यांची पुस्तके व प्रबंध प्रसिद्ध केले.

ग्रंथालय
७७५
२५६७८
मुं. १६४८८

पुण्याची विज्ञानवर्धिनी, मुंबईची मराठी विज्ञान परिषद, आंतरराष्ट्रीय जीवसंहारक परिषद आदींचे ते आद्य संस्थापक असून कैक संस्थांचे आजीव सभासद आहेत.

१९२४ साली त्यांनी मराठी लेखनास व १९३० साली हिंदी लेखनास सुरवात केली. आता इंग्रजी, मराठी व हिंदी या तीनही भाषांतून ते सातत्याने लेखन करीत असतात.

'भारतातील सर्प' हा त्यांचा ग्रंथ दहा भारतीय भाषांतून अनुवादित झाला आहे. मराठी विज्ञान परिषदेच्या अध्यक्षपदी असताना त्यांनी 'विज्ञान गवाक्ष' प्रसिद्ध केले. जोधपूर विश्वविद्यालयाच्या बी. ए. च्या अभ्यासक्रमात त्यांच्या हिंदी भाषेतील लेखांचा समावेश आहे.

सन १९८६ साली त्यांनी 'अनुभवाचे जग' पुस्तक आमच्यामार्फत प्रसिद्ध केले. त्या पुस्तकाची मागणी खूप झाली. वर्तमानपत्रांनी चांगले अभिप्राय दिले व प्रथमावृत्ती १९८७ सालीच पूर्णतया वितरित झाली.

आकाशवाणी व दूरदर्शन यावर त्यांची सातत्याने भाषणे व चर्चा होत असतात. संबंधित विषयावर अत्यंत कळकळीने व अधिकाराने ते दैनिकातून व साप्ताहिकांतून लिहीत असतात. त्यांच्या विषयांशी संबंधित संस्थांचे ते सभासद व मानद अधिकारी आहेत.

आंतरराष्ट्रीय कीर्ती प्राप्त झालेल्या डॉक्टरसाहेबांचा देशाच्या इतिहासाचा अभ्यास आजही चालूच आहे. अध्यात्म हा त्यांचा खास आवडीचा विषय असून त्याचाही त्यांचा गाढा व्यासंग आहे.

डॉ. देवरस यांच्या आमच्याकडून प्रसिद्ध होत असलेल्या या दुसऱ्या ग्रंथाचे रसिकाकडून यथोचित स्वागत होईल अशी आशा आहे.

— अरविंद तेंडुलकर
प्रकाशक

अनुक्रमणिका


१ दोन लक्ष कुसोडेची सफर
२ सुखी देशात अनुभवलेले क्षण
३ इंग्लंड येथील दुसऱ्या महायुद्धकालीन
वास्तव्यातील काही क्षण
४ त्रिनेत्राचे दर्शन
५ जगप्रवासातील वर्णभेदाचे दर्शन
६ मरणाची चाहूल वाघाला
७ यात्रा सर्पआराधनेची
८ दक्षिण भारत यात्रा
९ गुरुवायुर ते कन्याकुमारी
१० पांडुचेरीच्या मार्गावर
११ काशी : एक प्राचीन शहर
१२ गंगा-यमुनेच्या खोऱ्यात
१३ बिहारची सफर – आगगाडीने
१४ विदर्भाचा प्रवास
१५ वाघ गेला पण चित्ता दिसला !
१६ कलचुरी राजांच्या देशात
१७ देवाचे दर्शन होते का ?
१८ मृत्यूच्या समीप

# १ : दोन लक्ष क्रुसेडोची सफर

१९६० पर्यंत मी बऱ्याच देशांत फिरलो व शासनाने जग प्रवासाच्या दिलेल्या विमान तिकिटाचा चांगला उपयोग करून घेतला. या भेटीत विषारी प्राण्यांचे प्रयोगालय कसे व्हावे; याशिवाय प्लेग या रोगाची चाचणी व अवरोध सहज रीतीने कसा करावा या दोन विषयांबद्दल माझ्या मनात बरेच विचार घोळत होते. नशिबाने साथ दिली व काही मंत्र्यांनी विशेषत: डॉ. कैलास, (कै.) कन्नमवार व (कै.) वसंतराव नाईक यांनी मला बरेच प्रोत्साहन दिले त्यांचा मी नेहमीच आभारी राहीन. या प्रोत्साहनानंतर विषारी प्राण्यांकरिता एक नवीन इमारत बांधण्यात आली व तिथेच विंचवाच्या विषाचे दोहन विशिष्ट प्रकारच्या विजेच्या यंत्राने आम्ही केले. या प्रयोगाचे प्रात्यक्षिक मी डब्लिन इथे करून दाखविले होते व त्यानंतर मला बरीच पत्रे आली. सर्पांचे विषदोहनसुद्धा नवीन पद्धतीने करावे व एका दंशात सर्प किती विष टाकतो, याचे प्रमाण निश्चित करावे म्हणून मी चार वर्षे सतत प्रयोग करीत होतो. या प्रयोगातील आकड्याचे जगातील वैज्ञानिकांना दर्शन घडावे अशी माझी इच्छा होती.

मोठ्या प्रमाणावर हे कार्य चालले असताना बरेच पाहुणे येऊ लागले व सरकार-दरबारी याबद्दल विचारणा होऊ लागली. माझे असे मत होते व आजही आहे, की कोण-त्याही संशोधन संस्थेने एक तर मूलभूत संशोधन केले पाहिजे व दुसरे, लोकांना समजेल असे प्रात्यक्षिक दाखविले पाहिजे. या दुसऱ्या भावनेमुळे संशोधनाबद्दल जनतेत कुतूहल निर्माण होते व संस्थेला ख्याती जरी मिळाली नाही तरी ते लोकोपयोगी कार्य करतात म्हणून पैशाची अडचण पडत नाही, या भावनेतून मी कार्य करीत होतो. जनतेचा लोंढा माझे कार्य पाहण्याला येत होता. असा लोंढा एका विशिष्ट खात्याकडे येऊ लागला, की इतर विभागात मत्सर उत्पन्न होतो व मला तसे दिसू लागले. खोटीनाटी विधाने गुपचूप वर जाऊ लागली. प्लेगच्या कामाकरिता सबंध महाराष्ट्रात मला फिरावयाचे होते व मुंबईतून बरेच दिवस बाहेर राहिल्यामुळे माझ्या खात्यात मला ढवळाढवळ होताना दिसली, त्यामुळे मला पुढचे पाऊल सांभाळून टाकावे लागे. या सर्व घडामोडींमुळे मन

अस्वस्थ होई; तरी पण वाटे, बाहेर जावे व नवीन नवीन संशोधन पाहून आपल्या संशोधनाची उरलेल्या वेळात दिशा ठरवावी. अशा मन:स्थितीत असताना ब्राझीलहून मला एक रजिस्टर पत्र आले. मी प्लेगच्या रक्ताची स्लाईड मायक्रोस्कोपखाली तपासत होतो, तेव्हाच हा पोस्टमन रजिस्टर पत्र घेऊन आत शिरला. पत्र घतले व टेबलावर ठेवून पुन्हा स्लाईड तपासू लागलो. तपासताना विचार येत होते, की परदेशात जावे व हे कार्य नवीन जोमाने पुन्हा सुरू करावे. थोडया वेळाने आमच्या एका कमिटीची बैठक होती, तिकडे निघून गेलो व हे विचार तिथेच जिरले. संस्थेच्या परिसरात माझा सरकारी बंगला होता. तिथेच रोज दुपारी मी लंचला जात असे. रजिस्टर पत्र घेऊन तसाच घरी गेलो व जेवणापूर्वी ते पत्र फोडले. त्यात इन्स्टिटयूटो भूटंटान सावो पालो, या संस्थेने विष आणि विषारी प्राण्यांबद्दल जागतिक परिषद बोलावली होती व त्या परिषदेला मी अवश्य यावे असे अगत्याचे निमंत्रण होते. पत्नीला या निमंत्रणाबद्दल सांगितले. ती म्हणाली, 'तुम्ही घराकडे लक्ष देत नाही. पण परदेशात मात्र भराऱ्या मारता ! काही हरकत नाही. तुमचे नाव होऊ द्या; त्यातच मला आनंद आहे !' आज माझी पत्नी हयात नाही. पण तिचे शब्द मला आता बोचत आहेत.

लंचनंतर ऑफिसला जाऊ लागलो तेव्हा विचार आले की शासनाकडून काही आर्थिक साहाय्य मिळणार नाही व संस्थेच्या चालकांकडून आणखी अडचणी निर्माण होतील. म्हणून पटकन पत्र पाठविले, की निमंत्रण स्वीकारतो; पण मला प्रवासाचा व इतर खर्च झेपणे शक्य नाही. पत्नीशिवाय कुणालाही या गोष्टीबद्दल सांगितले नव्हते. नशिबाने साथ दिली व महिन्याभरात पत्र आले, की जाण्या-येण्याचा खर्च ब्राझील सरकार देईल व वरील खर्चाकरता दोन लक्ष क्रुसेडो अनुदान देण्यात येत आहे. (भारतात जसे आपल्या मुख्य नाण्याला रुपया म्हणतात, तसे ब्राझीलच्या नाण्याला क्रुसेडो हे नाव दिले आहे.)

दोन लक्ष हा आकडा वाचून मी थक्कच झालो व तावडतोब येतो म्हणून तार पाठविली. माझ्या संस्थेने जाण्याची परवानगी दिली नाही तर राजीनामा देण्यापर्यंत विचार आले. ठीक पंधरा दिवसांनी पॅनअॅम कंपनीचा फोन आला. माझ्या तिकिटाबद्दल पैसे मिळाल्याची पोच त्यांनी दिली. मी तावडतोब पंधरा दिवसांच्या रजेकरता अर्ज केला व जाण्याची तयारी सुरू केली.

पॅनअॅमचे विमान मुंबईहून काही दिवसच सुटत होते. याकरता त्या दिवसाची वाट पाहात सामान गोळा केले. दोन पेपर वाचले, त्याच्या स्लाईड पण करून घेतल्या. सावो पालो शहरातील काही मित्रांना माझ्या येण्याबद्दलची पत्रे पाठवली. मुंबईहून जेट विमानाने लंडनमार्गे आम्ही न्यूयॉर्कला पोहोचलो. या शहरी कॅनडी एअर पोर्टला लागूनच पॅनअॅमची भव्य इमारत आहे. त्यांची विमाने अगदी थेट या इमारतीच्या आत थांबत व उतारू सरळ इमारतीत शिरत होते. या भव्य हॉलमध्ये चहूबाजूस ब्रांझची अलगद वर दिस-

सारी कैक शिल्पे पसरली होती व सबंध हॉलभर जे लोक बसले होते त्यात स्पॅनिश भाषा बोलणाऱ्यांची संख्या खूपच होती. आपले सामान घेतले व सावोपालोला जाणाऱ्या पॅन अमेरिकन कंपनीच्या काउंटरवर दिले. विमान सुटण्याला बराच वेळ होता, म्हणून इकडे तिकडे भटकू लागलो. मला बऱ्याच काही घटना दिसल्या. त्यात एक अजब घटना मनात रुजून राहिली. ती अशी की, पोर्टोरिको या बेटावरून आलेल्या बऱ्याच स्पॅनिश बोलणाऱ्या प्रवाशांचा घोळका इकडे येत होता. या घोळक्यात स्त्री पुरुष-मुले तर होतीच, पण अगदी शेवटी एक अजस्र बाहुलीसारखी आकृती कुणीतरी मागून ढकलत असताना दिसली. मला वाटले की काही सणवार असतील म्हणून ही बाहुली व गर्दी असेल. जवळ गेलो तेव्हा आश्चर्य वाटले. एक पाच फूट दोन इंच उंचीची १५–१६ वर्षांची मुलगी चालू शकत नव्हती. म्हणून तिला लोक मागून ढकलत होते. ती इतकी अजस्र होती की तिचे बाहुदंड मोठ्या माणसाच्या मांड्याएवढे वाटत होते. हात अगदी लांब करून ती हाश्य हुश्य करत चिडून हळुहळू एक एक पाय पुढे टाकत होती. तिचे वक्षस्थळ, खांदा, पोट, पाय, सगळेच अवयव अजस्र या शब्दात मोडत होते. मी लोकांना विचारले की, "हा काय प्रकार आहे ?" तेव्हा त्यांनी सांगितले की ही मुलगी अवाढव्य वाढली आहे व अशा प्रकारच्या मुली पोर्टोरिको द्वीपवर काही स्थळी दिसू लागल्या आहेत. हा फुगण्याचा कसला तरी विचित्र रोग असावा. तिचा आहार तरी किती होता ? तर म्हणे एवढ्याशा वयात ती दोनतीन कोंबड्या सहज गट्ट करीत असे ! हा प्रकार पाहून सुबत्ता असलेल्या देशात मानवी शरीराचे विकार कसे होतात याचे दर्शन घडले.

एक-दोन तासांनी माझे विमान आले व हे विमान न्यूयॉर्कहून सरळ सावोपालोला गेले. आम्ही रात्रीलाच पोहचलो. या वेळी त्या परिषदेचे स्वयंसेवक आले होते. त्यांनी मला बसमध्ये बसवून ठराविक हॉटेलवर नेले. आठ वर्षांपूर्वी मी याच गावी आलो होतो, तेव्हा डॉ. होगी आपल्या संस्थेतील म्युझियममध्ये घेऊन गेले व तिथेच माझे १५ दिवस वास्तव्य होते. या वेळी मात्र सुंदर हॉटेलचा लाभ झाला. हॉटेलचे दालन भव्य होते व भिंतीवर चित्रे नसून विक्रीच्या मालाचे प्रात्यक्षिक ठेवले होते. पण हे प्रात्यक्षिक कसचे ? तिथे होते रिव्हॉल्व्हर, बंदुका, रायफल, कॅराबिन, कट्यारी, मोठाले सुरे. अशा शस्त्रांची उघड्या बाजारात सर्रास विक्री होत होती. हॉटेलच्या रिसेप्शनवर सही केली व त्यांनी माझ्या हातात एक पाकीट दिले. माझे सामान बेल बॉय माझ्या खोलीवर घेऊन गेला. खोली लहानच होती. पण व्यवस्था बरी दिसली. टेलिफोनने कोको आणि ब्रेड मागवून घेतले आणि रात्रीची न्याहारी केली. थकवा आल्याने तसाच पडलो.

दुसऱ्या दिवशी सकाळी दार ठोठावले गेले व एका वेटरने ब्राझीलची प्रख्यात कॉफी एका ट्रेमध्ये आणली. त्या समयी घडाळ्यात साडेसहा वाजले होते. मी कॉफीचा आस्वाद घेतला व आन्हिक उरकण्याकरता उठलो, तोच मला रिसेप्शननी दिलेल्या पाकिटाची आठवण झाली. तावडतोब पाकीट काढले व आतले पत्र वाचू लागलो त्यात लिहिले होते

की, " परिषद तुमचे स्वागत करीत आहे व तुम्हाला खर्चाकरता दोन लक्ष क्रुसेडो या पाकिटात ठेवले आहेत." लक्ष शब्द वाचून मला खूप आनंद झाला. मी लक्षाधीश झालो, या आनंदातच आन्हिक आटोपले. आंघोळ केली व ईश्वराला धन्यवाद देण्याकरता प्रार्थना आटोपून घेतली. तोपर्यंत ब्रेकफास्ट घेण्यासाठी मी फोन केला व आधीच सूचना दिली की, मी शाकाहारी आहे. तोच एका ट्रॉलीवर दोन-तीन ट्रे घेतलेला बेअरर आला व त्याने टेबलावर ते अन्न ठेवले. एका ट्रेमध्ये गर्द केशरी रंगाची अर्धी पपई होती. त्याच्याकडेला अननसाचे काप, तीन पिवळीधमक केळी, सफरचंद व खारे काजू, दुसऱ्या ट्रेमध्ये एका छोट्या टोपलीत कैक प्रकारचे ब्रेड व कडेला एका काचेच्या वाटीत लोणी मार्मलिड, कॉफी, दूध, साखर, आणि तिसऱ्या प्लेटमध्ये पॉरीज होते. इतके कसे खावे हाच एक प्रश्न मनात येऊन गेला. न्याहारी आटोपली. तोपर्यंत स्वयंसेवक परिषदेला नेण्यासाठी आले. कपडे घालण्यापूर्वी मी तो फराळाचा ट्रे सरकावला व वेटरला घंटा वाजवून नेण्यास सांगितले. तो लगेच आला व त्याने एका ट्रेमध्ये बिल दिले. बिलावर सही केली व कपडे घातले. बाहेर पडण्यापूर्वी त्या बिलाच्या कॉपीकड लक्ष दिले. तो आकडा पाहूनच मी अवाक् झालो. माझ्या सकाळच्या जेवणाचे बिल होते वीस हजार क्रुसेडो. झाले ! त्या दोन लाख क्रुसेडोची सगळी उर्मी थंड झाली. या हिशेबाने ते दोन लक्ष क्रुसेडो पाच सहा दिवसच पुरले असते.

बाहेर पडलो व बसमध्ये बसून इन्स्टिटयूटो भूटंटान इथे उतरलो. जुन्या ओळखीच्या मंडळींनी दृढ आलिंगन देऊन स्वागत केले. मिसेस होगी यांनी आपल्या मुला-मुलींच्या भेटी करविल्या. त्यांची मोठी मुलगी तर आता सहा फूट उंच झाली होती. भेटीनंतर मिसेस होगी मला रिसेप्शनवर घेऊन गेल्या. तिथे जवळजवळ सगळ्याच स्त्रिया व मुली जर्मन दिसल्या. मिसेस होगी पण जर्मनच होती. यामुळे माझी चांगली गट्टी जमली. दुपारी चार, नंतर आमचे संभाषण म्हणजे एक मजेदार गंमतच झाली. जर्मन मुली तुटक्या इंग्लिश मध्ये बोलायच्या व मी डिक्शनरी पाहून जर्मनमध्ये उत्तर देत होतो व खूप हशा उडत असे. कैक देशांतून आलेल्या वैज्ञानिकांच्या भेटी झाल्या व नवीन संशोधनाबद्दल चर्चा पण झाली. या नवीन वातावरणात एक प्रकारचा दांडगा उत्साह मनात उत्पन्न झाला. ठरा· विक वेळी आम्ही अधिवेशनाच्या हॉलवर गेलो. स्टेजवर ज्या ज्या राष्ट्रांतून वैज्ञानिक आले होते, त्या त्या राष्ट्राचा ध्वज भिंतीशी फडकत होता. आमचा तिरंगा पण चांगल-उठून दिसत होता. वेळेवर त्या देशातील एका मंत्र्याने आमचे स्वागत केले व परिषदेचे उद्‌घाटन जाहीर झाले. या देशात मुख्य भाषा पोर्तुगीज होती. पेपर वाचताना आम्ही सर्वांनी विशिष्ट प्रकारचा कर्णा कानावर लावला होता. जी भाषा आम्हाला समजत असेल त्या भाषेचे बटन दाबले की त्या भाषेतूनच भाषांतर आमच्या कानी पडे. यामुळे रशियन - जर्मन, इंग्लिश, स्पॅनिश, पोर्तुगीज, आणि फ्रेंच या सहा भाषांतून पेपर वाचले गेले. या बटनामुळे मला तरी इंग्लिशमध्येच ताबडतोब झालेले भाषण कळले. एकंदर १० ते १५

मिनिटेच पेपर वाचला जाई व पुढे प्रश्नोत्तरे होत असत. प्रश्न विचारताना मी इंग्लिश-मध्ये विचारत असे व वक्ता त्याला त्याच्या भाषेतून सांगत असे आणि त्यांनी बोललेली भाषा भाषांरित होऊन इंग्लिशमध्ये कळत असे. असे हे पहिले अधिवेशन ११-३० ला संपले. बाहेर कॉफी व बाटलीत भरलेले पिण्याचे पाणी ठेवले होते. ते घेऊन पुन्हा हॉलमध्ये आलो. त्या दिवशी संध्याकाळी ब्राझील शासनातर्फे रिसेप्शन समारंभ झाला. टाऊन हॉल-मध्ये पेय आणि फराळाचे पदार्थ ठेवलेले होते व एका मंत्र्याजवळ आमचे व्हिजिटिंग कार्ड वाचले जाई व आम्ही नंतर त्या मंत्र्याशी हस्तांदोलन करत होतो. सगळ्यांची ओळख झाल्यावर ठराविक नृत्य सुरू झाले. दुपारी मीटिंगच्या रिसेप्शनवर ज्या जर्मन स्त्रिया व मुली बसल्या होत्या त्यांना इंग्लिश जेमतेम येत होते. मला जर्मन भाषेतील काही शब्दच माहीत होते. त्यापैकी बऱ्याच स्त्रिया व मुली नृत्याकरता आल्या होत्या. नेहमीच्या रीतीप्रमाणे प्रत्येकाने आपापला जोडीदार निवडला व नृत्य सुरू झाले. नृत्याची एक फेरी झाली की त्या जोडीदाराला पेय घेऊन द्यायचे. एक तर मला व्हिस्कीची गोडी नव्हती. शिवाय थोडा फॉक्सट्रॉट व अमंळ वॉल्टझ एवढ्याच दोन नृत्य-प्रकारांची माझी ओळख होती. इथे तर सगळे सांबा नृत्य नाचत होते. मी कडेला बसून उद्विग्न मनाने ती मौज पाहत होतो. त्या दुपारच्या स्त्रिया आल्या व त्यांनी नृत्याचे आमंत्रण दिले. मी नम्रपणे नकार दिला. कारण मला ते जमणारच नव्हते. तरी पण ओढाताण केल्यावर दोन-चार पावले टाकली व शेवटी त्या उंच टाचेच्या बुटावर माझे पाऊल पडले व त्यांनी मग नृत्याचा नाद सोडला. बऱ्याच रात्रीपर्यंत हे कार्यक्रम चालले व आम्ही व आमच्या-पैकी कैक पेंगतच हॉटेलच्या दाराजवळ आलो.

आदल्या दिवशीच्या बिलाचा आकडा पाहून मी धास्तीच घेतली होती, म्हणून मी फळांची करंडी मागविली नाही, तरीपण बिल दहा हजार क्रुसेडो आले. त्या दिवशी मात्र रात्रीला मी दुसऱ्या एखाद्या स्वस्त जेवणगृहात जायचे ठरवले. स्विडनच्या उपासाला विश्वविद्यालयातील जीवरसायन शास्त्राचे प्रोफेसर डॉ. पोराथ, हे माझ्या बाजूच्या खोलीत होते. त्यांना घेऊन एका स्वस्त हॉटेलवर गेलो. इथे पाणी मागताच त्यांनी दोन मदिरेच्या बाटल्या आणून ठेवल्या. मदिरेने पाण्याची तहान जाणार नव्हतीच. मी पुन्हा प्यायचे पाणी म्हणून त्याला संदेश पाठविला. त्याने तिसरी बाटली आणली व या बाटलीवर पिण्याचे पाणी असे छापले होते. व त्या शीर्षकाखाली त्या पाण्यामध्ये कोणकोणते क्षार आहेत याची लांबलचक यादीच दिली होती. म्हणजे हे पाणी शुद्ध केले होते. या पिण्याचे बिल आले तेव्हा मला दिसले की त्या मदिरेच्या बाटलीपेक्षा या पिण्याच्या पाण्याच्या बाटलीची किंमत दीडपट होती. लोक याकरिताच ती मदिरा पीत असावे. मात्र पाण्या-शिवाय माझी तहान जात नव्हती.

तिसऱ्या दिवशी सगळ्या मित्रांच्या भेटीगाठी झाल्या व प्रत्येकाचे संशोधन कसे चालले आहे, नवीन काय आहे, याची दिवसभर चर्चा झाली. आता माझी पेपर वाचण्याची

पाळी आली. पाच वर्षे सापांना उघडच्या हवेत ठेवले होते व तेवढ्याच संख्येच्या सापांना पिंजऱ्यात कोंडून ठेवले होते. दर १५ दिवसांनी त्यांचे विष दोहन केले व पाच वर्षांची सरासरी काढली होती. या आकडयामुळे दिसून आले की, उन्हाळयात विष देण्याचे प्रमाण जास्त असते व हिवाळयात ते प्रमाण कमी होते. शिवाय नाग आणि मण्यार सर्पांचे विष देण्याचे प्रमाण उघडयावर ठेवलेल्या सर्पात जास्त दिसते. जरी सर्पांना दोन विषदंती असल्या तरी काही सर्पांच्या, विशेषत: घोणस सर्पाच्या दोन्ही दंतीतून वेगवेगळ्या प्रमाणात विष बाहेर येते व त्या विषात किण्वाचे प्रमाण थोडेफार कमी-जास्त असते. नर आणि मादी सर्पाच्या विषवमन प्रमाणात फरक दिसून आला. हे सगळे आकडे दाखविले. आज या आकडयांची नोंद बऱ्याच संशोधनपर पुस्तकात केलेली आढळते एकदा हे पेपर-वाचन झाले व मला डोक्यावरचे मोठे ओझे उतरल्यासारखे वाटले. शास्त्रज्ञांनी प्रश्न विचारले. थोडी टीका पण झाली, पण बहुतांश माझे मत सर्वांच्या मनात भरल्याचे वाटते. कारण, या पेपरनंतर काही वैज्ञानिक माझे अभिनंदन करते झाले व म्हणाले की, या आकडयांमुळे सर्प किती, केव्हा व कसे विष देतो हे कळू लागेल व त्याप्रमाणे निर्विषाच्या प्रमाणाची योजना करता येईल. सावोपॉलोतील एक प्रसिद्ध डॉक्टर मला म्हणाले की, आज सायंकाळी आपण डोंगरकपारी पार करीत समुद्राकडे जाण्याची एक ट्रिप काढू!

दुपारचा पाच वाजताचा कार्यक्रम संपताच आम्ही तिघे एका खाजगी गाडीने या ट्रिप-वर निघालो. सावो पॉलो शहर उत्तुंग इमारतीने बरेच गजबजलेले आहे व गावच्या कडेला गरिबांची छोटी छोटी घरकुले आहेत. मार्गात पोर्तुगीज बोलणारे, जर्मन बोलणारे कैक श्वेत पुरुष व स्त्रिया दिसल्या. छोटया घरकुलात राहणारे आणि शेतात राबणारे कृष्ण-वर्णीय नीग्रो तसेच श्वेत गृहस्थ काबाडकष्ट करताना दिसले. कडेला कणीस आणि उसाचे मळे होते व दूरवर साखर आणि सिमेंट कारखाने दिसले. मला आश्चर्य वाटले, की हे सगळे कारखाने रोमन कॅथलीक चर्चच्या मालकीचे होते. काही कारखान्यांना पोपचे नाव दिले होते. धार्मिक संस्थांनी धंद्यात किती गुंतवणूक करावी याचे सर्वात उत्तम उदाहरण ब्राझीलमध्ये दिसेल. या गुंतवणुकीपायी अर्थाचा धर्मावर किती पगडा बसतो व त्यामुळे धर्मांतर किती होत आहे हे नजरेस आले. या पैशापायी मिशनरी लोक लांब अॅमेझॉन नदीच्या खोऱ्यात वस्ती केलेल्या रेड इंडियन लोकांना येशूचा संदेश पोचवतात त्या संदेशासंगे आधुनिक युगाचे अन्न, राहणी तिथे पोचते. यासंगे ज्यांना शहरातील रोगाची जाणीव नाही व त्याबद्दल प्रतिकारशक्ती नाही, ते लोक या नवीन रोगांना बळी पडत आहेत. आता ऊस आणि कणीस यापासून गॅसोहॉल तयार करीत आहेत व या गॅसोहॉलवर मोटारी चालतात. परदेशातून पेट्रोल आयात न करता तिथे तयार होणारे गॅसोहॉल स्वस्त पडते. आपल्या देशात असे झाले तर बरेच परकीय चलन वाचेल.

तास दीड तास मोटर चालली व आम्ही एका हिरव्यागार उंच झाडांनी वेष्टित अशा परिसरांत शिरलो हा परिसर एका छोटया टेकडीवर होता व त्या परिसराभोवती

मोठ्या उच भिंती दिसल्या. मुख्य द्वारावर दोन शिपाई पहारा करीत होते. त्यांनी आमच्या डॉक्टरांचा परवाना तपासला व कडेला मोटर नेण्यास सांगितले. मोटारी सर्व दाराजवळच थांबविल्या जात व आत प्रवेश करणारे पायीच पुढील इमारतीकडे चालले होते. आम्ही पण एका भव्य इमारतीकडे चाललो. या इमारतीभोवती सुंदर बागा होत्या व सर्व परिसर मोठ्या प्रकाशमान विजेच्या दिव्यांनी झगमगीत दिसत होता. आता मात्र बरीच शांतता दिसली. एका इमारतीच्या पडवीत आम्ही शिरलो. तेथील बेअररनी आमचे स्वागत केले व आम्हाला बाहेरील बागेत बसण्याकरता खुर्च्या दिल्या. आमचे यजमान शीण घालवण्याकरिता या इमारतीत शिरले होते. हा परिसर म्हणजे एक मोठा क्लब होता. या क्लबमधे विशिष्ट प्रकारच्या पासधारकांनाच आत येण्याची परवानगी असे. खुर्चीवर बसल्यावर आमच्या यजमानांनी 'काय पिणार' असा प्रश्न केला. मला तर पिण्याचे वावडेच आहे. समोरचे कार्ड पाहून काय मागावे हेच कळेना. आमच्या यजमानांनी हलके पेय म्हणजे मार्टिनी मागविली. मी पण होकार दिला. दोन पेल्यात मार्टिनी व त्यावर एक लिंबांची फोड व तिसऱ्या पेल्यात व्हिस्की असा प्रकार आला. खाण्याकरता बटाट्याचे काप व काही सँडविच त्यांनी पाठविले होते. मला आठवत नाही, की मी कधी इतकी मार्टिनी घेतली असेल ! सँडवीचसमवेत मार्टिनीचा स्वाद लिंबू पिळून घेऊ लागलो. दोन-चार घुटके घेतले तेव्हाच जोराने बोलण्याची इच्छा झाली. मला वाटले, त्या लोकांना ऐकू येत नसेल, पण हे दोघेही मला पिताना पाहून खिदळत होते. अशी एक गंमतच चालली होती. अर्धा तास तिथे बसलो, पण ते काय बोलत होते हे जवळपास मला समजेनासे झाले. आम्ही सगळे उठलो व सडकेने मुख्य द्वाराकडे जाण्यास निघालो. ते दोघेही झपाझप चालत होते. पण मी चालत होतो की उडत होतो हेच मला कळेना ! पाय पुढे टाकला की वाटे तिथे जमीनच नाही. दुसरा पाय पुढे करावयाचा तो कुठे टाकावा हेच कळेना ! असे दोन फर्लांग उडण्याचे नाटक करीत द्वारापर्यंत पोहोचलो. आजूबाजूचा परिसर नीट समजना. कसातरी मोटारीत बसलो. ते दोघे खूप थट्टामस्करी करीत होते. बहुतेक माझ्याबद्दलच असेल व हसत होते. मला थट्टा तर कळतच नव्हती व ते हसले म्हणून मला बळजबरीने जोराने हसावे लागे. त्याने गाडी काढली व रस्त्याने जोराने सोडली. गाडीचा किती वेग असावा याची मला जाणीवच नसावी. त्याने समोरचा विंड स्क्रिन वर केला व सगळा वारा तोंडावर येऊ लागला. त्यामुळे केस विसकटले गेले व वाऱ्यासंगे बाहेरील कचऱ्याचे कण डोळ्यात जाऊ लागले, तेव्हा थोडा वेगाचा भास झाला. एकदा मनुष्य प्याला आणि गाडी चालवू लागला की त्याला भानच नसते.

काही वर्षांपूर्वी मी सॅन्फ्रान्सिस्कोला होतो. तिथून एका डायरेक्टरने मला डेव्हिस युनिव्हर्सिटीला नेले. मार्गात बरीच कांदा व लसूण यांची लागवड होती. शिवाय काजू, खिसमिस, अक्रोड, बदाम, द्राक्षे यांचे मळे दिसले. त्यांचा स्वाद घेत आम्ही डेव्हिसला पोहोचलो. सायंकाळी परत निघू असे तेथील डायरेक्टर म्हणाले, पण निघताना रात्रीचे

दहा वाजले. इतक्या रात्री दीडशे मैल कसे जावे हा एक प्रश्नच होता. तावडतोब ते म्हणाले की, आम्हाला तहान लागली. त्या डायरेक्टरने व ड्रायव्हरने तीन-चार पेग व्हिस्की प्राशन केली व तहान गेली; आता गाडी व्यवस्थित चालेल, असे ते म्हणाले. मला मागची सीट दिली होती व त्याने कडेच्या काचा बंद केल्या. गाडी सपाट्याने चालली व मला कडेच्या झाडाकडे पाहून वेग वाढत आहे असे दिसले. त्या डायरेक्टरला मी म्हणालो, 'या अंधाऱ्या रात्री तुमच्या गाडीचा वेग जास्त दिसतो. त्यांनी शांतपणे उजवा हात बाजूला केला व म्हणाले, ९५ ते १०० मैल ताशी आहे. गाडी मोठी होती. बहुधा कॅडीलॅक असावी; तरीपण ९५ ते १०० वेग ऐकून मी दचकलो मी त्यांना म्हणालो की, पोलीस काय म्हणेल ? कारण ६५ च्या वर वेग घेता येत नाही. ते चक्क म्हणाले की आता वेग १०१ झाला आहे व कोणताही पोलीस त्यांना पकडणार नाही. मी छातीवर हात ठेवून कडेला दडून तासभर बसलो व त्या वेळात मोटारीने १५० मैल पार करून ड्रायव्हरने मला घरी पोचविले होते.

त्या वेळी मी तरी काही प्यालो नव्हतो. पण आता त्या मार्टिनीचा प्रभाव माझ्यावर विशेषच दिसू लागला. त्या वेगाचे भान मला काही उरले नाही व लहान मुले जशी वारा लागल्यावर डुलक्या देतात तसे मला होऊ लागले. मी डुलक्या देत होतो व ते जोराने मोटर चालवीत होते व मला हातांनी हलवून खूप थट्टा करीत होते. असा हा प्रवास किती तास चालला याची जाणीवच राहिली नाही. मात्र एवढेच आठवते की मी 'गुड,' 'थँक्यू' असे शब्द सारखा वापरत होतो. त्या मार्टिनीची नशा दुसऱ्या दिवशीपर्यंत मला जाणवत होती.

मी तसा कधीच अशा पेयांच्या मागे लागत नाही. कारण ती घेतली की त्रास होतो. मला आठवते की मी २७ वर्षांचा असताना एका गावी प्रॅक्टिस करीत होतो. होळीचे दिवस होते व तिकडे त्या दिवशी जबरदस्तीने भांग पाजतात; म्हणून मी त्या दिवशी ते गाव सोडले व लांब एका खेड्यात एका मित्राकडे दडून बसलो. जशी संध्याकाळ होऊ लागली तशी त्या मित्राने म्हटले की, चला, अंधार होण्यापूर्वी आपण आपल्या गावाला जाऊ. मी कबूल केले व तो म्हणाला, काही चहा–कॉफी दुपारची घेऊ. मी म्हणालो, मी चहा-कॉफी काही घेत नाही. तसे त्याने दुधाचे सरबत आणून दिले. मी ते प्यालो आणि पायीच घराकडे निघालो. अर्ध्या तासाने मला माझ्या डोळ्याखाली गालावर कुणी गुदगुल्या करत आहे असे वाटले. हात लावले तर कुणीच नव्हते. पुढे जाताना पाय जमिनीवर टेकतात की नाही याची मला जाणीवच नव्हती. मी त्याला विचारले की, असे कसे तुमचे दूध ? तो म्हणाला, त्यात भांग होती. आता माझे धाबे दणाणले व घरी पोहोचल्यावर वडिलांना कळू नये म्हणून रामायणाची पोथी वाचण्याचा प्रयत्न केला. डोळे पुष्कळ विस्फारले. पण अक्षर काही दिसेना. मी पोथी उलटी करून पाहिली, सुलटी करून पाहिली, पण अक्षर काही दिसेना. जेवायला बसलो. किती पोळ्या खाल्ल्या हेच

मला कळेना. घरचे लोक म्हणाले की किती दिवसांचा उपाशी आहेस ? किती पोळ्या खातोस ? तसाच निजलो. गाढ झोप लागली. दुसऱ्या दिवशी तीन वाजेपर्यंत माझ्या स्मरणशक्तीवर नशा जाणवत होती. तसेच त्या दिवशी ब्राझीलमधे मार्टिनीचा परिणाम जाणवू लागला.

चारपाच दिवस अधिवेशन चालले होते. काही जर्मन संस्थांनी मला भारतीय तत्त्वज्ञानाबद्दल भाषण देण्याला पाचारण केले. या लोकांनी मॅक्समुलरच्या भाषांतराचा चांगलाच अभ्यास केला होता. यामुळे माझी थोडी पंचाईत झाली पण उच्चारण्यात आलेल्या आनंद व अनंत या दोन शब्दांची त्यांची नेहमीच गल्लत होत असे व ते पाहून मी दिवस जिंकला. भगवद्गीतेतील प्रत्येक अध्यायात विशिष्ट प्रकारची विचारशैली आहे व तुम्हाला जी आवडेल त्याचे अध्ययन करा अशी गीतामाऊली सांगते. उपनिषदांची ती जन्मदात्रीच आहे, हे माझे विचार त्यांना आवडले व कैक वर्षापर्यंत त्यांची मला पत्रे येत होती.

आता परत येण्याची वेळ सुरू झाली. पॅन अमेरिकन विमान कंपनीत संप सुरू होता. पण वारीग एअर लाईन्सने प्रवास करण्याचा माझा बेत पाहून पॅन अमेरिकनचे लोक म्हणाले, " पाहा बरे, तुम्ही आपल्या सामानाची गैरसोय करत आहात !" कारण या कंपनीचे विमान प्रवाशांचे सामान हरवत असते ! माझा त्यांच्या विधानावर विश्वास बसेना, कारण जवळपास सगळ्या कंपन्या सामानाची गैरसोय करत असतात. अमेरिकेतील नॉर्थ वेस्टर्न एअर लाइन्सने न्यूयॉर्क ते मिलवाकी असा प्रवास करताना पुढे ऑश_ कॉश गावी गेलो, तेव्हा माझे सामान ऑशकॉशला मिळाले नाही. दोन दिवसांनी मात्र परत आले. माझे चिरंजीव एकदा न्यूऑरलेन्सहून शिकागोला जात असताना त्या विमान कंपनीने त्यांचे सामान गहाळ केले, ते पाच वर्षे झाली तरी मिळाले नाही. त्याचे पासपोर्ट व इतर खाजगी सामान त्यात होते. त्यामुळे त्याची फार गैरसोय झाली व विमान कंपनीने ५०० डॉलर्स नुकसानभरपाई देऊन काम संपविले एअर इंडियाच्या एका फ्लाईटवर एका प्रवाशाचे सामान हरवले व ते त्यांना ४० दिवसांनी परत करण्यात आले. इतकेच काय, आता आमच्या घरी येणाऱ्या एका पाहुण्याने (टोरँटो) कॅनडाहून मुंबईचा प्रवास केला. त्या अलइटालिया विमान कंपनीने त्यांचे सामानच गहाळ केले. परिणामी ते नुसते अंगावरच्या कपड्यानिशी विमानतळावरून घरी आले. आता कुठे दहा दिवसांनी त्यांना सामान मिळाले. पण पेट्या कशा ओल्या होऊन. आतील सामान ओलेचिंब झाले होते. या घटनेमुळे सगळ्याच कंपन्या थोड्याफार प्रमाणात सामान गहाळ करण्यात वाकबगार आहेत असे मी सांगितले. ब्राझिलची वारीग एअर लाइन आम्हाला परत नेण्यास तयार झाली. या नवीन एअर लाईनवर कसे काय जमेल हा विचार न करता मी तिथे एक सीट घेतली. त्यांच्या विमानातील कारपेटवर प्लॅस्टिक अंथरलेले असते व प्रवाशांनी नेहमी यावे याकरता उतारूंची ते चांगली देखभाल करतात. विमान सुटल्यावर खारे काजू,

बदाम, मॅकेडेमियानट यांची पाकिटे तर दिलीच, पण भराभर पेले भरून मदिरा प्रवाशाच्या हाती येऊ लागली. त्या मार्टिनीची आठवण मला पुन्हा झाली व मी सोडाच मागितला. रात्रभर विमानातील परिचारिका विमानभर फिरत होत्या व प्रवासी उठला की त्याला मदिरा आणि काजू द्यायच्या. तो निजला की त्याच्या अंगावर पांघरूण टाकायचा. या वारीग विमानाच्या प्रवासाची एकच अडचण होती, ती म्हणजे स्पॅनिश भाषा. तसे स्पॅनिश लोक शरीराने धडधाकट व कातडीने गोरे असले तरी त्यांचा गोरेपणा भारतीय गोरेपणासारखा असतो. शिवाय त्यांचे केस आपल्यासारखे काळे असतात. घारे डोळे व उकडलेल्या रताळ्यासारखा रंग हा तर युरोपातील काही देशातच दिसतो.

या अशा नवीन कंपनीच्या विमानयात्रेकरता तिकीट बुक केले. पण ह्या विमान लाईनने मी प्रवास करू नये असे पॅनअॅमचे लोक मनापासून म्हणत असत. ते काही असो, त्या दोन लक्ष क्रुसेडोची क्षती पाहता एकंदरीत निर्याणाबद्दल मी आपल्या मनाशी ठरवले. सावोपालो येथील अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी मोठी मेजवानी झाली. या मेजवानीत जेवताना प्रत्येक राष्ट्राबद्दल आपुलकी व राष्ट्राध्यक्षांबद्दल 'टोस्ट' घेण्यात आला. टोस्ट म्हणजे दारूचा पेला घेऊन एक दुसऱ्याच्या पेल्याला हलकीशी ठोकर द्यायची व दारूचा घोट घ्यायचा. काही भाषणे पण झाली. भारताबद्दल लॅटीन अमेरिकन देशात किती आपुलकी आहे हे माझ्या निदर्शनास आले. जेवण बरेच लांबले. ते सगळे संपल्यावर पिण्याची चढाओढच लागली. आणि एकदा मदिरा चढली की मनुष्य काय बरळेल याचे त्याला भान नसते. माझा वेश-शर्ट कॉलरचा होता. जरा निराळाच होता. यामुळे त्या गोऱ्या लोकात मी उठून दिसत होतो. ते प्यालेले लोक गुडबाय करत सारखे हात दाबत होते. त्या ओळखीच्या जर्मन स्त्रिया अगदी डोळ्यात अश्रु आणून निरोप देत होत्या. अर्थातच त्यांना पण चढली होती हा पिण्याचा कार्यक्रम संपताच मी खिशातील क्रुसेडोंचे पाकीट तपासले. कारण पिण्यामागे लोकांकरिता बाटल्या मागवूनच त्यांची क्षती झाली होती व तो रोडावलेला क्रुसेडोचा पुडा पाहत मी तिथून पळ काढला. दुसऱ्या दिवशी डॉ. होगीकडे भेटून आलो व मिसेस होगीने फार प्रेमळ स्वभावाने निरोप दिला. मार्गात काही सूट घातलेले भिकारी दिसले. त्यांच्या हाती क्रूस होता व ते देवाच्या नावाखाली पैसे मागत होते. त्यांच्या हाती मी दहा क्रुसेडोची नोट ठेवली. त्यांनी ती सरळ परत केली व म्हणाले, तुम्हीच ठेवा. 'तुमच्या कामाला पडेल!' १०० क्रुसेडोच्या खाली भिकारी पण भिक्षा घेत नव्हते. आंतरराष्ट्रीय बाजारात एका अमेरिकन डॉलरला ४०० ते ५०० क्रुसेडो मिळत असत. आता हा भाव १२०० पर्यंत गेला आहे.

सायंकाळी सगळ्यांची भेट घेतली व विमानतळाकडे निघालो. रात्रीचे जेवण भारीच झाले होते. याशिवाय आमच्या अधिवेशनानिमित्त शासनातर्फे एक विशिष्ट अश्वधाव स्पर्धा आयोजित केली होती. तिथेसुद्धा खाणे बरेच झाले. या खाण्यात गुरांच्या मांसाचे तुकडे टाकून सुंदर केक बनविले होते. भारतात केकमधे कुणी मांस टाकत नाही,

यामुळे ते मांसाचे तुकडे काढून केक खाता खाता नाकी नऊ आले ! ती रेस पाहण्याला चिक्कार गर्दी झाली होती. गावातील मोठेमोठे लोक सपत्नीक व मैत्रिणींसह शर्यतीवर पैसे लावत होते. पण मी नकार देत असतानासुद्धा एका मित्राने माझ्या नावाने काही क्रुसेडो लावले व तो हरला. त्या सुंदर वस्त्र परिधान केलेल्या घोळक्यात मला कसे गुदमरल्यासारखे होत होत. कसेतरी संधी साधून तिथून निसटलो व विमानतळावर आलो. तोपर्यंत पोटात जणू काय ' भूकंप 'च सुरू झाला होता. विमान वेळेवर सुटले व रात्रभर प्रवास करून न्यूयॉर्कला सकाळी आलो. ती रात्र मी सोडा पीतच काढली. कॅनडा एअर पोर्टच्या जवळ ठरलेल्या हॉटेलवर वारीग एअर लाईन्सच्या लोकांनी मला ठेवले. झोपण्याचा पुष्कळ प्रयत्न केला, पण पोट बिघडल्यामुळे सारखे उठावे लागे. हे हॉटेल जरी विमानतळाजवळ होते तरी सडकेच्या पलीकडे असल्याने वळसा घालून जावे लागे. प्रकृती तशी ढासळत होती, व मला वाटले की अंगात जरा ताप पण भरत आहे. आता मुंबईला जाण्याकरता आपल्या देशाच्या- एअर इंडियाच्या विमानाने जावे. त्यामुळे शाकाहारी अन्न मिळेल व काही औषधही मिळेल, असे वाटले. एअर इंडियाच्या विमानतळावरील ऑफिसात गेलो व तेथील एका पारशी बाईला भेटलो. तिचे उर्मट भाषण ऐकून मला माझीच लाज वाटू लागली. तिला शेवटी दम दिला व तिच्याबद्दल रिपोर्ट करीन असे म्हणताच तिने आपले कार्ड दिले व अवश्य रिपोर्ट करा म्हणून निघून गेली. त्या काळी एअर इंडियाच्या परिचारिका व बरेच विमानवाहक लोक भारतीयांना कमी लेखत होते व परदेशी लोकांची अमाप स्तुती करत होते. याचे हे एक उत्तम उदाहरण मला दिसले शेवटी मी एअर इंडियाच्या न्यूयॉर्कच्या मॅनेजरला फोन लावला, तो मनुष्य बरा होता. एअर इंडिया काय ? सरकारी शासक काय ? सगळीकडे लहान अधिकारी उर्मटच वागतात पण मोठे अधिकारी सौजन्य दाखवतात, असा कैक लोकांना अनुभव आला आहे. हे ऑफिसर न्यूयॉर्क शहरातून कॅनडाच्या एअरपोर्टवर तडक आले व मी जिथे दोन तास तिष्ठत बसलो होतो तिथे येऊन माझी माफी मागितली. त्यांनी स्पष्ट सांगितले की, अशा मोठ्या श्रीमंतांच्या मुली एअरलाईन्समध्ये शिरल्या आहेत व कैक यात्रेकरूंना अशीच वागणूक देतात. त्याबद्दल मी रिपोर्ट करावा व काही तरी उपाययोजना करावी. या मॅनेजरने बराच चांगुलपणा दाखवला व एअर इंडियाच्या विमानात एक सीट मला दिली. शिवाय माझ्या औषधपाण्याची व्यवस्था केली. आपल्या वेटर्सना फोन करून माझ्याकरता मुगाच्या डाळीची खिचडी व दही याची व्यवस्था करायला लावली. सरतेशेवटी मला ते स्वत: विमानात नेऊन उत्तम जागेवर बसवून परतले. त्यांचे मी नेहमीच आभार मानेन.

मॅनेजरने विमानात बसविल्याबरोबर सगळे स्टुअर्ड व परिचारिका भराभरा माझा पाहुणचार करू लागले. पोट बिघडल्यामुळे मी काहीच घेऊ शकलो नाही. विमानतळावर मात्र क्रुसेडोचे रूपांतर डॉलरमध्ये करून घेतले. तेव्हा खिशात अवघे ३५ डॉलर होते. विमान दुसऱ्या दिवशी सकाळी लंडनला पोहोचले. विमानतळावर मी आडवा पडूनच

होतो कैक भारतीय स्त्रिया प्रसाधनसाधनांनी भरलेल्या शोकेसभोवती घिरट्या घालीत होत्या. माझे काही नवीन अमेरिकन कपडे पाहून एकीने ओळख करून घेतली. ही एक भारतीय ब्रिगेडियरची पत्नी होती. तिचे चिरंजीव आणि मुली लंडनला शिकत होते. तिने आपल्या पतीची व माहेरची बरीच फुशारकी मारली, व हळूच 'काय सुंदर सुगंधी सेंट आहेत!' असे म्हणून मला त्या शोकेसकडे घेऊन गेली. जवळपास बऱ्याच स्कॉच व्हिस्कीच्या बाटल्या होत्या. तिकडे पण तिचे लक्ष गेले. तिने निर्विकार नजरेने त्या बाटल्या विकत घेतल्या व व्हॅट ३६ च्या दोन बाटल्या गोळा केल्या. आता पैसे देण्याची पाळी आली. तिच्या खिशात पैसे नव्हते. ती गोडगोड बोलत माझ्याजवळ उभी राहिली व म्हणाली, " दिल्लीला सगळ्या मैत्रिणी येतील, त्यांच्याकरता काही घेतले पाहिजे म्हणून खरेदी केली ! असे सुवासिक सेंट भारतात कधी मिळणार नाही. मी तिच्या बोलण्याकडे लक्षच दिले नाही. मग तिने पटकन सांगितले, " तिचे पती एका रेजिमेंडचे कमांडर आहेत. तिने आणलेले पौंड आदि लंडनला दिले व घेतलेल्या मालाबद्दल काही पैसे कमी पडतात. मी चूपच होतो. ती जवळ आली व म्हणाली, " देखिये, हम आप दोनो हिंदुस्तानी है। परदेसमे एक दूसरेकी मदत करना हमारा फर्ज है।" याचा अर्थ एकच होता, की तिला पैसे हवे होते. आणि तेसुद्धा २५-३० डॉलर्स. मी खिशावर हात ठेवला आणि विचार करू लागलो, तोपर्यंत ती म्हणाली, " मुंबईला पोहचताच दिल्लीहून तारेने मनी-ऑर्डर करून पैसे परत करीन. दोन-तीन आणखी पंजाबी ललना जवळ आल्या व प्रत्येकीने देखिये म्हणत 'दे दिजियेना' म्हणत गळ घालू लागल्या. मी विरघळलो. फार कष्टाने पाकीट काढून ३० डॉलर दिले. तसे माझ्याजवळ काही भारतीय रुपये होते. पण ती बाईना पैसे घेताच थँक्यू थँक्यू म्हणत तिने माझ्या हनुवटीला हात लावला व सांगितले 'जाते बराबरही पैसे आपको मिलेंगे।' तिने मला पत्ता दिला व माझा पत्ता घेतला. हा सौदा झाल्यामुळे मी न्यूयॉर्कहून आणलेल्या एका बाहुलीशिवाय मुलांकरता काहीच घेऊ शकलो नाही. मात्र त्या मिसेस ब्रिगेडिअरबाईने चहा पिता का हे आमंत्रण दिले व ते मी नाकारले. दोन तासांनी विमान आले व आम्ही भारताकडे जाण्यास निघालो. विमानात बसताना ती बाई व तिच्या मैत्रिणी लांबच बसल्या आणि ते विमान बेरूटला सायंकाळी पोहोचले. तिथे जवळपास दीड तास थांबणार होते. त्या वेळी लॅबेनॉन हा देश उन्नत अवस्थेत होता. बेरूट शहराला प्रती पॅरिस म्हणत असत. पॅरिसप्रमाणे ऐषआरामात आयुष्य घालवण्याकरिता प्रवासी या शहरात येत असत. विमानतळावर ड्यूटी फ्री सामान पण बरेच मिळत असे. यामुळे विमानातील उतारू सरळ त्या विमानतळाच्या बाजारपेठेत शिरले. माझ्या खिशात जेमतेम थोडेच पैसे होते; म्हणून खिशात हात घालून मी विमनस्क मनाने इकडे तिकडे पाहत पायऱ्या चढत होतो. लॅबेनॉन हा देश जरी इस्लाम धर्माचा असला तरी तेथील स्त्रिया व मुली बुरखा घालीत नव्हत्या. स्कर्ट ब्लाऊज घातलेल्या त्या गोऱ्या गोमट्या नि सरळ नाकाच्या मुली आपल्या काळ्या केसांचा सोटा

बाजूला सारीत उतारूतील ग्राहकांना समोर येऊन दुकानात येण्याचे आमंत्रण देत होत्या. फ्रेंच, जर्मन आणि इंग्लिश तिन्ही भाषा मोडक्यातोडक्या शब्दात लाडीगोडीने हावभाव करून त्या बोलत होत्या. घड्याळे, रेडिओ, मदिरा, सेंट, सिगरेटी, कपडे व खेळणी प्रत्येकाची दुकाने कशी घसघशीत भरली होती. एक सोटेवाली माझ्याजवळ पण आली, तिने जर्मन भाषेचा प्रयोग केला. मी फ्रेंचमध्ये नाही म्हणून उत्तर दिले. कारण मला तेवढाच फ्रेंच शब्द माहीत होता. खूप लाडीगोडी करून सगळ्या दुकानाची तारीफ व नाईटक्लबचीसुद्धा तारीफ करत होती. मी तिचा सोटा धरून नो नो म्हणत तिच्या पाठीवर हात ठेवून तिला बाजूला सारले. ती हिरमुसली व रडके तोंड करून कडेला झाली. ती जात नाही तो एक दाढीवाला आला व त्याने पण तेच नाटक सुरू केले. मी 'पैसा नाही' म्हणताच एका अमेरिकन डॉलरला तीस भारतीय रुपये देतो, जेवढे डॉलर असतील तेवढे देऊन टाका. असे तो म्हणाला. भारतीय रुपयाचे इतके अवमूल्यन झालेले पाहून मला वाईट वाटले. असेच एकदा स्वित्झर्लंड येथील कस्टम्समध्ये सामान तपासल्या-नंतर खिशातील भारतीय रुपये स्वित्झ फ्रँकमध्ये रूपांतर करण्याला त्यांना विचारले. त्याने कचरापेटीकडे बोट दाखवून ते तिकडे फेका, एवढेच उत्तर दिले. आपल्या रुपयाची ही अवहेलना थोडी असह्यच झाली.

बैरूटच्या त्या बाजारात दीड तास घालविला, पण काही घेऊ शकलो नाही रात्री दहाला विमान सुटले व तोपर्यंत प्रकृती जरा सुधारली होती. म्हणून एअर इंडियाच्या शाकाहारी भोजनाचा यथेच्छ लाभ घेतला. जेवण झाले व परिचारिकेने आणलेल्या ट्रेवरून काही सामान घेतले. तोपर्यंत जवळपास भारतीय वेळाप्रमाणे रात्रीचे बारा वाजले होते. जरा डोळा लागतो तेवढ्यात मुंबई आली. मुंबई येताच सामान गोळा केले व खिशात हात घालून पैसे मोजले. तर आता अवघे दोनच डॉलर खिशात उरले होते. कुठे दोन लक्ष क्रुसेडोची गुर्मी व कुठे आता खिशातले दोन डॉलर ! हे लक्षात येताच 'लक्ष्मी किती चलायमान असते' याचे प्रात्यक्षिक घडले. नशिबाने विमानतळावर ऑफिसची गाडी व घरची मंडळी आली होती. यामुळे टॅक्सीचा खर्च वाचला.

आता प्रश्न एकच उरला होता, की ३० डॉलर कसे मिळावे ? त्या ब्रिगेडियरच्या पत्नीने ताबडतोब पैसे देते असे आश्वासन दिले होते. पण तीन महिने पैशाचे दर्शन झाले नाही. शेवटी मला तीन पत्रे लिहावी लागली. त्याचे पण उत्तर दिले नाही. अखेर कंटाळून त्या ब्रिगेडियर महाशयाला बातमी कळवली, तेव्हा त्याने डॉलर तर पाठवले नाहीच, पण त्याऐवजी भारतीय रुपयाचा एक छोटासा चेक पाठवून कानावर हात ठेवले. धन्यवाद तर जाऊच दे, पण पत्राची पोचसुद्धा त्या श्रीमंत बाईने पाठवली नाही. याकरिता परदेशात प्रवास करताना अशा अनाहूत ओळखीबद्दल माणसाने सावध राहिले पाहिजे.

*(या घटनेचा काळ : १९६७)*

# २ : सुखी देशात अनुभवलेले क्षण

कुटुंबात पहिले मूल आले की आईला किती आनंद होतो. ते मूल मुलगा असला तर हा आनंद द्विगुणित झालेला आपल्या देशात दिसेल. मग त्या मुलाचे लग्न, घरात येणारी सून, सुखी संसाराची अपेक्षा, आदि सुखासीन बाबी ठरलेल्या असतात. मुलाला चांगली आर्थिक प्राप्ती झाली व तो ऐषआरामात दिवस घालवितो असे कळल्यास त्या आईला पुत्रभेटीबद्दल कसा ओढा लागतो याचा अनुभव घेण्याला आईचाच जन्म घ्यावा लागेल !

असेच एकदा आमच्या सौभाग्यवतीला झाले. अमेरिकेत मुलाकडे जावे, सुना-नातवाचे कौतुक करावे, याची तिला सारखी ओढ लागली होती. मग नुकतेच आम्ही त्या देशाचा चार महिन्यांचा दौरा केला. ब्रिटिश एअरवेजच्या विमानाने मुंबई ते लंडन व तिथून शिकागो गाठले. दुपारी ३ ला 'लोओहेर' विमानतळावर विमान उतरले. प्रकृती ठीक नव्हती म्हणून पत्नीला खुर्चीवरून कस्टम्सकडे नेण्यात आले. वरच्या माडीवरील काचेच्या खिडक्यातून मुले हातवारे करताना पाहून तिला किती आनंद झाला. बाहेर पडताच सुना-नातवांनी पायांवर डोके ठेवताच तिला आनंदाश्रू आवरेनात. त्यांची मोटारगाडी कशी भव्य होती व तिने १८० मैल ३ तासात पार केले.

सकाळी सगळे घर पाहून घेतले व तिथे दिवाळीची तयारी केली. सगळे पदार्थ केले. लाडू, करंज्या, चकल्या, शेव सगळ्या वस्तू भारतात मिळतात तशा सामानानी केल्या. देव नेले होते. पूजापाठ तर झालाच, पण सायंकाळी लक्ष्मीपूजन व फटाकेसुद्धा वाजविले.

संसार सुखाचा होता; पण त्यात अमेरिकन संस्कृतीचे तिखटमीठ उफाळून येत होते. धुणेभांडे, झाडलोट स्वत: सूनबाई करीत होत्या, शिवाय स्वयंपाक तीच करी. समाजात समरस होण्याला आठवड्यातून एकदा ब्रिज, टेनिस होत असे. आम्ही नेहमीच्या सवयीप्रमाणे गावात पायीच फिरण्याचा सपाटा लावला. इकडे कुणी सहसा पायी चालत नाही. गाड्याच वापरतात. चार-पाच मराठी कुटुंबे होती. त्यांना भेटून यावे म्हणून चक्कर मारली. परत आल्यावर सूनबाई म्हणाल्या, "इकडे अपॉइंटमेन्ट घेतल्याशिवाय कुणी

कुणाच्या घरी जात नाही " बस्स ! इथूनच नवीनतेची जाणीव सुरू झाली.

ऑक्टोबर महिना संपला की शेतातली कामे कमी होतात. कापणी, मळणी झाली की त्यांना घरात लक्ष्मी आल्याचा भास होतो. हा आनंद भारतात दसरा-दिवाळी सणाच्या रूपाने व्यक्त केला जातो. इतर देशातसुद्धा असे आनंदाचे सण साजरे करतात.

अमेरिकेत हालोविन नावाचा सण याच सुमारास साजरा होतो.

इलिनॉईस प्रांतातली जमीन खूप सुपीक असून इथे मका, सोयाबीन, तुरळक गहू व काही भाजीपाला पिकवतात. शेतीचा हंगाम ऑक्टोबरपर्यंत संपतो. या हालोविन सणाला या प्रांतात लाल भोपळा आणतात. एका टोकाकडून लहान छिद्र पाडून तो पोखरतात समोर माणसाच्या मुखवटयाचे डोळे, नाक, तोंड करतात व रात्री आत मेणबत्ती पेटवून हे भोपळे प्रत्येक घराच्या दारासमोर मांडलेले दिसतात. ही भोपळयाची आरास ३१ ऑक्टोबरला सुरू झाली. सकाळी गावातल्या लहान मुलांचा एक मेळावा झाला. गावातल्या बाजारपेठेजवळच्या चौकात तीन ते दहा वर्षाची मुले जमली. प्रत्येकाने काहीतरी सोंग घेतले होते. कुणी अस्वल तर कुणी कुत्रा, मांजर, बेडूक, चेटकीण, पेन्सिलवही-पुस्तक असे विविध प्रकारचे सोंगाडे व रूप धारण करून पालकांबरोबर मुले फिरू लागली. मंद बँडच्या सुरात त्यांची मिरवणूक निघाली. दोन फर्लांग फिरून ते चौकात आले. प्रत्येक सोंगाची तपासणी झाली. उत्तम सोंगाला बक्षीस दिले.

घरी लंच घेऊन पुन्हा पालक मुलं त्या शहरातल्या मॉलमध्ये गेली. लहानमोठ्या शहरात सुपर मार्केटप्रमाणे एकाच छपराखाली वेगवेगळी दुकानं असून मध्यावर कारंजे, बसण्याची व्यवस्था व बाग केलेली असते. त्याला मॉल म्हणतात. मुलं मध्यावर आली. समोरच्या मंचावर दोन अस्वलरूप धारण केलेले गृहस्थ त्यांच्या रिंगमास्टरबरोबर बँडच्या तालावर नाचत होते. बालगीते सामूहिकरीत्या गायली. प्रांतगीते नृत्याबरोबर झाली. मुलांना खाऊ दिला व ती घरी आली. संध्याकाळी सगळीकडे भोपळयांची आरास होती. अंधार पडल्यावर मोठ्या मुलांनी भूत, चेटकीण आदि भीतीदायक सोंगे घेतली, ते ८ – १० च्या समूहानं घरोघरी फिरू लागले. दाराची घंटा वाजवत, दार उघडलं की, " ट्रिक ऑर ट्रीप " म्हणत. बहुतेक घरात त्यांना खाऊ दिला जात असे. तिकडे मोठी मंडळी विश्रामगृहामध्ये मेजवानी व नृत्य करण्यात गुंतली होती. रात्री अकरा वाजेपर्यंत हा शेतकऱ्यांचा सण साजरा झाला.

शेतकऱ्याच्या घरात शेती तरी कशी आहे याबद्दल उत्सुकता निर्माण झाली. एका खेडयास भेट देण्याचे ठरवले. तेथील प्राथमिक स्वरूपाच्या दवाखान्यास भेट देत असत. शेकडो एकर शेतांच्या कडेकडेनं त्यांनी मला अलेक्सीला नेलं. नुकताच त्यांचा दुसरा विवाह झाला होता. त्या देशातील सामाजिक चालीरीती व विवाहसंस्थेबद्दल बऱ्याच गप्पा झाल्या. त्या देशात कृष्णवर्णीय लोकात ५० टक्के मुली अल्पवयातच म्हणजे १३–१५ च्या वर्षीच अविवाहित माता बनतात हे प्रमाण श्वेतवर्णीयात १० टक्के आहे. या सम-

त्येला आळा घालण्याकरता गेल्सबर्गला शासकीय उपदेश संस्था आहेत. तिथे या अल्पवयीन मुलींना यथोचित सल्ला दिला जातो. खेड्यातल्या मुलात दोन लागट व्याधी मिसेस विन्ट्री यांना दिसल्या. एक म्हणजे, खरूज व दुसरी उवा. अलेकसी गाव एकदाचं आलं. दोनशे घरांच्या या गावात टेलिफोन, वीज, नळाचे पाणी, छोटं पोस्टऑफिस, लहानशी बाजारपेठ, एक हायस्कूल व दोन जवळपासच्या धान्याच्या साठा एकत्रित ठेवण्याचे सायलो होते. रात्री एक पोलीस गस्त घालून जात असे.

पहिल्या दिवशी हायस्कूलला भेट दिली. विद्यार्थ्यांना 'कीटक व मानव' यावर भाषण दिले. मुलांनी शांतपणे ऐकलं. पण मुली मात्र 'बबलगम' तोंडात चघळून फुगे काढत होत्या.

दुसऱ्या दिवशी मि. फेल या शेतकऱ्यानं आपला ट्रक आणला व शेतावर नेले. त्याची २०० एकर शेती होती, ते एकटेच कंबाइन या मोठ्या मशीनच्या साहाय्यानं नांगरणी, पेरणी, निंदणी, कापणी, मळणी व पेंढ्या बांधून ठेवणे ही सर्व कामे करीत. त्या शेतावर त्यांना त्या वर्षी प्रति एकर २२५ बुशल मका झाला. तो त्यांनी अडीचशे डॉलर प्रति बुशल या भावानं विकला. स्वतःच्या शेतीचा मका असा विकतात. ते धान्य गुरे किंवा आता 'गेसोहाल' नामक पेट्रोलप्रमाणे मोटारीत जाणारे अल्कोहोल या कामी येते. स्वतःला खाण्यासाठी दुसरीकडून धान्य आणतात. बहुतेक शेतकरी शेतीला जोडधंदा म्हणून डुकरांची पैदास करतात.

मि. फेलची पत्नी शिक्षिका होती. मुलगी नर्सिंगचा कोर्स दुसरीकडे करत होती व मुलगा नुकताच कॉलेजमध्ये जाणार होता. तो मात्र अधूनमधून वडिलांना मदत करत असे. मला वराह उत्पादन कक्ष दाखवण्यासाठी त्यांनी कोट, पँट, बूट, हातमोजे, टोपी, नाकावर प्लॅस्टिक पट्टी दिली. ६० X २० फूट बंद व वातानुकूलित खोलीत नेले. ही खोली शेतावर त्याच मापाच्या मोठ्या टाकीवर उभी होती. लाकडाची मधे मधे फटी असलेली फरशी व तिच्यावर ६X५ चे कठडे होते. प्रत्येक कठड्यात चांगली मोठी डुकरीण पहुडली होती व १०–१२ पिल्ले तिला झोंबून दुग्धपान करत होती. त्या खोलीतली सर्व घाण त्या फरशीच्या फटीतून खालच्या टाकीत पडून कुजत असे. त्यामुळे तिथे इतकी दुर्गंधी पसरली होती, की नाकावरच्या पट्टीचा काही उपयोग झाला नाही. त्यानं कपडे दिले ते याकरताच की कोणत्याही कपड्याला ही दुर्गंधी चिकटते व बराच वेळ टिकते. मला या दुर्गंधीचा वास कैक वेळा स्नान केलं तरी नाकात तीन दिवसपर्यंत जाणवत होता. मि. फेल यांना आता सवय झाली होती व दर डुकरामागे २०० डॉलर उत्पन्न मिळत असे.

या शेतीबद्दल बरंच कुतुहल निर्माण झालं. इलिनॉयस प्रांतात लक्षावधी एकर अशी शेती आहे व तिथल्या शेतात सहा फूट माती मिळते. यंत्र व रासायनिक खते व औषधे यावर भर होता. पण ट्रॅक्टरने भराभर नांगरलेल्या जमिनीवरून लक्षावधी टन माती उडून जाताना दिसली. या जमिनीच्या धुपण्याबद्दल तेव्हाच एक परिसंवाद झाला.

गेल्सबर्ग लहान शहर असून इथं अवघी ५० हजार वस्ती होती. प्रत्येकाच्या घरी मोटार होती. घरे सगळी लाकडाची. आत उत्तम सजावट व भारी नायलॉन तथा लोकरीचे गालिचे पसरले होते. घरात जरी वातानुकूलता असली तरी नायलॉन, लाकूड व प्लास्टिक पेन्टनं भरलेली ही घरे मला अक्षरश: 'लाक्षागृहे' भासली. बहुतेक घरात नुसत्या धुराचा संकेत देणाऱ्या घंटा होत्या. आग लागण्यापूर्वी जरा जरी धूर निघाला तरी या घंटा वाजायला लागत. घरातल्या ज्वालाग्राही पदार्थांमुळे ही घंटा वाजली की अवघ्या ९० सेकंदात घर सोडले तरच मनुष्य बचावतो.

गाव लहान असल्यामुळे एक तर कृष्णवर्णीय अगदीच तुरळक होते. शिवाय फूटपाथवरून अगदी सकाळी व संध्याकाळी नागरिक क्वचितच दिसत. त्यामुळे मला रोज सकाळ संध्याकाळ खुल्या हवेत फिरण्याची मजा इथे फार मिळाली. एकादा विरळ 'जॉगिंग' करणारा किंवा करणारी वगळल्यास मला कुणी भेटतच नसे. भेटलाच तर हटकून 'हाय' म्हणून हात वर करी. अशा या एकट्या फिरण्यात निसर्ग दिसे, पण हिवाळा सुरू झाल्यामुळे वृक्षांची पाने प्रथम केशरी झाली व मग गळू लागली. पाखरेसुद्धा कमी होऊ लागली.

अमेरिकेत एकटे फिरताना गावगुंड त्रास देतात, असे ऐकले आहे. पण ते मोठ्या शहरी, विशेषत: न्यूयॉर्क, शिकागोकडे दिसतात. शिकागोच्या लाओहेर या प्रमुख विमानतळावर इकडे येण्याकरता सर्व मंडळीसह आम्ही एकदा पोचलो. घरची मंडळी दुपारची न्याहरी घेत होती. मी बाथरूममध्ये गेलो. तिथे एक मिनिटसुद्धा थांबलो नसेन, की माझ्यामागे एक चांगला रेशमी सूट घातलेला मनुष्य थेट माझ्यापर्यंत आला व मला दरडावून म्हणू लागला की, 'सिगारेट काढा!' मी जरा नरम स्वरात म्हणालो, 'मी सिगारेट पीत नाही.' तो पुन्हा ओरडला, 'दोन डॉलर द्या!' व अगदी माझ्या पाठीशी टेकून 'क्विक क्विक' असे म्हणू लागला. मला कळले की मी खिशात हात घातला तर हा नक्की लुबाडणार, 'वेट अ बिट' असे म्हणत मी कोटाची बटणे उघडण्याचा आव आणला. नशीब बलवत्तर होते. तेवढ्यात आम्ही दोघेच त्या बाथरूममध्ये असताना बाहेरील दार एकाएकी उघडले व तीन-चार अमेरिकन लोक आत शिरले. त्यांना पाहताच हा सरळ बाहेर पळाला व मी वाचलो. अशी कैक उदाहरणे देता येतील, पण लहान शहरी असे उपद्व्याप जास्त होत नाहीत. मला भारतात असताना रोज मैल दोन मैल फिरण्याची सवय होती. त्याप्रमाणे रोज सकाळ संध्याकाळ गेल्सबर्ग या छोट्या शहरी फिरू लागलो. ऑक्टोबर संपून नोव्हेंबरचा महिना सुरू झाला. मेपल, बर्च, आदींची मोठी वृक्षराजी आता हिरव्या पानाबद्दल केशरी पाने दाखवू लागली. पक्ष्यांचा कलरव पण कमी भासू लागला. हवेत चांगलाच गारठा जाणवू लागला. तरी आमचे फिरणे चालूच

ऱ्येला आळा घालण्याकरता गेलसबर्गला शासकीय उपदेश संस्था आहेत. तिथे या अल्पवयीन मुलींना यथोचित सल्ला दिला जातो. खेड्यातल्या मुलात दोन लागट व्याधी मिसेस विन्ट्री यांना दिसल्या. एक म्हणजे, खरूज व दुसरी उवा. अलेकसी गाव एकदाचं आलं. दोनशे घरांच्या या गावात टेलिफोन, वीज, नळाचे पाणी, छोटं पोस्टऑफिस, लहानशी बाजारपेठ, एक हायस्कूल व दोन जवळपासच्या धान्याच्या साठा एकत्रित ठेवण्याचे सायलो होते. रात्री एक पोलीस गस्त घालून जात असे.

पहिल्या दिवशी हायस्कूलला भेट दिली. विद्यार्थ्यांना 'कीटक व मानव' यावर भाषण दिले. मुलांनी शांतपणे ऐकलं. पण मुली मात्र 'बबलगम' तोंडात चघळून फुगे काढत होत्या.

दुसऱ्या दिवशी मि. फेल या शेतकऱ्यानं आपला ट्रक आणला व शेतावर नेले. त्याची २०० एकर शेती होती, ते एकटेच कंबाइन या मोठ्या मशीनच्या साहाय्यानं नांगरणी, पेरणी, निंदणी, कापणी, मळणी व पेंढ्या बांधून ठेवणे ही सर्व कामे करीत. त्या शेतावर त्यांना त्या वर्षी प्रति एकर २२५ बुशल मका झाला. तो त्यांनी अडीचशे डॉलर प्रति बुशल या भावानं विकला. स्वतःच्या शेतीचा मका असा विकतात. ते धान्य गुरे किंवा आता 'गेसोहाल' नामक पेट्रोलप्रमाणे मोटारीत जाणारे अल्कोहोल या कामी येते. स्वतःला खाण्यासाठी दुसरीकडून धान्य आणतात. बहुतेक शेतकरी शेतीला जोडधंदा म्हणून डुकरांची पैदास करतात.

मि. फेलची पत्नी शिक्षिका होती. मुलगी नर्सिंगचा कोर्स दुसरीकडे करत होती व मुलगा नुकताच कॉलेजमध्ये जाणार होता. तो मात्र अधूनमधून वडिलांना मदत करत असे. मला वराह उत्पादन कक्ष दाखवण्यासाठी त्यांनी कोट, पँट, बूट, हातमोजे, टोपी, नाकावर प्लॅस्टिक पट्टी दिली. ६० X २० फूट बंद व वातानुकूलित खोलीत नेले. ही खोली शेतावर त्याच मापाच्या मोठ्या टाकीवर उभी होती. लाकडाची मधे मधे फटी असलेली फरशी व तिच्यावर ६X५ चे कठडे होते. प्रत्येक कठड्यात चांगली मोठी डुकरीण पहुडली होती व १०–१२ पिल्ले तिला झोंबून दुग्धपान करत होती. त्या खोलीतली सर्व घाण त्या फरशीच्या फटीतून खालच्या टाकीत पडून कुजत असे. त्यामुळे तिथे इतकी दुर्गंधी पसरली होती, की नाकावरच्या पट्टीचा काही उपयोग झाला नाही. त्यांनी कपडे दिले ते याकरताच की कोणत्याही कपड्याला ही दुर्गंधी चिकटते व बराच वेळ टिकते. मला या दुर्गंधीचा वास कैक वेळा स्नान केलं तरी नाकात तीन दिवसपर्यंत जाणवत होता. मि. फेल यांना आता सवय झाली होती व दर डुकरामागे २०० डॉलर उत्पन्न मिळत असे.

या शेतीबद्दल बरंच कुतुहल निर्माण झालं. इलिनॉयस प्रांतात लक्षावधी एकर अशी शेती आहे व तिथल्या शेतात सहा फूट माती मिळते. यंत्र व रासायनिक खते व औषधे यावर भर होता. पण ट्रॅक्टरने भराभर नांगरलेल्या जमिनीवरून लक्षावधी टन माती उडून जाताना दिसली. या जमिनीच्या धुपण्याबद्दल तेव्हाच एक परिसंवाद झाला.

गेल्सबर्ग लहान शहर असून इथं अवघी ५० हजार वस्ती होती. प्रत्येकाच्या घरी मोटार होती. घरे सगळी लाकडाची. आत उत्तम सजावट व भारी नायलॉन तथा लोकरीचे गालिचे पसरले होते. घरात जरी वातानुकूलता असली तरी नायलॉन, लाकूड व प्लास्टिक पेन्टनं भरलेली ही घरे मला अक्षरशः 'लाक्षागृहे' भासली. बहुतेक घरात नुसत्या धुराचा संकेत देणाऱ्या घंटा होत्या. आग लागण्यापूर्वी जरा जरी धूर निघाला तरी या घंटा वाजायला लागत. घरातल्या ज्वालाग्राही पदार्थांमुळे ही घंटा वाजली की अवघ्या ९० सेकंदात घर सोडले तरच मनुष्य बचावतो.

गाव लहान असल्यामुळे एक तर कृष्णवर्णीय अगदीच तुरळक होते. शिवाय फूटपाथवरून अगदी सकाळी व संध्याकाळी नागरिक क्वचितच दिसत. त्यामुळे मला रोज सकाळ संध्याकाळ खुल्या हवेत फिरण्याची मजा इथे फार मिळाली. एकादा विरळ 'जॉगिंग' करणारा किंवा करणारी वगळल्यास मला कुणी भेटतच नसे. भेटलाच तर हटकून 'हाय' म्हणून हात वर करी. अशा या एकट्या फिरण्यात निसर्ग दिसे, पण हिवाळा सुरू झाल्यामुळे वृक्षांची पाने प्रथम केशरी झाली व मग गळू लागली. पाखरेसुद्धा कमी होऊ लागली.

अमेरिकेत एकटे फिरताना गावगुंड त्रास देतात, असे ऐकले आहे. पण ते मोठ्या शहरी, विशेषतः न्यूयॉर्क, शिकागोकडे दिसतात. शिकागोच्या लाओहेर या प्रमुख विमानतळावर इकडे येण्याकरता सर्व मंडळींसह आम्ही एकदा पोचलो. घरची मंडळी दुपारची न्याहरी घेत होती. मी बाथरूममध्ये गेलो. तिथे एक मिनिटसुद्धा थांबलो नसेन, की माझ्यामागे एक चांगला रेशमी सूट घातलेला मनुष्य थेट माझ्यापर्यंत आला व मला दरडावून म्हणू लागला की, 'सिगारेट काढा!' मी जरा नरम स्वरात म्हणालो, 'मी सिगारेट पीत नाही.' तो पुन्हा ओरडला, 'दोन डॉलर द्या!' व अगदी माझ्या पाठीशी टेकून 'क्विक क्विक' असे म्हणू लागला. मला कळले की मी खिशात हात घातला तर हा नक्की लुबाडणार, 'वेट अ बिट' असे म्हणत मी कोटाची बटणे उघडण्याचा आव आणला. नशीब बलवत्तर होते. तेवढ्यात आम्ही दोघेच त्या बाथरूममध्ये असताना बाहेरील दार एकाएकी उघडले व तीन-चार अमेरिकन लोक आत शिरले. त्यांना पाहताच हा सरळ बाहेर पळाला व मी वाचलो. अशी कैक उदाहरणे देता येतील, पण लहान शहरी असे उपद्व्याप जास्त होत नाहीत. मला भारतात असताना रोज मैल दोन मैल फिरण्याची सवय होती. त्याप्रमाणे रोज सकाळ संध्याकाळ गेल्सबर्ग या छोट्या शहरी फिरू लागलो. ऑक्टोबर संपून नोव्हेंबरचा महिना सुरू झाला. मेपल, बर्च, आदींची मोठी वृक्षराजी आता हिरव्या पानाबद्दल केशरी पाने दाखवू लागली. पक्ष्यांचा कलरव पण कमी भासू लागला. हवेत चांगलाच गारठा जाणवू लागला. तरी आमचे फिरणे चालूच

होते. सकाळी मैलभर चालून तेथील एका विशिष्ट उपाहारगृहात शिरावे. इथे बहुतेक डॉक्टर, इंजिनीयर, प्रोफेसर आदी मंडळी सकाळी जमत असत. त्या काउंटरवर 'डूनट' किंवा केकची ऑर्डर दिली की वाटेल तितकी कॉफी फुकट प्यायला मिळत असे. या गावात मला वर्णभेद दिसला नाही. काही २५-३० भारतीय होते. सगळे सुशिक्षित, डॉक्टर, इंजिनीयर, उच्चशिक्षित असेच होते. त्यामुळे भारतीय दिसला की त्याबद्दल लोकांच्या मनात या गावी तरी आदर असे. मी तर डॉक्टरांच्या रांगेत गणला जाऊ लागलो व मला वैद्यक विषयाचे प्रश्न लोक विचारीत होते. सकाळचा हा वेळ यामुळे फार चांगला जात असे. फिरताना माझ्याशिवाय दुसरे कुणी दिसले नाही. एक-दोन वयस्कर लोक ज्यात काही स्त्रिया होत्या त्या 'जॉगिंग' (धावणे) करताना दिसल्या व ते मात्र मला हात उंचावून 'हाय' म्हणायचे. माझी फिरण्याची सवय पाहून आमच्या चिरंजीवांना बऱ्याच लोकांनी विचारले की हे वयस्क गृहस्थ काठी घेऊन इतके फिरतात कशाला ?

दिवाळीची तर मजा होतीच, पण या गावच्या ८-१० मराठी कुटुंबात दर पंधरवड्यात पार्टी होत असे. या पार्टीत आमच्या सूनबाई उठून दिसत, कारण भारतीय स्वयंपाक आणि पदार्थ त्यांच्याइतके कुणालाच करता येत नव्हते. मुंबईला मी तरी आपल्या घरात इतके पदार्थ कधी खाल्ले नाहोत. सर्व भाज्या, कच्चे पदार्थ व मसाले शिकागोहून येत असत. यात मेथी, आले, हिरव्या मिरच्या, कोथिंबीर, भेंडी, वांगी, गवार, सगळे मुंबईसारखे पदार्थ तिथे मिळत होते. ते इथल्या प्रमाणात स्वस्त व चांगले पण होते. दूध तर गॅलनने विकत घेत होतो. यामुळे घरात गुलाबजाम, रसगुल्ला, रसमलाई, चमचम, खीरमोहन यांचे उत्पादन, बुंदी, पुरणपोळी, करंज्याशिवाय बरेच वेळा झाले. आईस्क्रीमचा पाच किलोचा गोळा सदा सर्वदा फ्रीजमध्ये पडलेला असे.

मी फिरण्याचा व्यायाम घेत होतो, पण येथील लोक मोटारीशिवाय दोन फर्लांगसुद्धा फिरत नाहीत. व्यायामाकरता या गावात भला मोठा वातानुकूल जिम्नेशियम होता. याच्या आत सहा टेनिस कोर्टे होती, व सकाळपासून मध्यरात्रीपर्यंत बारा महिने लोक टेनिस खेळायचे. आमच्या चिरंजिवांना टेनिसचा नाद असल्याने घरातील आमच्या नाती पण उत्तम टेनिस खेळत आहेत. इतर नातवंडे मिशन शाळेत शिकत होती. डिसेंबर सुरू होताच चोहीकडे हिमवर्षाव सुरू झाला. व त्यांची शाळा अक्षरश: बर्फाने वेढली गेली. त्या शाळेत 'आजोबाचा दिवस' डिसेंबर महिन्यातच साजरा झाला. आम्हाला तिकडे जेवणाचे पण आमंत्रण होते. तो बर्फ तुडवीत आम्ही आपल्या नातवाचे कार्यक्रम पाहिले व त्याचे शिक्षण कसे होते, याचे निरीक्षण केले. मला वाटते, भारतातसुद्धा वर्षातून एकदा प्रत्येक शाळाचालकांनी मुलांच्या आजोबांना बोलावून असा कार्यक्रम करावा.

आमच्या पत्नीची प्रकृती ठीक नव्हती. तिकडे ज्या विभागात प्राविण्य मिळाले आहे त्या विषयाशिवाय इतर विभागाबद्दल डॉक्टर मत देत नाहीत. यामुळे दुसऱ्या डॉक्टरला टेलिफोन केला व त्याने हॉस्पिटलमध्ये यावे असा निरोप दिला. दवाखाना व तेथील

खाटा फार महाग असतात. पण दवाखाना सोडताना तुमची चादर, उशीचे अभ्रे, तुमच्यावर वापरलेला थर्मामीटर, मग्स व बादली तुम्हाला घरी नेण्याचा आदेश येतो. म्हणजे प्रत्येक रोग्याला या वस्तू नवीन मिळतात. पत्नीवर बायऑप्सी झाली व फुफ्फुसावर काही परिणाम झाला आहे काय हे पाहण्याकरता दर सात मिनिटाला ती नर्स येत होती. दिवसातून तीन वेळा अन्न विभागातली बाई येऊन विचारीत होती, कोणते व कशा प्रकारचे अन्न हवे ? डॉक्टर तर येतच होते. पण एक पादरीसुद्धा दिवसातून दोनदा येऊन गेला व त्याने तिच्या बऱ्या होण्याकरिता देवाला प्रार्थना पण केली.

१ डिसेंबर रोजी सकाळी घंटा वाजली. दार उघडले तेव्हा प्रो. एडवर्ड दिसले. 'हॅलो डॉक, यू हॅव अ नाईस हाऊस.' म्हणत त्यांनी ड्रॉइंग रूममध्ये प्रवेश केला. वेस्टर्न इलिनॉइस युनिव्हर्सिटीत मेकोंब शहरी ते जैविक शास्त्राचे प्राध्यापक होते. त्यांनी माझं भाषण पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी ठरवलं होतं व तिकडे नेण्यासाठी स्वत:ची गाडी आणली होती. साठ मैल लांब मेकोंब शहर या विश्वविद्यालयाचं शैक्षणिक केंद्र आहे. या शहराची एकूण वस्ती १५ हजार असून तिथे १० हजार विद्यार्थीच आहेत. म्हणजे ती वस्ती नुसती विद्यार्थ्यांकरताच होती. रस्त्याच्या दोन्ही कडेला अगदी क्षितिजापर्यंत उघडी शेतेच होती. पण मेकोंबजवळ जरा दाट झाडी लागली व वहिवाटीप्रमाणे एक लहान 'शहरी जंगल' दिसले. जवळ जवळ सगळ्याच शहरात अशी झाडी ठेवतात, व तिथे गोल्फशिवाय नुसते फिरणेसुद्धा जनतेला लाभते. भारतात एकाही शहरी अशी झाडी व इतकी उघडी जागा नाही. मुंबईत माहीमची खाडीच काय ती उघडी होती. पण तीही आता भरत आहे.

विद्यार्थ्यांचे थवे पाहून माझ्यातला प्राध्यापक जागा झाला व मी मोठ्या उत्साहाने सेमिनार घेतला. भारतात पक्षी अभयारण्य निर्माण करू पाहणारे डॉ. सूटर, डासनिवारण प्रक्रियेचे कीटाणूजनक डॉ. सिंगर व इतर प्रतिष्ठित मंडळींनी प्रश्न विचारून गौरव केला. एक भारतीय, डॉ. जानी यांनी घरी नेले. यांनी आंग्ल महिलेशी विवाह केला असून त्यांना तीन अपत्ये आहेत. घरी भारतीय वातावरण निर्माण करण्यासाठी संध्याकाळी दीप प्रज्वलित करतात व अधूनमधून गायत्री मंत्राचा पाठ करतात. तेथील विद्यापीठात शिक्षण विभागात ते रीडर आहेत. पण स्वत:च्या तळघरात त्यांनी यंत्रसामग्री गोळा केली असून चष्मा, त्याचं भिंग व डोळ्याची तपासणी करण्याची साधने ठेवली आहेत. हा त्यांचा जोडधंदा आहे. त्या देशात असा जोडधंदा करणाऱ्यांची संख्या बरीच मोठी आहे.

रात्री घरी आलो, तेव्हा कोलोराडो विद्यापीठाचे पत्र हाती पडले. बोल्डरला डॉ. साऊथविक यांनी दोन सेमिनार घेण्याची विनंती केली होती.

आगगाडीचं आकर्षण होतंच. यानिमित्त ती हौस पुरी करून घ्यायचं ठरवलं. सकाळी स्टेशनवर आलो. माणसांची वर्दळ अगदीच कमी होती. एका खोलीत स्टेशनमास्तर होता. तोच तिकीट देई. रिझर्व्हेशन करी, गाडीला सिग्नल देई व सगळीकडे लक्ष ठेवीत असे. दुसऱ्या खोलीत सामान तपासणारे व प्लॅटफॉर्मची देखरेख करणारे एकच गृहस्थ होते.

सामानवाहक कुली, पान बिडीची दुकानं, फराळाची दुकानं, सगळयांचा अभाव होता. भिंतीलगत स्लॉट मशीनस् होती व त्यातून नाणे टाकून सिगारेट, चॉकलेट, पेपरमिंट, केक, फळं, पेये काढून घ्यावीत अशी व्यवस्था होती.

स्टेशनमास्तरने माझे वय विचारले व ६५ च्या वरील जनतेला सिनीयर सिटीझन म्हणतात व त्यांना रेल्वे, बसेस, सिनेमा, हॉल वगैरे ठिकाणी वयोमानामुळे दरात सूट दिली जाते. मला तिकिटात सूट मिळाली. कॉम्प्यूटरने एका मिनिटात उत्तर घेऊन माझी सीट रिझर्व्ह केली. इतक्या लवकर आरक्षण व सूट मिळालेली पाहून मी पुढल्या प्रवासा-करता दुसऱ्या दिवशी स्टेशनवर आलो. मला एक लांबचे व परतीचे तिकीट काढावयाचे होते. वयोमानाप्रमाणे सूट तर दिलीच, पण माझ्या सोबत 'ती' असल्यामुळे अर्धे तिकीट पडले. शिवाय परतीचे तिकीट म्हणून आणखी सूट मिळाली. रेल्वेने प्रवास करावा या करता हे आमिष असावे. तिकीट विमानाच्या तिकिटाप्रमाणे पुस्तकासारखे होते. त्यांना चेक दिला तो त्यांनी स्वीकारला व सर्व हिशेब व्यवस्थित करून तिकीट व उरलेली चिल्लर स्वत: घरी आणून पोचती केली.

डिसेंबर आठला रात्री नऊ वाजता सॅन्फ्रान्सिस्को एक्सप्रेस गाडी पकडली. बरीच लांब गाडी होती. प्रथम सामान नंतर स्लीपर व त्यानंतर बसण्याचे डबे होते. प्लॅटफॉर्म असा नव्हताच. म्हणून डब्याचे प्रवेशद्वार उघडले व डब्यातून एक सेवक स्टूल घेऊन खाली उतरला. स्टुलावर उभं राहून डब्यात शिरलो. हातातलं सामान सेवकानं दाराजवळच्या रॅकवर ठेवलं. तळमजल्यावर फक्त बाथरूम व प्रसाधनकक्ष होते. कारपेट पसरलेल्या जिन्यावरून पहिल्या मजल्यावर आलो. सबंध डब्यात फक्त चारच प्रवासी होते. दोनदोन खुर्च्यांच्या वीस रांगा व मध्ये खुले दालन होते. कारपेट तर होताच, पण खुर्च्या विमाना-पेक्षा मोठ्या असून तिरप्या व निमुळत्या होत असत. कडेला अंधुक रंगाच्या काचेच्या अखंड खिडक्या असून त्यावर सरकणारे पडदे होते. डबे वातानुकूलित होते. खुर्चीवर बसताच कंडक्टर आला. त्यानं तिकीट पाहून वरील रॅकला माझे आरक्षण जोडले व 'गुड नाईट' म्हणत निघून गेला. स्टेशन येण्यापूर्वी हा लाउडस्पीकरवरून येणाऱ्या स्टेश-नचे नाव सांगे व प्रवासी आले की बसण्याची व्यवस्था करी. एक प्रवासी घाईमुळे तिकिटाशिवाय आत आला. पटकन तीन डॉलर दंडाची पावती त्याने फाडली. एका प्रवा-सात माझं सामानही कंडक्टरनं खाली आणून दिलं.

खुर्चीवर उशी व ब्लँकेट ठेवतात व तसे झोपावे लागले. सकाळी कंडक्टर ब्रेकफास्ट जाहीर करतो तो डायनिंग खोलीत घ्यायचा. याशिवाय फराळासाठी खाली डबाच असतो. गरम कॉफी, केक, सँडविच, दाणे, काही पेये मिळतात. ती कागदाच्या बशी-पेल्यात घ्यायची व कागद डब्यात टाकायचे. काही डब्यात मोठे दालन असते. पोट भरले की तिथे सोफासेटवर बसावे. दोन्ही बाजूला अख्ख्या काचेच्याच भिंती असल्यामुळे धावत्या गाडीच्या कडेचे मनोरम दृश्य पाहत राहावे. काही गाड्यात वरचे छप्परही काचेचे असते व रात्रीचे

चांदणे मुबक अनुभवता येते. दिवसा मात्र उन्हात बसल्याचा आल्हाद येतो.

याप्रमाणे प्रवास करीत दुसऱ्या दिवशी ९ वाजता डेनव्हरला पोचलो. इकडे मार्गात बरेच गो-पालन करणारे धंदे दिसले. यामुळे दूधदुभत्याची चांगली सुबत्ता आहे व इथे तयार होणारे दुधाचे चॉकोलेट चांगले प्रसिद्ध आहे. डेनव्हर स्टेशनवर डॉ. साऊथविक आले होते. त्यांनीच माझे सामान उचलले व बाहेर आपल्या गाडीत ठेवले. स्टेशनवर कुठे तिकीटचेकर दिसला नाही. डॉ. साऊथविक यांची गाडी बऱ्याच विटांनी बांधलेल्या गुदामाजवळून गावाबाहेर निघाली. १५–२० मैल गेल्यावर ते म्हणाले की आपणाला उशीर होईल म्हणून काही न्याहरी करून घ्यावी. रस्त्याच्या कडेला असलेल्या एका उपाहारगृहात टोमॅटो सूप, भाज्या, आणि ब्रेड बटर तथा आइसक्रीमवर ताव मारून आम्ही पुढे निघालो. बोल्डर हे शहर तेथील विश्वविद्यालयाकरताच प्रसिद्ध आहे. तिथे विद्यार्थी जास्त व रहिवासी कमी, अशी प्रथा दिसली. चोहोकडे उंच डोंगर होते व लांबच्या डोंगरावर बर्फ कसा दाट साचलेला दिसत होता. त्या युनिव्हर्सिटीच्या गेस्ट हाऊसमध्ये मुक्काम ठेवला आन्हिक उरकून खिडकीजवळ उभा राहिलो व चोहीकडे निरखून पाहिले. या गेस्टहाऊसजवळच मोठा रस्ता होता व त्यांच्या पलीकडे उंचउंच पर्वतराजी विखुरली होती. रस्त्यावरून मोटारी तर जातच होत्या, पण विशेषत: वेगवेगळ्या पोशाखात मोटरसायकलवर कैक विद्यार्थि-युगल हसत खिदळत भरधाव गाडी सोडताना दिसले पलीकडील पटांगणातून विद्यार्थी वर्गाकडे चालले होते. कुणी कुणाचे मित्र, तर कुठे प्रियकर-प्रेयसी. कुणी पुस्तक चाळत तर कुणी खिदळत. पण सर्व लेक्चरला चालले होते. हा विद्यार्थ्यांचा गतिशील मेळावा पाहून मला पुन्हा केंब्रिजच्या एका प्राध्यापकाने लिहिलेल्या 'फ्रॉम ए कॉलेज विंडो.' पुस्तकाची आठवण झाली. त्याच्या शब्दांची, भावनेची व गतकालाच्या गोडव्याची कशी हुरळून स्मृती उफाळून आली.

सकाळचे ब्रेकफास्ट विद्यार्थ्यांच्या क्लबमध्ये घेऊन उत्तम सूट व गरम टोपी व ओव्हरकोट घालून लेक्चरला त्या मैदानातून जात होतो. काही विद्यार्थी मला पाहून खिदळत होते. काही म्हणाले, 'हाऊ मच डॉल्ड अप!' काही फूटपाथवरच बसून अभ्यासाची पाने चाळण्यात गर्क होते. काही सिगरेटसंगे खेळत होते. काही धूम पळत होते, पण एवढ्या विद्यार्थ्यांच्या गर्दीत एकाही तरुण-तरुणीला सुशोभित पोशाखात मी पाहिले नाही लिपस्टिक तर नव्हतीच, पण नेलपॉलीशसुद्धा दिसले नाही.

वर्गात गेलो. लेक्चर सुरू केले. डॉ. साऊथविक यांनीच प्रोजेक्टर आणून स्लाईड्स् दाखविल्या. दुसऱ्या विषयांची बरीच मंडळी आली होती. रात्रीला प्रोफेसरने आपल्या घरी रिसेप्शन व डिनर दिले. तिथे आलेल्या पाहुण्यात इतर विषयांची बरीच मंडळी होती. कारण कोणत्याही वैज्ञानिक संशोधनाकरिता इतर विषयांचे मत घेऊन निदान काढलेले बरे ठरते. कोलोराडो नदी लक्षावधी वर्षांपासून इथे अखंड वाहत आहे. तिच्या प्रवाहाने पाषाण फोडून मोठमोठ्या दऱ्या आणि गुंफा तयार केल्या. अगदी उगमापासून

समुद्रमीलनापर्यंत या नदीवर ४० धरणे बांधली गेली आहेत. या धरणामुळे डेनव्हर व कोलोराडोजवळ जमिनीचे पाणी खोल खोल जात आहे. काही ठिकाणी १३० फूट खोली· वर पाणी गेले. यामुळे शेतजमिनीवर परिणाम होत आहे. तसेच हवामानावर परिणाम झाला व आमच्या चर्चेत भूगर्भाचा दाब हिमवर्षाव, आदी सगळ्यांचा विचार केल्याशिवाय पर्यावरणाबद्दल मत देऊ नये असा सूर निघाला. दुसऱ्या दिवशी सर्पविषाबद्दल भाषण झाले. इथे तर मानसशास्त्र समाजशास्त्र आदी विषयांचे प्रोफेसर पण होते. भारतात मला असे दिसले नव्हते. लेक्चरनंतर त्या मानसशास्त्राच्या प्रोफेसरने मला हळूच आपल्या खात्यात नेले व त्यांनी सुरू केलेल्या सर्पावरील प्रयोगांची माहिती देऊन पुढील कार्यक्रमा-बद्दल मत विचारले. या लेक्चरनंतर एक लहानसे रिसेप्शन होते. तिथे पदव्युत्तर विद्यार्थी पण आले होते. यापैकी बऱ्याच विद्यार्थ्यांची लग्ने झाली होती व त्यांना मुलेबाळे पण झाली होती. मुलांना पाठीवर घेऊन ते फिरत होते. शिक्षण संपल्याशिवाय लग्न व मूल का केले, असे विचारताच एकाने उत्तर दिले की, मी जोपर्यंत अभ्यास करून डिग्री घेत नाही तोपर्यंत माझी बायको नोकरी करील व घरखर्च चालवील. माझी डिग्री झाली व नोकरी लागली की ती शिक्षण करील. या देशात नोकरी करून आपल्या कमाईवर पैसे कमवून अभ्यास करावा असे प्रत्येक तरुणाला वाटते. बारा वर्षे झाली की तरुण–तरुणी काही तरी काम करतात व पैसे कमवतात. बेबी सिटिंग, भांडी धुणे, उपाहारगृहात वाढणे, रस्ते स्वच्छ करणे, यंत्र रिपेअर करणे, आदी सर्व कामे ते बिनदिक्कत करतात. एका विद्यालयात माझ्याकडे एक विद्यार्थी आला व त्या देशात राहून मार्गदर्शन करा अशी त्याने विनंती केली. हा विद्यार्थी सकाळी ५–३० वाजता घरातून निघत असे. ११–३० पर्यंत मोटार मेकॅनिकचे काम करत असे व त्या पैशाने तो, त्याची बायको व लहान मूल यांचा सांभाळ करीत असे. दुपारी १२ वाजता तो कॉलेजमध्ये येत असे. लंच घेऊन आपले टेबल प्रयोगाची उपकरणे, प्राण्यांचे पिंजरे स्वतः धूत असे. त्यांना खाना देऊन त्या कॉलेजमध्ये एक लेक्चर घेऊन लायब्ररीत अभ्यासाला जात असे. यानंतर प्रयोग करून रात्री १०–११ ला घरी जाई. इतके कठीण जीवन भारतातले विद्यार्थी अद्याप तरी जगताना दिसत नाहीत.

त्याच रात्री एका चायनीज रेस्टॉरंटमध्ये जेवण झाले. तिथे मला दिल्लीला मिळणाऱ्या लुकाट फळाचा आस्वाद मिळाला. दुसऱ्या दिवशी सकाळी डॉ. साऊथविक सपत्निक मला कोलोराडो स्प्रिंग शहरी घेऊन गेले. रात्रीला एका चर्चमध्ये त्यांच्या मुलीचे सामूहिक गायन होते. त्याचा आस्वाद घेतला. बिस्मिल्लाखानची शहनाईची टेप तिला दिली. याच शहरी अगदी स्वित्झर्लंडप्रमाणे डोंगरावर स्किईंग करणाऱ्याची गर्दी दिसली. अगदी लगतच उंच डोंगर होते व तिथे चांगला बर्फ साचला होता, तरी काही व्यापाऱ्यांनी कृत्रिम बर्फ निर्माण करून या खेळाला प्रोत्साहन दिले होते. गावातून फिरून तेथील जीवशास्त्राचे एक प्रोफेसर श्री. मट्टू यांच्या प्रयोगशाळेत गेलो. इथे हे प्राध्यापक वनस्पतींच्या

पेशीतील अणुसूत्रात असलेल्या जीन्सच्या डी.एन. ए. वर प्रयोग करत होते. एका प्रयोगामुळे साध्या मक्याच्या पेशीत ईस्ट या शेवाळाचे जीन्स मिसळून त्या मक्याचा उपयोग गॅसोहोल नामक द्रव तयार करण्यात ते यशस्वी झाले आहेत. या गॅसोहोल द्रवाचा पेट्रोलसारखा मोटार चालवण्याकरता आता उपयोग होऊ लागला आहे. पुढेमागे तांदूळ आणि गहू या रोपांच्या पेशीत याच प्रक्रियेने नत्रबंधन करावे, ज्यामुळे या झाडांना रासायनिक खत द्यावे लागणार नाही. असे यांचे मत आहे. या डॉ. मट्टूचे घर एका डोंगर कपारीवर अगदी टोकाला होते. घराच्या खिडकीतून बाहेर लांबपर्यंत पर्वतराजी व पुढे हिमाच्छादित पर्वतमाला दिसत होती जेवणाची वेळ झाली व इतर विषयासंगे स्त्रीमुक्ती विषय निघाला. ' तुमच्या देशात स्त्रियांना किती स्वातंत्र्य आहे, असे त्यांनी विचारताच मी त्यांना एक खर्डा आणायला सांगितला व त्यावर ' यत्र नार्यस्तु पूज्यन्ते, रमन्ते तत्र देवताः' अशी ओळ लिहिली. ती त्यांना फार आवडली. मिसेस मट्टूने तो खर्डा आपल्या ड्रॉईंग रूममधे भिंतीवर लावला. या कोलोराडो स्प्रिंगपासून ४ मैलांवर लाल चुनखडीची ५०० फूट उच डोंगराची बरीच शिखरे दिसली. या शिखर समूहाला ' गार्डन ऑफ गॉड ' असे म्हणतात. या डोंगराच्या पलीकडे ग्रेट पाईक नावाचे एक चित्रविचित्र शिखर दिसत होते व ते बर्फाने पूर्णतया आच्छादले होते. जवळपास झाडी होती. तिथे हरिणे मुक्तपणे फिरत होती. बोल्डरलासुद्धा विश्वविद्यायलाच्या पलीकडे डोंगरकपारीतून झुडपाझुडपातून हरणांचे कळप फिरताना दिसले. पण या हरणांना कुणी हाकलताना किंवा शिकार करताना दिसले नाही. चार दिवसांच्या यात्रेनंतर मला पुन्हा डेनव्हरला पोचवून दिले व मी गेलसबर्गला परत आलो.

गेलसबर्गहून न्यूआरलेन्सचा प्रवास शिकागोमार्फत केला. शिकागोला आम्हाला भेटायला आमच्या एका मित्राचे चिरंजीव श्री. धैर्यशील घोघले आले होते. त्यांची पत्नी तेथील एका दवाखान्यात अॅनेस्थेशिया विभागात काम करीत असे. त्यांना दोन मुले होती. व आम्ही येणार म्हणून त्या डॉक्टरीणबाईंनी अगदी भारतासारखा घरगुती स्वयंपाक केला होता. सायंकाळी शिकागोहून आमची गाडी ७–३० ला सुटली व दुसऱ्या दिवशी न्यूआरलेन्सला दुपारी १२ वाजता पोचली. मधील स्टेशनवर गाडी ५–७ मिनिटांपेक्षा जास्त थांबतच नव्हती. जे काही खावयाचे असेल ते एक तर खाली कॅन्टीनमध्ये घ्यावे किंवा वरील काचेचे छप्पर असलेल्या डब्यात सोफा सेटवर बसून सृष्टीनिरीक्षण करीत बसावे. न्यूआरलेन्सला आमचे दुसरे चिरंजीव स्टेशनवर आले होते. त्यांच्या गाडीतून त्या शहराच्या उपनगरातील एका छोट्या फ्लॅटवरती पोचलो. या लहान फ्लॅटमध्ये एक मोठा हॉल एक छोटे किचन व निजायची खोली एवढीच जागा होती. पण त्या किचनमध्ये गॅस, टेलिफोन, रेफ्रिजरेटर व काही भांडी त्या फ्लॅटच्या भाड्यामध्ये समाविष्ट झाली. अगदी दाराला लागूनच पोहण्याचे तलाव होते व त्याच्या पलीकडे ५–६ कपडे धुण्याची यंत्रे ठेवली होती. या यंत्रात नाणे टाकावे, साबण आणि कपडे आत टाकले की मशीन सुरू

होते. १०–१५ मिनिटात कपडे धुतले जातात. व मशीन थांबते. कपडे तिथेच वाळता येतात व घरी आणून इस्त्री करता येते. स्वयंपाकघरात डिश वॉशर नावाचे भांडी धुण्याचे यंत्र होते. त्यात भांडी ठेवावीत व साबण टाकावा. दहा मिनिटांनी ती धुऊन व वाळून वर येतात. तेथील वॉश बेसीनमध्ये सगळे खरकटे, भाजीपाला यांचे चूर्ण करणारे एक यंत्र असते. त्याची कळ दाबली की सर्वांचा भुगा होऊन गटारात जातो. घरचा केरकचरा व्हॅक्युम पंपने ओढावा; म्हणजे मुंबईत केरसुणीने घर झाडले की वर कचरा साचतो, तसे या पंपाने होत नाही; तर सर्व कचरा शोषल्यानंतर घरातील टाकाऊ सामानासंगे हा कचरा एका पिशवीत भरून दाराबाहेर ठेवतात. म्हणजे आठवड्यातून ठराविक दिवशी म्युनिसिपालिटीचे लोक तो कचरा घेऊन जातात.

न्यूआरलेन्स हे शहर स्पॅनिश व फ्रेंच या वसाहतीकडून अमेरिकन लोकांनी जिंकले, यामुळे या शहरात दोन्ही संस्कृतींची चिन्हे पसरलेली दिसतात. कॅनॉल स्ट्रीटवर डावीकडे सगळी फ्रेंच वसाहत आहे. इकडे फ्रान्स देशातील इमारतीप्रमाणे बाल्कनी असलेली घरे दिसतात. दोन घोड्यांच्या गाड्या अगदी टमटमसारख्या इकडे फिरतात. मधूनमधून पार्कच्या कोपऱ्याला ताबडतोब तुमचे रंगीत ऑईलपेंटचे चित्र काढून देणारे चित्रकार फूटपाथवर भेटतील. डुनट व फ्रेंच कॉफी व त्यांच्या पलीकडे भाजीपाल्याचे मार्केट इथे दिसले. जवळच मिसिसीपी नदीचे खोल पात्र आहे. आपल्या गंगा–यमुनेप्रमाणे ही नदी रुंद नसून खोलीमुळे नेहमी बोटींने भरलेली आढळते. या गावी या नदीच्या मुखावर एक सुंदर बंदरही आहे. आपल्या देशातील काही सागरी व्यापार या बंदरातून होताना दिसला. या शहरातील मध्यावर असलेली ऑफिसेस व विद्यालये चांगली उत्तुंग आहेत. तेथील रस्ते दोन–तीन मजल्याचे आहेत, ज्यामुळे आडव्या वाहतुकीला अडथळा येत नाही. मेडिकल कॉलेजच्या शिक्षकांच्या गाड्या वर थेट आठव्या मजल्यापर्यंत चढून गॅरेजप्रमाणे तिथेच ठेवल्या जातात. या कॉलेजच्या लगतच 'हिपोड्रोम' नावाचा एक बंद स्टेडियम आहे. कैक मजली स्टेडियमच्या इमारतीत एक लक्ष लोक बसून फूटबॉल, बास्केटबॉल आदी खेळ पाहू शकतात. या प्रख्यात स्टेडियमला पाहण्याकरता लांबून लोक येतात. या शहरातील दुसरे आकर्षण म्हणजे, इथे जाझ नावाच्या संगीताचा जन्म झाला. व ते संगीत ऐकण्याकरता लोकांच्या झुंडी विशेषत: 'मार्डीग्रास' या उत्सवात थयाथव्याने येतात. या शहरापासून जवळच कैक तळी आहेत. एका तळ्यावर ज्याचे नाव 'पॅचेट्रेन' आहे, एक मोठा पूल बांधला आहे. या पुलाची लांबी २१ मैल आहे. याला जगातील सर्वांत लांब पूल समजतात. या पुलाच्या पलीकडे एका छोट्या खेड्यात प्राणी प्रयोगशाळा निर्माण केली आहे. एका भव्य उघड्या जागेत जंगल ठेवून आत माकडे सोडली आहेत. चोहोकडून कुंपण असल्यामुळे माकडे बाहेर जाऊ शकत नाहीत. अंतराळातील प्रवासाकरता ज्या ज्या अडचणी निर्माण होतात त्यांचे प्रयोग प्रथम या माकडांवर करतात. ते प्रयोग तरी किती भीषण असतात? याचे उदाहरण मला तेथील प्रयोगशाळेत दिसले. एका

माकडाला सारखे गरगर फिरवून तो किती वेळात बेशुद्ध होतो हे पाहण्याचे प्रकार चालले होते. दुसऱ्या प्रयोगात माकडाच्या डोक्यावर कैक तारा लावून त्याच्या मेंदूतील प्रतिक्रिया यंत्राने मोजली जात होती. शिवाय त्याच्या पायातील धमणीत निरनिराळ्या प्रकारच्या औषधींची इंजेक्शने दिली जात होती. ते माकड किंचाळत होते. पण त्या गरिबाला कुणी दाद देत नसे. या शहराच्या जवळपास बऱ्याच खनिज तेलाच्या विहिरी आहेत व या विहिरी अगदी टेक्सासपर्यंत पसरल्या आहेत. हरेकृष्ण पंथाचे एक सुबक देऊळ पण न्यूआरलेन्सला आहे. या देवळात दर रविवारी फुकट प्रसाद (भोजन) मिळतो. अगदी भारताप्रमाणे पुलाव, पुऱ्या, शिरा व भाज्या असा मेनू असतो. राधा-कृष्णाच्या सुंदर मूर्ती असून यज्ञोपवीत धारण केलेला व मुंडन केलेला 'शेंडिवाला श्वेत' ब्राह्मण शंख-घंटांनी पूजा करतो. आरती करताना सगळे भक्तगण 'हरे राम हरे कृष्ण' म्हणत नाचत, डोलत 'समाधीत' जाण्याचा प्रयत्न करतात.

न्यूआरलेन्सहून हुस्टनला विमानाने गेलो. मुंबईच्या यू. डी. सी. टी च्या कॉलेज-मधील एक विद्यार्थी डॉ. आठवले त्या शहरी प्रदूषणाचे कार्य करीत होते त्यांच्या घरीच मुक्काम ठोकला. रासायनिक कारखान्यातून निघालेल्या प्रदूषित जलाचे रूपांतर करणाऱ्या काही कंपन्या अमेरिकेत निघाल्या आहेत. डॉ. आठवले अशा एका कंपनीत काम करतात. त्या रासायनिक कंपन्या आपले प्रदूषित पदार्थ या कंपनीला देतात. व वरून पैसे देतात. डॉ. आठवले यांची कंपनी या दूषणाला शुद्ध करते व जे पदार्थ शुद्ध होऊ शकत नाही त्यांना पृथ्वीच्या एक मैल खोल भूगर्भात साठवून ठेवते. स्फोटक द्रव्य व कडक रसायन यांच्याकरता गुदामे पण काढली आहेत. दुसऱ्या दिवशी सकाळी हाफ्कीन इन्स्टिट्यूट-मधून माझ्या मार्गदर्शनाखाली डॉक्टरेट घेतलेले माझे एक हुशार शिष्य डॉ. भास्करन् गाडी घेऊन मला भेटण्यास आले. ते टेक्सास प्रांतातील 'कॉलेज स्टेशन' विश्वविद्यालयात प्राणिशास्त्राचे प्रोफेसर होते व आता जीवशास्त्र संस्थेचे संचालक झाले आहेत. आपल्या गाडीने त्याने आम्हाला 'नासा' या अंतराळयात्रा संस्थेत नेले. ती सर्व यंत्रे याच संस्थेच्या यंत्रणेखाली वर गेली होती. त्या परिसरात मोठमोठे अंतरीक्षयान ठेवले होते. काही यानात आतली व्यवस्था दाखविण्याची सुविधा होती. उड्डाण झाले व परत येणारे कॅप्स्यूल पृथ्वीवर कसे येते, त्यात यात्री कसा बसतो, आदी विषयाबद्दल कैक यंत्रसामग्री कॅप्स्यूल-सहित मांडलेली दिसली. एका मोठ्या हॉलमध्ये कैक खुर्च्यांसमोर व कॉम्प्यूटरपुढे एका अजस्र पडद्यावर अंतराळयानाची यात्रा रेखाटली जात असे. त्याचे ते रेखाटन याच हॉलमधून होत असे. नासाची ही अंतराळयान प्रयोशाळा पाहून मनात विचार आला की, काही वर्षांनी मानव अशाच प्रकारच्या प्रयोगशाळेतून अंतराळयात्रा करू शकेल, तेव्हा ती प्रयोगशाळा राहणार नाही व तिचे रूपांतर 'अंतराळतळ' असे करण्यात येईल.

इथून पुढे अगदी समुद्रापर्यंत गेलो. जिथे आम्हाला कैक स्थळी त्या कॅरिबियन सागरातून तेल काढणाऱ्या रिग्ज दिसल्या. हा सर्व भाग खनिज तेलाकरता प्रसिद्ध आहे.

व त्यामुळे इकडील लोक फार धनिक आहेत. त्या प्रचंड तेलाचा साठा हे लोक जुन्या खाणीत ठेवणार आहेत. तिथून डॉ. भास्करन् यांनी आम्हाला 'कॉलेज स्टेशन' या विश्वविद्यालयात सायंकाळी नेले. त्यांचे घरीच उतरलो होतो. त्यांच्या पत्नीने पण पीएच. डी. केली होती. त्यांची दोन हुशार मुले होती. त्या सर्वांसगे रात्रीचे भोजन–शिरापुरी व वडे खाऊन आनंदात झोपी गेलो. डॉ. भास्करन् यांची प्रयोगशाळा दुसऱ्या दिवशी पाहिली. तिथे माझे भाषणही झाले. कीटकांच्या विशिष्ट ग्रंथीतून निघणाऱ्या आंतरस्रावाचे रासायनिक रूपांतर करून कीटकनाशक औषधी निर्माण करता येते. याचे प्रात्यक्षिक इथे मला मिळाले. या औषधीमुळे मानवाला किंवा इतर प्राण्याला इजा होणार नाही व भोपाळसारखी दुर्घटना झाली तरी मानवसंहार होणार नाही असे मला वाटते.

परत न्यूआरलेन्सला आलो. त्या दिवशी डोंबिवली येथील एका भारतीयाकडे रात्रीचे जेवण घेतले. त्या दिवशी एक विशिष्ट दुर्घटना घडली. ती इथे नमूद करावीशी वाटते. मुंबईचे एक डॉ. पै (काल्पनिक नाव) आपल्या पत्नीसह एका फ्लॅटमध्ये राहात होते. ते दुसऱ्या भारतीयाशी संपर्क टाळत असत. दुर्भाग्यवश आम्ही तिथे पोचलो, त्याच दिवशी त्यांना हृदयविकाराचा झटका झाला. काही श्वेत लोकांच्या कृपेने ते दवाखान्यापर्यंत पोचले, पण तिथेच त्यांचे निधन झाले. घरी प्रेत आणले; पण कुणाशीच संपर्क न ठेवल्यामुळे काय करावे हे त्यांच्या पत्नीस सुचेना. तब्बल बारा तास प्रेत घरी पडले होते. मग कुणीतरी काही हिंदी लोकांना ही घटना सांगितली शेवटी डोंबिवली येथील भारतीय सज्जनांनी त्या घराला ओळख नसतानासुद्धा भेट दिली. त्या उपाशी बाईला पोळी–भाजी खाऊ घातली व भारतात फोन करून त्यांच्या नातेवाइकांना बोलावले. याकरता त्या देशात एकमेकाशी संपर्क का ठेवावा, याची जाणीव झाली.

न्यूआरलेन्सला बरीच गुजराती मंडळी स्थायिक झाली आहेत. कैक पटेल गृहस्थांनी मोटेल विकत घेतली आहेत. जवळ जवळ चाळीस टक्के अमेरिकन मोटेल गुजरातेतील पटेल नावाच्या कैक गृहस्थांनी विकत घेतली आहेत. या मोटेल हस्तांतरानंतर अमेरिकेत थोडा कडवटपणा निर्माण झाला. आम्ही असताना मुंबईच्या एका श्री. कर्णिक नावाच्या मोटेल मॅनेजरचा खून झालेला वाचला होता. या गुजरातीबंधूंची दुकाने अगदी छोटी असतात. पण भारतातील सगळी धान्य, मुरमुरे, लाह्या, चणेफुटाणेसुद्धा इथे मिळतात. या दुकानाचे दैनंदिन चालकत्व त्या गुजराती बायकांकडेच असते. अगदी अल्पस्वल्प इंग्रजीचे ज्ञान असलेल्या या बायका फारच सुंदर व फायदेशीर व्यापार करतात.

दुसऱ्या दिवशी न्यूआरलेन्सहून न्यूयॉर्ककरता आगगाडीने निघालो. तब्बल २४ तास प्रवास करून दुसऱ्या दिवशी ८ ला न्यूयॉर्कच्या युनियन स्टेशनवर पोचलो. त्या स्टेशनची गर्दी इतकी होती की मी भांबावून गेलो. नशिबाने डॉ. लिखिते आले होते म्हणून व्यवस्था झाली, नाहीतर चांगलीच रखडपट्टी झाली असती. न्यूयॉर्क येथील महापालिका कॉर्पोरेशनचे एक सेवानिवृत्त डॉक्टर रोडीनो (काल्पनिक नाव) यांनी आपला फ्लॅट आम्हाला

राहण्यास दिला होता. तीन खोल्या आणि हॉलच्या या फ्लॅटमधे डॉ रोडीनो एकटेच दहाव्या मजल्यावर राहात होते. त्यांचे जीवन मला तरी अगम्य वाटले. अगदी सकाळी म्हणजे ५–३० वाजता ते आपल्या प्रयोगशाळेत कामाला जायचे व दुपारी २–३० ला परत येऊन झोपायचे. त्यांचे भोजन अगदी तपस्व्याप्रमाणे अल्पस्वल्प असे. त्यांची पत्नी काही वर्षांपूर्वी वारली होती व ते एकटे असल्यामुळे तिचा सहवास लाभावा म्हणून तिची हाडे आणि रक्षा एका बरणीत भरून त्यांनी आपल्या खोलीत ठेवली होती. माझा विषय प्लेग असल्यामुळे त्याने न्यूयॉर्क शहराची उंदीर–समस्या किती गहन आहे याचे एक उदाहरण दिले. हार्लेम या विभागातील एक नीग्रो गृहस्थ मृत्यू पावला, पण त्याला कुणी हात लावला नाही. हेल्थ ऑफिसर म्हणून हे जेव्हा त्याला तपासायला गेले तेव्हा त्या धडधाकट अंगयष्टीच्या नीग्रो गृहस्थाच्या उघड्या तोंडातून एक उंदीर बाहेर निघाला. याचा अर्थ तो उंदीर तोंडात शिरून आतली त्वचा–मांस आदी खात होता. डॉ. रोडीनो यांच्या संस्थेत माझे कॅन्सर या विषयावर भाषण झाले. सर्पविषाचा उपयोग काही प्रकारच्या कॅन्सरवर कसा करता येईल असे मी प्रतिपादन केले दुर्दैवाने माझे भाषण ऐकण्यास त्या लेक्चररूममध्ये अवघे पाचच लोक बसले होते. त्यापैकी हा विषय न समजणारी माझी पत्नी होती.

ग्रेहाऊंड बसने न्यूयॉर्क शहर पाहावे म्हणून तिकिटे काढली. जानेवारीचा महिना होता. हिमवर्षाव खूप जोराने सुरू होता व तो बर्फ तुडवीतच आम्ही बसस्टेशनवर आलो. पत्नीच्या पायाला बर्फामुळे इजा झाली होती व पाय सुजत होते. या बसने आम्हाला थोडे शहर दाखवले व चायना टाऊनमध्ये सोडून ती चिनी देवळाकडे गेली व आम्हाला येण्यास सांगितले. एक तास वाट पाहून त्या बसचा कंडक्टर आला नाही. किंवा ती बस पण आली नाही, म्हणून आम्ही तक्रार केली, तेव्हा या बसचालकाचा फोन आला, 'आमची काही चूक झाली आहे; तरी आपण यावे. आपले सगळे तिकिटाचे पैसे घेऊन जावे.' भारतात कुणी बसवाले असे करतील काय ? त्याच रात्री आगगाडीने आम्ही क्लिव्हलँडकरता निघालो.

न्यूयॉर्क हे शहर तसे फार मोठे आहे. जगातील सर्वांत जास्त लोकसंख्या टोकियोनंतर या शहराची भरेल. सर्वांत जास्त गगनचुंबी इमारती इथेच आहेत. आतापर्यंत एंपायर स्टेट बिल्डिंग जगातील सर्वांत उंच इमारत समजली जात होती. पण नुकतीच शिकागोला सियर्स टॉवर म्हणून ११० मजली इमारत तयार झाली व ती जगातील सर्वांत उंच समजली जाते. इथे अभिमानाने सांगावे लागेल की सियर्स टॉवर्सच्या निर्मितीकरता भारतीय इंजिनीयर व आर्किटेक्ट यांचा सिंहाचा वाटा होता. न्यूयॉर्कला सर्वांत मोठे म्युझिअम सेंट्रल पार्कजवळ आहे; तसेच जगातील सर्वांत मोठी कलाकृती 'स्टॅच्यू ऑफ लिबर्टी' या शहरातील बंदराजवळ उभी असून जगातील स्वातंत्र्यप्रेमींना दिलासा देत आहे. या मूर्तीच्या आत जाता येते. या शहरात जसे धनी आणि धनाढ्य लोक आहेत,

तशीच गरिबी मात्र बरीच डोकावते. गरिबांकरता अशी काही उपाहारगृहे आहेत, की जिथे अन्न काचेच्या अलमारीत ठेवतात व नाणे टाकून अलमारी उघडून ती डीश घ्यावी लागते. पोटभर जेवण एका डॉलरपेक्षा कमी पैशात मिळू शकते. मुंबईत आपणाला धारावी येथील झोपडपट्टीबद्दल नावे ठेवतात; पण धारावी येथील सद्‌भावना तेथील लोकांत जितकी दिसते तितकी दुसरीकडे दिसणार नाही. न्यूयॉर्कच्या हार्लेम विभागात केवळ नीग्रो लोकांची वस्ती आहे. जिथे दिवसाढवळ्या केव्हाही जा; लहान मुलेसुद्धा मारामारी करताना दिसतील. मुंबईची लोकलगाडी बकाल आहे असे आपण म्हणतो. या गाडीत फेरीवाले नि भिकारी गर्दीतून फिरतात, शिवाय पाकीटमार पण असतात. न्यूयॉर्कच्या ट्यूबट्रेन व इतर लोकल गाडीत गर्दी जरी नसली तरी चांगले ड्रेस घातलेले भिकारी पैसे मागताना दिसले. जुन्या वर्तमानपत्रांचे पुंजके, शेंगदाण्याची टरफले, तिथे पण दिसली. संध्याकाळी ४–५ नंतर एकटयादुकटया मुलींना अशा गाडीतून फिरणे धोक्याचेच होते. ट्यूबट्रेनच्या एका लोकल गाडीत चढण्याकरिता एकदोन मजले पार केले, तेव्हा जिन्यावरील काही कोपऱ्यात जुनी वर्तमानपत्रे, जुने खोके या सगळ्यांनी वेष्टित ऊब ग्रहण करीत असलेल्या महिला इकडे तिकडे दिसल्या. चायना टाऊनमध्ये सगळे चिनी लोक व फूटपाथवरती फेरीवाल्यांची चिक्कार गर्दी होती. मार्केटपेक्षा एकचतुर्थांश किमतीत इथे माल मिळत होता. या शहरातून निघण्याकरता टॅक्सी घेण्याचा आम्हाला पण अगदी मुंबईसारखाच अनुभव आला. मुंबईचे टॅक्सीवाले जसे जवळचे भाडे घेत नाहीत, तसेच येथील कैक टॅक्सीवाल्यांनी जवळजवळ तासभर मला त्रास दिला. न्यूयॉर्कच्या प्रसिद्ध बाजारपेठेत ' रॉकफेलर प्लाझा ' इथे एका महाराष्ट्रीयाचे दुकान पाहून मला फार आनंद झाला. हे दुकान हाफ्‌कीन इन्स्टिटयूटमध्ये असताना डायरेक्टरचे सेक्रेटरी श्री. इनामदार यांची पत्नी चालवत होती.

अशा या बहुढंगी शहराला भेट देऊन युनियन स्टेशनवर सहाला पोचलो. सबंध स्टेशनभर मोठमोठे स्टॉल्स होते. मला तर क्रॉफर्ड मार्केटचीच आठवण आली. खाण्याचे काही जिन्नस घेऊन प्लॅटफॉर्मकडे निघालो. दारातच श्री. इनामदार माझी वाट पाहत होते. ते हल्ली रवींद्रनाथ टागोर यांच्या साहित्याबद्दल व्याख्याने देण्याकरता युरोपखंडाची यात्रा करणार होते. या शहरातील गणेशमंदिराच्या निर्माणात यांचा मोठा वाटा आहे. न्यूयॉर्कपासून बरेच लांब म्हणजे लाँग आयलंडला त्यांचे घर आहे.

प्लॅटफॉर्मवर गाडी आली व कंडक्टरने आमचा डबा दाखविला. हा तर एक स्लिपरेट होता. ८×५ रुंदीच्या या खोलीत दोन बर्थ होते व कडेला कमोड आणि वॉशबेसीन दिसले. गावात हिमवर्षाव झाला, पण या कूपेमध्ये उष्णता निर्माण केली होती. यामुळे त्या थंडीचा परिणाम त्या स्लिपरेटमध्ये पाणीरूपाने दिसू लागला. कार्पेट पण भिजू लागली. अटेन्डन्टने जुन्या वर्तमानपत्रांनी ते पाणी झाकले व आम्ही निजण्याचा प्रयत्न केला. झोप काही येईना. तसेच पडलो व सकाळी सातला क्लिवलँड शहराजवळ आलो.

डबा पुष्कळ पुढे होता. यामुळे खाली जे उतरलो तो बर्फातच पाय पडले. या क्लिवलँडला त्या दिवशी थंडीचे प्रमाण शून्याच्या वीस अंशाखाली होते. आमचे भाचे डॉ. तामसकर तिथे आले होते. आम्ही त्यांचे घरी गेलो. क्लिवलँड शहर मोटार उत्पादनाच्या धंद्याकरता प्रसिद्ध आहे. इथे फोर्ड आणि शेवरोलेट गाडी उत्पादनाचे कारखाने आहेतच, पण इतर कारखानदारीसुद्धा बरीच आहे. या कारखानदारीपायी या शहराच्या मध्यभागी कृष्ण-वर्णीय लोकांची मोठी वसाहत आहे. हे धष्टपुष्ट लोक शारीरिक काम करतात. पैसा मिळाला की भारी किमतीची मोटार (कॅडीलॅक), उंची कपडे व महागड्या उपाहारगृहात भोजनापायी खर्च करतात. या शहराच्या कडेला भलेमोठे सरोवर आहे, पण प्रचंड प्रमाणा-वरील कारखानदारीमुळे या सरोवराच्या पाण्यात प्रदूषण बरेच वाढले आहे. सरोवरा-जवळच मोठ्या कंपन्यांची बाजारपेठ व कचेऱ्या दिसतात. मध्यावर विशिष्ट प्रकारची बाग असून बरीच कारंजी लावली होती. एका मोठ्या कारंज्याजवळ आम्हाला भारतीय, चिनी व युरोपियन संस्कृतीच्या प्रतीकांची शिल्पे दिसली. भारतीय शिल्पात एक बैल एक देवी व श्री महादेव यांच्या प्रतिमा होत्या. या सर्व शिल्पांवर एक मानव एका पायाने उडताना कोरला होता. सगळी पृथ्वी व सगळ्या संस्कृती ज्वालेत जळत असून हा महामानव आकाशात झेप घेत आहे असे या शिल्पाने आम्हाला दर्शविले.

दुसऱ्या दिवशी या गावातील म्युझियममध्ये माझे भाषण झाले. मुंबईच्या प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियमप्रमाणे येथील शिल्प ठेवले होते. या शहरापासून ४० मैल दूर 'अक्रॉन' शहर आहे. इथे आमचे दोन पुतणे राहतात. या सगळ्या भेटी संपवून तिसऱ्या दिवशी मला एका लोकल ट्रेनवर सोडण्यात आले. ही लोकल ट्रेन गावाबाहेर थेट विमानतळाच्या आत जाऊन थांबते. गाडीतून उतरले की पुढे विमानात बसण्याच्या जागेवरच आम्ही पोचलो. या वेळी मला एका अगदी लहान विमानाने प्रवास करावा लागला. या विमानात आम्ही अवघे दहाच यात्री होतो. आमचे सगळे सामान दाराजवळच्या पिशवीतच कोंब-ण्यात आले. अर्ध्या तासाने आम्ही टोलीडो या शहराच्या विमानतळावर पोचलो. इथे तीन विद्यार्थी माझी वाट पाहात होते. या विद्यार्थ्यांनी गाडीतून मला ४० मैल लांब 'बाऊलिंग ग्रीन' विश्वविद्यालयात नेले. हे विश्वविद्यालय त्याच नावाच्या गावी असून तिथे अदमासे सहा हजार विद्यार्थी शिकतात. तेथील एका गेस्ट हाऊसमध्ये माझी व्यवस्था झाली. गेस्ट हाऊसच्या खिडकीतून मला सगळा परिसर चांगला दिसत असे. ओळीओळीने जाणारे विद्यार्थी, प्रत्येकाच्या हातात पुस्तक आणि नोटबुक होते. सर्वत्र पसरलेले बर्फ तुडवीत तुडवीत वर्गात चालले होते. या विद्यार्थ्यांच्या रांगा, त्या मुला-मुलींचे हसणे, खिदळणे व विद्याभ्यासाची आवड पाहून मला माझ्या तरुणपणाच्या केंब्रिज विश्वविद्या-लयाची आठवण झाली.

सकाळी विद्यार्थ्यांच्या कँटीनमधून न्याहरी करून मी प्रोफेसर जॅक्सनकडे गेलो. त्या दिवशी त्यांनी मला दुसरा तास घ्यावयाला सांगितले. वर्गातील विद्यार्थी पुस्तकांची

बंडले घेऊन आले होते. प्रत्येकाने माझ्या भाषणाचे नोट्स घेतले व ताबडतोब पुस्तकाच्या आतील मजकुराप्रमाणे प्रश्न विचारले. मुंबईतील विद्यार्थी, विशेषत: मागल्या बेंचावरील, लेक्चर चालले असताना मला झोपताना दिसतात. पण इथे तर टिपणे घेऊनसुद्धा घरून तयारी करून आल्यामुळे प्रश्न विचारत होते. यामुळे मला फार आनंद झाला. त्या विषयाचे प्रोफेसर व इतर प्राध्यापक अगदी मागे बसले होते व ते पण टिपणे घेऊन प्रश्न विचारीत होते. मला कितीतरी तयारी करावी लागली. त्रास झाला, पण विद्यार्थ्यांची ग्रहणशक्ती पाहून ती चारही लेक्चर्स घेताना आनंद झाला. येथील तीन दिवसांचे वास्तव्य संपवून क्लिवलँडला परत आलो. रात्रीला बाजारपेठ संपवून दुसऱ्या दिवशी सकाळी शिकागोकरता जाण्यास त्या थंड हवेतून व बर्फाच्छादित रस्त्यावरून स्टेशनकडे निघालो.

क्लिव्हलँडला तपमान शून्याच्या ३० अंश खाली गेले. गाडी सकाळी सातला सुटणार होती. आम्ही साडेसहाला आलो व जड सामान काऊंटरवर दिले. स्लॉट मशीनवरून कॉफी घेतली व दालनात चित्रविचित्र वृक्षराजींच्या ताटव्याजवळ बसलो. सात वाजले, गाडी आली नाही. स्टेशनमास्तर जवळ आला. म्हणाला, "थंडीमुळे रूळ गारठलेत व गाडी तीन तास उशिरा येईल. आपणास शिकागोला गाडी बदलून तीनला दुसरी पकडायची आहे ते ध्येय साधणार नाही. तरी कृपा करून ग्रेहाउंड बसने आत्ताच शिकागोला जावे." पण इतके सामान घेऊन ते कसे जमेल असं म्हणताच तो म्हणाला, "नो प्रॉब्लेम, मी रेल्वेच्या मोटारीने तुम्हाला तिकडे पोचवतो!" त्यानं आमचं सामान मोटरीत कोंबलं, चार मैल ग्रे हाऊंड बसस्टॉपवर नेलं. तिथल्या मॅनेजरला सामान दिलं व 'गुड जर्नी' म्हणत परतला. रेल्वेच्या रिटर्न तिकिटावरच हा पाच तासांचा बसप्रवास केला. पण गारठा खूपच होता. हिमवर्षाव होऊन रस्ते अगदी थिजले होते. त्यामुळे बस वेळेवर येऊ शकली नाही व शिकागोला आमची गाडी चुकली. ग्रेहाउंड बसस्टॉपपासून युनियन स्टेशनपर्यंत टॅक्सी केली. मुंबईच्या टॅक्सीवाल्याप्रमाणे त्याने घासाघीस सुरू केली. पण भाडे घेऊन टॅक्सी ड्रायव्हरने रिसीट, गाडीचा नंतर व सही मात्र दिली. शिकागोच्या युनियन स्टेशनवर स्टेशनमास्तरला गाडी चुकल्याचे व टॅक्सीवर खर्च झाल्याचं सांगितलं. त्यानं पटकन व्हाउचर फॉर्म पुढे करीत 'नो प्रॉब्लेम' म्हटलं व मी भरलेले टॅक्सीचे पैसे परत केले. शिवाय दुसरी गाडी तासाभरात सुटेल त्यानं जावं, असं सुचवून गैरसोय झाल्याबद्दल क्षमा मागितली. शिवाय गाडी चुकून घरच्या मंडळींना काळजी लागली असेल याकरता 'या माझ्या फोनवरून खुशाल फुकट ट्रंककॉल करा' असे नम्र होऊन सांगितलं. भारतात असं कधी होईल काय?

गाडीला तास दोन तास वेळ होता. एका आरामगृहात कॉफी व डूनट घेत बसलो. समोर दुकानं होती. सुंदर वस्तू दिसत होत्या. पण मानवी मन काही विचित्र असतं. दृष्टीसमोरचं दृश्य जरी टेपरेकॉर्डप्रमाणे मेंदूत टेप होत असलं तरी अशा वेळी जुनीच कॅसेट डोळे अंधुक होऊन स्मृतिपटलावरून धावू लागते

गाडी भरधाव पळते आहे. मला आता झालेल्या प्रवासाची आठवण आली. दोन्हीकडे हिमवर्षाव होत असून डब्यातील तपमान वाढवलेय. नद्यातलं पाणी पार गारठलं होतं व प्रत्येक स्टेशनवर खूप उबदार कपडे घातलेले प्रवासी डब्यात शिरले होते. सगळ्यांचे कपडे एकसारखे होते. इथे स्पॅनिश होते, कृष्णवर्णीय होते, डच, फ्रेंच, ज्यू व आता अमेरिकन. सगळे एकाच प्रकारची वेशभूषा करून बसले होते. कृष्णवर्णीयांचा वेश जरा भारीच वाटला. रात्र झाली व सगळे आपआपल्या जागी आडवेतिडवे निजू लागले. कुणी पांघरूण घेऊन होते, कुणाचे तोंड उघडेच होते. काही युगुलं मिठीत गर्क होती. साऱ्या मानवी भावना चहुकडे निरनिराळ्या स्वरूपात विखुरल्या होत्या. पण या सर्वांना जोडणारा धागा मात्र एकच होता. तो म्हणजे सर्व मानव होते व आपापल्या स्वभावाप्रमाणे जीवन व्यतीत करीत होते. ते पाहून गुजरातेतील गरबा नृत्याची आठवण झाली. एका नृत्यात उंच छपरावरून रुंद रंगीबेरंगी रिबिनी सोडतात. खाली टिपऱ्या घेऊन नृत्यांगना हावभाव करून, फिरून त्या रिबिनींचा गोफ निर्माण करतात. जगातले सर्व मानव असेच रिबिनीप्रमाणे असावेत. त्यांचा संच करून, त्यांना डिवचून, खेळवून नियती एक मानवतेचा गोफ निर्माण करते. या गोफात वेगवेगळे रंग असतात व त्या विविधतेतच चराचर सृष्टीचे सौंदर्य साठले आहे. आपण सगळे एका माळेतले मणी आहोत ही भावना घेऊन चालू लागलो तर जगात दंभ, आकस, द्वेष, युद्ध, लाभ होतील काय ! श्रीज्ञानेश्वरांनी सांगितलंच आहे की " विचरे विश्वामाजी विश्व होऊनि ' असा मानव बनेल काय ?

" यू फ्रॉम इंडिया " म्हणत एकाने माझी स्मरणटेप बंद केली " इंडिया गुड कंट्री" दुसरा कृष्णवर्णीय पोर्टर म्हणाला. कुठे माझी स्मरणटेप व कुठे समोरचं दृश्य ! सामान गोळा करून गाडीकडे निघालो.

पोर्टरनं सर्व सामान व्यवस्थित गाडीच्या डब्यात ठेवलं आणि मी जेवढे पैसे दिले तेवढेच घेऊन ' गुड जर्नी ' म्हणत मुकाट्यानं निघून गेला. मुंबईला बोरीबंदरचा काय नि कोणत्याही स्टेशनचा कुली त्रास दिल्याशिवाय जाणारच नाही.

रात्रीचे सात वाजले होते. बाहेर तपमान शून्याच्या २० अंश खाली होते डब्यात मात्र खूप ऊब निर्माण केली होती. ती इतकी की माझी एक प्लॅस्टिक बॅग कडेला टेकून ठेवली होती ती वितळून गेली. प्रवास खूप दगदगीचा झाला. खुर्चीवर जरा लोळलो आणि त्या कंडक्टरचे शब्द कानी पडले. ' येणाऱ्या स्टेशनांची नावे ऐकावी व गाडी तिथे केव्हा पोचेल त्या वेळेची नोंद घ्यावी. ' आमचं ठिकाण दोन तासानं येणारं होतं रात्रीच्या भोजनाची घंटा झाली व डब्यातले दिवे मंद झाले. डोळे मिटून शीण घालवण्याकरता झोपेची आराधना करत होतो. तशातच गुंगी लागली. अर्धवट झोपेत मला ' नासा ' या अंतराळयान स्थानकाचे दृश्य दिसले. चंद्रावर मानव गेला. आता तो मंगळावर जाईल. एक अंतराळयान लांब शुक्र व गुरू या ग्रहांवरून शनीच्या पुढे अंतराळात जात आहे. अशा अंतराळात जर मानव असेल तर त्याला तिथली काळ व वेळ या पृथ्वीपेक्षा निराळी भासेल.

ज्ञान विश्वाच्या टोकाला जाण्यास त्याला प्रोफसर लॉरेन्सच्या मते १४.१ प्रकाश वर्षे प्रकाशवेगाने अग्निबाण गेल्यास लागतील पण तो परतल्यावर या पृथ्वीच्या कालमर्यादेत कक शतकं संपतील व तो इथे नवखा भासेल– येथील परिस्थिती बदललेली असेल. मग तो परत जाईल काय ? डॉ. एरिक डेन्किन यांच्या 'वॉज गॉड अॅन अॅस्ट्रोनॉट' या पुस्तकात असे दैवी मानव इकडे आल्याची नोंद दिली आहे. तसे आपल्या महाभारतातही नोंदलंय की राणी कुंतीला सूर्यापासून पुत्र झाला व तो 'कानातून' झाला. म्हणून कर्ण नाव दिले. पण डेन्कीनच्या आधारे हा लांबून येणारा तेजस्वी मानव (सूर्य) कुंतीच्या गर्भाशयात कर्ण नावाचा गर्भ विकसित करून गेला असे का समजू नये ? अशा अर्ध-तंद्रीत व गुंगीत बेजोड विचार येत होते, तेवढ्यात गेलसबर्ग आल्याची घोषणा झाली. अर्धवट तंद्रीत खाली उतरलो. कंडक्टरच्या मदतीनं सामान उतरवलं. तंद्रीतच त्या थंड हवेत कुडकुडत सामान गोळा करत होतो. तेवढ्यात मागून मांडीवर कुणाच्या तरी हाताची थाप पडली. "हॅलो ग्रँडपा, डिड यू ब्रिंग डेनवर चॉकलेट" हे वाक्य कानावर आलं. तिकडे गाडी सुटली व वळून पाहिलं तर आमचा नातू बोट धरून 'कम ऑन, टेल अस' म्हणत होता– मी तंद्रीतून पूर्ण जागा झालो व त्या – २५ डिग्री तपमानातून लग-बगीनं घरच्या मोटारीत शिरलो.

(या घटनेचा काळ १९८१–८२)

# ३ : दुसऱ्या महायुद्धकालीन वास्तव्याचे काही क्षण

कॉलेजची प्रयोगशाळा सकाळी नऊलाच उघडत असे. पदव्युत्तर विद्यार्थ्यांना वेगळी किल्ली दिल्यामुळे ते अगदी सकाळी जाऊन रात्री उशिरापर्यंत थांबत असत. लायब्ररी मात्र विशिष्ट वेळेवर उघडे. सीनियर विद्यार्थी व शिक्षक यांना वेगळीच जागा होती. अगदी शांत. ' बोलू नका ' व ' धूम्रपान करू नका ' असे फलक पण होते. या शांत वातावरणात केव्हा वेळ जाई कळत नसे. प्रयोगशाळेत वेगळा लांब बेंच होता. तिथे बसल्यावर तेथील असिस्टंट श्री. गेडीज हटकून येई. ' गुडमॉनिंग ! हाऊ आर यू धिस मॉनिंग ?' हे रोजचे वाक्य ठरलेले. नंतर ' मी आपणांकरिता काय करू ' हे पुढील वाक्य. कामाला लागणाऱ्या वस्तूंची यादी दिल्यावर ' सो लाँग ' म्हणून तो जाई. दुसरे विद्यार्थी आले की आडनावाने कधीच हाक मारीत नसत. ' हॅलो पी. जे.' एवढेच माझे नाव विद्यार्थी समूहात पसरले होते.

सकाळी खोलीतच दूध गरम करून घेई व थोडा पाव व लोणी एवढेच खाऊन कॉलेजचे काम सुरू होई. दुपारी कॉलेजच्या जेवण खोलीत एका शिलिंगला व्यवस्थित लंच मिळे. लँड लेडी सहा पेन्सला सूप व एक गोड पदार्थ देई. म्हणून मी घरीच जात होतो. येताना बहामाचे एक केळं, किंमत एक पेन्स व कॅट-बेरीचे किंवा राऊट्रीचे एक चॉकोलेट दोन पेन्स असा खर्च असे. सायंकाळी कॉलेजहून परत येताना स्टोअर्समधून तांदळाची पिशवी, मसूर किंवा वाटाण्याच्या डाळीची पिशवी घेऊन यावी. मध फारच उत्तम मिळे. कित्येकदा तर अगदी पोळ्यासहित मध मिळे. ' हेदर हनी ' जंगली झुडपांच्या फुलांपासून मधमाश्यांनी काढलेला असे. खेड्यातील बहुतेक खेडुतांकडे मधमाश्यांचे पोळे असे व सकाळी न्याहरीला मध, दूध व घरचे पाव लोणी अगदी अवश्य टेबलावर ठेवीत. नेहमी पाव आणताना ' ब्राऊन ब्रेड ' म्हणजे भरडलेल्या गव्हाचा पाव बरा लागे. त्यात जीवनसत्त्वे व कॅल्शियम टाकलेले असे. पुढे भाजी-वाल्यांकडे सर्वांत स्वस्त भाजी पानकोबी (अगदी बटाट्याएवढे हे लहान कोबीचे गड्डे

मिळत, ज्यांना ते ' ब्रसेल्स स्प्राउट ' म्हणत). लोणी दीड शिलिंगला अर्धा रत्तल होते. हे सगळे सामान खोलीवर आणणे हा रोजचा कार्यक्रम. दार बंद केले की खोली गरम करण्याच्या गॅस स्टोव्हवर भांडे ठेवावे. त्यात तांदूळ, डाळ व कोबी किंवा इतर काही भाजी टाकावी. ते उकडायला ठेवावे व हात-पाय धुऊन यावे तोपर्यंत ' खिचडी ' तयार. तिकडे जिरे मिळे, मोहऱ्या पण मिळत. लोण्यात जिरे किंवा मोहरीची फोडणी देऊन पण ' खिचडी ' होत असे. कपडे काढून स्वस्थ खाली बसावे. ब्रेडचे तुकडे, लोणी व ही खिचडी यथेच्छ खावी. ब्रेड आणि मध शेवटी घ्यावे व सकाळचे उरलेले दूध प्यावे. कॅनेडाचे ॲपल खात खात खोलीत शतपावली करावी. ॲपल अवघे तीन पेन्सला मिळे. असे रात्रीचे जेवण असे.

घरात दुसऱ्या मजल्यावर चार खोल्या होत्या व एकच न्हाणीघर व तिथेच संडास. सकाळी शौच-मुखमार्जन करून निघावे. यामुळे उशीर लाग. तिकडे नुसते दाढी करणे व तोंडावर पाणी टाकणे एवढाच इतरांचा कार्यक्रम सकाळी असे. एके दिवशी बाई म्हणाली, ' तुम्हाला इतका उशीर का लागतो ?' ती पुढे म्हणाली, (व इतरांनी रुकार दिला) ' इकडे तर सकाळी कुणी शौचाला जातच नाही. दुपारी किंवा दोन-तीन दिवसांनी जायचे !'

आंघोळीला गरम पाणी टबमध्ये आठवड्यातून एकदा मिळे. रात्री दहानंतर बहुतेक आंघोळ होई व नंतर झोपच. टबातील साबणाच्या पाण्यात अंग चांगले शेकले जाई व स्वस्छ होई. एके दिवशी लॅंड लेडी मिस फिलिप्स बाईंनी आमंत्रण दिले की आज दिवसभर इंग्लिश अन्न घ्यावयाला यावे. सकाळी वरून खाली येताना कातडी जळल्याचा वास येत होता. पटकन खोलीवर जाऊन रुमालावर कोलनवॉटर टाकले. नाकावर रुमाल घेऊन स्वयंपाकघरात शिरलो. जेवावयाचे टेबल तिथेच होते. बाईने ओट धान्याची लापशी-पॉरीज समोर ठेवली. दूध, साखर टाकून ती खाल्ली. नंतर दुसरी प्लेट आली. यात लाल पांढरे पातळ तळलेले वर्तुळ होते व त्यामध्ये पांढऱ्या पिवळ्या प्रकारची अंडी ही डिश होती. ' बेकन अँड एग्ज ' (डुकराच्या मांसाचा तळलेला बारीक पापुद्रा व त्यावर फ्राय केलेले अंडे) त्या मांसाचा घमघमाट येत होता. नाकाला रुमाल लावून ते काट्यांनी दूर केले व अंड्यावर मीठ-मिरे ओतू लागलो. बाई म्हणाली, ' देम बेकन कम फ्रॉम गुडस्टॉक ' (हे मांस उत्तम डुकराचे आहे.) मी नाकाला रुमाल लावूनच होतो. बाईंनी चहा केला. मी नुसते गरम दूध घेतले.

दुपारची लंचची वेळ झाली. बाईने घंटा वाजविली. टेबलावर पहिला कोर्स सूपचा होता. ब्रेडचे बारीक तुकडे तळून त्यावर तरंगत टाकले होते. तळाशी इतर काही बारीक तुकडे होते. सूप झाल्यावर मोठीच डिश आली. तिने ती गरम ओवनमधूनच काढून आणली. ती होती रोस्ट बीफ व पुडिंग. ' यार्कशायरची पुडिंग.' बाजूला करून खाल्ले. तिसरा कोर्स ' ॲपल टार्ट.' यात नासपाती उकडलेले व चिरोट्यासारखे भरलेले होते. शेवटी

केळी व चहा. चार वाजता पुन्हा घंटी वाजली. चहा, केक व बिस्कटे टेबलावर होती. रात्री 'आयरिश स्टू' (भाजी, भात वरण आदी एकत्रित करून जसा प्रकारहोईल तसे हे होते) व 'स्ट्रॉबरी कुकी' चहापान बिस्किटाबरोबर झाल्यावर बाई म्हणाली, 'यू आर ए डिफीकल्ट पर्सन टू प्लीज' (तुमच्या आवडीनिवडी सांभाळणे कठीण). मी उत्तरलो, 'भारतात तुम्ही आल्यास आमच्या अन्नाकडे पाहून तुमची तीच परिस्थिती होईल!'

न्यूकॅसल शहर कोळशाच्या खाणीकरिता प्रसिद्ध आहे. टाईन नदी शहरामधून वाहते. हिच्यावर उंच पूल आहेत. काही पूल बाजूला सारता येतात. या नदीकाठी मोठ-मोठ्या बोटी करण्याचे कारखाने आहेत. जगप्रसिद्ध लढाऊ युद्धनौका (बॅटल शिप) 'प्रिन्स ऑफ वेल्स' याच नदीकाठी तयार झाली. युद्धापूर्वी या अजस्त्र बोटीवर गेलो होतो. बोटीचे बाहेरचे पत्रे तर तीन इंच जाड होते. तोफांच्या बाजूला फूटभर लोखंडाचे थर दिसले. ही बोट जिथे तयार करण्यात आली, त्याच्या पैलतीरावर जर्मन बोटी अगदी युद्ध सुरू होईपर्यंत कोळसा वाहून नेत होत्या.

येथील रेल्वे यार्ड इंग्लंडमधील सर्वांत मोठे मानले जात होते. गावात ट्राम तर होतीच व बसेस पण धावत होत्या. इतर वाहतुकीला मोटारगाड्या व मोठ्या व्हेलर घोड्यांच्या सामानवाहू गाड्या होत्या. सायकली चिक्कार होत्या. रविवारी सकाळी हाफपँट घातलेली मुले-मुली पाठीवर शिधा व सामान बांधून लांब लांब सहलीला जात. यांच्या सायकली मजबूत व लांब पल्ल्याच्या होत्या. काही रस्त्यावर मधूनच सायकली-करिता मार्ग होते.

शहरापासून लांब गेले की निसर्ग अगदी हिरवागार. वसंत आणि ग्रीष्म ऋतूंत रस्त्याच्या दोन्दी बाजूस बसावयाला बेंच व मधे मधे फुलांचे ताटवे बरेच दिसत. लोक फुले पाहत. पण कुणी तोडताना दिसले नाही किंवा कधी याच्या रक्षणाला पहारेकरी नजरेला पडला नाही.

शहरातून लांब २० मैल प्लासी नदीच्या खोऱ्यात नेहमी प्रयोगाकरिता जावे लागे. ही नदी म्हणजे काळव्याप्रमाणे लहान ओढा होता. दोन्ही किनाऱ्याला उंच भाग व दोन्ही बाजूला गर्द गवत व झाडे. या गवतात सरळ लोळावे पण कधी सर्प नाही. विंचू तर राहोच, पण मुंग्या नि माशा पण दिसल्या नाहीत. बरेच भटके इथे येत व सारा दिवस मऊ गवतावर लोळून, पाखरांचे आवाज ऐकत व वाहणाऱ्या ओढ्याचे गीत श्रवण करीत. आणलेली न्याहरी व चहा घेत. कधी कुणी रेडियो आणलेला दिसला नाही. कुणी ग्रामोफोन वाजविला नाही नि कुणी जोराने गाण्याचा आवाज केला नाही. अशा या शांत नसर्गिक वातावरणात दिवस जाई. परतताना काही मासे पकडणारे दिसत. त्यांच्या नेहमीच्या गोष्टी 'अरे, तो निसटलेला मासा केवढा मोठा होता म्हणून सांगू...' वगैरे.

कोळशाच्या खाणी चोहीकडे होत्या. डोक्यावर लोखंडी टोपी, तीवर लाईट, तोंड काळे झालेले, सिगारेट पीत असलेले, गर्द निळे कपडे परिधान केलेले कामकरी भेटत. त्यांची इंग्लिश भाषा म्हणजे कित्येक वेळा व्याकरणाचा खूनच होत असे. (Them people no good) सरकारने त्यांना ओळीओळीने घरे बांधून दिली आहेत. आंघोळीला टप दिला आहे. बहुतेक खाणवाले मजूर आंघोळीच्या वेळी पाठ व कंबर धूत नसावेत. परिणामी कोळसे उचलून उचलून ती अगदी काळीकुट्ट झालेली दिसत होती.

येथील फॅशनेबल बाजार म्हणजे जवाहिऱ्यांची दुकाने, कपडे व मोठी स्टोअर्स. जवाहिऱ्यांच्या दुकानात अहोरात्र दिवा जळत असे. मुख्य सामान अंगठ्या, ब्रूच, काही मनगटावरील ब्रेसलेट, घड्याळे, चांदीचे चमचे, छत्र्या, कोट व तबक. गरिबांचा प्रवेश लग्नाच्या अंगठीकरिताच व्हायचा !

वस्त्रांचे मोठमोठे स्टोअर्स. त्या वेळी सर्वांत कुतूहल वाटत असे ते खिडक्यातील स्त्रियांच्या पुतळ्यांचे. कपडे बदलताना समोरून पडदा लावीत; मग त्याला नवीन वस्त्रे घालीत. शिंप्याकडून माप घेऊन सूट करणे फार महाग. स्त्रियांच्या फॅशन्स तर आठवड्याला बदलणार. रेडिमेड फ्रॉक, झंपर, ब्लाऊझ, स्कर्टच्या खात्यात जावे, कपडे घालावे. ती बाई गोड गोड बोलून कपडा बांधून देत असे. पुरुषांच्या विभागात तयार सूट असत. कमीअधिक किमतीत आठ दिवसांनी सूट मिळे. विणकर ते ग्राहक किंवा बरटन ४५ शिलिंग टेलर्स यांच्याकडे माप देऊन स्वस्त दरात महिन्याभरात सूट येई. बुटाच्या कित्येक दुकानात क्ष किरणांची व्यवस्था होती, पायाची हाडे पाहता यावीत यासाठी.

शर्ट, चड्ड्या तयार मिळत. धुलाईनंतर शर्ट आटल्यावर मला दोन वेळा दुसरा नवीन शर्ट त्यांनी दिला. परिटाच्या दुकानात कपडे हरवल्याने मला त्या कपड्यांची किंमत मिळाली. प्रामाणिकपणा फार होता. मालाची किंमत लिहून ठेवल्यावर कमी-जास्त करणे नाही. एकदा मी तीन सफरचंदे विकत घेतली. घरी जाऊन कापल्यावर एक कुजके निघाले. दुकानदाराने दुसरे उत्तम सरफचंद परत दिले.

ठिकठिकाणी मटन बाजार होते. उत्तम काचेच्या भव्य खिडक्या व आत अगदी स्वच्छ एका मशीनवर सबंध पोट पोखरलेले डुक्कर असे. मागून गोल करवत धीरेधीरे फिरे. त्या डुकराचे अगदी पातळ पापडाप्रमाणे कात्रे होत. हे बेकन ताजे विकले जाई. डुकरापासून हेम पोर्क मिळते. कुठे कुठे सबंध वासरू टांगून ठेवलेले असे. डोके ते शेपूट कापलेले गुरांचे धूडच्या धूड खुंटीला सर्रास असे. पॅन्टवर ॲप्रन घालून तो खाटीक मांस, मासे, कोंबड्या, टर्की विकत असे. लोक चांगले सुशिक्षित असत. एका खाटकाचा मुलगा माझा सहाध्यायी होता व पुढे तो पदार्थविज्ञानाचा प्राध्यापक झाला.

झाडूवाले, शिपाई, चौकीदार, कामगार सर्व कामाचे वेळी ॲप्रन घालून काम करीत. रविवारी सर्व उत्तम सूट घालून फिरत. भारतातील समाजव्यवस्थेमुळे यांच्यात मिसळण्यास कधी कधी मला बुचकळ्यात पडल्यासारखे होई.

वाण्याच्या दुकानात धान्य पुड्यात मोजून बांधून ठेवीत व समोर किमती लिहीत. भाजीवाल्याला ग्रीनग्रोसवर म्हणत. त्याच्याकडे लेट्स, एस्परेगस, स्पीनच, ब्रसल्स, स्प्राऊट फुलकोबी, पानकोबी, गाजर, बीट, बटाटे, मटार, फरसबी, लिंबू, ॲपल. पीच, द्राक्षे व बहामाची केळी वगैरे ठेवलेली असत. मधूनमधून इटालीहून वांगी, भेंडी, जाड्या मिरच्या. लहान भोपळे ठेवीत. यापैकी बरेचसे पदार्थ परदेशाहून येत असत. जवळच फुलवाल्याचे दुकान असे. फुले सजविण्याकरिता किंवा चर्च किंवा मृतदेहावर ठेवण्याकरिता असत. यात गुलाब, ॲास्टर, कारनेशन, नारसिसस, क्रोकस, व पानंझीज बहुतांशी मिळे. हिवाळयात फुलांचा तोटा. तेव्हा लांबून ती आणून विशिष्ट वातावरणात ठेवीत. कधी कुणी डोक्यात ती माळली नाहीत. व कधी कुणी फुलांचा वास घेताना दिसला नाही. पण फुलांची शोभा पाहून मुग्ध होताना सगळेच दिसले. घरी लावलेल्या फुलझाडाला पाने आली, कळी आली की तो कुतूहलाचा विषय होत असे.

हजामतीचे दुकान लांबून दिसे. दारासमोरच एका दांड्यावर लाल किंवा निळे पांढऱ्या रंगाचे पट्टे काढलेले असावयाचे. हेच ते दुकान. तसेच औषधाच्या दुकानासमोर मोठमोठ्या बाटल्या विविध रंगांनी भरून ठेवीत. हे दिसले की समजावे, औषधाचे दुकान आले.

नाक्यानाक्यावर तंबाखू विकणाऱ्यांची गादी असे. इथे सिगारेट, चिरूट, तंबाखू, तपकीर, चॉकलेट, काही वाचनीय कादंबऱ्या व वर्तमानपत्रे मिळत. मी रोज घराजवळच्या अशा गादीवरून ९ ला कॉलेजात जाताना चॉकलेट घेत असे. त्या गादीवर एक ठेंगणीशी विधवा तरुणी बसे व नेहमी भारताबद्दल गोष्टी काढी. तिच्याकडे एक वयस्कर गृहस्थ त्याच वेळी येई व बऱ्याच गप्पा मारून सिगारेट विकत घेई. एके दिवशी मी घाईत ८-४५ ला दुकानावर आलो. लांबून दुकान बंदच दिसले. दारात शिरणार तो दचकून परतलो. लहान स्टुलावर ती बया उभी होती व समोरच ते वयस्क गृहस्थ तिला धरून उभे होते.

कॉलेजमधील सहभोजनाचा दिवस आला. हप्त्याने बराच माल तिकडे मिळत असे, त्यात नवीन कपड्यांचा पण समावेश होता. आठ शिलिंग आठवड्याचे ठरवून निळा सूट घेतला व वार्षिक सहभोजनात भाग घेण्याची तयारी सुरू केली. त्या दिवशी आमचे प्रोफेसर व इतर शिक्षक सपत्निक आले. काही विद्यार्थ्यांनी आपल्या 'गर्ल फ्रेन्डस्' आणल्या. माझे एक मित्र मि. स्टिव्हन्सन होते, (आज ते ब्रिसबेन विश्वविद्यालयात प्रोफेसर आहेत) त्यांनी आपली मैत्रीण आणली होती. इतर वर्गातील मुली स्टिव्हन्सनशी बोलू लागल्या. पण हे साहेब दचकून वागायचे. त्यांचे म्हणणे असे की, त्यांच्या मैत्रिणीला 'हे' बोलणे खपणार नाही. टेबलावर सगळे बसले. माझे गाईड डॉ. मेक्लेगन व मी सोडून इतर

पुरुषांनी ' मैत्रिणी ' आणल्या होत्या किंवा बरोबर पत्नी होती.

जेवताना डॉ. मेक्लेगनने स्टिव्हन्सनला बाजूला बसविले व त्यांच्या मैत्रिणीला पलीकडे. आता दोघांची मदिरा पिण्याची चढाओढ सुरू झाली. ' वन ऑन मी ' करीत नवीन बाटल्या येऊ लागल्या. माझ्याकडे ग्लास पुढे करून हियर टू " सॉफ्टी " म्हणत ढोसत होते. मदिरा जरा चढली. खिदळणे सुरू झाले, चढाओढ आणखी वाढली. शेवटी स्टिव्हन्स-नच्या मैत्रिणीने हात धरला व म्हणाली, ' मला घरापर्यंत पोचवायचे आहे ना ' हे बोलणे ऐकले. विद्यार्थी ओरडले, ' साखळीने जखडलेला प्राणी. ' मुली माझ्याकडे वळून म्हणाल्या, ' हॅलो पी. जे., काय तुमच्या पत्नी तुम्हाला अशाच साखळीने जखडून ठेवतात ?'

जेवणाच्या सुरुवातीला राजाच्या नावाचा मदिरेचा घोट प्रथम घेतला व नंतर गमतीच्या गोष्टी सांगून इतरांच्या स्वास्थ्याच्या नावाने घोट घेण्यात आले. रात्रीला उशीर झाला. बरेचजण पेंगतच टेबलावरून उठले.

इकडे जीवण जगणे जोडीनेच जमते. फिरणे, सिनेमा, फार काय, कित्येकजण अभ्यासपण जोडीनेच करीत असतात. तसे नसल्यास एकाकी वाटायचे. एके दिवशी प्रयोग-शाळेतून एकाकी रात्रीला परत बाहेर निघालो. बाहेर जोराचा वारा होता. मुख्य दार लावले ते वाऱ्याने धाडकन् उघडे झाले. याच वाऱ्याच्या झोताबरोबर एक मफलर जोराने उडून डोक्यावर आला. त्यावर सेंटचा सुवासिक वास दरवळत होता.

बाजूला सारला तोच जरा दूरवर वाऱ्यावर उडणारे केस सावरीत ज्युनियर वर्गा-तील एक मुलगी इकडे येताना दिसली. ' मफलर आपला काय ?' ' होय, थँक्यू ' म्हणत तिने तो स्वीकारला. घराकडे निघालो. कॉलेजपर्यंत तिने नावगाव सांगितले. ' अनुवंश ' या विषयावरील विद्यालयीन व्याख्यानात मला पाहिल्याचे म्हणाली. मी भारतीय कळताच कुतूहलात्मक बोलणी सुरू झाली. शेवटी दीड मैल लेडीज हॉस्टेलपर्यंत ती चालत होती.

पुढे पुढे भारतीय इतिहास, संस्कृती, चालीरीती वगैरे विषयांवर सायंकाळच्या फिरण्याच्या वेळी अधूनमधून चर्चा सुरू झाली. एकदोनदा हिमवर्षाव होत असताना चांदण्याच्या शुभ्र प्रकाशात कर्रकर्र जोड्याच्या आवाजाचा लांब लांब या गोष्टी होऊ लागल्या. मैत्री जमल्यावर एक सिनेमा व एक ऑपेरा पाहणे झाले. जरा गट्टी जमू लागली.

याच दरम्यान तिचे वडील आजारी असल्याचे तिला पत्र आले. ती पत्र घेऊन माझ्या घरी आली. जरा चिंतेत होती. भारतीय रीतीप्रमाणे ' ते लवकर बरे होतील ' असे मी म्हणालो. ' कसचे बरे होतात ' तिने निःश्वास टाकून उत्तर दिले. चार दिवसां-करिता घरी जाऊन येते म्हणाली. मी शुभ चिंतन म्हणून ' गुडलक व शुभप्रवास ' म्हणत हस्तांदोलन केले. तिने माझा हात दुसऱ्या हाताने दाबून ' मला आशा नाही, पण तुमच्या

शुभेच्छेने धीर मात्र आला. असे म्हणत ती बसमध्ये चढली.

चार दिवसांनी तिचे पत्र आले. मन मोकळे करून लिहिलेले ते पत्र होते. आता वडील ख्रिस्तवासी झाले होते व आई आणि बंधूंची जबाबदारी आल्याने भांबावून गेली होती. मी तिला आध्यात्मिक सांत्वनात्मक पत्र पाठविले व स्मशान-यात्रेस येण्याबद्दल मनीषा व्यक्त केली. तिने नकारात्मक पत्र पाठविले. आठ दिवसांनी परत आली. भेटीत पाणावलेल्या डोळ्यांनी म्हणाली की, मी तुम्हाला सांगितलेच होते, ते जगणार नाहीत म्हणून ! त्यांना क्षय झाला होता. यातनेतून सुटले. घराचा भार तिच्यावर पडला. बी. टी. ची परीक्षा कशीतरी दिली व 'शिक्षिका' बनून कॉलेज सोडले. मास्तरणीची नोकरी जवळच्याच गावी तिला मिळाली होती. त्यामुळे मधूनमधून येत असे. लांब लांब फिरून सुख-दु:खाच्या गोष्टी करी. तिच्या घरी आता सावत्र आई व सावत्र भाऊ एवढेच कुटुंब होते. आईला तिचे फिरणे योग्य वाटेना. "काळ्या लोकांपासून सांभाळून राहावे" असे तिची आई तिला नेहमी बजावून सांगत असे. इतक्यात तिची दुसऱ्या गावी बदली झाली. जाताना धैर्य दिल्याबद्दल खूप धन्यवाद दिले. 'आपली ओळख व आपले मायेचे शब्द यांचा विसर मला कधीच पडणार नाही, आपली आठवण चिरकाल टिकेल' असे म्हणत तिने रुमालाने डोळे पुसले व तिकडे गाडी तिला दूर नेण्याला धावत होती.

याच सुमारास महायुद्ध सुरू झाले होते. त्या गाडीने बरेच सैनिक घर सोडून आघाडीवर जात होते. प्रत्येकाला विरहाची जाणीव होत होती. गाडी सुटली. तिकडे उत्तम बँड वाजत होता. प्रत्येक जोडपे चुंबनात विलीन झाले होते. संगीत ऐकून मला भारतीय चित्रपटातील सायगलच्या एका गाण्याची आठवण झाली, 'न आया मन का मीत उमरिया बीत गयी सारी.' महायुद्धाच्या काळात तर आम्हाला वाटे की भारत स्वतंत्र होणार ! माझ्या खोलीवर एक-दोन वेळा रेगी येऊन गेले, इतर खोलीवाल्यांची ओळख करून दिली. आमच्याकडील आयरिश मुलीला ते फार आवडत म्हणे 'काय व्यक्तिमत्त्व, काय पौरुषत्व आहे आणि तुम्ही कसे जरा किरकोळच दिसता !' एके दिवशी हे रावसाहेब सकाळी घरी आले. बाहेरूनच मला हाक मारीत होते. या वयेने पाहिले व लगबगीने येऊन म्हणाली, 'बोलवाना रेगीना (रणजीतला रेगी म्हणत) मी खिडकीतून डोकावलो व हिंदीत त्याला कळविले. तो म्हणाला, 'बकवास करती है– चलो जल्दी नीचे आओ.' मी तसाच खाली गेलो. रेगी म्हणाला की, श्रीगुरुगोविंद जयंती आहे व तिथे आत्ता गेलेच पाहिजे. तसाच स्वेटर व कोट घालून निघालो. न्यू कॅसलला कोळशाच्या बऱ्याच खाणी आहेत, तेथील वसाहतीत पोहोचलो. एका दुमजली वसाहतीजवळ उतरलो.

बाहेर मलीन कपडे घातलेला एक शीख उभा होताच. आत गेला व मधल्या हॉलमधील टेबलाजवळ आलो. टेबलाजवळ उंचावर ग्रंथसाहेब होते. फुले, उदबत्त्या समोर होत्या. बाजूला वर्तमानपत्र होतेच. सर्व फेटेवाल्यात त्या टेबलाभोवती मी एकटाच बोडका होतो. डोक्यावर टॉवेल ठेवला. खंजरी, चिमटा, ढोलक यांच्या निनादात भजने सुरू झाली. 'ये...ये... जे .. मिलना बाजवालेनू जे मिलन क... लगी बालेनू ... सिर धरते तलीते आ ऽ जा...जे मिलना ऽ'... अशी भजने होत. पत्रकार फोटो टिपीत व मधूनमधून मला अर्थ विचारीत– (मुकुट धारण करणाऱ्याला भेटायचे असेल तर शिर हातावर घेऊन या) शेवट 'ठाकूर तुम शरणाई आया... कहुनानक गुरुबंधन काहे बिछुरत आनि मिलाया" झाले. आरती झाली. 'जपूजी साहेब' झाले. बाजूच्या खोलीत भरपूर 'कढाव प्रशाद' (उत्तमपैकी तुपट शिरा) ठेवला होता. प्रत्येकाच्या हातावर भरपूर आला. ते तूप सगळ्यांनी दाढीलाच पुसले. नंतर पुऱ्या आणि 'छोले' आले, (चण्यांची उसळ) गोऱ्या लोकांनी जेमतेम खाल्ले. दुसऱ्या दिवशी वर्तमानपत्रात जयंतीचे फोटोसहित वर्णन आले. त्यात 'धार्मिक प्रवचनाचे' रंगीत वर्णन होते. त्या दिवशी बरेच कॉलेजविद्यार्थी भेटले. 'तुम्हीच का बिनदाढीवाले शीख– काल अध्यक्षपदी होते– असा प्रश्न विचारीत.

त्या मीटिंगमुळे मैत्री वाढली व फोटोमुळे धार्मिक विचारवंत असे थोड्या प्रमाणात नाव झाले. पत्रे येऊ लागली. धार्मिक वादविवादाची निमंत्रणे आली. खाणी भागातील वस्तीत एक गरीब तरुण होता. वयाने तेवीस-चोवीसचा असेल. शिक्षण जेमतेम बी. ए पर्यंत. घरची गरिबी, पण वाचनाचा भयंकर छंद. वाचन दांडगे व त्यातून स्मरणशक्ती उत्तम. कित्येक मौलिक ग्रंथातील उतारे अगदी मुखोद्गत होते. खाणीत काम करणाऱ्यांची घरे लहान. बहुतेक खाणीत काम करणारे आंघोळ करताना पाठ धूत नाहीत. 'ती तुटेल' असा अंध विश्वास. अगदी काळीकुळकुळीत पाठ, पण सर्व शरीर गोरेपान असलेला उतार-वयाचा त्या तरुणाचा बाप त्याच्या घरी भेटला. चहा-कोकोनंतर त्या तरुणाने सॉक्रेटीस, कांट, डेकारटीज, नीत्शे यांच्या लिखाणातील उतारे भराभर दिले. नंतर 'आनंद' व 'अनंत' याबद्दल बराच बोलला. मॅक्समुल्लरचे ऋग्वेदाचे भाषांतर त्याला पाठ होते. हे ज्ञान पाहून मी थक्कच झालो! खूप बोलू दिले व नंतर आनंद आणि अनंत यात फरक काय हे श्लोक स्तोत्र आदी संस्कृत भाषेतून म्हणून पगडा बसविला. 'इंडियन फिलॉसॉफर' अशी पदवी मला मिळाली.

असेच नाव कानोकानी जाता जाता भारतातील रेल्वेखात्यातून निवृत्त झालेल्या मि. रिचर्डसनच्या कानी गेले. या ब्रह्मचारी गृहस्थाकडे एके रविवारी जेवणाचे आमंत्रण आले. उत्तम शाकाहारी भोजन उरकून पडवीत बसलो. तिथेच साहेबांनी ॲनी बेझंटबाईंच्या ग्रंथांचा सेट, टिळकांचे ओरायन, रामकृष्ण परमहंसांची वाणी, स्वामी विवेकानंद, स्वामी रामतीर्थ, रोमाँरोला, टॉलस्टॉय, महात्मा गांधी आदींचे ग्रंथ दिसले. त्यांनी टिळकांचे ओरायन मॅक्समुल्लरच्या पुस्तकातील दस्यू व दैत्य, ब्रह्मा व ब्रह्म आदी शब्दांबद्दलची

विचारणा केली.

संस्कृत हा माझा विषय मॅट्रिकपर्यंतच होता. माझे एक धाकटे बंधू दिलीप व बहीण तारा यांचा संस्कृतचा अभ्यास शिक्षक करवून घेत. बाजूच्या खोलीत ही दोन कोवळी प्री मॅट्रिकमधील मुले, पाणिनी, अमरकोश पाठ करीत, संधिसमास पुन्हा पुन्हा म्हणीत, शाकुंतल, कुमारसंभव आदींचे पाठांतर होत असे. माझ्या अॅनाटॉमी–मॉरफॉलॉजीच्या बाजूच्या खोलीतील वाचनात या पाठांतराची भर पडे व मला त्यातील 'तुरळक पण बरेच सेकंडहँड पाठांतर झाले होते. घरी लहानपणी वडिलांनी पंडिताकडून पुरुषसूक्त, श्रीसूक्त, संध्या, वायुसूक्त, अथर्वशीर्ष, रुद्र आदींची मला संथा देवविली होती. गीता व काही स्तोत्रे मीच पाठ केली होती. हे एवढेच माझे संस्कृतचे भांडवल. याच्या भरंवशावर मी त्याच्या प्रश्नांना संस्कृत गाऊन उत्तर देत होतो. गायनाचा (स्तोत्र) परिणाम झालेला दिसला. तो खूष झाला व पुन्हा पुन्हा बोलावू लागला.

आता थंडी जाऊन उन्हाळा सुरू झाला होता. दिवस वाढला. शनिवारी हॉकी खेळण्याचे ठरविले. स्टिक घेऊन ग्राउंडवर आलो तर सगळ्या मुलीच होत्या. तिकडे मुलीच हॉकी खेळतात. मुलांचा खेळ फुटबॉल व रग्बी. एके दिवशी टेनिस खेळताना स्वत:चा चेंडू स्वत:च आणीत असताना मि. रिचर्डसन तिथे आले. 'मला वाटले तुम्ही काही ग्रंथपारायण करीत असाल!' असे म्हणत भावाकडील जेवणाचे व लांबच्या गावी जाण्याचे आमंत्रण देऊन गेले.

हे गाव न्यू कॅसलहून तीस मैल दूर होते. मि. रिचर्डसन यांच्या बंधूंची पंचवीस एकर जमीन होती. चहूकडे अगदी हिरवेगार होते. प्रत्येक शेताला लाकडी कुंपण दिसले. एका शेतात मेंढ्या होत्या, एकात गुरे. ओढ्याजवळील शेतात टर्की, कोंबड्या व बदके. पलीकडे एका छपराखाली आणखी काही कोंबड्या दिसल्या. व लांबवर डुकरे होती. ओढ्याजवळ लहान बाग व तिथे मधमाश्यांच्या पोळ्यांची कपाटे व्यवस्थित लावली होती. उंचवट्यावर पवनचक्कीचा पंखा उभा होता व तो वाऱ्याने फिरला की ओढ्यातील पाणी वर चढे. या पाण्याने बागायत तर होत होतीच, पण पुढे ते पाणी एका चाकावर पडून त्याला गती मिळे, यामुळे आतील दळणाची चक्की चाले व लहानसा जनरेटर चालून थोडीशी वीज मिळत असे. शेतकरी नांगराला घोडे जुंपून शेत नांगरीत होते. त्यांच्या बायका शेतातील बीट व बटाटे उकरून व्यवस्थित ठेवीत होत्या. हे सर्व दृश्य पाहत मी त्यांच्या घराजवळ आलो. मि. रिचर्डसनने टाळ्या वाजवून भावाला बोलावले, ओळख झाली. तीन लहान मुले, 'काळ्या' माणसाकडे कुतूहलाने पाहत होती. मुलांची आई फ्रॉकवर बिब घालूनच बाहेर आली. प्रथम घरदार दाखविले. गुरे, दूध काढण्याची जागा, व्हेलर जातीचे घोडे, खताची जागा, धान्याचा साठा, या सगळ्या गोष्टी दाखविल्या. जेवायला बसलो. घरच्या गव्हाचा ब्रेड, गाईच्या दुधाचे लोणी, घरच्या भाज्या, दूध, घरचा मध, केळी, घरची फळे, यांवर मी ताव मारला. दोघे बंधू जरा पहुडले. तीन

मुलांनी माझा हात धरला व शेतात नेले. कुत्र्याच्या साहाय्याने मेंढयांना एकत्रित केले व कुंपणावर बसून खेळू लागले.

मी पण जवळच हिरवळीवर बसलो. चोहीकडे हिरवेगार, भरपूर अन्न, घरची शेती व अशी प्रसन्न शांतता. फार बरे वाटले. पण इतक्यात माझ्या परिस्थितीची आठवण झाली, ती विसरण्याकरता टक लावून लांब घोडयाकडे पाहत होतो. घरची आठवण झाली. माझ्या आईचे आजोळ एका मोठ्या खेडयात होते. घरी अशीच खूप शेती होती. घर तर केवढे मोठे! मधला हॉलच ३०×२० फुटांचा होता. उन्हाळयात हा हॉल नुसत्या आंब्याच्या आढीने भरलेला असे. एकदोन पिकले आंबे कधीच खाले नाहीत. टोपली भरून काढायचे व चोखत बसायचे. ऊस तर मोळयांनीच येत असत. सीताफळे, पेरू, शिंगाडयाच्या टोपल्या भरूनच येत असत. घरचे उत्तम लोणकढे तूप, तो 'बादशहा भोग' तांदूळ, ज्याचा सुगंध शिजताना दूरपर्यंत दरवळत असे. मग ते जेवण–पापड, सांडगे, कुरडया, मुगोडया, मेतकूट, बोरकूट असे कितीतरी पदार्थ रोज फस्त होत. पण...पण इथे आता फक्त आठवणच. असाच विचारात असताना डुलकी आली. साहेबांनी टाळया वाजविल्या व झोप उडाली. हॉलमध्ये बसलो. चहा, कोकोपान झाले व बायबलच्या सेंट जॉनच्या अध्यायावर चर्चा सुरू झाली. मंत्र, तंत्र व अध्यात्म यांची विचारणा झाली. स्वामी रामकृष्ण परमहंस यांनी व्यक्त केलेली समाधी सिस्टर निवेदिता यांच्या मनोकामनेला फलित झालेले स्वामी विवेकानंदांच्या चितेतून निघालेले कफनीचे कापड आदी उदाहरणे देत बराच वेळ गेला. त्यांनी स्वामी विवेकानंदांच्या इतर ग्रंथांची ऑर्डर तेव्हाच दिली.

धार्मिक उपदेशाबद्दल इकडील लोकात माझे नाव येऊ लागले. मधूनमधून चर्चच्या मीटिंगला जात असे व त्यांच्या वादविवादात भाग घेत असे. दोनतीनदा 'येशू ख्रिस्तावरच विश्वास ठेवा व बाप्तिस्मा घ्या; म्हणजे बुद्धीला उत्तम चालना मिळून स्वर्ग व मोक्ष मिळेल,' असे पाद्री चक्क म्हणाला.

एकदा सायंकाळी 'आध्यात्मिक चर्च' मधील काही मंडळी शुक्रवारी माझ्या घरी आली व चर्चला अवश्य येण्याची विनंती करून गेली. रविवारी सकाळी वर्तमानपत्र उघडले. त्यात जाहिरात– 'भारतातील एक धार्मिक आज प्रवचन करतील. हे गृहस्थ ..' असे चक्क माझ्या नावासहित होते. ते वाचून मी थक्कच झालो.

दुपारी ते गृहस्थ न्यायला आले. सहा मैल लांब गेलो. एका जुनाट वस्तीच्या टोकाला, जुन्या इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावर एक हॉल होता. हेच त्यांचे चर्च. इथे भिंतीवर एक क्रूस होता, समोर पुलपीठ व पुढे टेकू असलेले बेंच होते. मुख्य पाद्रयांनी (त्यांनी कॉलर साधीच लावली होती व टाय पण होता) माझी ओळख करून दिली. नंतर काही 'हिम्स' झाले. मला पुलपीठापर्यंत पोचविले. बरीच हिम्मत करावी लागली.

या मंडळीत बरीच वयस्कर मंडळी होती. माझे वय अवघे अठ्ठावीस होते. तत्त्वज्ञानाचा अभ्यास नाही. तरी कशी बशी हिम्मत बांधली. वर गेल्यावर डोळे मिटले, हात जोडले, देवाचे ध्यान केले व अगदी नम्र व पूज्य भावनेने 'या ब्रह्मा वरुणेन्द्र रुद्र मरुतः' ही प्रार्थना सुरू केली. 'मूकं करोति वाचालं पंगुम् लंघयते गिरीम् । यत्कृपा तु अहं वंदे परमानंद माधवम्' असे म्हणत पुन्हा नमस्कार केला व डोळे उघडले. पाहतो तर सगळे स्तब्ध होते. काहींनी हात जोडले होते, काहींनी डोळे मिटलेले होते. हात वर करून श्रीमद्‌भगवत् गीतेतील दुसऱ्या अध्यायातील चोपन्नावा श्लोक खड्या आवाजात सुरू केला. 'स्थितप्रज्ञस्य का भाषा' श्लोक म्हणून अर्थ सांगू लागलो. असे तीस मिनिटात अवघे सहा श्लोक झाले. शेवटी 'येषा ब्राह्मीस्थिती पार्थ' या श्लोकाचा अर्थ सांगितला. डोळे पुन्हा मिटले व 'त्वमेव माता पिता त्वमेव' म्हणालो व रामनामाच्या गजरात डोके नमवून देवाला मानसिक नमस्कार केला. एक मिनिट स्तब्ध होतो. डोळे उघडले. हळूहळू खाली आलो. टाळ्यांचा गजर झाला. एक बाई जवळ आली व म्हणाली, 'तुम्ही बोलत असताना तुमच्या खांद्यावर कुणाचा तरी हात होता व ती व्यक्ती तुमच्या प्रत्येक शब्दागणिक मान डोलावीत आणि स्मित करीत होती !'

या प्रवचनाने इंग्लंडमधील एका नवीन चर्चच्या गुप्तज्ञानाची दारे मला मोकळी केल।

नाताळ संपू लागला. पंचवीस तारखेनंतर बॉक्सिंगचा दिवस आला. गोळा केलेल्या. ख्रिसमस कार्डांचे प्रदर्शन मांडले. प्रत्येकाला मिळालेल्या उपाहारांच्या याद्या तयार करून ठेवण्यात आल्या. शाळा-कॉलेजांना सुट्टी असल्यामळे प्रवास पण सुरू झाले. याच सुमारास दोन-चार गृहस्थांनी मला ३१ डिसेंबरला सायंकाळी फराळाला बोलावले. ख्रिसमिस केक व पेये होतीच. बऱ्याच गप्पा झाल्या. एकाने विनंती केली, परत येताना मध्यरात्र झाल्यास त्यांच्याकडे अवश्य यावे. सोबत दोन पुड्या दिल्या, त्या खिशात ठेवून आणाव्यात. दुसऱ्या घरी तीच प्रार्थना व तशाच पुड्या. अशाच पुड्या गोळा करीत खरोखरीच रात्रीचे ११-३० वाजले. शहरातली बरीच गर्दी मोठ्या कॅथिड्रलकडे जात होती. गर्दीसंगे तिकडे जाऊ लागलो. काही मद्याची दुकाने उघडी होती. गर्दीत बऱ्याच लोकांकडे बाटल्या होत्या. काही बायका पुरुष जोराने, रस्त्याने गाणी म्हणत होते. हा सव घोळका त्या गिरिजाघराजवळच्या चौकात आला. आत्तापर्यंत पिणाऱ्यांची संख्या पण बरीच वाढली होती. कित्येकांच्या हातात बाटल्या होत्याच. रात्री धार्मिक लोक चर्चमध्ये गेले. चर्चच्या घंटा वाजू लागल्या. प्रार्थना सुरू झाल्या. येशू ख्रिस्ताच्या बाळरूपी प्रतिमा कित्येक रोमन कॅथलिक लोकांनी घरी पण ठेवल्या होत्या व त्यांच्या चर्चमध्ये तर 'नेटिविटीचे' दृश्य पण ठेवले होते. या दृश्याजवळ पण प्रार्थना होत होत्या. रात्रीचे बारा वाजणार होते. देवाच्या प्रार्थना जोराने होऊ

लागल्या. बाहेर काही फटाके ठीक बारा वाजता उडले. नंतर एकच जल्लोष. प्यालेल्या लोकांनी ओरडायला सुरुवात केली. ' रिगांइन दिन्यू अँन्ड रिंग आइट दि ओल्ड ' या गाण्याचा जोराचा आवाज चहूंकडे ऐकू येऊ लागला. जोराच्या ओरडण्याबरोबरच हातातील रिकाम्या बाटल्या भराभर लांब फेकल्या जात होत्या व त्या फुटल्याचा आवाज येत होता. ते ओरडणे, ते फेकणे व प्यायलेल्यांची रस्त्यावरील अस्ताव्यस्त संख्या हे सगळे पाहून लवकरच परतलो. तेवढ्यात पहिल्या गृहस्थाकडे जाण्याची आठवण झाली. दारावरील घंटा वाजविली. दार काही उघडेना. बाजूच्या खिडकीचे दार उघडले. ' कम इन प्लीज ' आवाज आला. प्रश्न पडला की दार बंद व खिडकीतून जावे कसे ? त्यांनी शिडी दिली. सगळेच प्रकरण कसेसेच वाटले. आत गेल्यावर पुन्हा केक आणि पेये दिली. पुड्या दिल्या. ' यू आर वेलकम 'चा आवाज आला व ते सर्व हसू लागले. पुडीत मीठ व कोळसा होता. वर्षारंभी ' काळा माणूस ' मीठ आणि कोळसा घेऊन मागच्या दाराने घरात आल्यास वर्षभर सुबता येते, असा समज होता.

जानेवारीनंतर बर्फ संपला. वृक्ष पालवू लागले. न दिसणारे काही काही पक्षी दिसू लागले. हिवाळ्यात दिवस जवळपास सकाळी आठला उगवल्यासारखा दिसे व सायंकाळी चारनंतर काळोखाला सुरुवात होई. त्या आठ तासात थोडेफार सूर्याचे दर्शन धुक्याच्या मागून कधी कधी होत असे. वृक्षांना पालवी नव्हती व पक्षी तर दिसेनासे झाले होते. आता दिवस वाढू लागला. उन्हाळ्यात दिवस रात्री १० वाजेपर्यंत दिसे. कधी कधी ९ पर्यंत तर टेनिस खेळताना लोकांना पाहिले आहे.

एके दिवशी कॉलेजचा जॉन म्हणाला, की दोन दिवसांनी ' रॅगिंग डे ' होणार. त्या प्रमाणे मिरवणूक निघाली. दोन-चार ट्रक होते. बऱ्याच मुलांनी विग घालून मुलींचा फ्रॉक व स्कर्ट घातला होता. हावभाव करीत आरडाओरडा चालला होता. आजूबाजूच्या पांथस्थाकडून कॉलेजच्या दवाखान्याला मदत मागत होते. कुणाच्याही गळ्याला मिठी मारावयाची व हॅट किंवा डबा पुढे करावयाचा. त्या दिवशी विद्यार्थ्यांच्या आचरटपणाची कमालच दिसली. पण प्रत्यक्षाने संस्थेला मदत म्हणूनच काय ते केले.

पुढे पदवीदान समारंभाचा दिवस आला. भारतातील पदवीदानात तीनदा भाग घेतलेला मी होतो. ते कपडे, कुलपतीचे भाषण व स्वतः समोर जाऊन पदवी प्रमाणपत्र घेणे हा भारतातला कार्यक्रम होता. इथे हा जरा खालच्याच पातळीतला दिसला. विद्यार्थ्याचे नाव घेतले की गॅलरीत बसलेले इतर विद्यार्थी थट्टा करून ओरडायचे. वरून टॉयलेट पेपरचे लांब केलेले गोळे तर बऱ्याच वेळा आले. पण सर्व हसण्यावर नेत होते. शपथविधी वगैरे लॅटिमन भाषेतून होत होता.

ज्याप्रमाणे पदवीदान हसण्या-खेळण्यात झाले तसेच काही दिवसांनी राजेसाहेब

जॉर्ज यांच्या स्वागताचे झाले. भारतात एक गव्हर्नर रस्त्याने गेला की दुतर्फा पोलीस उभे असत. इथे परराष्ट्रमंत्री पार्लमेंट हाऊसला पायी जाताना मी पाहिले आहे. हेच परराष्ट्र मंत्री भारताचे व्हाईसराय असताना मोटार, गाडी, लवाजमा, पोलिसाशिवाय कधी दिसले नाहीत व तेच सेंट जेम्स कोर्टच्या मागून पायीच पार्लमेंटमध्ये शिरले. राजे जॉर्ज, मेडिकल कॉलेजच्या नूतन इमारती पाहावयाला येणार होते. आमची सर्वांची चिक्कार गर्दी. राजेसाहेब महाराणीसमवेत अर्ध्या उघड्या रोल्स राइस गाडीत बसून आले. पोलिसांनी आजूबाजूची गर्दी हटविली. व त्यांना कॉलेजच्या दारापर्यंत आणले. मोटारीभोवती पोलिसांचे कडे होते व आम्ही अवघे दहा फुटांवर उभे राहून फोटो काढीत होतो. राणीसाहेब मंद स्मित करून, उजवा हात वर करून सलाम घेत होत्या. दाराशी आल्यावर राजे उतरले. अवघे दहा शब्दच हळूहळू बोलले. राणीकडे पाहायचे व राणी अनुमती द्यायची, मोठे भाषण नाही की जास्त गवगवा नाही.

स्वत:बद्दल आत्मविश्वास असला की थिल्लर गोष्टीकडे लक्ष जात नाही. सर्जरीचे प्रोफेसर नामांकित सर्जन होते. त्यांना तेथील मेडिकल कॉलेजात सर्जरी कशी होते व ती पाहण्याची इच्छा सांगितली. ते म्हणाले, ठीक आहे. उद्या आपण दोन केसेस करू. सकाळी आठला यावे. त्याप्रमाणे ऑपरेशन थिएटरजवळ गेलो. दोन पेशंट स्ट्रेचरवर होते. मी व नर्स गाऊन–मॉस्कसहित तिथे थांबलो. पेशंटनी माझ्याकडे पाहिले. माझा हात धरा म्हणाली. कारण काळ्या लोकांच्या सान्निध्यात शुभ होते अशी तिची कल्पना होती. हात धरून आत गेलो. तिची तयारी झाली. गुंगी देणारे आले, 'गुड मॉर्निग' म्हणत हात धूतले व ग्लोव घातले. पेशंट टेबलावर आला एक्सरे फोटो पाहून सर्जनने कुठे काय आहे ते आम्हास सांगितले. पोटावर रेषा काढून कसे ऑपरेशन करणार याची कल्पना दिली. चादरी व टॉवेल तिच्या पोटावर आले. 'रेडी' म्हणून एक क्षण डोळे बंद केले. उजव्या हातात चाकू होता. 'देयर वी गो' म्हणत सरळ पहिली चीर दिली. सिस्टर, नर्स व आम्ही भराभर पुढील कार्याला लागलो. अवघी दोनच इंच चीर होती. पटकन बोटे आत गेली. आतडी बाहेर आणली. 'देयर यू आर' म्हणत त्यांनी लहान जठरातील भाग उचलला. अगदी अचूक निदान. तो भाग कुजलेला होता. पटापट तो तुकडा काढून विजेने केथेराईझेशन करून जठर शिवले. लेक्चर चालूच होते. आम्ही नोटस् घेत व कधी मदत करीत होतो. अवघ्या २० मिनिटात ऑपरेशन पूर्ण झाले व बाहेर आल्यावर त्यांनी प्रश्न पण विचारले. 'हॅव कॉन्फिडन्स यंग मेन' असे म्हणून पाठीवर हात ठेवला ! किती धन्यता वाटली. विजेने कॅथरायझेशन इथे पहिलेच पाहिले. ते साल १९३९ होते.

●

क्लबची भली मोठी इमारत होती. वर ३०० खुर्च्या मावतील असा मोठा जेवणाचा हॉल होता. बाजूला स्वयंपाकघर. लहान लहान खेळण्याच्या खोल्या होत्या. मासिके व दैनिके वाचण्याची लायब्ररी. मध्ये हॉल–जिथे कोच व सोफा ठेवून समोरील शेकोटीकडे तोंड करीत सिगारेट फुंकत विद्यार्थी बसत. अगदी सबंध तळघर पिण्याकरिता उघडे असे.

मे महिन्यात दिवस रात्री दहाला बुडत असे. मी एके दिवशी साडेनऊ वाजता लॅबोरेटरीमधून खाली उतरलो. मुख्य दाराच्या पुढे जाणार तोच क्लबकडून एक उंच धिप्पाड तरुण झपाझप पावले टाकीत येत होता. जोराने हातवारे करीत, 'हॅलो पी. जे.' म्हणत बोंबलत माझ्याजवळ आला. 'मी पास झालो' म्हणाला. अभिनंदन करण्याला हात पुढे केला. तो त्यांनी मला अलगद उचलले, सात फूट उंच आपल्या डोक्यावर मला ठेवले व नाचू लागला. 'ही इज ए जॉली गुड फेलो' म्हणत क्लबकडे पळू लागला. इतर मुले खिदीखिदी हसून टाळ्या वाजवीत होती. सरळ तळघरात गेला व मला एका खुर्चीवर ठेवले व समोर बसला. 'चला, आनंद व्यक्त करू' म्हणत खांद्यावर हात दिले. 'काय पिणार' विचारले. मी म्हणालो, 'लेमोनेड.' तो म्हणाला, 'लाउझी.' काय तुमच्या देशात तुमच्यासारखेच लोक आहेत ? पाण्याशिवाय काही पीतच नाहीत ? त्यांनी बीयरचा मोठा टँकर्ड मागितला. खिदीखिदी हसत टेबल क्लॉथचे धागे ओढू लागला. बारवर असलेली बया आली. 'स्टॉप इट' म्हणत त्याच्या हातावर थापट मारली. दोरी तुटली, राव गरम झाले. म्हणाले की दोर जसाच्या तसा कर, नाहीतर सबंध टेबल तोडेन. बाई म्हणाली, 'शट अप. वॉर्डनला हाक मारते.' राव चूप झाले. तेवढ्यात माझे लेमोनेड आले व त्याची बीयर. पहिलाच प्याला होता. त्यावर दोन घुटके घेतले व म्हणाला, 'डॅम लाऊझी !' माझ्या लेमोनेडचा मी घुटका घेतला. इतकी बीयर त्याच्या घशाखाली काही उतरेना. इकडे तिकडे पाहू लागला. उपयोग केलाच पाहिजे म्हणत टेबलावर हात मारून उठला. मी लेमोनेडचा घुटका घेणार, इतक्यात जोराचा आवाज आला. ह्या रावाने उजव्या हातात टँकॉर्ड घेतला होता व डाव्या हाताने बाजूच्या एका विद्यार्थ्याचे मुंडके धरले होते व पायांनी त्याला दाबून धरले होते वळून पाहिले. तर हा त्या टक्कलवाल्या विद्यार्थ्याच्या डोक्यावर बीयर ओती व काचेचा टँकर्ड त्याच्या गुळगुळीत डोक्यावर गोल फिरवी. मी धावलो व विचारले, 'काय करतोस ?' त्याने शांतपणे उत्तर दिले, 'टकलावर केसांची वाढ करतो !'

आमच्या घरात बारा खोल्या होत्या. एकात आयरिश मुलगी राहात होती. तिचे केस मेंदीने रंगवल्यासारखे लाल होते. नेहमी नाकाच्या शेंड्याला पावडर फाशीत व लिपस्टिक चाटीत ती खोलीबाहेर पडायची. सकाळच्या दैनिकात भारताबद्दल काही वर्तमान आले की नक्को माझ्या खोलीकडे येत असे काँग्रेसचा एखादा नेता पकडला किंवा

एखाद्याने भारताविरुद्ध मत दिले की बस्स, तिचा पट्टा सुरू, " हे ब्रिटिश फार क्रूर आहेत, फार त्रास देतात. आम्हाला अगदी छळले. आता यांच्या उरावर तो हिटलरचा राक्षस बसणार आहे. मग बरे होईल ! "

दुसऱ्या एका खोलीत एक कापड व्यापारी होता. जातीने ज्यू होता. सकाळी दिसला की बाजारात कुठे कुठे स्वस्त माल मिळतो याची यादी मला द्यावयाचा. कुठे जाऊ नये हे नेहमी सांगावयाचा. एके दिवशी मी याचे ऐकले नाही. बाजारात एका ठेल्यावर स्ट्रॉबेरी घ्यावयास गेलो. तेथील जाडीभरडी बाई भरमसाट भाव सांगू लागली. तिला पलीकडच्या दुकानाचा भाव व मालाबद्दल सांगितले. ती भडकली. म्हणाली, ' यू ब्लॅकबरी ' म्हणत खेकसली. मी सरळ दुसऱ्या दुकानात गेलो व फळाशिवाय ब्लेडच्या किंमती विचारल्या. महाग होत्या. मी त्याला पण पलीकडील दुकानाची आठवण दिली. तोही भडकला. " तुम्ही त्या ज्यू लोकांचे अडत्ये दिसता." ज्यूबद्दल अशा कडक भावना फार होत्या !

तिसऱ्या खोलीत एका ' फ्रीमेसेन ' ची विधवा राहत असे. सकाळी निघालो की ही बया डोक्याला फडके बांधून, हातात झाडू घेऊन सिगारेटचे झुरके मारीत " हाऊज देम गांडी " म्हणत खिदीखिदी हसत भारतीय नेत्यांची थट्टा करीत अगदी दारापर्यंत येत असे. एके दिवशी मी लवकरच निघालो. तिच्या खोलीवर टिचकी मारली व " हाऊज देम चेंबरलेन " म्हणालो. ती सर्द झाली. आत या म्हणाली. " तुमच्या भावना किती खोल आहेत हे पाहाण्याकरिता तुम्हाला थट्टेने डिवचते.' असे म्हणून झाडूच्या टोकांनी माझ्या बुटाला ढकलून म्हणाली, ' बी स्पोर्ट ! '

चौथ्या खोलीत जर्मनीतून आलेली एक शरणार्थी यहुदी स्त्री होती. तिला इंग्लिश येत नसे. माझे जर्मन जेमतेम. तिच्याशी ब्रिटिश लोक सहसा बोलावयास धजत नसत. ती बिचारी गोड हसून " गूटन आबेन माईन हो हेन हेर " (नमस्कार माझ्या सरदारा) म्हणे. मग बोटांनी, तुटक्या शब्दांनी माझ्या जर्मन भाषेत व तिच्या फाटक्या इंग्लिशमध्ये असा छोटासा संवाद होई. संवादानंतर तिच्या डोळ्यांत नेहमी अश्रू दिसत. फार दुःखी होती. तिच्या पतीला बुखेनवाल्ड जेलमध्ये डांबले होते. ही कशीतरी जर्मनीतून निसटली. सगळे मौल्यवान सामान बळकावले. रोल्डगोल्डच्या चष्म्याची फ्रेम नेली, हातातली अंगठी, कानातील बाळी, फार काय हवे, तीन दात सोन्याने मढलेले होते, ते दातच उपटून नेले. अशी दुःखी बाई. ब्रिटिश, तिच्याशी धड बोलत नसत. ज्यू म्हटला की कपाळाला आठ्या.

पलीकडचा एक जर्मन तरुण हिच्याकडे कधी कधी येत असे. त्याला पाहिले की ही अगदी गारठून जाई. त्याच्याशी बोलू नका असे मला नेहमी सांगे. एके दिवशी तो जर्मन तरुण मला भेटला व उत्तम बँडवादक आहोत व रोज बीचवर बँड वाजवितो म्हणाला. मला आमंत्रण पण दिले. ही बाई नको म्हणतानासुद्धा मी बीचवर गेलो. केवढी मोठी ती बँड पार्टी ? केवढे अजस्र त्यांचे वाद्य ? माणसाचे मुंडके जाईल एवढे कित्येक वाद्यांचे

तोंड होते. बँड सुरू करून ही मुले समुद्राकडून गावाकडे डोके हलवीत नाचत बागडत जात असत. शहरातील बरीच मंडळी वाद्यांचा आस्वाद घेत व मुले त्यांच्या मागे जात. हे वाजंत्री गाव सोडून गेल्यावर त्या बाईने सुस्कारा टाकला. नंतर झेकोस्लोव्हाकियामध्ये जर्मन सैन्य गेल्यावर तिने सांगितले की, हे सर्व जर्मन हेर होते. बँडच्या तोंडात कॅमेरा असे व वाजविताना बीचवरील घरांचा व्यवस्थित फोटो टिपीत होते.

बाजूच्या खोलीत एक तरुण मुलगी नुकतीच राहावयाला आली. डोळे अगदी घारे व वर्ण इटालियन लोकांप्रमाणे होता. ब्रिटिशांचा रंग लाल उकडलेल्या टोमॅटोप्रमाणे असे. एक दिवस लक्ष गेले नाही. तिसऱ्या दिवशी शिरस्त्याप्रमाणे मी गुड मॉर्निंग म्हणालो, तिने स्मित करून "ओ हॅलो, गुड मॉर्निंग" म्हणत मुरका मारला. चौथ्या दिवशी पुन्हा स्मित आणि मुरका, सात दिवसांनंतर सायंकाळी ती परतली, तेव्हा "गुड इव्हिनिंग" म्हणालो. ती 'हॅलो' म्हणत भारताबद्दल माहिती हवी म्हणाली. माझ्याजवळ मुंबईतील 'इलस्ट्रेटेड वीकली' चे काही जुने अंक होते. ते चित्रे पाहावयास दिले. थोड्या वेळाने ती खोलीवर आली व बायकोचे कपाळाचे कुंकू नऊवारी लुगडे, बांगड्या, मंगळसूत्र, सती, अस्पृश्यता आदींबद्दल विचारू लागली. इतके बोलावयाला वेळ नव्हता. मुद्दा विचारताच तिने एडिनबर्ग येथे प्रसिद्ध होणाऱ्या एका दैनिकाचा अंक दाखविला. त्यात एक शीर्षक होते. "शी मॅरिड ए ब्राह्मिन' (तिने एका ब्राह्मणाशी लग्न केले) "स्कॉट कोर्ट कांट गिव गर्ल डायवोर्स" (स्कॉटिश कोर्ट त्या मुलीला सोडचिठ्ठी देऊ शकत नाही) मजकूर वाचल्यावर कळले की एका महाराष्ट्रीय विद्यार्थ्याने एडिनबर्गला राहत्या घराच्या मुलीशी लग्न केले व तिला तिथेच ठेवून भारतात नेतो सांगून तिकडे ब्राह्मण मुलीशी पुन्हा लग्न केले. ती सिगारेटचे झुरके मारीत हावभाव करून मला खिजवत होती व 'असे कसे होते.' म्हणत होती. मी तिला खोलीतून बाहेर काढले व तिने हसून हळुवार चापटी मारली. मी दार बंद केले.

## येई आठव जुन्या स्मृतींचा

आमच्या इंडियन लीगचे अध्यक्ष श्री. मायाधर मानसिंग होते. ते ओरिसा प्रांतातले असून तिथे कॉलेजमध्ये इंग्लिश शिकवीत. (हल्ली ते ओरिया भाषेचे कवी म्हणून स्वातंत्र्य-दिनी कवी-संमेलनात दिल्लीला भाग घेत असतात.) डरहम विश्वविद्यालयात 'कालि-दास आणि शेक्सपियर' या निबंधावर ते पीएच. डी. करीत होते. नेहमी कॉलेज प्रोफे-सरच्या तोऱ्यात ते मिरवीत व तसेच भाषण करीत. एके दिवशी कॉलेज क्लबमध्ये बसलो असताना त्यांनी आपली परिस्थित सांगितली. घरची अगदी गरिबी. लग्नानंतर सासुर-वाडी जरा मध्यमवर्गीय मिळाली. शालक त्याच विश्वविद्यालयात इंजिनीयरिंगचा कोर्स करीत होते. घरून त्यांना दरमहा पैसे येत असत. पत्नीने महत्त्वाकांक्षेची ज्योत पेटवली. कोलंबोहून जपानी बोटीने अवघ्या दहा पौंडाच्या तिकिटावर ते लंडनपर्यंत कसेबसे आले.

तोंड होते. बँड सुरू करून ही मुले समुद्राकडून गावाकडे डोके हलवीत नाचत बागडत जात असत. शहरातील बरीच मंडळी वाद्यांचा आस्वाद घेत व मुले त्यांच्या मागे जात. हे वाजंत्री गाव सोडून गेल्यावर त्या बाईने सुस्कारा टाकला. नंतर झेकोस्लोव्हाकियामध्ये जर्मन सैन्य गेल्यावर तिने सांगितले की, हे सर्व जर्मन हेर होते. बँडच्या तोंडात कॅमेरा असे व वाजविताना बीचवरील घरांचा व्यवस्थित फोटो टिपीत होते.

बाजूच्या खोलीत एक तरुण मुलगी नुकतीच राहावयाला आली. डोळे अगदी घारे व वर्ण इटालियन लोकांप्रमाणे होता. ब्रिटिशांचा रंग लाल उकडलेल्या टोमॅटोप्रमाणे असे. एक दिवस लक्ष गेले नाही. तिसऱ्या दिवशी शिरस्त्याप्रमाणे मी गुड मॉर्निंग म्हणालो, तिने स्मित करून "ओ हॅलो, गुड मॉर्निंग" म्हणत मुरका मारला. चौथ्या दिवशी पुन्हा स्मित आणि मुरका, सात दिवसांनंतर सायंकाळी ती परतली, तेव्हा "गुड इव्हिनिंग" म्हणालो. ती 'हॅलो' म्हणत भारताबद्दल माहिती हवी म्हणाली. माझ्याजवळ मुंबईतील 'इलस्ट्रेटेड वीकली'चे काही जुने अंक होते. ते चित्रे पाहावयास दिले. थोडया वेळाने ती खोलीवर आली व बायकोचे कपाळाचे कुंकू नऊवारी लुगडे, बांगडया, मंगळसूत्र, सती, अस्पृश्यता आदींबद्दल विचारू लागली. इतके बोलावयाला वेळ नव्हता. मुद्दा विचारताच तिने एडिनबर्ग येथे प्रसिद्ध होणाऱ्या एका दैनिकाचा अंक दाखविला. त्यात एक शीर्षक होते. "शी मॅरिड ए ब्राह्मिन' (तिने एका ब्राह्मणाशी लग्न केले) "स्कॉट कोर्ट कांट गिव गर्ल डायवोर्स" (स्कॉटिश कोर्ट त्या मुलीला सोडचिठ्ठी देऊ शकत नाही) मजकूर वाचल्यावर कळले की एका महाराष्ट्रीय विद्यार्थ्याने एडिनबर्गला राहत्या घराच्या मुलीशी लग्न केले व तिला तिथेच ठेवून भारतात नेतो सांगून तिकडे ब्राह्मण मुलीशी पुन्हा लग्न केले. ती सिगारेटचे झुरके मारीत हावभाव करून मला खिजवत होती व 'असे कसे होते.' म्हणत होती. मी तिला खोलीतून बाहेर काढले व तिने हसून हळुवार चापटी मारली. मी दार बंद केले.

## येई आठव जुन्या स्मृतींचा

आमच्या इंडियन लीगचे अध्यक्ष श्री. मायाधर मानसिंग होते. ते ओरिसा प्रांतातले असून तिथे कॉलेजमध्ये इंग्लिश शिकवीत. (हल्ली ते ओरिया भाषेचे कवी म्हणून स्वातंत्र्य-दिनी कवी-संमेलनात दिल्लीला भाग घेत असतात.) डरहम विश्वविद्यालयात 'कालिदास आणि शेक्सपियर' या निबंधावर ते पीएच. डी. करीत होते. नेहमी कॉलेज प्रोफेसरच्या तोऱ्यात ते मिरवीत व तसेच भाषण करीत. एके दिवशी कॉलेज क्लबमध्ये बसलो असताना त्यांनी आपली परिस्थित सांगितली. घरची अगदी गरिबी. लग्नानंतर सासुरवाडी जरा मध्यमवर्गीय मिळाली. शालक त्याच विश्वविद्यालयात इंजिनीयरिंगचा कोर्स करीत होते. घरून त्यांना दरमहा पैसे येत असत. पत्नीने महत्त्वाकांक्षेची ज्योत पेटवली. कोलंबोहून जपानी बोटीने अवघ्या दहा पौंडाच्या तिकिटावर ते लंडनपर्यंत कसेबसे आले.

सकाळ, संध्याकाळ खिचडी–भाजी करून निर्वाह करीत होते. घरची फार आठवण येत असे, त्यावर ते कविता करीत. त्या म्हणतांना त्यांचा गळा दाटून येई व पुढे अश्रुधारा अनावर होत. सुरुवातीला कित्येक रात्री त्यांनी अक्षरशः रडून घालविल्या. नुकताच जर्मनीहून बऱ्याच तरुणांचा लोंढा इंग्लंडला आला. यात बऱ्याच मुली होत्या. यांची वये वीसच्या वर नव्हती. त्यांना इंग्लिश जवळपास येत नसे. त्या इंग्लिश घरात घरकाम करून इंग्लिश भाषा व वातावरण यांचा सूक्ष्मरीत्या अभ्यास करीत होत्या. एक अशीच एल्सा नावाची जर्मन मुलगी, श्री. मानसिंगाकडे राहिली. ते तिला इंग्लिश शिकवीत. इतर इंग्लिश मुला-मुलींपेक्षा मानसिंग तिला चांगली वागणूक देत. ती त्यांच्याच घरी राही. ती आल्यावर मानसिंगांना घरचा ओलावा मिळाला. त्यांची कविता संपली व ही जिवंत कविता घेऊन ते भटकू लागले. मी दोन-चार वेळा तिला भेटलो. ती नेहमी जर्मनीच्या गोष्टी सांगे व मला हेम्बुर्गला आमंत्रण करी. महायुद्ध सुरू होण्यापूर्वी चार महिने ही घरी परत गेली व मला तिथून ' परत जाताना जर्मनीला अवश्य या व आमचे घरी थांबा.' असे पत्र व त्याबरोबर साबण आणि चाकोलेटचे पार्सल पण पाठविले.

या देशात आल्यापासून कॉलेज, लायब्ररी व प्लासी नदीची ट्रीप इतके वगळल्यास माझ्या जीवनात दुसरे काही आले नाही. संशोधन–साहित्याची जुळवणूक सारखी चालली होती. कितीतरी पुस्तकांतील उतारे, रेफरन्स कार्डें, चित्रे व लागणारे साहित्य एकत्रीकरण करण्यात इतका गर्क होतो की मार्केट सोडून दुसरीकडे जावयास वेळच मिळेना. सकाळी आठला घरून निघाल्यावर रात्री आठलाच घरी येणे होत असे, व रात्रीला पुन्हा उतारे काढणे होत असे. श्री. मायाधर मानसिंग यांची भेट झाल्यानंतर तंद्रीतून उठल्यासारखे झाले.

क्लबमध्ये मानसिंग व एल्सा बसले होते. घरी जाताना त्यांनी ' हॅलो पी. जे.' म्हणून हाक मारली. मी थोडे स्मित केले व चालू लागलो. निद्रा गेल्याप्रमाणे मी चार महिन्यांचा काळ सोडून मागे पाहू लागलो. पहिली आठवण आली कॉलेजच्या डिबेटिंग सोसायटीची. बैठक नागपूरला होती. मी प्रेसिडेन्ट होतो. सूट घालून वर टोपी ठेवली होती. नागपूरचा पावसाळा असल्यामुळे हॉलमध्ये थोडा अंधार होता व दिवे लावले गेले. समोर सगळे विद्यार्थी व काही शिक्षक बसले होते. पहिल्या व्याख्यात्याला मी पाचारण केलेले होते. बॅरिस्टर हिदायतुल्ला (भारताच्या सर्वोच्च न्यायालयाचे प्रमुख न्यायाधीश व उपराष्ट्रपती) त्यांचा तो केंब्रिजचा सूट, ती इंग्लिश फॅशन, बोलण्याची लकब व पुढे भाषणात इंग्लिश राहणीचे उतारे, इंग्लंडमधील शिक्षण, या सगळ्या गोष्टींचा मनावर

परिणाम झाला. त्यांच्यापुढे माझा वेष व माझे विचार कुठे होते ? ते बोलत होते व मी समोर पाहून भविष्यात केंब्रिज येथील वास्तव्य पाहत होतो. त्यांच्यानंतर बॅरिस्टर बार्लिंगे आले. त्यांचा अवतार जरा देशीच दिसला. मॉरिस कॉलेजहून मि. कोतवाल आले. ते नेहमी रुमालाने हात पुसत. त्यांच्या तळहाताला सारखा घाम येत होता. त्यांनी बोलताना विलायती लकब आणण्याचा बराच प्रयत्न केला. तरी पण प्रभावी वक्तव्य केले. हे नंतर मुंबईचे चीफ जस्टिस झाले. त्या वादविवादाने माझ्या आय. सी. एस. व आय. पी. एस. स्वप्नाला जास्तच चालना दिली.

यू. टी. सी. व वक्तृत्व यात बराच भाग घेऊन इच्छा होती की यू. आय. पी. एस. च्या परीक्षेला बसावे. एकापाठीमागून एक अशी दोन वर्षे गेली. पण या परीक्षा झाल्याच नाहीत. बी. एससी. ला प्रो. भालेराव आमचे प्रोफेसर होते. ते फार विसरभोळे, पण अगदी जीव लावून शिकवीत. त्यांनी संशोधन सुरू केले होते व त्याबद्दल वर्गात कुतूहल उत्पन्न करीत. त्यांनीच संशोधनाचे अंकुर माझ्या मनात रोवले. ते असेपर्यंत वर्गात माझा नंबर जवळ जवळ पहिलाच येत असे. प्रिन्सिपॉल स्टॅन्ले यांनी एकदा या नंबराकडे माझे लक्ष वेधून उज्ज्वल भविष्याची प्रतिमा उभी केली. एके दिवशी प्रोफेसर लेक्चर देताना व संशोधनाबद्दल सांगताना इतके गर्क झाले व बेंचच्या इकडून तिकडे चालू लागले. त्यांचे लक्ष नुसते विषयाकडे होते. इकडे काही विद्यार्थी हसू लागले व कुजबूज करू लागले. माझे पण लक्ष गेले. बरीच गडबड दिसल्याबर प्रोफेसर स्मित करीत आपल्या बाजूच्या खोलीत चालते झाले. मुलांनी पाय आपटून बेंच वाजविले. प्रोफेसरांच्या चड्डीची नाडी त्यांच्या पॅन्टमधून बाहेर पडली होती !

हे प्रोफेसर पुढे मुक्तेश्वराला दुसऱ्या नोकरीवर निघून गेले व संशोधनाच्या अंकुराची जोपासना करणारा माझा गुरू गेला !

दुसरे एक प्रोफेसर फार वायफळ बडबड करायचे. पुढील वर्गात आम्ही चौघेच होतो. पहिल्याच दिवशी ते मला म्हणाले, ' संशोधन खतम करा, लग्न करा, हुंडा घ्या व मुलेबाळे करून संसार करा. ' ते असेच नेहमी तुटकपणे वागायचे. यामुळे संशोधनाची वृत्ती आय. पी. एस. च्या परीक्षेकडे लागली. पदव्युत्तर परीक्षा झाली. मंदीचा काळ होता. नोकऱ्या कमीच व त्यात विशिष्ट जमातींनाच त्या मिळत. महत्त्वाकांक्षेवर हळूहळू आघात होऊ लागले. प्रो. भालेराव यांनी पेरलेले अंकुर पुन्हा डोकावू लागले. घरी वडिलोपार्जित जुना न चालणारा दवाखाना होता. तिथे घरीच जुन्या पद्धतीने औषधनिर्मिती होत असे. वनस्पतीबरोबर प्राणी पण या कामाला घरी येत. कित्येकदा गारुड्यांनी नाग आणले. घरीच त्यांचे विषदोहन झाले. काही प्रकारचे मासे, मोर, पारवे आदी प्राण्यांचे पित्ताशय पण येत. घरीच नागविषापासून विषायन मात्रा तयार होत असे. पंचांग पाहून वडील वनस्पती आणत. गावरान शेणीची भट्टी लावून विशिष्ट मुहूर्तावर ती पेटवून पाऱ्याची कज्जली करीत. हे सगळे समोर व्हावयाचे. वडिलांची इच्छा की धंदा असाच चालावा.

माझी इच्छा अशी की हे कसे होते याचे संशोधन व्हावे. वैद्यकीय व्यवसाय व वैद्यकीय संशोधन यातच जीव घुटमळत असे. समोर सगळे होते. सर्प तर अगदी लहानपणापासून. एकदा सकाळी उठून स्वयंपाकघरातल्या चुलीत पाहिले. एकदा आई चूल सारवायला गेली, तर आठ-दहा सर्प वळवळत बाहेर आले. बाहेरील ओटचाचा दगड उचलला. एक मोठा नाग बाहेर आला. एके रात्री मांजर जोराने ओरडत होते. सगळे बाहेर पाहावयास गेलो. तो एका अजगराने तिला धरून नुकतेच गिळावयास सुरुवात केली होती. सोडवणूक झाल्याबरोबर तोंडात शेपूट धरून चाकाप्रमाणे तो भरकन पळाला. पावसाळ्यात रस्त्यावरून कितीतरी सर्प दिसावयाचे. त्यातून पाऊस बंद झाल्यावर ती पिवळी-निळी पट्टेरी मण्यार नेहमी दिसे. नागपूरच्या तेलंगखेडी तळ्यात पोहताना नेहमी पाणसर्प शरीरावरून जात, मग पलीकडे नाग भेटलाच समजा. एकेदिवशी परत येताना एक मनुष्य मरताना दिसला. त्याच्या मांडीला नागदंश झाला होता. काळानिळा पडत होता. पण हा असा का होतो हे कुणी सांगेना. हे असे सर्व समोरच दिसताना संशोधनाकडे दृष्टी जास्त वळू लागली. भारतात त्या समयी वैद्यकीय संशोधन असे जवळपास नव्हतेच. आय. सी. एस. करिता जाऊन आलेले काही मित्र दिपून जातील अशा गोष्टी सांगत.

शेवटी भातपिकावर लागणारी कीड, जिला विदर्भात गाद म्हणतात, यावर काही संशोधन करावे असा विचार झाला. वडिलांची गरिबीच होती. काका मात्र प्रोफेसर होते. त्यांच्याकडे राहून बारा वर्षे मी विद्यार्जन केले. पण आता पदव्युत्तर परीक्षा दिल्यावर त्यांच्यावर अवलंबून तरी कसे राहावे ? संशोधनाला पैसे नाहीत वेळ तर आहेच. या समयी लॉ. कॉलेजच्या लेक्चर्सकरिता जाऊ लागलो. लेक्चरमध्ये लक्ष मात्र लागेना. नुसते लेक्चर ऐकून सर्व अभ्यास समजणारे फार तीक्ष्ण बुद्धीचे व स्मृतीचे त्या वेळचे माझे सहाध्यायी श्री. माधवरावजी गोळवलकर होते. लेक्चरनंतर दोन तासांनी ते सबंध लेक्चरचे मुद्दे अगदी तोंडपाठ म्हणून दाखवत. लेक्चरकडे लक्ष न देता युनियन व इलेक्शनच्या धामधुमीत लक्ष घालणारे डोळ्यात भरणारे व विलक्षण स्मार्ट असे दुसरे सहाध्यायी श्री. शेषराव वानखेडे होते

एका हायस्कूलमध्ये तासभर हिंदी शिकवण्याचे मला वीस रुपये महिना मिळत. मूक चित्रपट काढणारी संस्था नागपूरला निघाली. त्यांच्या मासिक पत्रिकेचे - 'चलत-सृष्टी'चे संपादन केले. इथेसुद्धा पंचवीस रुपये महिना मिळत असे. या मासिकात राजा बढेची 'द्राक्षकन्या' नामक कविता आली होती. श्री. पंडित यांची पण कविता होती व दोन पाने विविध टीपणनावाखाली मलाच मराठीत भरून काढावी लागत. एकदा तर त्या चित्रपटाचा खलपुरुष निघून गेला व माझीच हजार बाराशे फुटांची फिल्म खलपुरुष म्हणून घेतली. ही फिल्म घरी होती (आमच्या पत्नीने ती नंतर जाळून टाकली.) त्या

फिल्मचे नाव होते. ' राजदंड. '

असे विविध अनुभव घेत वर्षभर प्रॅक्टिस पण केली. तेवढ्यात लग्न झाले. घरी लक्ष्मी आली व अवघ्या दीड महिन्यात दिल्लीहून संशोधन करण्याच्या कामाकरिता शंभरची फेलोशिप मिळाली. लग्नानंतर दीड महिन्यांनी एक पेटी, बिस्तरा घेऊन मी जे घर सोडले ते अद्याप मी परत गेलो नाही. सारा संसार बाहेरच झाला.

या संशोधनासाठी खेडोपाडी फिरलो. कित्येकदा रात्री पलंगाखाली सर्प घेऊन निजे. एकदा तर चित्ता घराजवळून गेला. एके दिवशी सायंकाळी सहल करीत असताना हातातील लाठी फिरवावयाची हुक्की आली. ती फिरवली. मागून विचित्र आवाज आला. मागे पाहतो तर एक तरस बाजूने पळत होता. तो चूपचाप माझ्या मागून चालला होता व ती लाठी लागून पळाला. अंधारात मला दिसले नाही. पण लांबून तांब्या घेऊन सायंकाळ उरकत असलेले एक गृहस्थ तसेच कासोटा उघडलेले धोतर धरून तऽरऽस करीत ओरडले.

एवढ्यातच माझे एक सहाध्यायी नुकतेच केंब्रिजहून परतले. संशोधनाबद्दल त्यांनी पुन्हा कुतूहल निर्माण केले. हाती पैसा नाही. त्यांनी हिंदू एज्युकेशन फंडाचा अर्ज आणून दिला. एका वर्षाकरिता जावे म्हणून अवघा ३००० चा अर्ज केला. मुंबईला कुणाचीच ओळख नव्हती, पण श्री. नानासाहेब घारपुरे यांनी अर्ज मंजूर केला. हातची नोकरी सोडावी तर वडील रागवायचे. घरी नुकताच पहिला मुलगा झाला होता. पैसा नाही, घराचीही माया, व वडिलांचे मत या सगळ्यांचा मेळ कसा घालावा ? त्याच वेळी नुकतेच हिंदी मंत्री आले. त्यांना भटलो. त्यांनी हकार दिला की वर्षाची सुट्टी मिळेल. परत ऑफिसात आल्यावर मॅकडोनल्ड नावाचा डायरेक्टर कडाडत आला, ' मला विचारल्याशिवाय मिनिस्टरला का भेटलास ?' शेवटी राजीनामा दिला. स्कॉलरशिपकरिता विमा काढावयाचा वरून आणखी १०० रुपये खर्च. थोडी आमदनी होती. कसे जमणार ? एका को-ऑप. सोसायटीने ५०० रु. कर्ज दिले. अंगावर जे कपडे होते तेच घालून मी मुंबई गाठली. सगळ्यांचा राग होता. एंपायर हॉटेलमध्ये उतरलो. विलायतेला जाणाऱ्याचा त्या वेळी केवढा मान व केवढे कौतुक होते ! त्यांच्या भेटीला व पोचवायला किती लोक येत. माझ्याकडे पाहून सगळे थट्टा करीत. मी खाकी पँट, पांढरा शर्ट, टेनिसचे जोडे-मोजे एवढेच कपडे चढवून सूटबूटवाल्या हारांनी वेष्टिलेल्या गर्दीतून फिरत होतो. लोकांना विश्वास वाटेना.

एका वर्षाची तरतूद केली होती. कारण वर्षात रायसाहेब सेवानिवृत्त होणार होते. व मला ती जागा मिळाली असती. मला आधार काहीच नव्हता व आश्वासन फक्त एकाचेच, श्री. राघवेन्द्रराव (जे मध्यप्रदेशचे गव्हर्नर झाले) यांनी मात्र मी जातो हे पाहून म्हटले, " अवश्य जा, जग बघा, खूप कष्ट सहन करा, पण विजयी होऊन या – अडचण

पडल्यास मला लिहा. "

इंग्लंडला पोचल्यावर वडिलांचे पत्र आले, ' रावसाहेब ताबडतोब सेवानिवृत्त झाले व घरचे ऐकले नाही तरी आता डोके तपासून घ्यावे !' सगळाच बेत फिसकटला. दोन वर्षे राहावयाचे ठरवले, पण खिशात पैसा नाही. हाताने करून खावे व खूप अभ्यास करावा. यामुळे अडचणींचा विसर पडत होता. श्री. मानसिन व त्या मुलीला पाहून मनात दडलेली ही विस्मृती व जवळ नसलेली रक्कम या गोष्टींची आठवण झाली. पैशाशिवाय कुणी मिळत नसे. मी तोपर्यंत कधी सिनेमा किंवा नाटक, तमाशा काहीच पाहिले नाही, किंवा हॉटेल इत्यादिकांचा उपयोग केला नाही. सोबत कोण व कुठे हाच विचार आता मला झोंबू लागला. घरी गेलो व मला मानसिगसारखेच वाईट वाटले व रात्रभर चितेमुळे झोप आली नाही.

थंडी वाढू लागली. दिवस लहान झाले. त्या दिवशी चिंतेने झोपलो. कशीतरी रात्र काढली. सकाळी उठून पाहतो तर चहूंकडे पांढरे कण उडत होते. हिमवृष्टी सुरू झाली. मला त्याबद्दल कुतूहल वाटले. आन्हिक आटोपून कॉलेजला निघालो. बाहेर चहूकडे हिम-कणांचे थर पसरले होते. चालताना पायाखाली करकर आवाज येत असे. यामुळे रात्रीच्या चिंतेचा थोडा विसर पडला. गल्लीबोळातून हा बर्फ साचलेला दिसत होता. एका बोळा-तून दोन पांढरे गोळे ठीक माझ्या हॅटवर येऊन थडकले. बोळाकडे पाहिले तर दोन तरुण मुली बर्फाचे गोळे करून माझ्यावर फेकत होत्या व खिदळत होत्या. मी पण गोळे केले व गोळाफेक सुरू झाली. पाच-दहा मिनिटे चालली. दोन्ही बाजूंचे एक-दोन रिक्रूट आणखी आले. गोळाफेक व खिदळणे यांनीच वातावरण भरून गेले. रात्रीची चिंता विसरलोच.

कॉलेजपर्यंत रस्ते कसे अगदी बर्फाच्छादित होते. मोटारी चालून चोहोकडे चिकचिक होत होते. त्या रात्री थंडी आणखी वाढली. दुसरा दिवस उजाडू लागला. खोलीच्या खिडकीवरील पडदा बाजूला सारला. काचेच्या तावदानावर कितीतरी भूमितीच्या आकृत्या रेखाटलेल्या दिसल्या. बाहेर तपमान शून्याच्या तीन डिग्री खाली गेले होते.

माझ्या श्वासोच्छ्वासाचे बाष्पकण तावदानावर बर्फ म्हणून साचले व त्यांच्याच आकृत्या झाल्या. बाथरूममधील नळाचे पाणी गोठले. तोंड धुण्याला पाणी नाही. दुधाची बाटली दारावरून आणली. दूध अगदी बर्फाचा 'खडा' – बाटली थोडी टिचली पण होती. कॉलेजचे विद्यार्थी सगळे पार्ककडे चालले होते. तेथील सरोवर अगदी थिजून पार गोठून चकाकणाऱ्या पांढऱ्या खडकाप्रमाणे दिसत होते. जवळपास वृक्षाला पालवी तर नव्हतीच, पण फांद्यांवर जाड बर्फ साचला होता. सूर्यप्रकाश कसा अगदी अंधुक होता. पौर्णिमेच्या रात्री जसा चंद्र दिसतो तसे दिसत होते. कित्येकांनी पायातील जोड्यांवर लोखंडी स्केटस् घातले. त्या बारीक धारेवर एक एक पाय पुढे करून सरकत असत व वेग आला की सपाटून चकरा मारीत. मला पण एकाने स्केट बांधले. उभे राहिल्याबरोबर

पाय आत जाऊन खाली आदळलो. हळूहळू एक-दोन दिवसात उभे राहणे जमले. लांब झाडूची दांडी धरून मी पुढे सरकू लागलो. आठ दिवसात थोडी प्रगती झाली. वर्गातील मुले-मुली थट्टेखातर हात धरून जोराने गिरक्या घेत. तोल सांभाळताना जीव कासावीस होत असे. मुली म्हणायच्या, की तुमचे लग्न झालेले दिसते, कारण अद्याप पाघळपणा सुरू केलेला दिसत नाही.

डिसेंबर महिना लोटू लागला. नाताळाकरिता सुट्ट्या सुरू झाल्या. दुकाने सामानांनी अगदी भरून गेली. ख्रिसमसची झाडे चोहीकडे दिसू लागली. न्यूकॅसलहून वीस मैलांवर व्हिटलीबे नावाचे जुहूप्रमाणे वाळू असलेले समुद्रकाठी गाव होते. अमरावतीहून इथे येऊन स्थायिक झालेल्यांपैकी डॉक्टर दांडेकर यांनी दवाखाना काढला होता. त्यांची पत्नी एक ब्रिटिश नर्स होती. त्यांना एक चार वर्षांची मुलगी होती. तिचे नाव त्यांनी 'वनिता' असे ठेवले. मुलगी रंगाने व रूपाने भारतीय दिसावयाची. हिचे फार लाड पण होत असत. त्या समयी ब्रिटिश मुलींनी 'रंगीत' लोकांबरोबर विवाह केल्यावर तेथील समाजात तिला कनिष्ठ स्थान प्राप्त होत असे.

मिसेस दांडेकर आम्हा भारतीयांवर फार ममता दाखवीत. त्यांनी ख्रिसमसच्या रात्री घरी आमंत्रण दिले.

माझे एक मित्र ऑस्कर ओसवॉल्ड हे पण व्हिटलीबे येथे स्थायिक झाले होते. त्यांच्या घरी ख्रिसमसच्या दिवसाचे आमंत्रण आले. ओसवॉल्ड निरामिष भोजन करीत. त्यामुळे माझे त्यांचे घरी जमले. त्यांच्या लहान भावाला खूप खेळणी आणली होती. ती चालविण्यात वेळ गेला मग जेवण झाले. व्हेजिटेबल लेंटिलसूप, मढविलेल्या टेबलावर आले. ओसवॉल्डच्या वडिलांनी डोळे मिटून प्रार्थना केली. सूप उत्तम ब्रेडबरोबर संपविले. दुसरा कोर्स आला. यात पुलाव भात, मुगाची डाळ, मटकी, गाजर, पालक असे उकडलेले होते. सर्वांवर चीज किसून नक्षी काढली होती. टोकाला शेंगदाणे बदाम व पिस्ता किसून आकृत्या काढल्या होत्या. सोबत रशियन कोशिंबीर होती. इतर लोकांनी मस्तपैकी मसाल्याने भरलेल्या टर्कीवर ताव मारला. पिण्याला उत्तम गोड रंगीत वाईन होती. शेवटचा कोर्स ख्रिसमस पुडिंगचा होता. फारच मस्त लागली ही डिश. ते सर्व हसत असताना मी दोनदा ती डिश घेतली. तिकडे उपाशी राहिलो, तरी चालेल, पण पुन्हा मागू नये, अशी रीत होती.

जेवणानंतर काजू किसमिस, अक्रोड, बदाम, पिस्ते घेऊन बाहेर ड्रॉईंगरूममध्ये आलो. ते सर्व विशिष्ट प्रकारच्या अडकित्यांनी फोडावयाचे. मी दोन्ही दातांनीच फोडू लागलो. सर्वांना आश्चर्य वाटले. एकाने प्रयत्न केला. तो सात दिवस डेंटिस्टकडे जात होता. ते चहापान करीत होते व मी सुकामेवा भरीत होतो. ओसवॉल्डच्या आई-वडिलांशी बोलणे सुरू झाले. ते म्हणाले की, टर्की फारच अप्रतिम होती, मी घ्यावयाला पाहिजे होती, अशी दुसरीकडे मिळणे कठीण पडेल. नंतर कळले की ओसवॉल्डचे वडील हे स्वत: खाटीक होते

व त्यांचे मांसाचे दुकान पण तिथे होते.

सायंकाळी समुद्रकिनाऱ्यावरून निघालो. लहान लहान मुले गाणी म्हणत होती. ही नाताळची विशिष्ट गाणी, त्यांना ' केराल ' म्हणतात. घरोघरी गाणी म्हणून त्यांना पैसे मिळत. चर्चमध्ये त्या दिवशी विशेष प्रार्थना झाल्या. चोहोकडे बर्फ व दारातून विजेचा झगमगाट. घराघरातून ख्रिसमसचे झाड व त्यावरील लाईट आणि खेळणी लांबून दिसत. मुले गाणे म्हणत नाचत होती. ख्रिसमसच्या आदल्या दिवशी मुलांनी पलंगाला लांब मोजे बांधून ठेवावे. निजताना ' सांताक्लॉज ' ची प्रार्थना करावी की, मला अमुक अमुक खेळणी दे, रात्री वडील मंडळी ती खेळणी मोज्यात भरून ठेवीत. दुसऱ्या दिवशी मुले आपापले मोजे एकमेकांना दाखवीत.

फिरता फिरता डॉ. दांडेकरांकडे पोचलो. आम्ही पंचवीस लोक होतो. केक आणि मद्याचा फराळ झाला दांडेकरांच्या मुलीला खेळणी दिली. त्या ख्रिसमस वृक्षाभोवती आम्ही जमा झालो. ग्रामोफोन लावला. गाणी झाली. नाच सुरू झाला. सारे बागडत होते, पीत होते. रंगारंगाचे खेळ सुरू झाले. दारादाराच्या फ्रेमच्या मध्यावर ' मिसलटो ' नावाचे बांडगूळ बांधले होते. आलेल्या ख्रिसमस कार्डाची भिंतीवर आरास केली होती. या ' मिसलटो ' खाली ख्रिसमसच्या दिवशी कुणीही कुणाचे चुंबन घ्यावे असा एक नियम होता. प्रत्येकाची तीच धडपड चालली होती. मी पण इकडून तिकडे फिरत होतो. शेवटी कंटाळून न कळत एका दारात हताश होऊन उभा राहिलो. इतक्यात मागून मला कुणी तरी गच्च पकडून जोराने मुका घेतल्याचा भास झाला. भानावर आलो, तेव्हा दिसले की मिसेस दांडेकर खिदीखिदी हसत ' कशी जिरली ' म्हणत उभ्या होत्या.

(या घटनांचा कांळ १९३८–१९४०)

# ४ : त्रिनेत्राचे दर्शन

व्हेनीजुवेला येथील कॅराकस शहरी एकदाची जागतीक सर्प परिषद संपू लागली. शेवटच्या दिवशी कॅराकस हिल्टन हॉटेलच्या वरील गच्चीवर एक लहानसा समारंभ काही लोकांनी आयोजित केला. या समारंभात सबंध गच्चीभर छोटे छोटे विजेचे निळे बल्ब लावले होते. एक वाद्यवृन्द पण येऊन थडकला. संध्याकाळी ६ वाजल्यापासून पाहुणे येऊ लागले. या पाहुण्यांनी आपापले गट करून वाद्यवृन्द सुरू होण्यापूर्वी मदिरापानाला प्रारंभ केला. एकदा रंग चढला व प्रत्येक सभासद आपापल्या गटात जोरजोराने भाषण करू लागले. आमच्या गटात मयामीचे मिस्टर व मिसेस् हास्ट आणि कोस्तरीकाचे दोन वैज्ञानिक होते. कुणीतरी मिस्टर हास्टला त्यांच्या विष इंजेक्शनाबद्दल विचारले. दर १५ दिवसांनी मि. हास्ट कैक विषारी सापांचे विष गोळा करून काही प्रमाणात त्यांचे द्रावण करीत असत. या द्रावणाचे प्रमाणात ते इंजेक्शन घेत. यामुळे त्यांच्या शरीरात त्या विषाबद्दल प्रतिकारशक्ती निर्माण होत असे. तो सर्प दंश करून पळाला तरी त्यांना काही होत नसे. यांच्या रक्तात विषाबद्दल इतकी प्रतिकारशक्ती निर्माण झाली होती, की त्यांचे रक्त दंशित माणसाला दिले तर तो दगावत नसे. गप्पा सुरू झाल्याबरोबर, मि. हास्टने गेल्या युद्धात भारतात जो प्रवास केला त्याबद्दल माहिती सांगण्यास सुरुवात केली. सिंध प्रांतातील काही देवालयात त्यांनी श्रीशंकराची प्रतिमा पाहिली होती, व शंकराचे त्रिनेत्र व अमृतमंथनातील विषप्राशन याबद्दल बऱ्याच गोष्टी त्यांना तिथे कळल्या होत्या. बराच तर्ककुतर्क झाल्यावर त्यांना इतर सदस्यांनी प्रश्न विचारले असता मिसेस् हास्ट म्हणाल्या की, यांना २५० वेळा नागसर्पदंश झाला आहे. हे वाक्य ऐकून मदिरा प्राशन केलेल्या मि. हास्टला आणखीनच चेव चढला. ते पेंगतच उभे राहिले व ' मी महादेव आहे ' असे म्हणत माझ्या जवळील कोचावर आदळले. मिसेस हास्ट यांनी त्यांचे शब्द ऐकताच ' तुम्ही महादेव तर मी पार्वती ' असे म्हणत तिने आम्हां दोघांना गळामिठी मारली. हे एवढे मोठे ओझे अंगावर पडल्यावर मला गुदमरल्यासारखे झाले. याशिवाय आपल्या पूज्य देवतेबद्दल त्यांचे शब्द मला अनादराचे वाटले. तोपर्यंत वाद्यवृन्दाचे वाद्य वाजू लागले, व उपस्थित मंडळींनी फॉक्स ट्रॉट आणि नंतर ' सांबा ' नृत्य आरंभिले. मी काही उठलो

नाही. पण मनात ते शल्य बोचत होते की शंकराचे विषप्राशन याबद्दल हा किती थिल्लर विचार यांनी व्यक्त केला होता. कुठे तपस्या करणारे भगवान शंकर आणि कुठे हा मदिरा पिणारा व सर्प पकडणारा मि. हास्ट !

परदेशात असताना प्रत्येक देशवासियांना भारताबद्दल बरीच जास्त आस्था निर्माण होत असते. या गच्चीवर त्या निळ्या विजेरी प्रकाशात व धुंद वातावरणात नृत्य व आलिंगन चालले होते. पण मी अस्वस्थ होतो. मला माझ्या देशाबद्दल राहून राहून आठवण येत होती. शिवरात्र, एकादशी, श्रावणातला सोमवार व महादेवावर वाहिलेल्या बेल पानांचा भार कसा डोळ्यांसमोर दिसत होता ! देव आणि दानवांनी समुद्रमंथन केले, व त्यातून निघालेली १४ रत्ने वाटून घेण्याची अहमहमिका सुरू झाली. शेवटी विष कुणी घेईना व श्री शंकरांनी त्याचे प्राशन केले. ज्यामुळे त्यांचा कंठ हिरवानिळा पडला व त्यांचे नाव नीळकंठ झाले. दक्षाच्या यज्ञाचे वेळी पार्वतीने आत्मसमर्पण केल्याने त्या यज्ञाचा महादेवाने विध्वंस केला. या समयी त्याने आपले त्रिनेत्र उघडले. या तिसऱ्या डोळ्यामुळे विश्वसंहार होतो की काय असे सर्व देवांना वाटू लागले. आम्ही महादेवाचे चित्र जटाधारी व गळ्यात सर्पमाला धारण केलेले पाहतो. त्या मनुष्यरूपी मूर्तीच्या कपाळावर दोन्ही भुवयांजवळ त्यांचा त्रिनेत्र दाखविला जातो. माझ्या मनात प्रश्न आला की मानवास किंवा कोणत्याही पृष्ठरज्जू असणाऱ्या प्राण्याला असा तिसरा डोळा असेल काय ? असल्यास त्यावर विचार आणि पाहणी केली पाहिजे.

कॅराकस हिल्टन येथील ही परिषद संपवून मी डॉ. मॉन्टीला यांचे घरी राहण्यास गेलो. तत्पूर्वी मि. हास्ट यांना दुसऱ्या कोणत्याही हॉटेलमध्ये खोली मिळत नव्हती म्हणून ते कुटुंब माझ्याच खोलीत दोन दिवस निजले. या घटनेचा फायदा घेऊन मी प्रयोग करून पाहिला. सर्पविषाचे इंजेक्शन घेणाऱ्या या मानवाच्या थुंकीत विष असते का ? मला ते दिसले नाही. त्याच दरम्यान त्या हॉटेलमध्ये नागसर्प आणला होता. मॅनेजरची परवानगी नव्हती. म्हणून तो पिंजरा मी आपल्या पलंगाखाली दोन दिवस लपवून ठेवला. रात्रभर तो नाग फुत्कार करीत असे. यामुळे झोपेचे खोबरे झाले. हॉटेल सोडल्यावर डॉ. मॉन्टीला यांच्या घरी राहावयास गेलो. त्यांनी मला एका वेगळ्या खोलीत ठेवले होते. तेथे पण रात्रभर सर्प फुत्काराचा आवाज ऐकू आला. रात्री उठून टॉर्चने पाहिले, तेव्हा दिसले की पलंगाखाली व कडेच्या खिडकीपलीकडे कितीतरी जिवंत सर्पांचे पिंजरे ठेवले होते. रात्रभर सर्प फुत्कार करून पिंजऱ्यात धुडगूस घालीत होते. झोप काही येईना. यानंतर ४–५ दिवस व्हेनीजुवेला देशातील बऱ्याच गावाला भेटी दिल्या. पण श्री शंकर व त्रिनेत्र या वादविवादाची आठवण सारखी येत होती.

मी एकदा न्यूयॉर्क येथील प्राणिसंग्रहालयाला भेट दिली. तेव्हा तिथे गॅलॅपेगोज द्विपसमूहातून आणलेला एक सरडा पाहिला. याला कोमोडो म्हणतात. या सरड्याची लांबी दहा फूट असून उभा राहिल्यावर उंची अडीच फूट होती. हा सरडा फार पुरातन

काळी असलेल्या उत्क्रांतीयुक्त सरपटणाऱ्या प्राण्यातील एक उदाहरण होता. याला मात्र दोनच डोळे होते. कॅराकस सोडताना तेथील आमचे यजमान डॉ. मॉन्टीला यांच्याशी व इतर वैज्ञानिकांशी बराच विचारविनिमय या त्रिनेत्राबद्दल केला. कॅराकस शहरापासून ३० मैलावर असलेल्या मैकटीया विमानतळावर कैक डोंगरातून केलेले बोगदे पार करीत आम्ही पोचलो. पहिला विचार होता की दक्षिण अमेरिकेतील वारीग विमान कंपनीचे विमानातून प्रवास करावा. या विमानात एअरहोस्टेस अतिथींची चांगली काळजी घेतात. खारे भाजलेले काजू व मेकेडेमिया बियांची पाकिटे देऊन फुकट मदिरा पाजतात. यामुळे रात्रभर झोप येत नाही. तुम्ही झोपलात की ती एअरहोस्टेस हळूच तुमच्यावर ब्लँकेट टाकून पांघरून देते व जागे झाल्यास मदिरापान आणते. माझी झोप कैक दिवस झाली नव्हती. म्हणून मी लुफ्त हंसा या विमान कंपनीने प्रवास केला. विमानतळावर आमचे यजमान आले होते व त्यांनी आम्हाला प्रेमाने निरोप दिला.

विमानात बसताना मला तीन सीटच्या मधील खुर्चीवर बसावे लागले. डावीकडे खिडकीजवळ एक स्पॅनिश भाषा बोलणारे गृहस्थ होते. त्यांच्या हाती दोन-तीन पिशव्या असून त्यातून त्यांच्या रोमन कॅथेलिक देवी-देवता डोकावत होत्या. ते बसल्यानंतर मी जरा त्या पिशवीकडे वळून पाहिले. गृहस्थ फार सद्भावी दिसले. त्यांनी हातवारे करून व स्मित हास्य करून स्पॅनिश भाषेत त्या पिशवीतील पुतळ्यांची माहिती देण्यास सुरुवात केली. मला स्पॅनिश भाषेचे मोजकेच शब्द येत होते. त्यामुळे ते नक्की काय बोलतात ते कळेना. मी नुसते ‘ ग्रासिया, ग्रासिया ’ म्हणत होतो. ह्याचा अर्थ ‘ Thank you ” असा होतो. शेवटी मला स्पॅनिश समजत नाही हे कळल्यावर दोन्ही खांदे वर केले व हात पसरून ग्रासिया म्हणत त्यांनी बोलणे बंद केले. मला जरा लाजच वाटली. मी उजवी-कडील गृहस्थाकडे वळून पाहू लागलो. त्याने माझ्याकडे जरा लक्ष दिले व म्हणाला, ‘ स्पाखन झी डॉयशे, तुम्हाला जर्मन कळते काय ? मला जर्मन भाषेतील काही तोकडेच शब्द माहीत होते. मी म्हणालो, ‘ नाईन माईन व्होहेन हेअरर् – नाही महाराज.’ त्याने पटकन इंग्लिश भाषा सुरू केली. ‘ फ्रॉम इंडिया ’ मी मुंबईहून आलो असे सांगताच त्याने हात वर केले व आनंदाने हसू लागला. त्याने सांगितले की तो ‘ मुंबईला आय. जी. फारबेन या कंपनीत काम करीत होता व मला भारताची पुष्कळ माहिती आहे.’ त्याने पटकन ब्राह्मणांच्या मुंजीबद्दल व त्या बटूंच्या वागण्याबद्दल सांगितले. देवदेवांची पूजा त्याने कशी पाहिली व भारतीय लोक आपल्या पोटच्या कन्येचे कसे कन्यादान करतात. आदी सर्व कार्यक्रमाबद्दल त्याने थोडी खिल्ली पण उडविली. सीतासावित्रीबद्दल तोकडी माहिती सांगून जर्मन बायका किती काम करतात व कशा उत्तम गृहिणी म्हणून वागतात त्याचे उदाहरण देऊ लागला. मी तात्काळ त्याला सांगितले की, या गोष्टी त्याने काळ्या चष्म्यातून पाहिल्या असाव्यात. भारतीय संस्कृती आणि धर्म हा विज्ञाननिष्ठ आहे व भौतिक जगताच्या पुढे आध्यात्मिक जगतात झेप घेतो आहे. आम्हाला प्रत्येक भारतीयात

बसलेला देव पाहावयाचा आहे. आम्हाला नराचा नारायण करायचा आहे. आम्हाला आदि-मानवाचा मानव व पुढे महामानव निर्माण करावयाचा आहे. जर्मन बायका जरी उत्तम गृहिणी असल्या व आमच्या मुलींचे कन्यादन जरी झाले तरी आमच्यात सीता, सावित्री व अरुंधती निर्माण तर झाल्याच पण आधुनिक युगात राणी दुर्गावती किंवा राणी लक्ष्मीबाई याप्रमाणे शूरवीर तेजस्वी देवता या भूमीत जन्माला आल्या.

त्याने नंतर आधुनिक काळाच्या गोष्टी सुरू केल्या. गेल्या महायुद्धात जर्मन व ब्रिटिश जरी भांडत होते तरी त्यांचा व्यापार अधूनमधून चालतच होता. ब्रिटिश लोकांनी आम्हाला फसविले. रुडाफहेस नावाच्या आमच्या नेत्याला गुप्ततेने तहासाठी बोलावून कपटनीतीने फसवून अद्यापपर्यंत तुरुंगात डांबून ठेवले आहे. हे विमान फ्रँकफूर्ट या जर्मन शहरी जात आहे. आपण जर विमानतळाबाहेर गेलात तर अमेरिकन व ब्रिटिश सैन्यांनी आमच्या शहरांची किती नासधूस केली व आमच्या बायकांची किती अब्रू नष्ट केली, हे स्वत: पाहावे. नष्ट झालेल्या या शहरांच्या राखेतून आम्ही नवीन जीवन निर्माण केले. आमचे वस्तुसंग्रहालय पाहावे व विचार करावा, की आम्ही आमची संस्कृती युद्धात किती जपून ठेवली होती. तुमचे देव, देऊळ काही स्थळी उपलब्ध आहेत. आमच्या हल्लीच्या वस्तुसंग्रहालयात आमच्या क्रियाशीलतेचे देव तुम्हास दिसतील ते अवश्य पाहावे.

असे भाषण दोन-तीन तास चालले. तोपर्यंत रात्रीचे जेवण आले. मी शाकाहारी असल्याने मला भात, डाळ, भाज्या ब्रेड बटर व आईस्क्रीम दिले व या गृहस्थाला कोंबडी व लिव्हर अर्पिले. जेवण होऊन काही मादक पेये घेत हे गृहस्थ झोपले. मी नेहमीप्रमाणे मुखमार्जन करून झोपण्याचा प्रयत्न केला. पण झोप काही येईना. मला आगगाडीत किंवा विमानात व नवीन जागी कधीच झोप येत नाही. बरेच दिवस मला असे बिनझोपेशिवाय गुंगीत काढावे लागतात. अशीच मला गुंगी आली व मी विमानाचे स्थान व उड्डाण विसरू लागलो.

बरेच दिवस आपल्या जन्मभूमीत राहिल्यावर परदेशात जरी आपणास नवीन परिस्थितीत किंवा नवीन घटना दिसल्या तरी आपल्या मनावर जे स्वदेशातील मूलभावनांचा प्रकाश पडला आहे, तो काही विसरला जात नाही व अशा गुंगी वेळी अर्धस्वप्नरूपात स्वदेशातील हुरूप उफाळून येतो. मला असे दिसले की मी परत भारतात आलो आहे व जुन्या गोष्टींची आठवण करीत आहे. माझी आई मालगुजार घराण्यातली होती. आमच्या वडिलांच्या घराला तिने कसे मन लावून वाहून घेतले होते. दर वर्षी नवरात्रात १०० लोकांचा स्वयंपाक ती स्वत: करी व कधी तर ती वाढायलाही घेत असे. आमचे घर मोठे होते व जवळपास झाडेझुडपे होती. ती सडासारवण सकाळी करून या झुडपातील लहान काटक्या गोळा करी. आंघोळीचे पाण्यासाठी सरपण गोळा करीत असे. थोड्याथोडक्या

पैशांचा उपयोग करून भांडी व सोने विकत घेऊन साठवण करीत असे. आमची ३०–३५ एकर जमीन होती. त्या शेतीवर ती स्वत: राबून लोकांकडून सगळी कामे करवून घेत असे. एकदा माहेरून पावसाळ्यात बैलगाडीतून येत असताना एक नदी लागली. ती पुरामुळे दुथडी भरून वाहत होती. बैल हाकणाऱ्याला तो पूर पाहून पुढे जाण्याचे धैर्य झाले नाही. आमच्या आईने मात्र त्या गाडीवाल्याला बाजूला सारून बैलांचे दावे हाती घेतले व त्या पुरात बैलगाडी झोकून दिली. बैल चांगले पोहत होते व गाडी ओढत होते. पुराचे पाणी थोडेफार गाडीत पण शिरले. तिने हिंमत बांधून नदी पार केली. जर्मन गृहिणीबद्दल आय. जी. फारबेनचे हे गृहस्थ मोठ्या अभिमानाने बोलत होते. परंतु त्यांनी भारतातील खेड्यात जाऊन पाहावे. त्यांना आमच्या कष्ट करणाऱ्या पण स्वत: अर्धपोटी राहून कुटुंबाला प्रेम व वात्सल्य देणाऱ्या कितीतरी गृहिणी दिसतील. परदेशातून हे लोक येतात व या देशाची काळ्या चष्म्यातून दिसणाऱ्या वाईट गुणांची तेवढी नोंद करून जातात. पण या वाईट गुणांच्या चिखलातून निर्माण होणाऱ्या थोड्याथोडक्या सुंदर कमळपुष्पांचे त्यांना दर्शन होत नाही. ते दर्शन केवळ भृंगराजालाच होत असते.

याप्रमाणे सगळी रात्र अशी गुंगीत काढली. दुसऱ्या दिवशी विमान सकाळी ६–३० ला फ्रँकफूर्टला पोचले. इथे उतरल्यावर सामान घेऊन ते जर्मन एअरलाईन्सच्या ऑफिसात ठेवले व सायंकाळच्या भारताकडे जाणाऱ्या विमानाची व्यवस्था करण्याची विनंती करून हॉटेलचा पास घेतला व तिकडे निघालो. या विमानतळावर कैक दुकाने, बँका, ट्रॅव्हल एजन्ट आदी असून तिथेच एक उत्तम हॉटेल पण आहे. जर्मन कंपनीने ह्या हॉटेलातच मला पास दिला होता. आत शिरताच वेटर मला चौथ्या मजल्यावर घेऊन गेला. या फ्रँकफूर्ट ऑनमेन शहरात उत्तम वस्तू संग्रहालय आहे असे कळले होते. त्या संस्थेच्या डायरेक्टरला माझ्या तिकडे येण्याबद्दल पत्र पण गेले होते. हे संचालक चांगले प्राणिशास्त्रज्ञ होते. त्यांचा टेलिफोननंबर मला दिल्याने मी फोन लावला, तेव्हा सकाळी १० वा. त्यांनी माझी भेट विमानतळावर घेण्याचे फोनवर कबूल केले. सकाळची न्याहरी घेताना ऑरेंज-ज्यूसचा एक प्याला मागितला. त्याला २५ रु. पडले. पण हा खर्च विमान कंपनीच देणार होती. सर्व आटोपून मी खाली आलो. लाउंजमध्ये त्या संचालकाची भेट झाली. या संचालकाला माझ्या संशोधनाची माहिती होती. त्याने माझे लेख व पुस्तके वाचली होती. भेटताच कॅराकसच्या आंतरराष्ट्रीय संमेलनाबद्दल विचारपूस झाली व त्याने एकदम माझ्या पुस्तकाची दुसरी आवृत्ती कधी निघेल, याची विचारणा केली. दुसरा प्रश्न त्याने माझ्या परतीच्या विमानवेळेबद्दल विचारला व वस्तू संग्रहालयात एखादे भाषण देण्याची विनंती केली. फ्रँकफूर्ट शहरात गेल्या महायुद्धाने जी हानी केली ती दाखवून नवीन योजना कोणत्या व कशा आहेत त्या मी पाहाव्यात अशी तिसरी विनंती होती. लगेच मी खोलीवर गेलो व भारतातून आणलेल्या भेटवस्तू त्यांना दिल्या. त्याने धन्यवाद देऊन घारापुरी येथील लेण्यांच्या शिल्पांबद्दल विचारणा केली. श्री महादेव या देवतेच्या शरीरावर

लोळणाऱ्या नागसर्पाचा अर्थ व तिसऱ्या डोळ्याबद्दल कुतूहल दाखवले. असे बोलताच आम्ही दोघे उठलो व विमानतळाच्या बाहेर पडलो. मुंबईच्या विमानतळाप्रमाणे येथे वाहन कुठेही बाहेर दिसत नव्हते. ते मला एका तळघरात घेऊन गेले. इकडे अशी कितीतरी दालने होती व तिथेच सर्व वाहने ठेवण्याची व्यवस्था दिसली. गेल्या युद्धाच्या वेळी हवाई हल्ल्यामुळे होणाऱ्या संकटापासून संरक्षण होण्यासाठी ही भुयारे निर्माण झाली. त्यांचा असा उपयोग आज होत आहे. मुंबईच्या एक-दोन भुयारात (चर्चगेट) जशी अनिर्बंध दुकाने किंवा बेवारशी लोकांचे फिरणे व राहाणे चालू असते, तसे इथे कुठेही दिसले नाही. मोटर बाहेर पडल्यावर मला चोहोकडे धुके दिसले. या धुक्यातून जाताना सडकेच्या कडेला लावलेली झाडे त्यांनी दाखविली. गेल्या युद्धात ती नष्ट झाली होती व युद्धानंतर ती पुनश्च लावण्यात आली.

गावातील एक-दोन स्थळी बॉंबफेकीमुळे झालेल्या मोडतोडीचा त्यांनी थोडा देखावा दाखविला. तरी पण सगळीकडे जवळपास नवीनच वस्ती उभारण्यात आली होती. सडकांच्या कडेला कैक स्थळी टेलिफोनचे लहानलहान बूथ दिसले. सडकेच्या मधून ट्रॅमचा रस्ता व त्याच्या दोन्ही बाजूस येणाऱ्या-जाणाऱ्या वाहतुकीचे मार्ग होते. एक-दोन स्थळी घोडागाडी धावताना दिसली. यातून बहुतेक मालाची ने-आण करीत होते. दोन्हीकडील फूटपाथ जरी स्वच्छ होते तरी मधूनमधून फुले व फळे विकणाऱ्या बायकांच्या हातगाड्या उभ्या होत्या. अगदी भुयाराप्रमाणे जागोजागी प्रसाधन, स्नान व आन्हीक आटोपण्याची व्यवस्था दिसली. आम्ही मुख्य मार्गावर आल्यावर दगडांच्या मोठ्या इमारती दिसू लागल्या. त्या इमारतींमधून वृक्षराजी डोकावत होती. अशा इमारती ओलांडून आम्ही एका फरशीने सुसज्ज झालेल्या चौकात आलो. चौकाच्या मध्यभागी एक कारंजे होते. त्याच्यामध्ये काही शिल्पे व भोवताली झाडाझुडपांची दाट गर्दी होती. हाच वस्तुसंग्रहालयासमोरील चौक होता. आत शिरलो. दरवानाने स्वागत केले. व त्या संचालकांनी वस्तुसंग्रहालय दाखविण्यास सुरुवात केली. येथील बहुतेक वस्तू गेल्या युद्धात दुसरीकडे ठेवण्यात आल्या होत्या. युद्धानंतर हळूहळू संग्रहालय सज्ज करण्यात आले. त्यांनी मला अति पुरातन काळच्या सरपटणाऱ्या प्राण्यांचे अजस्त्र अवशेष दाखविले. हे प्राणी अदमासे ८० फूट लांब व २० फूट उंच होते. या डिनोसावरस व ब्रॉन्टोसावरस प्राण्यांचे सापळेच कितीतरी मोठे होते ! याशिवाय हवेत उडणारे या जातीचे मोठाले प्राणी त्या इमारतीच्या वरील टोकावर अडकविले होते. या खोलीनंतर सस्तन प्राणी व त्यांचे सापळे दाखविले. इथेच एका काचेने आवरण केलेल्या अलमारीत इजिप्तमधील एका मुलाचा मृत देह ठेवला होता. याला साध्या भाषेत ' ममी ' म्हणतात. हा ममी एका १२ वर्षाच्या मुलाचा होता. तोंड कसे काळेकुट्ट झाले होते, पण मुखातून पांढरे दात थोडेफार डोकावत होते. डोक्यावर काळेभोर केस दिसले, पण सगळे शरीर पांढऱ्या पट्टीने वेष्टिले होते. इजिप्तमध्ये मृतदेहाला औषधोपचार करून ते प्रेत दडवून ठेवण्याची प्रथा होती. राजघराण्यातील लोकांना

तर असे वेष्टित करून त्यांच्या तोंडावर सोन्या-चांदीचा मुखवटा ठेवीत व सगळे प्रेत शिशाच्या कुपीत पुरत असत ह्या प्रेताभोवती त्या राजवंशाच्या सेवकांची प्रेते, त्यांची गुरे आणि इतर प्राणी, शिवाय परलोक तरून जाण्यासाठी बोटी व सामान ठेवीत असत. कैरोजवळील उंच पिरॅमिडच्या आत इजिप्तच्या राजवंशातील बऱ्याच लोकांची अशी प्रेते असावीत. अदमासे ५० वर्षांपूर्वी असेच एक पिरॅमिड उघडल्यावर तिथे 'राजा तूताखान मेन' याची ममी मिळाली. त्याचा सुवर्णाचा मुखवटा हिऱ्यामाणकांनीं मढवलेला होता. ही ममी कैरो येथील वस्तुसंग्रहालयात अद्याप ठेवलेली सापडेल. ज्या पिरॅमिडच्या आतील खोल्यातून ही ममी काढली गेली त्याच्या दारावर विशेष अक्षरांनी लिहिले होते की, 'यांची चिरनिद्रा जो कोणी भंग करील त्याचा अंत लवकरच होईल.' दुर्भाग्यवश ज्या *ब्रिटिश वास्तुशास्त्रज्ञाने ही ममी शोधली त्याचा खरोखरच महिन्याच्या आत मृत्यू झाला.*

या तूताखान मेनच्या ममीबद्दल ते सांगत होते व या ममीजवळ पण कुणाचा तरी अंत झाला असे म्हणाले. या सगळ्या वास्तू निरखून आम्ही त्या संचालकाच्या खोलीत गेलो. सगळी खोली कशी पुस्तकांनी व हाडांच्या सापळ्यांनी गच्च भरली होती. यांच्या टेबलावर एक काचेचे झाकण असलेला पिंजरा होता. तिथे बसल्यावर मी पिंजऱ्यात डोकावले. मला एक सरड्याप्रमाणे दीड फुटाचा जिवंत प्राणी दिसला. मी त्याला निरखून पाहू लागलो. तेव्हा संचालक म्हणाले,

"हा स्फिनोडॉन आहे. याला साध्या भाषेत 'टुवाटारा' म्हणतात. गेल्या चार वर्षांपासून आम्ही त्याला जिवंत ठेवले आहे. आम्हाला हा प्राणी न्यूझीलंडमधून आणून दिला." टुवाटाराचे नाव ऐकताच मला एकदम स्फूर्ती आली व मी त्या प्राण्याच्या डोक्यावर पाहू लागलो. दोन्ही डोळ्यांच्या वरील बाजूस व मध्यावर एक चीर होती. ती चीर पुसटपणे थोडी उघडी होती. चिरेची लांबी एक सेंटीमीटर असावी. ही चीर म्हणजे या प्राण्याचा तिसरा डोळा होय. आम्ही कॉलेजात शिकविताना किंवा क्रमिक पुस्तके वाचताना स्फिनोडॉनचे नाव सांगत होतो, पण आता समोरच हा त्रिनेत्र प्राणी भेटला. या डोळ्यावर प्रकाशाचा काही परिणाम होतो का ? म्हणून टॉर्च मारला. पण परिणाम दिसेना. या सृष्टीत पृष्ठरज्जू असणाऱ्या प्राण्यांत तिसरा डोळा दाखवणारा हा एकमेव प्राणी होय. त्याचे दर्शन त्या दिवशी मला झाले मग भारतीय संस्कृतीत श्री शंकराचा त्रिनेत्र दाखवितात तो कुठे व कसा असावा याबद्दल मनात कुतूहल उत्पन्न झाले.

माझे भाषण एका छोट्या खोलीत सुरू झाले. श्रोत्यांची संख्या फार नव्हती; पण प्रत्येक जर्मन पुरुष व बायकांना तिथे इंग्रजी चांगले समजत होते, व बोलता येत असे, यामुळे प्रश्नांचा तास चांगला रंगला. त्यानंतर दुपारची न्याहरी घेण्यास कॅफेटेरियाच्या कडेच्या खोलीत बसलो. जेवण तसे अगदी साधेच होते. पहिले सूप आले. पानकोबी, बटाटा व गाजर यांची उकडलेली डिश आली व शेवटी केक, कॉफी व चीजने जेवण संपले माझ्या टेबलावर त्या संचालकाशिवाय दोन जर्मन महिला होत्या. त्या मध्यम-

वयीन असाव्यात, कारण त्यांचे डोक्यावरील केस पांढुरके झाले होते. प्राणिशास्त्राशिवाय त्यांचे विचार गेल्या युद्धातील भयानक घटनांकडे जात होते. शहरावरील बाँबफेकीबद्दल व त्यामुळे झालेल्या पडापडी व आगीबद्दल भयानक वर्णन ते करत होते. शेवटच्या वाक्यात अगदी हुंदके देत त्या म्हणाल्या की, " त्या काळच्या आमच्या तरुण पिढीचा अगदी नायनाट झाला. आम्हाला युद्धानंतर लग्नासाठी तरुण पुरुष जवळपास मिळेनासे झाले !"

तिचे सांत्वन करीत मी सगळ्यांचा निरोप घेतला. संचालक महाशयांनी गावाच्या दुसऱ्या टोकाकडून मला विमानतळावर पोहचविले. मधूनमधून कारखानदारीने होणाऱ्या प्रदूषणाचे त्यांनी दर्शन दिले.

विमानतळावर पोहोचलो व त्यांचा निरोप घेऊन विमान कंपनीच्या ऑफिसाकडे वळलो. हे एअरइंडिया कंपनीचे ऑफीस होते. जर्मन महिला काउंटरवर दिसल्या. मला बघून त्यांनी " NINE NINE " म्हणजे जागा नाही असा पाढा सुरू केला. मी त्यांना तिकीट दाखविले. पण त्यांनी जर्मन अरेरावीचेच दर्शन दिले. नशिबाने आत एक भारतीय ऑफीसर होता, त्याच्याशी हिंदीत बोललो व त्याने सीट दिली. या बाईबद्दल सांगितले तेव्हा तो म्हणाला की, " यहाँ के लोग ऐसेही हैं ।" आता बराच वेळ झाला म्हणून खोलीवर जाऊन सामान व्यवस्थित केले. तिथे ह्या वस्तुसंग्रहालयातील महिलांचा फोन आला. त्यांनी सुखद प्रवास व्हावा असे तर म्हटलेच, पण त्या जिवंत स्फिनोडॉनची आठवण ठेवावी, असेही सुचविले.

मुंबईत आल्यावर मनात विचार सारखा घोळत होता की हा तिसरा डोळा कुठे व कसा असावा. दोन वर्षांपूर्वीच एका स्वीस कंपनीने पृष्ठरज्जू प्राण्यांतील विशिष्ट ग्रंथीबद्दल एक परिसंवाद घेतला होता. या परिसंवादात मेंदूखालील दोन्ही भुवयांतील भागात ' पिनिअल ' ग्रंथीबद्दल बराच विचार करण्यात आला, त्यांच्या मते हिला ' मास्तरग्लँड ' म्हणतात व हिच्या रसप्रवाहाने ' पिट्यूटरी ' अॅड्रीनल व इतर ग्रंथीतील प्रवाह जोराने वाहू लागतात, असे मत दिसले.

आम्ही त्याप्रमाणे उंदराचा उपयोग करून ह्या ग्रंथीबद्दल दोन वर्षे प्रयोग केले. शुक्ल पक्ष आणि कृष्ण पक्षात ह्या ग्रंथीच्या पेशीत उलथापालथ होत असताना दिसली. ही ग्रंथी पिट्यूटरीच्या अगदी वर असल्याने या उलथापालथीचा परिणाम तिकडे लगेच दिसून येतो. उंदराची जननक्रिया ह्या उलथापालथीच्या प्रक्रियेसंगे समांतर जाताना दिसली. ह्याचा अर्थ पिट्यूटरीने वरील रस ग्रहण करून त्या लांबच्या ग्रंथींना प्रवाहित केले व जननक्रियेवर परिणाम झाला. हा निष्कर्ष त्या परिसंवादाच्या निष्कर्षांप्रमाणे एवढाच निघाला की ही ग्रंथी पृष्ठरज्जू प्राण्यांच्या महत्त्वाच्या क्रियेवर संचलन करते.

आपल्याकडील योगशास्त्रात ज्याला आज्ञाचक्र म्हणतात व ज्याचे स्थान आपल्या दोन्ही भुवयांच्या मध्ये व जरा वर आहे, त्याच भागात ही पिनिअल ग्रंथी उपस्थित असते.

टुआटारा प्राण्यांच्या त्रिनेत्राचे उदाहरण घेऊन असे म्हणावे लागेल की उत्क्रांतिवादा प्रमाणे पृष्ठरज्जू प्राण्यात ही ग्रंथी जरा वर होती व तिच्या वर सूर्यप्रकाश व इतर प्रकाशज्योतींचा परिणाम होत असावा. जसजशी ह्या प्राण्यांची उत्क्रांती झाली व त्या ग्रंथीच्या बाहेरील भागाचा उपयोग कमी झाला, तसतसे तो भाग लुप्त होऊ लागला आज ती ग्रंथी कपाळाच्या आत आहे व मुख्य ग्रंथी (मास्तरग्लँड) म्हणून सर्व सस्तन प्राण्यांना महत्त्वाची मदत करीत आहे. तिला तिसरा डोळा म्हणावा की ग्रंथी म्हणावी याबद्दल अभ्यास सुरू झाला. सन १९८६ साली मेरीलेंड प्रांतातील बेथेस्डा शहरी दोन अमेरिकन वैज्ञानिकांनी या सर्व अभ्यासाचा गाभा एका पुस्तकरूपाने प्रसिद्ध केला. या पुस्तकात स्पष्ट नमूद केले आहे की " सस्तन प्राण्यांच्या पिनियल ग्रंथीत व त्याच्या दोन्ही डोळ्याच्या रचनेत बरेच साम्य आहे. दोघात मेलानीन विभाजन, रोडाप्सिन कायनेज प्रक्रिया असून रेटायना (डोळ्यातील पडदा) रचनासुद्धा एकसारखी आहे."

टुआटाराची कथा :– २० कोटी वर्षांपूर्वी या पृथ्वीवर सरपटणाऱ्या प्राण्याचे राज्य होते. या प्राण्यात अजस्र डिनोसावरस (लांबी १५० फूट, उंची २२ फूट) तर होतेच पण तेव्हा स्फिनोडॉन– ज्याला न्यूझीलंडमध्ये टुआटारा म्हणतात तोसुद्धा बहरत होता मोठ्या प्राण्यांनी धुमाकूळ माजवून आपली जातच नष्ट केली, पण हा दीड फूट लांब टुआटारा अद्याप न्यूझीलंड जवळील काही बेटांवर जगत आहे. हा प्राणी पर्यावरणाशी समरस झाला व इतके वर्षं जगला. न्यूझीलंडच्या माओरी वनवासी लोकांनी खाद्य म्हणून याला खनम करण्याचा सपाटा चालविला, पण १९ व्या शतकात ब्रिटिश लोकांनी सर-क्षण दिले व तिथे अदमासे दहा हजार टुआटारा, ज्याची लांबी दीड ते दोन फूट असते. (वजन २ पौंड) ते तेथील काही बेटांवर पक्ष्यांच्या घरट्याजवळ विष्टेवरील कीटकांवर गुजराण करून जगत आहे. याला प्रौढावस्था २० वर्षांनंतर प्राप्त होते व तो १०० वर्षे तरी जगतो. मादी ८ ते १५ अंडी घालते पण ती अंडी स्वत: उबतात. पिल्ले जन्मल्या-पासूनच स्वावलंबी असतात.

सरपटणारे प्राणी आवाज काढीत नाहीत पण धुके पडल्यास हा प्राणी घरट्यातून निघून रडण्याचा आवाज काढतो. नराला बर्हिलिंग नसते. याच्या दोन कडेवर असलेल्या डोळ्याच्या वरील भागावर डोक्याच्या मधोमध लालट अस्थिवर एक चीर असते. या चिरेखाली एक पारदर्शक पडदा पापणीप्रमाणे उघडझाप (तो बाल्यावस्थेत असताना) करू शकतो. पडद्याखाली डोळ्याचे भिंग व त्याखाली प्रकाश-आकृती दाखविणारा दुसरा पडदा (रटायना) दिसतो. प्रकाशाचे ज्ञान देणारे ज्ञानतंतू पण आहेत. डोळे विस्फारित किंवा आकुंचन करणारे मज्जातंतू मात्र नाहीत. हाच टुआटाराचा त्रिनेत्र होय. डोळ्यानी आकृती दिसत नाही. प्रकाश व तपमान ग्रहण करण्याची त्यांना शक्ती आहे. पिनिअल ग्रंथी कवटीखाली सस्तन प्राण्यात दिसते. तिला पण प्रकाश व तपमान ग्रहण करता येतो.

तिबेटमध्ये * बरीच वर्षे वास्तव्य केलेल्या व लामापद लाभलेल्या एका पारिचाराला लेखकाने लिहिले आहे की त्या देशात काही विशिष्ट क्रिया केल्यावर पिनियल ग्रंथी थोड्या प्रमाणात जागृत करता येते. ठराविक लामांच्या ललाटावर दोन्ही भुवयांच्या मध्ये ही क्रिया करतात. अशा लामांना प्रत्येक मानवाच्या डोक्याभोवतालच्या वलयात वेगवेगळे रंग दिसतात. लाल रंग दिसल्यास तो मनुष्य खुनी असेल काय ? हिरवा किंवा निळा दिसल्यास तो पाताळयंत्री तर नसेल ना ? असे अनुमान काढतात.

या तिसऱ्या डोळयावर अधिक संशोधन झाल्यास श्रीशंकराच्या त्रिनेत्राचे गूढ उलगडू लागेल.

(या घटनेचा काळ १९७६)

* डॉ. टी. लाब्संग रंपा...यांचा ग्रंथ 'THE THIRDEYE'

# ५ : जगप्रवासातील वर्णभेदाचे दर्शन

भारतीय स्वातंत्र्यापूर्वी आपण साम्राज्यवादाबद्दल बरेच वाचत होतो. पण याचा अनुभव एका विशिष्ट दृष्टिकोनातून मला आला नव्हता. पुढे माझ्या जगप्रवासामुळे याबद्दलचे बरेच चांगले आणि वाईट अनुभव आले आणि त्या दृष्टिकोनातून या विषयाबद्दल मला विचार करावा लागला.

गेल्या महायुद्धाच्या पूर्वी म्हणजे १९३८ साली मी मुंबईहून इंग्लंडला प्रयाण केले. आम्ही कॉन्टिरोसो या इटालयीन बोटीतून प्रवास केला. भाषेचा प्रश्न तर होताच, पण वागणुकीचासुद्धा प्रश्न समोर आला. युरोपियन राष्ट्रांमध्ये भारतीयांबद्दल त्या वेळी काही आस्था नव्हती. या बोटीतील इटालयीन अधिकारी त्याप्रमाणे वागू लागले. पण आम्ही काही भारतीयांनी एकत्र येऊन त्यांना चांगलीच समज दिली व त्यानंतर ते मार्गावर आले. या पहिल्या अनुभवाचा परिणाम आम्हाला त्या बोटीच्या अधिकाऱ्याच्या वागणुकीत चांगलाच दिसून आला. एकाने स्पष्ट सांगितले की, "आम्ही भारतीयांचे मित्र आहोत, ब्रिटिश साम्राज्यवादी आहेत, ते तुम्हाला चांगले कधीच वागविणार नाहीत· आम्ही तुम्हाला बरोबरीची वागणूक देऊ !"

हा सगळा प्रवास संपवून आम्ही डोहरहून लंडनला पोहोचलो व तिथून एका लक्झरी बसने एडिनबरो शहरी येऊन थडकलो. तिथे पोहोचल्यावर आन्हिक आटोपून वास्तव्याकरिता एखादी खोली मिळते काय ? या निमित्ताने युनिव्हर्सिटीच्या पलीकडील परिसरात शोध सुरू केला. कैक घरांवर भाड्याने खोली देणे आहे अशी जाहिरात लावलेली दिसली. पण दाराची घंटा वाजवताच आतील बाई किंवा बुवा बाहेर यायचे. माझ्या तोंडाकडे पाहायचे व म्हणायचे, "Sorry, we are full." या शोधाकरिता मला चार तास रपेट करावी लागली, कारण सगळीकडे मला तेच उत्तर मिळत होते. शेवटी एका घरी तसे उत्तर मिळताच मी पाऊल पुढे टाकले व त्या बाईला स्पष्ट विचारले की, माझ्याकडे पाहून असे उत्तर का देता ? मला नक्की तरी सांगा, कारण तुमच्याकडे जागा आहे.' त्या बाईने दार अर्धबंद करून सांगितले की, "आम्ही तुमच्यासारखे कृष्णवर्णीय

लोक घेत नाही. इथून दोन फर्लांगावर एक बाई राहते, ती बहुतेक अशा लोकांना खोली भाड्याने देते. तिच्याकडे जावे." मला फार दुःख झाले. माझा वर्ण पाहून तिने अशी वागणूक दिली.

एडिनबरोला महिनाभर राहिलो व पुढे न्यूकॅसल ऑन-टाईन या गावी राहण्यास गेलो. इथे माझ्यासारखेच २–३ भारतीय इसम राहणारे घर मिळाले. या ३३ सँडीफोर्ड रोडवर आमच्याच घरात दोन ब्रिटिश इसम राहत होते. आम्ही कृष्णवर्णीय जरी असलो तरी या ब्रिटिशांपेक्षा आमचे शिक्षण व राहणी पुष्कळ बरी होती. काही दिवस राहिल्यानंतर याच घरातील एक बाई मला रविवारच्या दिवशी चर्च दाखविण्याकरिता घेऊन गेली. गावाच्या बाहेर मोठे कॅथिड्रल चर्च होते. आम्ही तिकडे जावयास निघालो. पण मार्ग जरा चुकलो. कडेच्या बसथांब्यावर उभ्या असलेल्या काही नागरिकांना या बाईने मार्ग विचारला, त्या लोकांनी माझ्याकडे दृष्टी फेकली व त्या तरुण बाईकडे पाहिले व म्हणाले, " आम्ही सांगणार नाही. कारण तू त्या कृष्णवर्णीय माणसासंगे फिरत आहेस." त्या बाईला वाईट तर वाटलेच, पण कृष्णवर्णीय शब्द ऐकून मला धक्काच बसला !

वर्ष अखेरीचा डिसेंबर आला आणि सर्वत्र ख्रिसमसचा सण सुरू झाला. या दोन महिन्यात बऱ्याच ब्रिटिश लोकांची व माझी तोंडओळख झाली होती. यापैकी काही लोक माझ्याकडे आले व ३१ डिसेंबरच्या रात्रीचे त्यांचे घरी येण्याचे आमंत्रण देऊ लागले. आमंत्रण तरी किती विचित्र होते ? मी त्यांच्या घरी रात्री साडेअकराला यावे व समोरच्या दाराने न येता मागील भिंतीवर असलेल्या खिडकीतून शिरावे. तिथे चढण्याकरिता एक शिडी ठेवली असेल. येताना सोबत दोन पुड्या आणाव्यात. एका पुडीत दगडी कोळशाचे काही तुकडे व दुसऱ्या पुडीत खाण्याचे मीठ. त्यांनी तयार केलेल्या तशा पुड्या पण मला दिल्या. मला जरा आश्चर्य वाटले, की ही थट्टा तर नसावी ? त्यावर त्याने सांगितले की नूतन वर्ष उगवण्यापूर्वी जर कृष्णवर्णीय मनुष्य मागील दारातून मीठ आणि कोळसा घेऊन आला तर ते वर्ष सुबत्ता आणि भाग्याचे ठरते. आत आल्यावर ख्रिसमस केक आणि मदिरापान होणार होते. मला कृष्णवर्णीय शब्द ऐकून धक्का बसला व मी नकार दिला. असे मला 'कृष्णवर्णीय' संबोधिलेले शब्द बऱ्याच वेळा ऐकू आले. आमच्या युनिव्हर्सिटीचे व्हाइस चॅन्सलर लॉर्ड लंडनडेरी होते. त्यांनी भारतीयांची व इतर इंग्लंडबाहेरील रहिवाशांची एक सभा घेतली. या सभेत आम्ही भारतीयांनी आपल्या देशाच्या स्वातंत्र्याबद्दल विचारणा केली. त्यांनी सांगितले की भारतात राज्यकारभार चालविणारे, रक्षण करणारे व मार्गदर्शन करणारे लोक नाहीत. आम्ही त्यांना ट्रेनिंग देत आहोत व असे ट्रेनिंग झाल्यावर या गोष्टीचा विचार करू. कृष्णवर्णीय व तिसऱ्या जगातील लोक स्वातंत्र्याकरिता तयार नाहीत. एवढा जबाबदार मनुष्य असे बोलल्यावर मी जरा खट्टूच झालो. १९३९ पासून दुसरे महायुद्ध सुरू झाले. रोज रात्री जर्मनीहून रेडिओवर संदेश येऊ

लागले. यात एक संदेश होता की, "भारतीयांनो, जागे व्हा व इंग्रजांची सत्ता झुगारून द्या, आम्ही तुम्हाला मदत करू!" लढाई सुरू होण्याच्यापूर्वी एक महिना जर्मनीतून बरीच वाद्यवृंदाची पथके इंग्लंडला आली होती. त्याच सुमारास त्या देशातून बऱ्याच तरुण मुलीसुद्धा आल्या होत्या. त्यांना इंग्लिश भाषेचे ज्ञान घ्यावयाचे होते. या मुली भारतीयांशी उघड उघड बरोबरीने भेटत होत्या. पण ब्रिटिश मुली भारतीय तरुणाकडे फटकळपणे वागत होत्या. हा फरक नजरेत चांगलाच भरला; तरीपण त्या इंग्लिश मुलींचे पालक जर्मन मुलींना सांगत होते की, कृष्णवर्णीय लोकांशी सलोख्याचे संबंध ठेवू नयेत. इंग्लंडला थिऑसॉफी सोसायटीच्या बऱ्याच शाखा आहेत. इथे आमचे स्वागत होत असे. तरीपण भारतीय राजे व संस्थानिक यांच्या राहणीचे उदाहरण देऊन आम्हाला खाली पाहण्यास काही लोकांनी कमी केले नाही. एके दिवशी स्पिरिचुअल सोसायटी चर्च यांच्या बैठकीला मला नेण्यात आले व त्या बैठकीत 'माध्यमा' मार्फत मृत माणसाचे साक्षात रूपांतर करण्याचा प्रयोग झाला. इथे वैज्ञानिक दृष्टिकोनातून मी प्रश्न विचारले असता तेथील काही लोकांनी मला हटकले. पण आश्चर्याची गोष्ट अशी की, समोर जे मृत आत्म्यांचे अंधुक स्वरूप दिसत होते त्यानेसुद्धा उत्तर देऊन सांगितले की, हा प्रयोग यशस्वी होण्याकरता या भारतीयांच्या अध्यात्मवलयाने फार मदत केली. बस्स! एवढे ऐकल्यावर शेवटी इतर लोक म्हणू लागले की कृष्णवर्णीय लोकांना आध्यात्मिक वलय खूप असते.

असा कृष्णवर्णीय लोकांचा उच्चार झाला तरी युद्धाकरता सैन्य हवे म्हणून आम्ही भरती व्हावे असे सुचविण्यात येऊ लागले. ऐन धुमश्चक्रीच्या वेळी म्हणजे V–2 जेव्हा लंडनवर येत होते, तेव्हा दवाखान्यात जखमी लोकांना नेताना ते म्हणायचे की कृष्ण-वर्णीय लोकांनी हात धरले तर आम्ही लवकर बरे होऊ. एकदा लंडनपासून ३०–४० मैलांवर असलेल्या 'इटन' या प्रख्यात शाळेचे दर्शन घेण्याकरिता गेलो होतो. या शाळेचे विद्यार्थी टॉप हॅट आणि लाँग कोट घालून क्रीडांगणावर उभे असताना दिसले. त्यांना लढाईबद्दल वा भारतीय स्वातंत्र्याबद्दल विचारले असताना त्यांनी स्पष्ट सांगितले की, "ब्रिटिश साम्राज्यावर सूर्य कधीही मावळत नाही. साम्राज्यवादाचा उगम याच वाक्याने भरला आहे!" मी त्यांना उत्तर दिले की, "या युद्धानंतर ब्रिटिश साम्राज्यावर सूर्यच उगवणार नाही!" माझ्या सोबत असलेल्या एका ब्रिटिश वैज्ञानिकाने पाठ थोपटली व म्हणाला की, "तुम्ही अगदी खरे बोललात. या युद्धानंतर साम्राज्य नष्ट होईल व तुमच्यासारखे वैज्ञानिक इथून ज्ञान घेऊन गेले की आम्हाला तुमच्याकडे ज्ञानार्जन करावे लागेल!" याची वाणी किती खरी ठरली! ब्रिटिश साम्राज्य संपले व आज आपल्या बऱ्याच विश्वविद्यालयात ब्रिटिश विद्यार्थी अभ्यासाकरता येत आहेत!

युद्ध चालू असताना आम्ही सप्टेंबर महिन्यात १९४० साली भारताकडे येण्यास निघालो. या प्रवासाकरता आमच्या बोटीला साठ दिवस लागले. या बोटीवर आम्ही अवघे

वीस भारतीय होतो. त्यात नामदार मुकुंदराव जयकर, लेडी महाराज सिंग, डॉ. कृष्णस्वामी मुदलीयार व लंकेचे एक कम्युनिस्ट नेते पण होते. सबंध बोट ब्रिटिश सोजिर व ब्रिटिश कुटुंबांनी भरली होती. या सगळ्यांचे विविध कार्यक्रम होत असून आम्हाला प्रवेश नसे. आमच्याबरोबर एक अँग्लो इंडियन महिला होती. तिला पाहून तर त्या ब्रिटिश बायका नाक मुरडीत होत्या व तिला जवळ येऊ देत नसत. आमची बोट बऱ्याच कष्टातून व विघ्नातून निघून केप ऑफ–गुड होप जवळ आली. बंदरापासून आठ मैलांवर तिने नांगर टाकला. आमच्यापैकी काही लोकांनी लहान बोटीतून केपटाऊन या बंदरात प्रवेश घेतला. गावात जाताना सडकेच्या कडेला इंग्लिश आणि आफ्रिकन्स या भाषेत बरेच फलक सगळीकडे लागलेले दिसत होते. एका न्हाव्याच्या दुकानावर पाटी होती, Dogs and Black Prohibited." म्हणजे आम्हाला केशकर्तन करता आले नाही. जेवणाला हॉटेलमध्ये गेल्यावर त्याने पास मागितला. तो आमच्याकडे नव्हता. त्याने स्पष्ट सांगितले, " Dogs and Black not allowed." टॅक्सीवाले आमच्याकडे पाहून नकार देऊ लागले. शेवटी एका आयरिश टॅक्सीवाल्याने आम्हाला लांबच्या डोंगरावरील एका खाणावळीत नेले. जिथे कृष्णवर्णीय लोकांना जेवू घालत होते. सगळा दिवस या अपमानात गेला. जयकरसाहेब बोटीतून उतरलेच नाहीत, पण लेडी महाराज सिंग यांनी सांगितले की त्या एका उपाहार गृहात एका पाहुण्यासंगे गेल्या होत्या. तिथे एका वेटरने सांगितले, " we do not serve you !" पण त्या लेडीने आपला डिप्लोमॅटिक पासपोर्ट दाखवल्यानंतर त्याने उत्तर दिले, " We my serve you but not your guest. " केपटाऊनला दोन विश्वविद्यालये आहेत. स्टीलॅन बॉक या एका विश्वविद्यालयात कृष्णवर्णीयांना प्रवेश नाही सिनेमागृहात कृष्णवर्णीय लोकांचे वेगळेच थिएटर दिसते. तिथे आपल्या भारताच्या थिएटरप्रमाणे शेंगदाण्याची टरफले, केळ्याची सालपटे व पॉपकॉर्नचे पुडे फरशीवर दिसत होते. या केपटाऊनचा हा वर्णद्वेष पाहून गेल्या वर्षभरात टीव्हीवर कृष्णवर्णीय लोकांनी जो लढा सुरू केला त्याच्या प्रात्यक्षिकांची आठवण मला आज येत आहे.

भारतात आल्यावर मी 'डास कॅपिटल' पूर्णपणे वाचले. तसेच इंग्लंडहून आणलेल्या हिटलरच्या 'माईन काम्फ' पुस्तकाची पाने पण चाळली. डॉ एँगल यांचे लिखाण वाचले. रशियन क्रांतिकारक लेनिनची भाषणे, ब्रिटिश राज्यातील फेबियन सोसायटीच्या पेंग्युइन सीरिज वाचून काढल्या, पण या पुस्तकातून डोकावत होता 'अर्थवाद' व 'पूंजीवाद' नंतर बऱ्याच वर्षांनी म्हणजे १९६७ साली पुन्हा गेलो, तेव्हा इंग्लंडचे साम्राज्य संपले होते. त्या देशात आता कैक भारतीय, पाकिस्तानी, बांगलादेशीय व अगदी कृष्णवर्णीय स्थायिक झालेले दिसले कैक भारतीय तेथील मोठ्या व्यापारात भाग घेतात. शाळा कॉलेजात भारतीय शिक्षक नजरेत आले. हिंदूंची काही देवळे व मुसलमानांच्या मशिदी व शिखांची गुरुद्वारे दृष्टीस पडली. बस आणि ट्राम चालविणारे कैक हिंदू दिसत होते. दुकानातून माल विकणारे भारतीय चोहीकडे आढळले. लंडनच्या हिथ्रो विमानतळावर

कचरा काढण्याकरिता नायलॉन व वायल नेसलेल्या व अंगावर दागिने घातलेल्या कैक स्त्रिया स्वच्छता ठेवण्याकरिता चोहीकडे नजरेस पडल्या. भारतात घरामध्ये बायका जशी स्वच्छता ठेवतात तशा या बायका विमानतळ स्वच्छ ठेवीत होत्या. कैक काऊंटरवर भारतीय क्लार्क बसले होते. मी केंब्रिज, ऑक्सफर्ड आदी विश्वविद्यालयांना भेटी दिल्या. तिथ भारतीय चांगलेच नजरेस आले. ब्रिटिश सरकारची आरोग्याची उपाययोजना मुख्यत: भारतातील डॉक्टर चालवत होते. आता मला रस्त्याने कृष्णवर्णीय शब्द ऐकू येऊ लागले. भारतीयांनी व पाकिस्तानी लोकांनी त्या देशातील कारखानदारी व आर्थिक व्यवस्था वाढविली. यामुळे त्यांच्याबद्दल आता खालच्या थरातील लोकांमध्ये द्वेष उत्पन्न होत आहे. खालील वर्गातील कमी शिकलेले तरुण आता टोळीटोळीने फिरू लागले. Skin head नावाची डोके भादरलेली तरुणांची (गुळगुळीत केलेली) टोळी हातात बायसिकलच्या चेन घेऊन 'पाकिबॅशी' म्हणजे भारतीय आणि पाकिस्तानी लोकांना मारण्याकरता फिरू लागली. कुठे तो साम्राज्यवाद, जिथे भारतीयांना कृष्णवर्णीय म्हणून लेखत होते व कुठे आता हा द्वेष !

मला आठवते की, १९३९ साली ब्रिटिश वैज्ञानिकांचे (ब्रिटिश असोसिएशन फॉर दि कल्टिव्हेशन ऑफ सायन्स) एक अधिवेशन डंडी शहरी भरले होते. मी तेव्हा न्यूकॅसलला संशोधन करीत होतो. या अधिवेशनाचे मला आमंत्रण आले. मी ते आमंत्रण स्वीकारले व लिहिले की, माझी राहण्याची व्यवस्था एखाद्या ब्रिटिश शेतकऱ्याच्या घरी करण्यात आली तर बरे होईल. तोपर्यंत मला दोन-तीन पदव्युत्तर पदव्या मिळाल्या होत्या. या पदवीकडे पाहून काही शेतकऱ्यानी मला पाहुणचार देण्याचे कबूल केले. मी डंडीला पोहोचलो, व मला त्यांचे घरी नेण्यात आले. मी त्या घरी दुपारी चारलाच पोहोचलो होतो माझी व्यवस्था एका उत्तम खोलीत करण्यात आली होती. शेतकरी सधन होता. शेती चांगली होती व शेतकामाशिवाय शेअर मार्केट व इतर व्यापारात तो भाग घेत असे. यामुळे त्याला जगाच्या व्यापाराबद्दल चांगली माहिती होती. त्याच्या त्या भव्य घरात मला दुसऱ्या मजल्यावर ठेवण्यात आले. सायंकाळी हे गृहस्थ आले व रात्रीच्या जेवणाकरिता मला खाली बोलावले. माझी ओळख झाली; पण त्या गृहस्थांच्या तोंडावर कसलातरी कडवटपणा दिसू लागला. त्याने मला कलकत्त्याच्या ताग विणणाऱ्या कारखान्याबद्दल बरेच विचारले. कारण तिथे त्याने पैसे गुंतविले होते. शेतीबद्दल व इंग्लिश भाषेबद्दल ज्ञान पाहून त्याला आश्चर्य वाटले. त्याच्या या प्रश्नावरून मला कळून चुकले की, माझ्या डिग्र्या पाहून त्याला वाटले की मी कोणीतरी ब्रिटिश नागरिक (पांढऱ्या रंगाचा) असेन, तरी कृष्णवर्णीय लोक इंग्लिश चांगले बोलू शकतात व शास्त्रीय ज्ञानाबद्दल त्यांना चांगली आस्था आहे, याची त्याला कल्पना नव्हती. त्याला वाटे की कृष्णवर्णीय लोक खालच्या दर्जाचे असावेत, जे अज्ञानी, अशिक्षित असतात. जेवण संपल्यानंतर मी खोलीत गेलो. पण मला निरोप देताना त्याच्या मनात काहीतरी शल्य खुपत होते. सकाळी उठताच त्या घराच्या 'मेड' ने दार

वाजवले व सांगितले की, त्या घरमालकांनी माझी राहण्याची व्यवस्था डंडी शहरात दुसऱ्या ठिकाणी केली आहे व खोली खाली करा असे सांगितले. एक कृष्णवर्णीय मनुष्य सुशिक्षित असू शकतो व तो आपल्या घरात आदरातिथ्य घेण्यास योग्य असतो, हे त्याला पटले नाही. मला घर सोडून जावे लागले. ही घटना १९३९ सालची आहे. पण १९५९–६१ साली मला कैक ब्रिटिश लोकांनी घरचे आमंत्रण दिले व शेती व स्वास्थ्य प्रश्नांबद्दल बरीच विचारणा केली. हा साम्राज्य गेल्याचा तर परिणाम नसावा ? साम्राज्यवाद साम्राज्याच्या गुर्मितच असतो व ते राज्य गेल्यावर ती गुर्मी शांत होते, त्याची ही दोन उदाहरणे आहेत. आफ्रिकेतील वर्णभेद याच भूमिकेतून पाहावा लागेल. केनिया आणि ऱ्होडेशिया या देशांचा इतिहास पाहून माझ्या वरील विधानाला पुष्टी मिळते.

या जगामध्ये आणखी काही वाद आहेत, जे मानवा-मानवात भेद निर्माण करतात. या वादाला आपण पुंजीवाद व जातीवाद असे म्हणू. पैसा पुष्कळ असला म्हणजे सगळे ज्ञान आपोआप प्राप्त होते, अशी उद्योगपतींच्या मनात भावना रुजलेली आहे. तोच हा पुंजीवाद. कार्ल मार्क्सनी याच वादाचे धिडवडे उडविले आहेत. आपल्याकडे वर्णभेद या रूपाने जातीयवाद हिंदू समाजात शिरला आहे. जो आता हळूहळू कमी होत आहे. हिंदू समाजरचना जेव्हा सुरू झाली तेव्हा जाती नव्हत्या. मुख्यत: ऋषीमुनी व त्यांचे धर्म उपदेशक लोक जरा विचार करण्याकरिता वेगळे राहात होते. इतर लोकांनी शेती केली. काही लोकांनी व्यापारउदिम केला व काही लोकांनी या कामाला हातभार लावला व त्यांचे वंशज तेच काम करू लागले. व जसजशी लोकसंख्या वाढली तसतसे या लोकांनी आपल्या धंद्याशी निगडित राहण्याचे ठरविले व इथूनच अज्ञानाच्या भूमिकेतून जातीयवाद सुरू झाला. भगवद्‌गीतेत या वादाला स्पष्ट म्हटले आहे की गुण आणि कर्म याच दोन मुद्द्यांवरून जाती निर्माण झाल्या व त्या वेगळ्या राहून जातीवाचक नावाने लोक संबोधू लागले. हे संबोधणारे कशाच्यातरी न्यूनगंडामुळे पछाडले होते.

मला आठवते की, १९४२ साली जेसेलमेर संस्थानात टोळधाडीच्या नियंत्रणाकरिता मला मध्यवर्ती शासनाने पाठविले होते. त्या वेळी जून महिन्यात रखरखत्या वाळवंटात दिवसभर फिरल्यानंतर एका उजाड गावाजवळ रात्री मुक्काम केला. माझ्यासंगे एक पठाण शरीररक्षक होता व माझा उंटचालक एक कोळी होता. दिवसभराच्या दगदगीमुळे सायंकाळी मला ताप भरू लागला. त्या राज्यातील रेस्टहाऊस म्हणजे एक पडके घरच होते. जवळपास खाण्या पिण्याची काही व्यवस्था दिसत नव्हती. मी त्या अंगरक्षकाला गावात धाडले व काही भांडी स्वयंपाकाला आणावीत असा हुकूम दिला. माझ्या शिपायाला गावातील लोक म्हणाले की, जो माणूस कोळ्यासंगे उटावर बसून फिरतो तो हलक्या जातीचा असावा. शिपायाने बरीच दमदाटी केली, तरीपण भांडी मिळाली नाहीत. शिपाई परत येताना त्याच्यामागून हळूहळू दोघेतिघे गावकरी आमच्या रेस्टहाऊसजवळ आले. एकाने शिपायाला विचारले की, साहेबांची जात सांगावी. मी ब्राह्मण म्हणताच त्याने कळविले

की ब्राह्मण केवळ बंगाल आणि उत्तर प्रदेशातच असतात. महाराष्ट्रात ब्राह्मण असतील याची त्यांना जाणीव नव्हती. शेवटी एकाने निरोप पाठविला की साहेबाने कधीच मांसाहार व मदिरापान केले नसेल तरच आम्ही भांडी देऊ. या प्रश्नमालिकेतून एवढाच निष्कर्ष निघतो, की लोकात अज्ञान व अहंभाव जिथे पसरलेला असतो तिथेच जातीयवाद फोफावतो. या वादाला स्वतःची पोळी भाजून घेण्याकरता नेते खतपाणी घालतात. पुंजीवाद आणि जातीयवाद या शीर्षकाखाली जे वर्णभेद मोडतात त्यांना आळा घालण्याकरिता अज्ञान दूर करणे व अर्थार्जन वाढविणे हेच दोन उपाय होत. जगातील साम्राज्यवाद आता नष्ट झाला किंवा होत आहे, पण पुंजीवाद आणि जातीयवाद कुठेकुठे अज्ञानामुळे डोकावत आहेत. अमेरिकेत नीग्रो लोकांच्या वसाहतीमुळे गेल्या शतकात वर्णभेद बोकाळला होता, पण आता ज्ञानार्जन व अर्थार्जनामुळे त्याला मूठमाती मिळत आहे. मी अमेरिकेत १९५९ साली गेलो, तेव्हा विमानतळावर सामान उचलणारे कृष्णवर्णीय हमाल दिसले. सामान उचलण्याकरिता पोलिसची मदत घेतली पण रॉकफेलर प्लाझा येथील रॉकफेलरच्या ऑफिसात कृष्णवर्णीय सुशिक्षित ऑफिसर पाहून माझ्या कल्पना बदलल्या. बाल्टीमोर शहरातील हॉटेलमध्ये कृष्णवर्णीय लोकांनी माझे जे आदरातिथ्य केले तेवढे दुसरीकडे दिसले नाही. वॉशिंग्टनला जाताना बाल्टीमोर स्टेशनच्या प्लॅटफॉर्मवर बसलो होतो. आपल्याकडील स्टेशनच्या प्लॅटफॉर्मप्रमाणे तिथे गर्दी नव्हती. एका बेंचावर बसलो असताना एक नीग्रो गृहस्थ जवळ आला. त्याने प्रथम विचारले की, 'आपणाजवळ मी बसलो तर काही हरकत आहे काय ?' मी 'नाही' म्हणताच तो बसला व थोड्याच वेळाने म्हणाला, 'मी विचारू की तुम्ही कोणत्या देशातून आलात ? आशिया असेल. तुमचे नाक सरळ आहे, डोळे मोठे आहेत, यामुळे तुम्ही चिनी नसाल. तुमच्या कोटाची कॉलर बंद आहे, यामुळे तुम्ही बहुतेक हिंदुस्थानचे रहिवाशी असाल !' मी 'हो' म्हणताच त्याला आनंद झाला, व त्याने डोळे बंद केले व म्हणाला की, 'त्या देशाचे लोक फार चांगली कविता करतात. मला त्यांच्याबद्दल फार आदर आहे !' मला आश्चर्य वाटले व मी विचारले की, त्यांनी कोणती कविता वाचली ? त्या नीग्रो गृहस्थाने खिशात हात घातला. एक छोटेसे पुस्तक काढले. त्या पुस्तकाच्या दुसऱ्या अध्यायातील ओळीखाली पेन्सिलीने रेघोट्या मारल्या होत्या. 'वाचा वाचा' असे म्हणत त्याने ते पुस्तक मला दिले. मला एकतर आश्चर्याचा धक्काच बसला व दुसरे त्या ओळी वाचताच मी गहिवरून आलो. माझ्या डोळ्यांत आसवे आली, कारण ते पुस्तक होते अँड्रू आरनाल्डचे 'सॉंग सेलेस्टियल' म्हणजे भगवद्गीतेचे भाषांतर व त्यांनी रेघाटलेल्या ओळी होत्या.

**विहाय कामान्यः सर्वान् पुमान्श्चरति निस्पृहः ।**
**निर्ममो निरहंकारः स शांतिमधिगच्छति ॥**

भगवद्गीतेतील हा दुसरा अध्यायाचा श्लोक भाषांतरीत जरी असला तरी तो

वाचून आनंदाने माझी वाचाच एका क्षणाकरिता स्तब्ध झाली. हा नीग्रो माणूस, कुली काम करणारा, खिशात भगवद्‌गीता घेऊन वाचतो व त्या गूढ अर्थाखाली रेघोट्या मारून मनन करतो, केवढी ही ज्ञान संपादन करण्याची तपस्या ? आपल्याकडे कैक सुशिक्षित लोक भगवद्‌गीतेकडे ढुंकूनसुद्धा पाहत नाहीत. काही लोकांना हिंदू शब्द उच्चारल्यावर राग येतो; पण हा कृष्णवर्णीय माणूस त्या भगवंताच्या शब्दाचा रस घेत होता. इथेच जातीयवाद संपला पाहिजे.

◇

*(या घटनांचा काळ १९३८–१९४२–१९५९)*

# ६ : मरणाची चाहूल वाघाला !

वाघाला व्याघ्रेश्वरी देवी व संत चांगदेव यांचे वाहन मानले आहे. बेफिकीर व क्रूर स्वभावाचे प्रतीक म्हणून वाघ प्रसिद्ध आहे.

ज्या रानात वाघाचे वास्तव्य राहील ते जंगल वनश्रीनें भरलेले दिसेल. वाघ वनाचे रक्षण करतो. हरिण, गवा, गुरे आदी शाकाहारी प्राण्यांची संख्या मर्यादित ठेवून वनस्पती नाशाला तो आळा घालतो. अशक्त व जर्जर हरिणादी जनावरांची हत्या करून सशक्त शाकाहारी जनावरात उत्तम जाती निर्माण करण्यास त्याची मदत होते. पण भारतातील वाघांची संख्या शिकारीपायी आता फारच रोडावली आहे.

या शतकाच्या प्रारंभी आपल्या देशात ५० हजार वाघ येथील वनात होते. पण सन १९७० पर्यंत ही संख्या अवघी १९०० पर्यंत येऊन ठेपली. शिकारीपायी भारतातून वाघ नष्ट होऊ लागले आहेत.

रीवाच्या महाराजांनी ९०० वाघ मारून एका शहरात या संख्येबद्दल विजयस्तंभ उभारला. सरगुजच्या महाराजांनी सर्चलाइटचा प्रकाश टाकून त्यांच्या राज्यातील ११०० वाघ मारले. प्रख्यात क्रिकेटपटू महाराजा विजयानगरम् यांना १००० आकडा आपल्याला गाठता आला नाही, म्हणून खेद झाला. राजे पाचवे जॉर्ज, राजपुत्र एडवर्ड, कैक व्हाइसरॉय यांनी ३०–४० वाघ मारले. वाघाची शिकार करणे हे शौर्याचे लक्षण समजले जात असे.

वाघांची संख्या कमी झाली, त्याचा परिणाम म्हणजे जंगलाचे नैसर्गिक संरक्षण गेले व लागलीच जंगलतोड वाढू लागली. शाकाहारी प्राण्यांच्या वाढीला ऊत आला व त्यांची संख्या भरमसाठ वाढली. त्यांनी वनस्पतीनाश मोठ्या प्रमाणावर सुरू केला व उरलेले हिंस्र प्राणी आता खेड्यात व लहान लहान शहरात येऊ लागले. जंगलतोडीमुळे मानवाची इंधनसमस्या अधिक बिकट झाली.

गरिबांचे इंधन लाकुडफाट्यातूनच मिळत असे. शासकीय कर्मचाऱ्यांनी या इंधनाकडे दुर्लक्ष केले व इमारतीसाठी लागणाऱ्या लाकडाच्या उत्पादनाला उत्तेजन देऊन इंधन

समस्या व त्याच्याशी निगडित असलेली वन्य शाकाहारी प्राण्यांची अन्नसमस्या आणखीनच उग्र केली. महाराष्ट्राला खरे म्हणजे २५ दशलक्ष क्यूबिक मीटर जळाऊ लाकडांची जरुरी आहे, पण येथील जंगलातून अवघे ५ ते ८ दशलक्ष क्यूबिक मीटर लाकूड आता उपलब्ध होत आहे. मानवाच्या जीवनाशी निगडित अशा या समस्येला व्याघ्रहत्या हे एक कारण मानले जाते. ही जरी आजची भूमिका असली तरी, ५०–६० वर्षांपूर्वी 'वाघाची शिकार' हे एक शौर्य आणि मोठेपणाचे प्रतीक मानले जात असे. या विचारसरणीला मीसुद्धा बळी पडलो व ५०–६० वर्षांपूर्वी वाघाचे दर्शन व त्याची शिकार याबद्दल मला किती रपेट करावी लागली याची आज मला आठवण येते, पण त्याबद्दल मला एकच समाधान होते, की मी वाघाची हत्या करण्यात यशस्वी झालो नाही. वाघाला पाहावे ही जिज्ञासा आता केवळ त्याच्या अभ्यासासाठीच कायम आहे.

सन १९३० साली बी. एस्सी. करीत असताना या जिज्ञासेचा प्रादुर्भाव झाला. नर्मदा नदी उमरकंटक नामक घनदाट वनश्री असलेल्या ३००० फूट उंच डोंगरावरून जन्म घेते. पेंडरा रोड रेल्वे-स्टेशनवर उतरावे व तीन मैल चालून गेल्यावर दहा-बारा मैल चढण पार करावी लागते. ती त्यासमयी आम्ही चढून गेलो. घनदाट वनश्रीमधून आंबा, जांभूळ, आवळा, महुआ, बेहडा, चारोळी, तेंदू आदी फळांचा आस्वाद घेत आम्ही जरी दोघेच होतो, (मी आणि माझा भाचा) तरी कैक यात्री ईश्वराचे नाम-स्मरण करीत वर चढत होते. त्यामुळे आम्हाला बरीच सोबत लाभली. आपले लक्ष्य गाठल्यावर त्या तीर्थक्षेत्री असलेली एक धर्मशाळा हुडकून काढली. तिच्या पडवीवजा खोलीत पाठीवरील सामान ठेवले. नर्मदेचे उगमस्थळ अगदी किरकोळ आहे. एक देऊळ व थेंब थेंब गळणारे पाणी एवढेच दिसले. त्याच्या जवळील कुंडात स्नानसंध्या केली. धर्म-शाळेतून भांडी घेतली. डाळ–तांदूळ विकत आणले व तीन दगडांच्या चुलीवर इंधन पेटवून खिचडी तयार करून जेवलो. थकवा आलेला होताच, त्यात भर म्हणून गरम अन्न पोटात जाताच आळस येऊ लागला. भांडी घासून टाकली व चटईवर पडताच झोप लागली. जाग आली तेव्हा दुपारचे साडेचार वाजले होते. धाब्यावर गरम दूध घेतले व नर्मदा प्रदक्षिणेला निघालो. उगमानंतर तीन फर्लांगावर नदीला आकार येऊ लागतो व पुढे ती खोल होत जाते. नदीच्या जवळपास उत्तम ब्राह्मी वनस्पती पसरली होती. दोन्ही किनाऱ्याला लांबपर्यंत हिरवीगार वनराजी दिसली. चित्रविचित्र पाखरे, खारी, सरडे, मधमाश्यांचे थवेच्या थवे, भुंगे, डास, माश्या, मासे आदींचे निरीक्षण करीत चाललो असताना यात्रेकरूंचा तांडा 'जय नर्मदे' म्हणत समोरून गेला. आम्हा दोघांकडे पाहून ते मिस्किलपणे हसले. दुसरा तांडा तसाच गेला हसत हसत. तिसऱ्याला आम्ही हटकून कारण विचारले. आम्ही 'दूधधारा' व 'कपिलधारा' धबधबे पाहून स्नान करणार असे त्यांना सांगताच ते म्हणाले की, आता साडेपाच वाजत आले आहेत. लवकरच काळोख पडेल व जर आम्ही त्या गर्द जंगलात शिरलो तर हरवण्याचा संभव होता, कारण इतक्या

उशिरा त्या जंगलात राहण्याचे धाडस कोणताच यात्रेकरू करीत नाही व म्हणूनच आम्ही आता परत फिरावे, असेही त्यांनी आम्हाला सांगितले.

मनात लहान वयातली जिद्द होती. त्यांचा उपदेश धुडकावून आम्ही झपाझप पुढे पावले टाकू लागलो. चारपाच मैलांवर दूधधारा धबधबा दिसला. नर्मदा नदी डोंगरावरून तीनशे फूट खाली उतरते. धबधब्याचे पांढरे शुभ्र जलबिंदू बुडत्या सूर्यप्रकाशामुळे अगदी दुधासारखे दिसले. लवकर स्नान आटोपून अगदी धावतच कपिलधारेकडे निघालो. आता अंधार पडू लागला कोल्हेकुई ऐकू येऊ लागली. पक्ष्यांचे घरट्याजवळील कलरव कानी पडले. कसेतरी कपिलधारेजवळ आलो. त्या अंधुक प्रकाशातच आम्ही स्नान केले. पण वर येताना चांगलाच अंधार पडला होता. आपले ध्येय गाठताना अडीअडचणीची आपण पर्वा करीत नाही. पण ध्येय गाठल्यावर ही सर्व संकटे आ वासून उभी राहतात. आमचे तसेच झाले. कपिलधारेच्या पायथ्यापासून वर शिलाकपारी पार करीत त्या अंधारात कसे यावे हा एक प्रश्न उभा राहिला. काहीच न सुचल्याने मी डोळे घट्ट बंद केले व काही अवधी-नंतर उघडले. जेमतेम ठेचाळत वरील आकाशातील चांदण्यांच्या प्रकाशात आम्ही मार्ग शोधू लागलो. आता रातकिडे ओरडत होते, काजवे चमकत होते. कोल्हेकुई ऐकू येत होती. जेमतेम वरच्या शिलेवर हात लावला आणि काही तरी सरंकन् पळाले. भीतीने 'आई' म्हटले. तेवढ्यात लांबवर एका कुत्र्याचे भुंकणे कानी पडले, म्हणून आवाज कुठून येतोय तिकडे लक्ष देऊ लागलो. तो आवाजाच्या बाजूलाच एका कपारीत एक मिणमिणता दिवा स्पष्ट दिसू लागला. त्यामुळे मी एक शिलेवर बसून मार्ग नीट पाहून घेतला व आम्ही पायवाट ओळखून काटेकुटे, खाचखळगे, दगड, लाकूडफाटा या सगळ्यांशी टक्कर देत त्या दिव्याजवळ आलो. कुत्रा एका शाकारलेल्या कुटीच्या पडवीतून भुंकताना दिसला. म्हणून आम्ही बाहेरूनच हाक दिली, अंदर कोई है?' कुत्रा आणखीनच जोराने भुंकू लागला. त्याबरोबर त्या कुटीचे दार थोडे उघडले गेले. हातात चांगले जळते लाकडाचे कोलीत घेऊन एक जटाधारी लंगोटी नेसलेला साधू पुढे आला. कोलीत आमच्या समोर धरून त्यानेच आम्हाला 'कौन है रे' म्हणून उलट प्रश्न विचारला. तेव्हा 'आम्ही विद्यार्थी वाट चुकून इकडे आलो व आता आम्हाला आपण आश्रय द्यावा' अशी त्यांना विनंती करू लागलो. प्रथम त्याने बरीच दमदाटी केली. पण कॉलेजचे सुशिक्षित विद्यार्थी आश्रयाला आले आहेत, याची खात्री पटताच त्याने आम्हाला आत घेतले. ती कुटी एका खोली-एवढीच होती. मध्यभागी जळत्या लाकडाचा ढिगारा पेटला होता. या धुनीजवळ एका मृगचर्मावर तो साधू बसला. त्याने आम्हाला बांबूची चटई बसायला दिली.

हळूहळू आमच्याबद्दलची पूर्ण माहिती विचारून घेतली. आंग्ल शिक्षणाचे वैगुण्य आम्हाला दाखवून दिले व आमची जणू तपासणीच करावी या उद्देशाने स्तोत्र किंवा ईश-स्तवन पठण करण्याचा आदेश त्याने आम्हाला दिला. तेव्हा मी 'रामरक्षा स्तोत्र', 'भीमरूपी महारुद्रा' आदी स्तोत्रे म्हणताच साधुमहाराज खूष झाले. रताळ्यासारखा एक कंद

त्यांनी विस्तवात भाजला व आम्हाला प्रसाद म्हणून दिला. भूक खूप लागलीच होती. त्यामुळे त्या कंदाचा छोटासा तुकडा तोडून त्याचा स्वाद घेऊ लागलो. अगदी दूध-भाताचा स्वाद होता. पण इतका चिवट की, चार तुकडे खाणे कठीण झाले. आश्चर्य म्हणजे तेवढ्या तुकड्यानेही आमचे पोट तुडुंब भरले. त्या अन्नास 'लक्ष्मणकंद' असे म्हणतात.

त्या लक्ष्मणकंदामुळे पोट तर भरलेच, पण डोळ्यावर झोपही येऊ लागली. त्या उबदार धुनीजवळ नुसत्या चटईवर आम्ही पडलो. साधुमहाराज मात्र जप करताना दिसले. आमचा डोळा लागला. बरीच रात्र गेली असेल. त्या कुटीत कुत्र्याला पण घेतले होते. तो मात्र आमच्या पायाला तोंडाने ढुशा देत होता. त्यामुळे आमची झोप उडाली. कुटीच्या दारावरही कुणीतरी धक्के देत होते व तिकडूनच येणारे 'हुं हूं' असेही शब्द आमच्या कानी पडत होते. कुत्र्याने साधुमहाराजांना पण उठवले. उठताच त्यांनी लाकडाचे कोलीत पुढे करून दार थोडेसे उघडले तेव्हा 'आँव आँव' असा आवाज आला. हा साधू बाहेर-च्याला 'जाव रे' म्हणून ओरडत होता व तिकडून 'आँव आँव' करीत भिंतीवर धक्के बसत होते. बाहेरून धक्के देणारा वाघ होता. त्याला आतल्या कुत्र्याचा वास येत होता व त्याकरिताच त्याची आत येण्याची धडपड चालली होती. कोलीत जोराने फिरवीत त्या साधूने वाघाला पिटाळून लावले.

आत आल्यावर साधू म्हणाले की वाघावर काहीतरी संकट येणार आहे. त्याला त्याची चाहूल लागली होती व जंगलात न फिरता कुटीजवळ रेंगाळत होता.

पहाटे चारलाच आम्ही साधूबरोबर उठलो. आन्हिके आटोपून शेकोटीजवळ बसलो. तिकडे एका कोपऱ्यात त्या साधूने ध्यान लावले होते. दिवस उजाडताच त्यांनी पुन्हा आम्हाला 'लक्ष्मणकंद' दिला व 'हूडपणा करू नका' अशी ताकीद दिली. पण आम्ही 'वाघाचे दर्शन आम्हाला घडविल्यास फार आभार व उपकार होतील' असे सांगताच 'गुरुजींना विचारून रात्री कळवीन' असे म्हणून त्यांनी आम्हाला आशीर्वाद दिला. नंतर आम्ही बाहेर पडलो. रात्रीचा अनुभव पुनःपुन्हा आठवत धर्मशाळेवर पोहोचलो शेणी विकत घेऊन शेगडी पेटवून त्याच्या मंद आचेवर कणकीच्या जाड भाकऱ्या करून भाजल्या. वांग्याचे भरीत, मुळा आणि दह्याबरोबर दुपारचे भोजन आटोपले

आमची वामकुक्षी संपली तेव्हा दुपारचे चार वाजले होते. नर्मदेच्या प्रवाहा-पलीकडील दाट जंगलात पायवाटेने प्रवेश केला. भव्य वृक्षराजी, त्यावरील विहंगांचे गीत, मधूनमधून येणारे सुगंध, यांचा आस्वाद घेत बरेच आत शिरलो. एकाएकी 'अनु-दिनी अनुतापे तापलो रामरामा' हे शुद्ध मराठी शब्द कानी पडले. लांबून येणाऱ्या या शब्दांचा वेध घेत एका लिंबोळीच्या वनात पोचलो. कडुलिंबाच्या झाडाखाली नुसती चटई व पाचोळा यांची बैठक करून एक अपूर्ण वस्त्र परिधान केलेले गृहस्थ दिसले. नम-स्कार चमत्कार संपल्यावर कळले की यांचे नाव श्री. परचुरे असून ते महारोगाने पीडित होते. औषधोपचार म्हणून लिंबाच्या झाडाखाली राहावे, त्याचा पाला भक्षण करावा असे

काही पथ्य पाळून जीवन कंठीत होते.

श्री. परचुरे ईश्वर-आराधनेत मग्न होते. ते मुंबईकडील राहणारे असून इथे त्यांना एक गृहस्थ दूध व अन्न आणून देत होता. त्या स्थळी त्यांना कैक वेळा वाघ दिसले, पण त्यांनी कधी अपाय केला नाही, पण गेल्या चार-पाच दिवसांपासून वाघ तिथे येत असल्या-मुळे घबराट पसरलेली होती. परचुरे यांचे आणि आमचे बरेच बोलणे झाले. त्यांनी आम्हाला तेथल्या कैक वनस्पतींची नावे सांगितली व शेवटी त्या निबिड अरण्यातून घरा-कडच्या पायवाटेवर आणून सोडले.

धर्मशाळेतील एक हलवाई पुरी-भाजी चांगली करीत असे. म्हणून रात्री तेच खाऊन झोपेकरिता चटईवर पडलो. डोळा जेमतेम लागला होता, तेवढ्यात कालचेच साधू दाराशी आले व त्यांनी, 'कोई घर पर हो ?' असे विचारले. त्याबरोबर मी खडबडून उठलो. त्यांना नमस्कार केला. तेव्हा ते म्हणाले, 'गुरुजी का हुकूम है की तुम्हे सोन उगमपर लाया जाय, शायद व्याघ्रेश्वरी की कृपासे उनके वाहन का दर्शन हो जाय.'

एकंदरीत वाघ दिसणार असे समजले. ते साधुमहाराज जाता जाता बजावून गेले, 'सुबह चार बजे चलेंगे, तय्यार रहना।'

सकाळी गाढ झोपेतच होतो. पण साधुजींची खणखणीत हाक आली आणि खड-बडून उठलो. जेमनेम कॅन्व्हासचे बूट घातले व धोतर नेसून शर्ट घालून एकटाच निघालो. प्रथम जरा भीती वाटली. कारण अद्याप अंधारच होता व त्यांच्याबरोबर मी एकटाच चाललो होतो. 'कोई स्तोत्र कहते चलो' असे ते म्हणाले व मी रामरक्षा सुरू केली. जरा हिंमत आली. जंगलात शिरताच चक्रवाक पक्ष्यांच्या जोडप्यांचे आवाज आले. साधूच्या हाती जळते कोळीत होतेच व पायात खडावा. मी त्यांचे उपरणे धरून मागून चाललो होतो. दोन कोल्हे आडवे गेले. एक अस्वल पळाले. सळसळणारी धामण झाडावर चढली. रानकिडे, काजवे, अद्याप दिसतच होते. माकड, मोर यांचे आवाज येतच होते. असे तब्बल तासभर जंगलातून प्रवास केल्यावर समोर अस्पष्ट उजेड दिसला. जवळच उजवीकडे डोंगर कडा खाली पडताना दिसत होता. त्या कड्याच्या अलीकडेच एक शाकारलेली झोपडी होती. आम्ही ओढा ओलांडून त्या झोपडीच्या दाराशी आलो. एका वृद्ध साधूने झोपडीचे दार उघडले. सोबत असलेल्या साधूने साष्टांग प्रणिपात केला. मग मी पण साष्टांग नमस्कार केला. मला उठवून ते म्हणाले, 'चलो, जल्दी स्नान करो और कुटि में आवो' त्या शीतल समयी थंडगार ओढ्यात मी डुबी मारली अन् माझा थरकापच झाला. तसाच ओल्या अंगाने आत आलो. त्या वृद्ध महापुरुषाने माझ्या अंगास धुनीतील राख फासली व नुसत्या लंगोटीनेच त्या धुनीजवळ असे बसविले की, दाराजवळील खिडकी अगदी डोळ्यां-समोर यावी. 'बिलकूल चूप रहो, मनमें गायत्री जप करो और जो दिखाई पडेगा वो देखते रहो' माझ्या मागे त्यांनी आसन मांडले व माझ्या खांद्यावर डावा हात टाकला.

खिडकीतून आता सकाळचा मंद प्रकाश दिसत होता. बाहेर चिमण्यापाखरांचे

आवाज सुरू होते. एवढ्यात माकडाचे 'हुपहूप' ऐकू येऊ लागले. मोर पण जोरजोराने ओरडू लागले. कुटीला लागूनच तो ओढा होता. पलीकडे एक पायवाट व पुढे वनराजी होती. टक लावून पाहत असताना समोरील वृक्षाची खालची फांदी जरा हलू लागली. त्या फांदीपलीकडे दोन लुकलुकणारे ठिपके दिसले. ते जवळ येऊ लागले, तसे वाघाचे तोंड व त्याची निरखून फिरणारी मान आता दिसू लागली. हळूहळू तो राजबिंडा प्राणी इकडे तिकडे बघत समोर येत होता. पायवाट ओलांडून त्याने जमिनीचा वास घेतला. मान उंचावून येणाऱ्या वासाचा त्याने शोध घेतला. आता तो अगदी ओढ्यात शिरणार असे वाटले तोच टिटवी, मोर, माकड यांचे जोराचे ओरडणे ऐकू येऊ लागले. वाघाने दोन्हीकडे मान फिरविली. पाण्यात आधी एक पाय टाकला व नंतर दुसरा पाय टाकला. खाली मान करून जिभेने 'लप् लप्' जलप्राशन केले, पुन्हा मान उंचावून निरीक्षण केले पाय वर काढले. जिभेने मिश्या व पाय चाटले व समोर येऊन उभा राहिला. शेपटी हलविली व डोके खाली करून एका दमात ओढ्यावरून उडी घेतली. त्याची झेप अगदी आमच्या कुटीसमोरच आली. माझ्या खांद्यावरील हाताने शांततेचा आदेश दिला. वाघ आता त्या कुटीच्या कडेवर आपले अंग घाशीत होता. ऊँ-ऊँ. आँव-आँव हा ध्वनी चालू होता. मी तर गांगरलोच. किती वेळ गेला याचे मला भानच राहिले नाही. तो आवाज, ते कुटीचे हादरणे एकदाचे थांबले व लांब झेप घेताना वाघ उजेडात दिसला वृद्ध साधूने, 'उठो बेटा' म्हटले तेव्हा मी भानावर आलो. त्यांना नमस्कार केला. 'परमात्मा का नामस्मरण हरदम करते रहना, सब विपदा दूर होगी' असा आशीर्वाद दिला. तोपर्यंत कालचे साधू उठले व त्यांच्याबरोबर त्या अद्भुत अनुभवाची मनात उजळणी करीत धर्मशाळेत पोचलो.

तिसऱ्या दिवशी आन्हिक आदी उरकण्यास वनात गेलो असताना फार लांबून खूप वाद्यांचा ओरडा, विशेषत: डफाचा गजर व मधूनमधून बंदुकीचे बार ऐकू आले. धर्मशाळेचा चौकीदार सांगू लागला, 'फार लांब जाऊ नका, कारण 'हाका' होत आहेत व रीवा नरेश शिकार करणार आहेत.'

आम्ही तरी लांब कुठे जाणार ? नर्मदेच्या उगमाजवळील मंदिरात जाऊन बसलो. अदमासे सकाळी नवाच्या सुमारास दोनतीन मोठे जोराचे बंदुकीचे आवाज आले. त्यानंतर आनंदोत्सवाचे मानवी शब्द कानावर आले. पुन्हा साडेनऊला तसेच झाले. असे आम्ही एकूण चार वेळा ऐकले. सुमारे बाराला सगळा गोंधळ संपल्यावर अर्धा मैल आत गेलो. इथे सुंदर तंबू व राहुटचा ठोकल्या होत्या. रीवा राजाचे शिपाई गस्त घालत होते. त्यांनी राजांची प्रशंसा करून आम्हाला सांगितले की, सकाळी एकंदरीत सहा वाघांची शिकार रीवा नरेश व जोधपूरचे राजेसाहेब यांनी केली. हाक्याचा वाघ समोर दिसला की झाडावरील मचाणात बसलेले राजेसाहेब तो टिपीत. तो वाघ एका गोळीत पडला नाही तर बाजूला बसलेले शिकारी गोळ्या झाडीत. वाघ पडला की त्यावर पाय ठेवून फोटो काढून

घेत. सोबतीला असलेला राजपुरोहित या वेळी त्यांना ओवाळून गंध, अक्षदा, सुपारी लावी व नारळ फोडीत असे. हे असे संपले की, साहेबांकरिता कलकत्त्याहून आणलेले फरपो कंपनीचे केक्स व शीतपेये समोर येत. त्यांची क्षुधा तृप्त झाली की राजे तंबूत जात. त्या तंबू व राहुटयांभोवती मी चक्कर मारली. कावळे व गिधाडे लांब घिरटया घालत होती. त्या स्थळी सहा मोठे वाघ नि:स्तब्ध पडलेले पाहिले. कालचा किंवा परवाचा वाघ त्यात कुठे दिसतोय का म्हणून मी पाहू लागलो. आदल्या दिवशीच्या सकाळचे त्या शूर वाघाचे दर्शन मला आठवले. काय मस्ती, काय ऐट होती त्याच्यात नि आता भोवती माशा भिणभिणत होत्या. चांभार खाली कातडे सोलीत होते व वर गिधाडे ओरडत होती.

लांबच्या तंबूतून ग्रामोफोनवरचे संगीत, आनंदाचे हास्य हे सर्व ऐकू येत होते. बेअरर मदिरापात्रे, उंची खाद्यपदार्थ घेऊन आत चालले होते. कॅम्पच्या दुसऱ्या टोकाला चारशे लोक हातात टाळ, ढोल, देशी बंदुकी घेऊन रांगेने उभे होते. त्यांना तांदूळ, डाळ व मीठ यांचा शिधा व मजुरी कर्मचारी वाटत होते व तेही निमूटपणे घेत होते. सकाळपासून काटयाकुटयातून जोखीम पत्करत ओरडणारे हाकेवाले चांगली शिकार झाली म्हणून आनंद व्यक्त करीत होते.

ते दृश्य पाहून मला गहिवरून आले. वाघाला त्याचे मरण आधीच कळले होते काय ? हा प्रश्न आजही मला त्रस्त करीत आहे. ही घटना १९२८–२९ ची आहे.

दिवस लोटले. माझे शिक्षणही संपले. पण मी एन. सी. सी. मध्ये असल्यामुळे मला रायफलचा परवाना लवकर मिळाला. सन १९३७ साली माझी भंडारा जिल्हयातील अर्जुनी या गावी संशोधन कार्याकरिता नेमणूक झाली. गावाबाहेर माझा कँप होता. पावसाळयाचे दिवस होते. रोज रात्री वाघाच्या आरोळया कानी पडत असत. एकदा तर संध्याकाळच्या वेळी तरसच माझ्या मागे लागला. माझ्याजवळची रायफल व खेडयातील खुशामतखोरांची खुशामत ऐकून एके दिवशी रात्री चंद्रप्रकाशात मला शिकार करण्याची इच्छा निर्माण झाली. मध्यरात्रीपासून उजाडेपर्यंत त्या जंगलात पायीच फिरलो. पण डुक्कर, हरीण या शिवाय इतर काही दिसले नाही. साधारण एक महिन्यानंतर जवळच्याच बोंडगाव या गावापर्यंत फिरून आलो. पण काही यश आले नाही. बोंडगावच्या देवीचा भगत मला आरतीला देवळात घेऊन गेला. देवी त्याच्या अंगात आली होती की काय कोण जाणे ! कारण, 'तुले वाघ नाही–त्याले वाचीव–लांब लाब जाणार–साता समंदरा पुढं–येसील तवा खन–नारल ओटी– तुले पुना दिसेल–पण तुझा मन त्याले वाचेल' असे तो भगत अस्पष्ट बरळत होता व मी ते टिपून घेत होतो.

त्या वर्षीच मी इंग्लंडला गेलो होतो. परत आल्यावर २५ वर्षांनी महाराष्ट्र शासनाच्या 'बोर्ड ऑफ वाईल्ड लाइफ' या कमिटीचा मेंबर म्हणून एका तज्ज्ञ समितीबरोबर मला या प्रांतातील सर्व जंगले तपासण्याची संधी मिळाली.

प्रथम अर्जुनी बोंडगाव या विभागात मी दौरा केला. जंगल संपून पक्के रस्ते झाले होते. बोंडगावच्या देवळात पुन्हा एकदा मी गेलो. जुना भगत केव्हाच स्वर्गवासी झाला होता. म्हणून नवीन भगताला जुनी आठवण सांगितली व बरोबर आणलेली खणा-नारळाची ओटी त्याच्या ताब्यात दिली, तेव्हा ' जुना जमाना गेला, आता देवी दौऱ्यावर गेली ' असे तो पुटपुटला.

अर्जुनीहून नवेगावला गेलो. तेथील मालगुजाराने सांगितले की, आता वाघ संपले. शेवटचा वाघ त्यानेच मारला होता. कारण मोटार सायकलवरून जाताना वाघाने म्हणे त्याच्यावर झेप घेतली होती. वाघ गेले, हरिणे वाढली व त्यांनी शेतीचे नुकसान सुरू केले. नवेगावचे जंगल तुटले. तळ्याजवळचे जुने वृक्ष गेले. तेथे आता गुलमोहर, केशुरिना पेल्टोफोरम, निलगिरी ही झाडे जंगलखात्याने गेस्ट हाऊसजवळ लावली आहेत. एक तारेचे कुंपण करून काही हरिणे तेथे शोभेकरिता ठेवली आहेत, पण गुलमोहोर खाऊन हरिणांचे पोट भरणार नाही. आता त्यांची पण संख्या कमी होऊ लागली आहे.

याच दौऱ्यात मेळघाटला गेलो. वाघाचे अभयारण्य म्हणून या वनाला आम्ही ओळखतो. इथे वाघाच्या शिकारी बंद केल्या आहेत. वाघ हा प्राणी एकलकोंडा आहे. नर व मादी माजावर येतात तेव्हाच एकत्र येतात व मीलनानंतर ते एकाकीच फिरतात. एका दिवसात वाघ भक्ष्याकरिता ३५ ते ४० मैल फिरू शकतो. शिकार झाली की भक्ष्य ओढून कधी पाठीवर घेऊन फिरून ते लपवून ठेवतो, तर कधी शिकार होताच रक्त पितो व लपविण्यापूर्वी थोडे ताजे मांस खातो. वाघ चोवीस तासात पस्तीस किलोपर्यंत मांस खातो. हरिणे, माकडे, गुरे, शेळ्या, कुत्री, कधी कधी रेडे, ससेसुद्धा खातो. भोजनानंतर आराम करतो व पुन्हा दुसरे दिवशी सायंकाळी शिकारीकरिता तो प्रयाण करतो. डोंगर-कपारीत वाघ आराम करतो. त्याला शांतता हवी असते. मीलनानंतर तीन-चार महि-त्यांनी वाघिणीला तीन-चार पिल्ले होतात. ती पिल्ले आपल्या आईबरोबरच पहिले सहा महिने तर कधी वर्षभर फिरतात व नंतर एकएकटी फिरू लागतात. वाघ माणसाला सहसा मारत नाही. वृद्धापकाल, जबर जखमी झालेलाच वाघ नाइलाजास्तव मानवाची शिकार करतो.

मेळघाटच्या जंगलात आता अवघे ३४ वाघ उरले आहेत. रहदारी, जंगलतोड आणि शिकार या गोष्टी इथे थांबल्या आहेत.

सप्टेंबर १९७६ मध्ये या जंगलाचे निरीक्षण करण्यास गेलो. कोळखातच येथे कँप ठेवला होता. रात्री एक वाघीण आपल्या पिल्लांसह रस्त्यावर बसलेली आहे अशी खबर आली. सकाळी त्या सडकेवर आलो, तेव्हा वाघिणीच्या पंजाच्या खुणा बाजूच्या चिखलात दिसत होत्या. त्या अनुरोधाने मी दोन फर्लांग गेलो. पुढे दलदल होती म्हणून मी परतणार

तोच बाजूच्या झुडपातून काहीतरी आवाज आला. म्हणून तिकडे वळलो, तो वाघीण पिल्लांसहित उड्या मारत पळून गेली. आम्ही तिला पाहण्यासाठी चाललो होतो. पण तीच आमचा मागोवा घेत बाजूच्या झुडपातून लपून लपून चालली होती. आम्ही तिच्या शिकारीला निघालो होतो, पण आमचीच शिकार होणार काय असे वाटले.

*( या घटनांचा काळ १९२८–१९७५, ७६ )*

# ७ : यात्रा : सर्प - आराधनेची

दिल्लीला अदमासे ५ वर्षांपूर्वी ' एशियाड ' नावाचा क्रीडामहोत्सव साजरा झाला. उद्घाटनाच्या दिवशी प्रख्यात तीर्थस्थान गुरुवायुर येथील हत्ती चांगले सजवून क्रीडास्थानी उभे केले होते. हे हत्ती केरळहून विशेष आगगाडीने आणले होते. तरी पण त्या प्राण्यांची आबाळ झाली व एक हत्ती दगावला. कोणतेही पाळीव किंवा वन्य प्राणी वाहून नेण्याकरिता व त्यांचे संगोपन करण्याला दिल्ली येथील मानकसंस्था कडक नियम करीत आहे. त्या नियमांप्रमाणेच प्राण्यांची वाहतूक करावी अशी बंधने प्रकाशित झाली आहेत. ही बंधने करण्याला मानकसंस्थेने एक उपसमिती २० वर्षांपूर्वी नेमली होती व ती समिती भारतातील विविध शहरांत सभा बैठकी घेऊन ह्या नियमांची कोटकोर दृष्टिकोनातून अंमलबजावणी करीत आली आहे. हत्ती दगावल्यामुळे त्याबद्दल पण नियम करावे याकरिता १९८३ साली या उपसमितीची बैठक त्रिवेंद्रम शहरी घेण्यात आली. या उपसमितीच्या अध्यक्षपदाची धुरा माझ्यावर आली व त्याकरिता मला केरळला जावे लागले.

उपसमितीच्या कार्याला हातभार लागावा, म्हणून केरळ विश्वविद्यालयातील प्राणिशास्त्राचे एक प्रोफेसर डॉ. प्रसाद व त्रिवेंद्रम प्राणिसंग्रहालयाचे संचालक श्री. चंद्रम यांना पाचारण केले होते. घोडे, बैल, शेळ्या, मेंढ्या, डुकरे कोंबड्या, ससे, उंदीर, साप, बेडूक आदी बऱ्याच प्राण्यांच्या वाहतुकी व संगोपनाच्या नियम-पुस्तिका प्रकाशित झाल्या आहेत. त्यावर प्रथम विचार झाला व हत्ती आदी हिंस्र प्राणी यांच्या वाहतुकीचे नियम करण्याकरिता एक समिती नेमली गेली. सर्व कार्य आटोपल्यावर डॉ. प्रसाद मला आपल्या वडिलोपार्जित गावाच्या घरी "मावेलीकुरा" इथे घेऊन गेले. डॉ. प्रसाद हे माझे विद्यार्थी होते. यांनी मुंबईच्या ' हाफकीन इन्स्टिटयूट ' मधून डॉक्टरेटचे काम केले होते. आपल्या आजोबांची राहती खोली, त्यांनी जिथे चित्रकारी केली, तो लहानसा स्टुडियो व नुकतेच केरळच्या गव्हर्नरने उद्घाटन केलेले त्यांच्या चित्रांचे प्रदर्शन दाखविले. घराजवळील बागेतील, जायफळ, लवंग, मिरे, वेलदोडे यांची वृक्षराजी दाखवत ते गावातील मंदिराकडे घेऊन गेले. राजा रविवर्म्याची ही सर्व जागीर होती. मावेलीकुरा हे गाव कोट्टायम-त्रिवे

न्द्रम या रेल्वेमार्गावर आहे, व हे स्थान केरळच्या अलेप्पी जिल्ह्यातील हरिपद तालुक्यात मोडते. या गावापासून दहा मैल दूर उंच वृक्षराजीने आच्छादिलेले एक सर्प मंदिर १०० ते २०० वर्षांपासून प्रख्यात आहे. हे मंदिर मन्नारशाला या गावाच्या बाहेर झाडीझुडपाने वेष्टीत असून दुपार व सायंकाळच्या आरतीला बऱ्याच भाविकांना गोळा करते. इथे एक अशी आख्यायिका आहे की, या देवालयात नियमित पूजा केल्यास 'सोरायसिस' नावाचा रोग बरा होतो. या रोगात त्या माणसाच्या कातडीवर खवले पडतात व सारखी खाज येऊन रोगी विद्रूप होतो. मंदिराच्या मागील दारावर व्हायोलीन घेऊन एक वृद्ध महिला बसली होती. ती नाव विचारून व्हायोलीनवर देवाची प्रार्थना वाजविते. देवळाच्या परिसरात सगळीकडे पाषाणाच्या कैक मनुष्याकृती मूर्ती आढळतात. या मूर्तींवर नागसर्पाच्या पाच किंवा सात फणा असून काही जागी यांच्या पायाचा भाग सर्पाच्या शेपटाप्रमाणे कोरला आहे. या सर्व मूर्तींचे दर्शन घेत त्या कौलारू देवळाजवळ आलो. या देवळाची मुख्य अधिष्टात्री एक 'अम्मा' असते. असे सांगतात की नंबुद्री ब्राह्मणाची ही १४ वर्षांची मुलगी लग्न झाली की विशेष पद्धतीने तिला निवडतात व ती आपल्या नवऱ्याला सोडून या देवालयातील तळघरात राहण्यास येते. असं सांगतात की, तळघरात बरेच सर्प आहेत व त्यांच्या सान्निध्यात ही राहते. देवाची आरती हिच्या हातूनच होत असते. देवाची प्रतिमा मानवमुखावर मुकुटधारी असून डोक्यावर पाच नागसर्पांच्या फणा आहेत. खालील शरीर सगळे वस्त्राने झाकलेले होते. आरती सुरू झाली की, कैक सर्पदंशित लोक व सोरायसिस रोगाने त्रस्त झालेले रोगी इथे येतात व आख्यायिका आहे की ते बरे होतात. त्या 'अम्मा' ची भेट घेण्याचा प्रयत्न केला, पण ती दर्शन देईना. तरी ती आरतीनंतर भुयारात उतरत असताना एका लहानशा खिडकीजवळून जाताना आत हात करून तिचा फोटो काढला.

या मंदिराच्या चालकांनी तेथील इतिहास सांगितला. 'विश्वामित्राने' समुद्रातून हा मन्नारशाला गाव व इतर जमिनीला बाहेर काढले. काही दिवसांनी झुडपे वाढली. उंदरांचा सुळसुळाट झाला. देवाची प्रार्थना केली, तेव्हा देवांनी सर्पांची आराधना करण्यास सांगितले. सर्प आले व त्यांनी उंदरांचा नायनाट केला व अन्नधान्याची नासाडी थांबविली. तेव्हापासून हे मंदिर स्थापन झाले व सर्पपूजा सुरू झाली.

मावेलीकुरा गावात कैक नायर गृहस्थांच्या घराच्या परिसरात एक दगडी चबुतरा दिसतो. या चबुतऱ्यावर घरमालकीण रोज अन्नाचा प्रसाद ठेवते. यामुळे घरात "लक्ष्मी नांदते –" याचा अर्थ एकच की, अन्न खाण्याला उंदीर येतात व उंदराकरता साप येतात. उंदरांचा असा नाश झाला की घरातील अन्नधान्याची नासाडी थांबते. म्हणून सर्पाच्या आराधनेने घरातील 'लक्ष्मी नांदली.' असे म्हणतात.

मन्नार शाळेतील 'सोरायसीस' ने पछाडलेल्या रोग्यांची श्रद्धा आहे की अंगावर येणारे खवले सर्पाच्या खवल्यासारखेच आहेत व ते त्यांच्याच शापामुळे झाले असावेत

यामुळे सर्पाची आराधना केल्यास ते बरे होतील. आम्ही रोगी तपासले व ते खरोखर 'सोरायसिस' ने आजारी होते.

११ मे १९८७ रोजी मुंबईच्या टाइम्स ऑफ इंडिया दैनिकात एक खबर होती, की महाराष्ट्रातील लातूर जिल्ह्यात एका ट्रक ड्रायव्हरने आपल्या ट्रकखाली अजगर सर्प चेंगरला. त्या ड्रायव्हरच्या घरात जी मुले जन्माला आली ती सगळी अजगर सर्पाच्या अंगावर असलेल्या खवले, चट्टेपट्टे व त्या रंगाची होती. हा ड्रायव्हर नंतर देवाचा प्रसाद घेण्यास निघाला. पण टाइम्स ऑफ इंडियाच्या पान २३ वर पुढे नमूद केले आहे, (११.५.८७) की डॉ. जे. सी. बर्नेट यांनी १८९५ साली "Cure for snake skin" या मथळयाखाली (Diseaseb of India) या पुस्तकात लिहिले आहे की या अजगर कातडीमुळे डोळयावरसुद्धा खवले पडून रोगी आंधळा होतो. या रोगाकरिता त्याने केल्केरिया-फ्लूरिक सोरिकम नेट्रम, थुजा, ग्रेफायटिस दिले व रोग्याला दृष्टी आली आणि खवले कमी होऊ लागले. पुढे पल्साटिला, ब्रायोनिया, बोराकस, केल्केरिया आदी देऊन शरीरावरील अजगर कातडीप्रमाणे आलेले खवले बरे केले. या डॉक्टरच्या निदानावरून दिसेल की सोरायसिस औषधाने बरा होतो. पण रोग्यांना यथोचित निदान करणारे डॉक्टर भेटत नाहीत.

प्लेग रोगाची तपासणी करण्याला गेलो असताना कोलार जिल्ह्यातील बहुतेक पिंपळाच्या पारावर मानव देह व पाच किंवा सात फणा असलेल्या मूर्ती दिसल्या. कैक स्त्रिया या पारावर प्रदक्षिणा घालीत होत्या. यापैकी कुणाला मूल हवे होते, तर कुणाला भूतबाधा झाली होती. एक मोठा पिंपळाचा वृक्ष २४ तासात १२०० लीटर प्राणवायू सोडतो. घरातील तरुण स्त्रिया नवीन वस्त्र परिधान करून गावात व्यायाम म्हणून फिरू लागल्या तर लोक शिटया मारतील, पण त्याच स्त्रिया नटुन सजून या मोठ्या वृक्षाच्या पाराभोवती एक हजार प्रदक्षिणा घालू लागल्या तर तिकडे कुणाचे फारसे लक्ष जाणार नाही. एक हजार प्रदक्षिणा म्हणजे चांगलाच व्यायाम होतो. शरीरप्रकृती चांगली झाली की, गर्भधारणा यथोचित होईल व मूल झाले की नागप्रतिमेला प्रसाद जाईल, हा असा या प्रतिमापूजेचा अर्थ आहे. शिवाय आर्य भारतात येण्यापूर्वी या भारतात जे नागराजे होते ते उत्तम वैद्य, नैय्यायिक व स्थापत्याशास्त्रज्ञ होते. त्यांनी सूर्यपूजा सुरू केली व सूर्याचे प्रतीक म्हणून नागसर्प ठरविला. त्या नागराजाची पूजा प्रतिकाची पूजा म्हणून करतात. नागार्जुन रासायनिक, पांडवाचा महाल तयार करणारा 'मय' स्थापती किंवा 'मेरू' बोटीला चालविणारा 'शेष' नावाचा कप्तान ही त्या नागराजाची काही नावे आहेत.

सांचीच्या पश्चिमेकडील स्तूपाच्या खाली एका लहान टेकाडावर काही चित्रे अर्धवट कोरलेली दिसतात. या चित्रात एक सूर्याचे चित्र दाखवले असून त्या वर्तुळात पाच फणांचा नाग दाखविला आहे. या नागाच्या दोन्हीकडे दोन नागकन्या हातात हार घेऊन

उभ्या कोरलेल्या दिसतात. नागसर्प हा सूर्याचे प्रतीक दाखविण्याचा या शिल्पात प्रयत्न केला आहे. तसेच वरील एका स्तंभावरील शिल्पात नागराजा बोधी वृक्षाखाली म्हणजे भगवान बुद्धाच्या प्रतिकाखाली मांडी घालून बसलेला दिसतो. या राजाच्या डोक्यावर पाच फणांच्या नागाचे चित्र कोरले आहे. या नागराजाच्या दोन्ही बाजूला दोन राण्या बसल्या आहेत, पण त्यांच्या मुकुटावर एकाच फणाचा नाग दिसतो. ह्यू–एन–त्संग हा यात्री चीनहून भारतात आला होता. त्याने आपल्या रोजनिशीत लिहून ठेवले आहे की, रात्री निजताना हे नागराजे व नागराण्या आपल्या शिरावरील मुकुट काढीत असत व त्या मुकुटावर हे पंच फणांचे नागमुख किंवा एक फणाचे नागमुख काढताना त्यांना दिसले. एका पाश्चात्य तत्त्वज्ञाच्या मते हे नागसर्पाचे पाच फणे म्हणजे मानवी हाताची पाच बोटे होत व आपण जसे आशीर्वाद देताना पाचही बोटे उघडी करून डोक्यावर ठेवतो; त्याप्रमाणे आहेत. याचा अर्थ पुरातन काली जे नागराजे होऊन गेले ते सूर्योपासक होते व त्यांनी नागसर्पाची प्रतिमा सूर्याचे प्रतीक म्हणून मानली. याप्रमाणे त्या प्रतिकाचा आशीर्वाद या दृष्टिकोनातून पंचमुखी नागफणा हे नागराजे आपल्या पागोट्यावर किंवा डोक्यावर ठेवीत होते. भारतातील कैक देव देवतांच्या मुकुटावर असे पंचफणात्मक नाग संरक्षण रूपाने ठेवलेले आढळतील. कर्नाटकातली पूजा किंवा इतर सर्पपूजा त्या दृष्टिकोनातूनच पाहावी. पण एक लक्षात ठेवावे की, या सगळ्या पूजेत नागसर्पच दिसतो. इतर सर्पांची आपल्या देशात पूजा होत नाही. मांत्रिकसुद्धा नागसर्प दंश झाल्यावर मंत्र टाकतात व त्याचा उपयोग होतो असे म्हणतात. फुरसे किंवा घोणस यांच्या दंशावर मंत्र जमत नाही असे श्री ज्ञानेश्वरीत पण म्हटले आहे. नागसर्प हा सूर्याचे प्रतीक आहे असे भारतात मानतात. पण इतर देशात नागसर्प सापडत नाहीत व तिथेसुद्धा सूर्योपासना करताना एका सर्पाची आकृती पाषाणावर कोरलेली ठेवतात. दक्षिण अमेरिकेतील माया संस्कृतीत सूर्यदेवळात आत खिडकीतून सूर्याचा प्रकाश येतो तो प्रथम अशा पाषाण मूर्तीवर पडतो असे दिसते व या पाषाणावर हात ठेवून लोक शपथ घेत होते. स्वीडन देशातील उपासाला शहरी एक फार पुरातन गिरीजाघर आहे. यांच्यासमोर काही थडगी दिसतात. एका थडग्यावर एक शिला रोवली आहे, जिच्यावर नागसर्पाकृती दिसते व तिथे काही अक्षरे कोरलेली आहेत. ज्यात आपल्या देवनागरी लिपीतील ' प्र ' शब्द ठळकपणे दिसतो. पुरातन काली या देशातील लोक सूर्योपासक होते. जुन्या बायबलच्या सुरुवातीला सृष्टीमधील मानवनिर्मिती सांगताना ' आदम आणि ईव्ह ' जोडप्यांना एका बागेत सर्प आलेला दिसला आणि त्याने ॲपल या नावाच्या फळाला स्पर्श केला. हा स्पर्श होताच त्या आदम-ईव्हने ते फळ खाल्ले व त्यांना आपल्या नग्नावस्थेची जाणीव झाली. इथूनच संसार सुरू झाला. डॉ. रीव्ह यांच्या मते ही घटना बायबलमध्ये याकरिता आणली की जुन्या काळी सर्पपूजा होती तिला स्थान द्यावे, यामुळे त्या आराधकांना पुढील बायबल बरोबर समजेल; असा समज असावा.

या विधानावरून असे दिसेल की सर्पपूजा ही फार पुरातन कालापासून मानव जातीत उपलब्ध होती. मानवाला जेव्हा बुद्धी प्राप्त झाली. त्या काळी त्याने रोज सूर्योदय होताना पाहिला व सायंकाळी त्याचा अस्त झाला, तरी दुसऱ्या दिवशी तो पुन्हा दिसला. तो अजरामर आहे अशी त्यांची जाणीव झाली. या पृथ्वीवरील कासव आदी सरपटणारे प्राणी असेच पुष्कळ दिवस जगतात. कासव तर पाचशे वर्षे जगताना वैज्ञानिकदृष्टचा नमूद करण्यात आले आहे. सूर्याची अजरामर स्थिती या सरपटणाऱ्या प्राण्यांशी त्यांना दिसली व त्यांनी सूर्याचे प्रतीक म्हणून याची गणना केली. हीच पार्श्वभूमी सर्प आराधनेमागे आहे.

महाराष्ट्रात नागपंचमी आणि अनंत चतुर्दशीला सर्पपूजा होत असते. या पूजेतील सर्वांत भव्य सोहळा सांगली जिल्ह्यातील शिराळा या गावी दिसतो. या गावाला बत्तीस शिराळा पण म्हणतात. इथे अशी आख्यायिका आहे की, संत गोरखनाथ या गावी आले होते. त्यांच्या पंथाचा मठ अद्याप त्या गावाबाहेर दिसतो. तसेच गोरखचिंचेची बरीच झाडे या गावी दिसतात. कैक लोकांनी या झाडांच्या बुंध्यावर लहान प्रकाशज्योत पाहिली आहे. हा बुंधा पोकळ असतो व त्या पोकळीत पाण्याचे थेंब साचल्यावर काही काळाने विशिष्ट प्रकारचे किटाणू वाढतात व या किटाणूतून प्रकाश Phosphorescence निघत असतो व ही वैज्ञानिक घटना बऱ्याच जागी दिसते, पण अंधश्रद्धेमुळे इथे त्याला बरेच स्थान दिले गेले. दुसरी आख्यायिका अशी आहे की, या गावी जुन्या काळी मातीचे नाग-सर्प करीत होते व त्यांची पूजा नागपंचमीला होत असे. एकदा एक साधू या गावी आला व त्याने नागपंचमीला जिवंत नागाची पूजा करावी असा उपदेश दिला. त्याने अशी पूजा केल्यास त्या दिवशी (नागपंचमीच्या) नागदंश होणार नाही व गावात धान्याची समृद्धी होईल असा आशीर्वाद दिला. या उपदेशानंतर बऱ्याच कुटुंबांनी नागपंचमीच्या पूर्वी काही दिवस जिवंत नाग पकडण्याची कला साधली. आता हे नाग शेतातून पकडून मडक्यात ठेवतात व मडक्याच्या तोंडाला कापड गुंडाळतात. अशी मडकी झाडांना बांधलेली नागपंचमी-पूर्वी या गावात दिसतील. नागपंचमीच्या दिवशी या गावात मोठी यात्रा भरते. मडक्यातील नाग एका बैलगाडीत ठेवून गावाबाहेरील देवीच्या देवळात वाजतगाजत नेण्यात येतात. कैक गाड्यांच्या वरील खुंट्यावर घोरपडी शेंदूर फासून कधी कधी बांधतात. मंदिराचे दर्शन झाले की हे नाग ठेवलेले मडके घरोघरी नेतात व शेवटी मोठ्या मैदानात अशी मडकी आणतात. एक तज्ज्ञ मडक्यावरील कापड उघडतो व नाग बाहेर आला की, एका हाताने शेपूट धरतो व दुसऱ्या हातातील काठीने त्याचे मुंडके दाबून ठेवतो. समोर त्याचा दुसरा साथीदार एका मडक्यात खडे साचवून व त्या मडक्याला पांढरा रंग देऊन जोराने ते मडके हलवितो. ही क्रिया त्या नाग ठेवलेल्या मडक्यापासून ३–४ फुटावर होत असते. तो आवाज व हलणाऱ्या मडक्याकडे पाहून दंश करण्याकरता नाग फणा उघडतो. असे कैक नाग ओळीत त्या मैदानावर दिसतात. इतके नाग फणा काढलेले एकाच जागी व लोकांनी पूजा करत असताना भारतात दुसऱ्या गावी कुठेच दिसत नाही, म्हणून

या गावाची ख्याती अलीकडे बरीच गाजली आहे. हे दृश्य पाहण्याला दूरदूरच्या ठिकाणाहून लोक येतात व या यात्रेकरूत बरीच परदेशी मंडळी पण असतात. १९७०-७१ साली या शिराळच्याच्या घटनेबद्दल अमेरिकेतील नॅशनल जॉग्रीफिकल मॅगझीनमध्ये विस्तारित लेख पण आला होता. दुर्भाग्यवश या लेखात भारतीय संस्कृती व पूजा याबद्दल यथोचित उद्‌गार काढले नव्हते. आम्ही त्या संपादकाच्या नजरेस हा मजकूर आणला होता व त्याने काही सुधारणा केली होती. एकीकडे हे सर्प फणा काढतात व लोक फोटो घेतात. दुसरीकडे मोठी यात्रा भरलेली असते. तिथे दुकानात चिवडा, लाडू व इतर सामान विकतात- शिवाय फोटो काढणाऱ्यांची बरीच दुकाने पण मांडलेली असतात. या यात्रेत गावातील काही मुले निर्विषारी सर्प घेऊन यात्रेकरूंच्या गळ्यात घालतात व यात्रेकरू आपला फोटो काढवितात. मुलांना दक्षणा मिळते. सांगावयाचा मुख्य मुद्दा हा की, अंधश्रद्धेमुळे लोकांत असा गैरसमज पसरलेला असतो की नागपंचमीच्या दिवशी नागासारखे सर्पसुद्धा दंश करीत नाहीत. पण लोकांना माहीत नसते, की गळ्यात घातलेले सर्प निर्विषारी आहेत. आम्ही स्वत: त्या गावाच्या दवाखान्यात बसलो होतो व नागपंचमीच्या दिवशी नागसर्पाने दंशित झालेल्या व्यक्तींना निर्विषाचे इंजेक्शन देऊन बरे केले होते. गावातील जाणकार लोकांच्या मते हा सर्पदंश झाला की, अशा इंजेक्शनमुळेच मनुष्य वाचतो. पण अंधश्रद्धा गैरसमज निर्माण करते. सायंकाळी सर्व सर्प जिथून आणलेले असतात तिथेच सोडतात. या गावातील सर्प-प्रदर्शनाचे मुख्य कारण एकच की या गावात सर्प पकडणारे हरहुन्नरी लोक बरेच आहेत व नागसर्प व्यवस्थित हाताळला की सर्पदंशापासून मनुष्य वाचू शकतो हे आपणास दिसते.

इथून पुढे सोलापूर जिल्ह्यातील शेटफळ नावाचे एक गाव आहे. त्या गावात आम्ही प्रवास केला. तिथे आम्हाला दिसले की, त्या गावातील मुख्य वस्तीत राहणाऱ्यांपैकी ७५ टक्के लोकांच्या घरात जिवंत नागसर्प सळसळताना दिसतात. घरातील माळ्यावर हे सर्प राहतात व सायंकाळी घराबाहेर जाऊन उंदीर खाऊन परत माळ्यावर बसतात. हे सर्प घरातील बायकामुलांच्या अंगावरून गेले तरी दंश करीत नाहीत. यावरून असे दिसते की जोपर्यंत तुम्हीत त्याला छेडीत नाही तोपर्यंत नागसर्प दंश करीत नाहीत. या गावातील शतमाळाच्या भोवती असलेल्या उंदरांची संख्या आम्ही तपासली व त्यात आम्हाला दिसले की, त्याच प्रमाणात जमीन असलेल्या दुसऱ्या गावापेक्षा येथील उंदीरसंख्या ५० टक्के कमी आहे. गावातील नागसर्पामुळे घरातील व माळातील उंदीरसंख्या कमी झाली व त्यामुळे अन्नधान्याची नासाडी वाचली. W. H. O. च्या एका मासिकात नमूद केले आहे, की मुंबई शहरातील उंदरांची संख्या कमी केली की जेवढे धान्य वाचेल त्यामध्ये नऊ लक्ष लोकांचे बारा महिने पोट भरू शकेल. यावरून असे दिसेल की जिथे सर्पांची बहुसंख्या आहे तिथे उंदीरनाश होऊन लक्ष्मी नांदते. म्हणून महाराष्ट्रात नागपंचमी व अनंत चतुर्दशी हे सण नागसर्पाला धन्यवाद देण्याकरीता साजरे केले जातात. कारण त्याच्यामुळे उंदरांची

संख्या कमी होऊन अन्नधान्याची नासाडी वाचते व त्यामुळे घरात लक्ष्मी नांदते.

विदर्भातील अकोला शहराहून वाशिमकडे जाताना मार्गात एक नवीन देवालय उभारण्यात आले आहे. या देवालयातील गर्भगृहाच्या खाली तळघरात एक लहानशी पक्क्या चुनखडीने बांधलेली विहीर दिसते. या विहिरीचा तळ उथळ असून तिथे अवघे एक फूटभर पाणी असेल. त्या विहिरीच्या तळाला पक्की चुनखडी लावलेली दिसते व त्या चूनखडीवर एक चांदीची फणा काढलेली नागसर्पाची प्रतिमा ठेवलेली दिसेल. या सबंध परिसराला नगेनाथ महाराजांची समाधी म्हणतात. आख्यायिका अशी आहे की सर्पदंश झाल्यावर इथे आल्यास दंशित माणूस बरा होतो. इथून पुढे वाशिमच्या आणखी पुढे मेहकर आणि लोणारचा मार्ग लागतो. लोणारचे भव्य सरोवर फार पुरातन असून अंतराळातून पडलेल्या उल्कापातामुळे ते जन्माला आले असे दिसते. हे तळे आदमासे एक मैल लांब–रुंद असून ३००–४०० फूट खोल आहे. पाणी मात्र अगदी तळाला दिसते. या पाण्याचा खारटपणा इतका भयंकर आहे की यावर मनुष्य पडला तरी तो आपोआप तरंगू शकेल. जगातील उल्कापाताने झालेल्या २–३ च सरोवराबरोबर या लोणारचे महत्त्व सांगावे लागेल. तळ्यातील पाण्याच्या कडेला बरीच हिरवळ असून एका टोकाला एक देवीचे देऊळ दिसते. या देवळाजवळ आम्हाला एक अजगर सर्प दिसला. लोक सांगतात की, या गावात बरेच सर्प आहेत. मध्यवर्ती शासनाने या बहु–खारट पाण्यातून क्षार काढण्याची योजना आखण्यापूर्वी चाचणी सुरू केली आहे. इस्राईल आणि जॉर्डन या देशातील मृतसमुद्र (Dead sea) ज्याप्रमाणे उपयोगिला जात आहे तसेच इथे होऊ शकेल.

या गावी बहुतांश वस्ती मुसलमानांची आहे. आम्हाला दिसले की, इकडील बऱ्याच जुन्या इमारती भूमीखाली अदृश्य झाल्या. याचे उदाहरण आम्हाला एक विष्णूचे मंदिर दिसले. जे अगदी मातीत पुरले गेले होते व यामुळे जो टेकाड निर्माण झाला, त्याच्यावर त्या काळच्या पोलिसांची चौकी होती. हे टेकाड हळूहळू फोडले गेले. व मंदिर आता उत्तम स्थितीत निदर्शनास आले. या मंदिराच्या मालकीबद्दल कोर्टात दिवाणी दावा चालू आहे. इथून मेहकर ११–१२ मैल आहे. या गावी एक भव्य काळ्या पाषाणाची शारंगधर देवाची मूर्ती स्थापन करून भोसले सरकारने एक मंदिर उभारले आहे. ही मूर्ती एका शेतकऱ्याला शेतात मिळाली होती. या देवळाच्या जवळपासच्या घरातून ज्यांना मातीच्या भिंती आहेत– आम्हाला काही छिद्रातून सर्प डोकावताना दिसले. गावाबाहेर हजारो थडगी दिसली. पण बहुतेक थडग्यात छिद्रे नजरेत आली. ज्या दिवशी आम्ही मेहकरला पोहोचलो, त्या दिवशी एक नागसर्प अगदी येथील मुख्य पोलिसस्टेशनच्या आवारातील सडकेवर दिसला. आम्हाला सांगण्यात आले की इकडे असे सर्प जवळ जवळ रोजच कुठे ना कुठे तरी दिसत असतात. हे सगळे इत्थंभूत लिहिण्याचे कारण की जुनी घरे मुस्लिम लढाईच्या वेळी व त्यांच्या राज्याच्या वेळी पाडली गेली. त्यात देवळे पण

होती. या सर्वांवर माती साचून टेकाड निर्माण झाले. या पोकळ टेकाडाच्या आत किंवा त्या गावाबाहेरील थडग्याच्या आत उंदरांचा सुळसुळाट सुरू झाला. त्यांना खाण्याकरिता सर्प आता तिकडे जाऊ लागले. या सर्व गोष्टींचा फायदा तेथील एका महाराजांनी घेतला. त्यांनी एक देऊळ निर्माण केले व त्या देवळाच्या पडवीतच एक नागसर्पकृती प्रतिमा ठेवली. या प्रतिमेपुढे हे साधुमहाराज बसतात व भूतप्रेत, सर्पदंश याबद्दल मंत्रतंत्र करतात, आम्ही पूर्णतया तपास केला व आम्हाला दिसले की, जवळपासच्या पडक्या घरांमुळे सर्प येत आहेत व त्याचा फायदा हे साधू घेतात. सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे, मेहकर आणि लोणार या गावांची माळावरील उंदरांची संख्या इतर गावाच्या उंदीर संख्येपेक्षा पुष्कळ कमी आहे.

सौराष्ट्राच्या ध्रांगध्रा संस्थानात त्यांच्या राजधानीकडे जात असताना मार्गात एक देऊळ लागते. हे देऊळ म्हणजे कवेलुवजा एक खोलीच आहे. या देवळाच्या मागे बरीच थडगी दिसली. काही थडग्यावर सतीचे दगड पण होते. या जुन्या थडग्यात काही छिद्रे होती. असे म्हणतात की वर्षातून एकदा ध्रांगध्राचे महाराज येतात व आपले पागोटे नागप्रतिमेसमोर ठेवतात. लोक म्हणतात की, त्या थडग्यातून एक नागसर्प येतो व त्या पागोटयात जाऊन बसतो. हे बसणे शुभ मानले जाते. मेहकरसारख्या जुन्या थडग्यातून जसे सर्प इतरत्र पसरतात तीच प्रक्रिया इथे होत असेल.

उत्तर हिंदुस्थानात कैकस्थळी वासुकी नाग याची देवालये आहेत. त्यांचा पुजारी त्या तीन फणा किंवा पाच फणा असलेल्या नागाची पूजा करतो. कुलू शहरी दसऱ्याच्या सुमारास नागपूजा होत असते. काश्मीरलापण ३ किंवा ५ फणांच्या नागाची पूजा होते. अशीही पूजा सबंध भारतात होत आहे. पण ज्यांची पूजा होते त्यांच्या जगण्याबद्दल कुणी विचार करीत नाही. १९७० नंतर भारतात काही सर्पालये काढून सर्पांचे प्रदर्शन कैक लोक करीत आहेत. यामुळे थोडे आर्थिक उत्पादन होते; पण सर्प अशा कृत्रिम जागी जगू शकत नाही. इथे फुरशी प्रतिदिन २५ टक्के मरतात. इतर सर्पांचे तेच प्रमाण आहे. एकतर जंगलांची नासाडी झाल्यामुळे सर्पांच्या राहण्याच्या जागा नाश झाल्या, शिवाय त्यांचे अन्नपण गेले. आम्ही पाहणी केल्यानंतर असे दिसून आले की, उंदिराशिवाय सर्प बेडूक, किडे, पाली, विंचू पण खातात. एकदा जंगल गेले की, हे सर्व अन्न नाश पावते. सर्प दुधावर जास्त दिवस जगू शकत नाही. तसेच वरून मेलेल्या प्राण्यांचे मांस तोंडात कोंबले त्यावरसुद्धा ते जगणार नाही. जोपर्यंत स्वतः अन्न पकडून त्यात लाला पिंडाचा रस तो टाकत नाही तोपर्यंत तो असे अन्न घेणार नाही, व ते त्याला चांगले पचणार पण नाही.

भारतामध्ये सर्पाची कातडी अवैधरीत्या गोळा केली जात आहे. मध्यवर्ती शासनाने नेमलेल्या एका समितीला आढळून आले की, जवळजवळ अडीच लक्ष चोरून काढलेली कातडी उघडकीस आली. ही कातडी जिवंत सर्पाला खिळ्याने वृक्षावर अडकवून जिवंतपणीच क्रूरपणे काढतात. ती परदेशात पाठवितात. पैसा चांगला मिळतो. बहुतांश कातडी

धामण सर्पाची असते. व एका कातडीला परदेशात ३५–४० रुपये मिळतात. शासनाने या कातडी निर्यातीवर बंधन घातले आहे. तरीपण चोरून अशी कातडी सर्रास निर्यात होत आहे. यामुळे उंदीर कमी करणारे सर्प, विशेषत: धामण यांची संख्या बऱ्याच प्रमाणात कमी होईल.

भारतातील ही सर्पसृष्टी पर्यावरणात इतकी उपयोगी आहे की, तिचा नाश झाला तर निसर्गाचा समतोल बिघडेल व भलतीच समस्या मानवावर ओढवेल. सर्पपूजा किंवा सर्प–आराधना ही जी घटना आपल्या देशात दृढमूल होऊन बसली आहे, त्याच्यामागे एकच सत्य आहे की, " सर्प तुम्हाला मदत करतात त्यांना धन्यवाद द्या, ज्यामुळे मानवाची उन्नती होईल." या भावनेतूनच सर्पमंदिरे उभारली गेली व नागपंचमी साजरी होते. दुर्भाग्यवश नागपंचमीच्या निमित्ताने कैक नाग पकडून विकले जातात. त्यांचे विषदंत उपटले जातात. त्यांना थकेपर्यंत दिवसभर फणा काढायला उद्युक्त केले जाते व शेवटी ते थकलेले जखमी सर्प लवकरच मृत्युमुखी पडतात. आता तर सर्पगृह काढून त्यांना कोंडून ठेवतात, तिथे त्यांचा मृत्यू होतो. असंख्य सर्पांची जिवंतपणीच कातडी काढून हत्या होत आहे. यामुळे सर्पसंहार वाढू लागला. पुराणात जनमेजय राजाने सर्पयज्ञ केल्याची कथा आहे. पण सर्पसंहाराचे कार्य तो पूर्ण करू शकला नाही. ते कार्य म्हणजे सर्पनाशाचे कार्य भारतात मोठ्या प्रमाणात होत आहे. ज्याची आराधना करावी त्याची आता हत्या होत आहे. ही वाचविली पाहिजे, व भारतातील सर्पसृष्टी अखंड ठेवली पाहिजे एवढेच प्रत्येक भारतीयाने लक्षात ठेवावे. नवीन नवीन सर्पालये काढण्यामागील, महत्त्वाकांक्षा एकच असते व ती म्हणजे अर्थार्जन. आजचे अर्थार्जन करून नेहमीचे पर्यावरण बिघडेल याची त्यांना कल्पना नसते. यातील काही जाणकार म्हणतात की, सर्पविषातील किण्वे काढून आणखी पैसे मिळवू. पण भारतातील पायरेथ्रम या कीटकनाशक वनस्पतींचा आता व्यापारिक दृष्टया उपयोग होत नाही, कारण रासायनिक क्रियेतून निर्माण करून ते विकले जात आहे. तसेच सर्प किण्वांचे लवकरच रूपांतर होणार आहे.

*( या घटनांचा काळ १९७१ ते १९८३ )*

## ८ : थोडी दक्षिणभारत यात्रा

सहा महिने बाहेर फिरून आल्यावर पुन्हा मी १९०० मैलांचा प्रवास करण्याचे ठरवून त्याप्रमाणे सगळ्या कुटुंबाचा प्रवास–पास काढला.

तसे आमचे तिकीट त्या वेळच्या थर्ड क्लासचे होते. पण त्या रेल्वे ऑफिसरने जणू जादू केली व आम्हाला बसायला ऐसपैस जागा मिळाली. पुणे, सोलापूर, कुर्डुवाडी, रायचूर, गुंटकल व आरकोणम्‌पर्यंत फराळगाडीवाले खाण्या-पिण्याची बडदास्त ठेवत होते. मद्रासला रिटार्यरिंग रूममध्ये जागा मिळाली. सकाळी आन्हिक–जेवण आटोपून आम्ही टॅक्सीने ‘पक्षीतीर्थ’ व समुद्रकिनाऱ्यावर फिरून आलो. या पक्षीतीर्थावर गिधाडाच्या जातीचे दोन पक्षी खीर खाण्यास येतात व ठीक बाराला परत जातात अशी आख्यायिका आहे. मला तरी ते दोन वाजेपर्यंत दिसले नाहीत. त्या रखरखत्या उन्हात उघड्यावर भांडेभर खीर घेऊन समोरच्या पाटाकडे लक्ष ठेवणाऱ्या पुजाऱ्याची कीव आली. त्याची ती तपस्याच होती. कैक मैलांच्या परिसरात तेवढेच ते डोंगर शिखर होते व त्या शिखराच्या मध्यभागी हे खीर ठेवलेले भांडे लांबून दिसते. खाणे मिळते या नित्याच्या सवयीमुळे पक्षी येत असावेत.

मदुराईच्या मीनाक्षी मंदिरात उत्तम शिल्पकारी आहे. पण त्या गोपुरावरील शिल्पांना बहुरंगी ऑईल पेन्ट (तैलरंग) लावून शिल्पांची किंमतच कमी केलेली दिसली. नुकतेच लॉस एन्जलिसच्या हॉलिवुड विभागात, एका श्रीमंत अरब व्यापाऱ्यानं उत्तुंग प्रासादवजा बंगला विकत घेतला. सगळ्या ऋतूत रंगीत फुले दिसावी म्हणून नैसर्गिक झाडे तोडून कृत्रिम झाडे व फुले लावली. बागेत उत्तम संगमरवरी दगडाच्या शुभ्र मूर्ती जिथे होत्या, तिथे त्याना नैसर्गिक रंग दिला. त्या नग्नावस्थेत असलेल्या मूर्तींना कामवासना उत्तेजित करण्यास स्वत: पाणी दिले ते सगळे फार अभद्र दिसू लागले. लोकांनी हटकले तरी ते शेटजी ऐकेनात. शेटी फुगीतरी त्या प्रासादाला आग लावून ते अभद्र दर्शन समाप्त केले. आपल्याकडे असे होईल काय ?

चिदंबरम्‌ देवळाच्या दालनातील स्तंभ वेगवेगळे सूर काढीत होते. श्रीशिवाची

मूर्ती नटराज स्वरूपात जरी होती तरी त्या देवळामागील भिंतीवर एक पडदा होता व त्याखाली काहीच नव्हते. यालाच चिदाकाश म्हणत. इंडोनेशियाच्या बाली बेटावर अशीच काही देवालये आहेत. या देवालयाबाहेर श्री ब्रह्मा-विष्णू-महेशाच्या शिल्पाकृती दिसतात. पण आत भिंतीवर नुसते 'अनंत' म्हणजे काहीच नसते. याशिवाय या देवालयात अगदी शिवालयाजवळच श्री विष्णूची काळ्या पाषणाची मूर्ती आहे व त्या मूर्तीच्या बाहूवर नागसर्पाची फणा आहे.

कावेरी नदीच्या सुपीक टापूत बृहदेश्वराचे मोठे देऊळ तंजापूर शहरी दिसले. नंदी तर भला मोठा बाहेरच होता. श्री शिवाजी महाराजांचे वंशज व्यंकोजी यांचा वाडा, त्यांनी स्थापलेले पुस्तकालय व संगीतालय याच्या जवळच होते. या शहरी गलमिशा ठेवणारे शिपाई त्या मराठाकालीन रीतीरिवाजांची आठवण देत होते. श्री व्यंकोजींचे वंशज अद्याप आहेत. थोडे फार मराठी बोलतात. पण गत वैभवाची आठवण व आताचे वैफल्य त्यांना बेचैन करीत आहे. राजवाड्यात शिवकालीन चित्र दिसले. पण ते तिथे स्थापन केलेल्या प्राथमिक शाळेच्या वर्गाबाहेर होते. व मुले पडदा म्हणून उपयोग करीत होते.

श्री रामेश्वर क्षेत्री खाडीवरून जाणारी आगगाडी एक दिव्यच दाखवीत होती. इकडे दोन्ही कडेला खाडीचा समुद्र भीतीदायक होता व तिकडे वरून धो धो पाऊस आणि सोसाट्याचा वारा सुरू होता. त्या आगगाडीचे छप्पर गळत होते व डब्याची दारेच बद होईनात. वीस मिनिटे त्या वादळवाऱ्यातून भिजत गारठत कसेतरी स्टेशन गाठले. स्टेशन आले व 'पंडे' धावपळ करू लागले. माझ्याकडे दहा पंडे आले, त्यापैकी एकाचे नाव कर्वे होते. रीतीप्रमाणे त्यांच्या घरी जावे लागले असते, पण तेवढ्यात स्टेशनमास्तर आले व त्यांनी रिटायरिंग रूमकडे नेले. त्यांना माझ्या येण्याची खबर मद्रासहून आली होती. श्री. कर्वे यांना त्यांच्या घरी जेवण करू व त्यांनी पूजा करवून घ्यावी असे सांगितले. कपडे वगैरे बदलले व गावात कर्वे यांच्या घरी गेलो. त्यांच्या घरी सगळेच तामीळ भाषेत बोलत होते. पण जेमतेम एक-दोन मराठी शब्द उच्चारत होते. त्यांचे घराणे दीडश वर्षांपासून इकडे स्थायिक झाले. जेवणात भाताला प्राधान्य होते. इकडे पोळी कुणी खात नाहीत. त्यामुळे स्पेशल दळून आणलेल्या कणकीच्या पिठात मैदा, बेसन आदी बऱ्याच पिठांचे मिश्रण केलेली पोळी खावी लागली.

आगगाडीत भिजल्यामुळे रात्री आमच्या मुलाला ताप आला. रात्र कशीबशी काढली. सकाळी डॉक्टरला आणले. ताप चांगलाच होता व सर्दी-पडसे पण खूप होते. न्यूमोनियाकडे आजार वळणार असे मत पडले. डॉक्टरांनी माझी माहिती घेतली. हाफकिन इन्स्टिटयूटशी मी संबंधित आहे हे कळल्यावर त्याला फार आनंद झाला. ते फी तर घेईनात, शिवाय फुकट स्ट्रेप्टोमायसिनचे इंजेक्शन दिले व "अशा मोठ्या संस्थेच्या ऑफिसरची सेवा करण्यात आनंद मानतो व आपली भेट झाली, शास्त्राच्या आधुनिक संशोधनाबद्दल माहिती मिळाली, यातच मी धन्यता मानतो." असे ते म्हणाले.

मोठ्या देवालयाच्या महाकाय नंदीचे दर्शन, कैक कुंडातील जलाने स्नान आदी उरकून दर्शन, पूजा करीत रामेश्वर सोडले.

टिपू सुलतानचा वाडा, तेथील ऐतिहासिक चित्रे, पराभव स्वीकारलेला किल्ला, तसेच त्रिचनापल्ली येथील देवालय, पैसे निवडणारा हत्ती आदी बघत आम्ही त्रावणकोर गाठले. तेथील देवालय व नारळ तथा टॅपिओका वृक्षांची लागवड, खाडी, कालवे यांच्या कडेला वळणारे खोबरे यांचे दर्शन घेत कन्याकुमारी गाठली. तेव्हा विवेकानंदांचे स्मारक झाले नव्हते. देवीची मूर्ती समईच्या प्रकाशात झगमगत्या हिरे-माणकांच्या ज्योतीत फारच मोहक दिसली. अगदी सकाळी सूर्योदय इथून पाहावा व तीन सागरांचे दर्शन व स्नान करावे असेच इथे प्रत्येक भारतीयाला वाटते.

## उपरती सुरू झाली

थर्डक्लासने प्रवास केला, पण वरून आदेश आल्यामुळे सुखावह झाला. असाच प्रवास तिरूवनमालायचा झाला. या गावी मध्यावर चांगला मोठा डोंगर आहे. काही वर्षांपूर्वी या डोंगरावर घनदाट वनश्री होती आणि बऱ्याच गुंफा पण होत्या. संत-महंत या गुंफेत राहून तपस्या करीत असत.

डोंगराखाली श्रीशंकराचे भव्य देवालय असून त्या प्रासादाला अदमासे १२०० दगडी खांब आहेत. देवळातील आवारात मोठे तळघर असून तिथे श्री रमणमहर्षी यांना समाधी लाभली होती. वैकुंठ चतुर्दशीच्या सकाळी जवळच्या डोंगर शिखरावर भली मोठी कढई ठेवतात. या कढईत कैक पिंपे साजूक तूप ओततात व सबंध ठाणभर मलमलच्या कापडाची वात त्या तुपात भिजवितात. सकाळी पाचच्या सुमारास खालील मंदिराच्या गर्भगृहातून एका आरशाच्या साहाय्याने देवाजवळ जळत असलेल्या समईच्या ज्योतीचे प्रतिबिंब डोंगरावरील कढईतील वातीवर टाकतात. कढईतील वात वाजत गाजत प्रज्वलित होते. ती १५ दिवस अहर्निश जळत असते. या कढईतील वातीचे दर्शन घेण्यास लांबून लोक येतात, यात्रा भरते. साधुसंत, भिकारी यांचा सुकाळ तर असतोच, शिवाय माकडे पण बराच त्रास देतात.

देवळाजवळच श्री रमणमहर्षींचा आश्रम आहे. तिथे एका कौलारू घरातील मोठ्या पडवीत हे महर्षी खाटेवर टेकून बसत व समोर बसणारे दर्शनार्थी प्रश्न विचारीत व आश्चर्य हेच की, प्रश्नार्थी स्वतःच उत्तर देत. आता श्री रमणमहर्षी नाहीत. तरी लोक पडवीत बसतात व त्या खाटेवर ठेवलेल्या त्यांच्या चित्राकडे बघतात. मी तसा बसलो. टक लावून ३-४ मिनिटे बसलो असेन नसेन, मला घेरी आल्यासारखे वाटले. माझा तोल जाणार इतक्यातच मी ताडकन उठलो व बाहेर आलो. श्री रमणमहर्षींच्या मातोश्रींच्या समाधी मंदिरातील रमणगीतेच्या श्लोकाची शिला वाचली-

"हृदय कुहरमध्ये केवळ ब्रह्ममात्रम्"

हा श्लोक वाचताना पुन्हा मला घेरी आल्यासारखे वाटले. सावध झालो व महर्षींनी समाधी घेतली त्या खोलीचे दर्शन घेऊन आमचे एक स्नेही श्री. चटर्जी यांचे घरी जरा जड मनानेच गेलो. चटर्जी कुटुंबाने भोजनास बोलावले होते. पश्चिम बंगालमधील चीफ इंजिनीयरच्या पदाचा त्याग करून त्या कुटुंबाने या गावी एक कुटी बांधली होती व श्री रमणमहर्षी यांच्या फोटोसमोर तासन् तास बसून ते साधनेत व्यस्त राहात होते. मला आत घेतले. माझ्या तोंडाकडे पाहून म्हणाले, "तोंड जरा उतरलेले दिसतेय !" मी सांगितले, सकाळी दोन वेळा जरा भोवळ आल्यासारखा त्रास झाला. त्यांनी खोदून खोदून प्रश्न विचारले व म्हणाले, "अरेरे ! प्रगतिपथाकडे भगवान नेत होते, पण तुम्ही ही संधी टाकून दिली !"

आपला अनुभव सांगताना त्यांनी जुनी आठवण सांगितली. सुरुवातील तिथे आल्यावर रोज ते पडवीत रमणमहर्षींच्या खाटेसमोर कैक दिवस बसले. एके दिवशी असेच बसले असताना त्यांना वेळ फुकट दवडतो असे वाटले. उठून बाहेर गेले. तिथे एक जटाधारी साधू उभा होता. त्याने विचारल, "इतने चलबिचल क्यों हो ?" चटर्जींने व्यर्थ वेळ जात आहे याची जाणीव दिली. तो साधू म्हणाला, "गंगाजल पीने बर्तन लेकर गये परंतु जब तक बर्तन के अंदर का गोबर फेंक कर साफ नही करोगे, तब तक शुद्ध गंगाजल की आपकी प्यास हरदम भूकी ही रहेगी."

तिरुपती स्टेशनजवळच देवस्थानची धर्मशाळा आहे. त्याला चोल्ट्री म्हणतात. यातील तीन खोल्यात आम्ही उतरलो व भोजन करून बसची वाट पाहत होतो. मला एक फार जुनी आठवण आली. अदमासे पंचेचाळीस वर्षांपूर्वी याच गावी वडिलांनी यात्रेकरता मला आणले होते व अगदी सकाळी पाच वाजता उठून दोन कुंडात स्नान करून आम्ही तिरुमलाई डोंगर पार करीत निघालो होतो. मला डोलीत ठेवले व आई वडील पायऱ्या चढून वर येऊ लागले. मधेमधे कमानी होत्या व तिथे विश्रांती घेऊन 'गोविंदा' म्हणत गर्द झाडी व डोंगर चढत वर जायचे. दुपारी बाराला देवळाजवळ आले की धर्मदर्शन होई व लागलीच चांगला मोठा दही-भात व मसालेभाताचा लाडू प्रसाद म्हणून मिळत असे. तेवढ्या प्रसादाने चढण्याचा शीण जाई व कृतार्थता पण वाटत असे. श्री बालाजीची भव्य मूर्ती व बाहेर ठेवलेली हुंडी अद्याप आठवत होती.

या वेळी मात्र एक तासात बसने वर गेलो व छोट्याशा बंगलीत वास्तव्य केले. माकडांचा त्रास आत्ता आहे त्यापेक्षा पूर्वी जास्तच होता. आता तिकीट काढून दर्शन घेतले. मूर्ती प्रतिभासंपन्न व डोळ्यात भरणारी होती. खूप डोळा भरून पुन्हा पुन्हा दर्शन घत होतो.

मुंबईला आल्यावर घरी त्या मूर्तीची आठवण नेहमी करू लागलो. पुढे पुढे एक-दोन वेळा स्वप्नात पण श्री बालाजीच्या मूर्तीचे ओझरते दर्शन झाले. पण त्यापुढे जरी स्वप्न दिसले व तिरुमलाईच्या देवळाचा भाग दिसला की आत प्रवेश होई, पण गर्भगृहाकडे

जाऊ लागलो की गर्भगृहाचे दारच बंद होताना दिसे. असे का होते याचा विचार करत असताना एके दिवशी तसेच स्वप्न दिसले व गर्भगृहाचे दार बंद होऊन दारावर श्री ज्ञानेश्वरांचा फोटो व जवळ श्री ज्ञानेश्वरी दिसली. त्यानंतर मी मात्र स्वप्नाचा नाद सोडला आणि श्री. ज्ञानेश्वरीचा एक श्लोक रोज वाचायचे ठरवले.

अशा स्वप्नामुळे काही संदेश येतात काय ? किंवा रक्षणाची अथवा अरक्षणाची कुणी खबर देतो काय ? या प्रश्नाचे उत्तर कठीण असले तरी मला दोन अनुभव आले व पुढे काही घटना घडल्या त्याबद्दल कुणीतरी विचार करावा असे वाटते

प्रयाग इथे १९५१–५३ च्या सुमारास कुंभमेळा भरला होता. तो भरण्यापूर्वी वर्तमानपत्रातून व्यवस्थेबद्दल इत्थंभूत माहिती देण्यात येत असे. मेळ्याच्या आदल्या दिवशी काही चित्रे पण आली. मेळ्याचे स्नान सकाळी ४–५ पासून सुरू झाले. त्या वेळी मी मुंबईत झोपलो होतो. सुमारे पाच वाजता मला स्वप्न पडले की स्नान करण्यास गेलेल्या यात्रेकरूंच्या मार्गात कैक मृत देह पडले आहेत. माझे दिवंगत वडील दिसले. त्यांनी हात धरून मला दुसऱ्या बाजूने गंगेवर नेले. तिथे गर्दी नव्हती. मी स्नान केले. सकाळी सहा वाजण्याच्या सुमारास मला जाग आली व मी ते स्वप्न लिहून काढले. दोन तासांनी रेडिओवर बातमी आली की अलाहाबादेच्या कुंभमेळ्यात स्नानाला जाणाऱ्यांची गर्दी झाली व चेंगराचेंगरी होऊन २००–३०० यात्रेकरू मरण पावले. तरी काही विशेष यात्रेकरूंनी दुसरीकडून स्नान केले. मला हा संदेश का कळला ?

दक्षिण भारतात प्लेग या सांसर्गिक रोगाची लागण कुठेतरी आहे, असा तज्ज्ञांना संशय आहे. होसूरजवळील काही गावात दरवर्षी प्लेगची लागण होते. काही लोकांना प्लेगच्या गाठी पण येतात. इतके होऊनसुद्धा मृत्यू झालेला दिसला नाही. कोलारच्या सोन्याच्या खाणीत दहा हजार फूट खाली उंदरांची संख्या आतोनात वाढलेली दिसली. बंगळूरजवळील काही खेड्यात उंदीर मरू लागले व माणसांना लागण झाली. नवीन डॉक्टरांच्या एका पिढीने प्लेगचे रोगी पाहिले नव्हते. त्यामुळे बेलार ते तिरुनमलै विभागात गाठी आलेल्या रोग्यांचे निधन झाले नाही. त्या खेड्यातील वयस्कर लोकांनी मात्र प्लेग ओळखला व आम्ही तपासणीकरता गेलो असताना लागण झालेल्या रोग्यांना गवताच्या गंजीत किंवा लांब लपवून ठेवले. त्यांना भीती होती की घर सोडण्याचा आदेश येईल. या अशा लागणीच्या वस्तीत उंदीर पडलेल्या घरात मला शिरावे लागले. उंदीर काढला व इतरजनांना सल्ला दिला. किंवा स्ट्रेप्टोमायसिनचे इंजेक्शन दिले. मद्रास, म्हैसूर आंध्र, व महाराष्ट्र या प्रांतानीच चांगली उपाययोजना करावी म्हणून दरवर्षी विचार-विनिमयासाठी सभा होत असत, एका वर्षी त्या आंध्र प्रदेशात ठरल्या.

आंध्रप्रदेशात गरम मोसमात थंड जागी जाता येईल असे महाबळेश्वरसारखे स्थान नुकतेच हार्सले हिल्स या डोंगरसपाटीवर निर्माण करण्यात आले आहे. इथे राज्यपालांचा प्रासाद व दोन डझन बंगले बांधलेत. अद्याप ती जागा उपयोगात आणली गेली नव्हती व

प्लेगची मीटिंग तिथेच घ्यावी असे ठरले.

महाराष्ट्र शासनातर्फे मी व डॉ. महल दोघे तिकडे गेलो. मी प्रथम तिरुपती गाठले. वर तिरुमलाई देवळात दर्शनाला गेलो. पण भयंकर गर्दी व मोठी रांग पाहूनच सर्द झालो. पेशकारला भेटलो. पण काही दाद लागेना. शेवटी वेळ घालवण्यासाठी बाजारातून एक माळ घेतली. वराह मंदिराच्या तळ्यात स्नान केले व कपडे वाळवून पुन्हा देवळात गेलो. पेशकार तिथेच होता. हार्सले हिल्सला रात्रीच जायचे आहे असे सांगून वैद्यक खात्याच्या संचालकांना फोन लावण्यास सांगितले. सकाळी 'नाही' म्हणणारा पेशाकर आता नरम आला होता. आता तो स्वत: मला आत घेऊन गेला व तीर्थप्रसाद दिला. त्यांचा निरोप घेऊन सायंकाळी सातला तिरुपती स्टेशन सोडले. रात्री अकराला मदनपल्ली स्टेशनवर उतरलो. छोट्याशा वेटिंगरूममध्ये इतरांची वाट पाहिली. आंध्रप्रदेश शासनाच्या गाड्या पहाटे चारला आल्या व आम्ही डोंगर चढण्यास प्रारंभ केला. 'ऋषीवेली' नामक शिक्षणसंस्था याच विभागात आहे. त्या परिसरातल्या बागा, वनश्री, बंगले क्रीडास्थाने बघत गर्द झाडी पार करून डोंगरमाथा गाठला. अगदी वर २००० फूट उंच कड्याला लागूनच राज्यपालांचा प्रासाद होता. वरून कैक मैल लांबपर्यंत गावे, शेती आदी दिसत होते. एका बंगलीत वास्तव्य केले. आन्हिक, स्नान आटोपून मीटिंगला प्रासादाच्या दालनात आलो. म्हैसूरचे असिस्टंट डायरेक्टर आधी भेटले. ते बंगलूरहून मोटारीने आले होते. तिरुपती करण्याची त्यांची इच्छा अतृप्त राहिली होती. ठीक ९ ला मीटिंग सुरू झाली. तामिळनाडूचे डायरेक्टर (वैद्यकशास्त्र) अध्यक्षस्थानी होते. प्रत्येकाने आपापल्या प्रांतांचा प्लेगबद्दल आढावा घेतला. म्हैसूरचे नायब डायरेक्ट आाकडेवारी सांगत होते. पण तीत बरीच विसंगती होती, म्हणून त्यांना हटकले. त्यांनी आकडे फिरवून पुन्हा विधान केले, पण तेही व्यवस्थित नव्हते, म्हणून आम्ही दोघांनी हरकत घेतली. नायबसाहेब तीस मिनिटे असे विधान हटकणे, सहन करत थांबले. मग 'आत्ता येतो' म्हणून आत गेले. आम्ही इतर प्रांतांचे आकडे तासभर तपासले, पण नायबसाहेब गायबच होते. धावपळ सुरू झाली. आतल्या एका खोलीत पलंगावर कण्हत पडलेल्या व्यक्तीकडे लक्ष गेले, तो काय, ते नायबसाहेब होते व त्यांना हृदयविकाराचा जबर झटका आला होता. हार्सले हिल्सला जेवणसुद्धा हैद्राबादहून आणावे लागते, तिथे इतर सोय काय असणार? एकाजवळचे पेथिडीन दिले व मदनपल्लीहून ॲम्ब्युलन्स बोलावली. संध्याकाळपर्यंत ती आली आणि साहेबांना नेण्यात आले.

इकडे आम्हा सर्वांचा विरस झाला होता. प्रत्येकाला एकेक बंगली दिली होती. कसे तरी जेवण करून बंगलीत गेलो. रात्री आठलाच वीज गेली. मच्छरदाणी नव्हती. डास घोंघावत होते. अंधार होता व त्या भागाला पाऊसही सुरू झाला. घरे लांब लांब

असल्यामुळे कुणाचे आवाज पण येत नव्हते. त्या अंधारात प्रत्येकाला वाटे की आणखी कुणाला तरी हार्ट अॅटॅक येणार. डॉ. महल फार अस्वस्थ झाले. कसाबसा दिवस उजाडला आणि आम्ही त्याच क्षणी हार्सले हिल्स सोडले. स्टेशनवर डॉक्टर महल मुंगीच्या गतीने चालले होते.

आयुष्याचा प्रवास करत असताना मृत्यूचा हात केव्हा सावलीरूपाने पडेल याची शाश्वती नसते. ती सावली कशी भासेल याचा प्रत्येकाचा अनुभव वेगळा असतो. त्या प्रवासाचा शेवट कुठे होईल माहीत नाही. या नकारात्मक भावनेतच आपण जीवनाचा क्षणिक आनंद लुटतो. तरी पण मृत्यूच्या पलीकडे गेल्यावर आयुष्ययात्रेचा अनुभव लिहिता येईल काय ?

*( या घटनांचा काळ १९५९ ते १९६६ )*

# ९ : गुरुवायुर ते कन्याकुमारी

सोळा वर्षांपूर्वी माझे एक शिष्य ‘ डॉ. प्रसाद ’ मुंबईला हाफकिन संस्थेत संशोधन करीत होते. वैज्ञानिक विषयाशिवाय इतर विषयात त्यांना रस नव्हता. पूर्णतया ते नास्तिक होते व देवाधर्मावर त्यांचा अजिबात विश्वास नव्हता.

या वर्षी मी त्रिवेंद्रमला त्यांना भेटलो, तेव्हा त्यांनी श्री. गुरुवायुर देवालयाची स्तुती केली. मला आश्चर्य वाटले व या ‘ कायाकल्पा ’ बद्दल त्यांना विचारणा केली.

ते म्हणाले की, एकदा मोठ्या बहिणीला त्रिचूरहून यात्रेला पोचविण्यास गेलो. श्री गुरुवायुरच्या हिरव्यागार परिसरात प्रवेश केला. बहिणीला आत जाऊ दिले व स्वत: बाहेर उभा राहिलो.

कैक यात्रेकरू नामाचा जयघोष करीत रांगेने आत जात होते. कित्येकांनी हात जोडले होते, डोळे मिटले होते. कैक स्त्रियांच्या नेत्रांतून अश्रूंचे लोट वाहत होते. रोमांचित झालेले भाविक त्यांनी पाहिले. यांना असा उभा पाहून एकाने ‘ दर्शन तर घे ’ अशी आर्द्र स्वरात विनवणी केली. नाइलाजास्तव ते देवळात गेले. त्या रत्नजडित, अलंकारित श्रीकृष्णाच्या मूर्तीकडे त्यांनी पाहिले. गर्भागारात नुसती तेलाचीच वात तेवत होती. चंदन केशर, कस्तुरीचे अर्चन कुणीतरी त्यांच्या भाळी फासले. सुगंधित उदबत्त्यांच्या धुरातून त्यांनी पुन्हा मूर्तीकडे नजर फाकली– पण एकाएकी त्यांच्या हातानी डोळयांवर झाकण ठवले व ‘ राव ’ त्या गर्दीत सांष्टांग नमस्कार घालू लागले. उठविले तेव्हा दोन्ही गाला-वर थप्पड मारली व म्हणाले, “देवा, मी दर वर्षी तुझ्या चरणरज–दर्शनाला येईन !”

दक्षिणेतील देवालयात श्री बालाजी देवस्थानानंतर गुरुवायुर स्वामींचाच नंबर लागतो. डोंगरकपारीखाली हिरव्यागार नारळी–पोफळी, आंबा, फणस, केळी, आदी वृक्षांनी घेरलेल्या आवारात हे कौलारू देऊळ आहे. तिथे श्रीकृष्णाची सुंदर मूर्ती असून अक्षरश: गजांतलक्ष्मी लोळते. एकूण ३२ हत्ती त्यांच्या गजशाळेत आहेत व प्रत्येक हत्तीला साजेशी रुप्या– सोन्याची झूल आहे. असंख्य पणत्यांच्या दीपमालिका प्रज्वलित केल्यावर, नगारे नादस्वरम्‌च्या निदादात ते रत्नाने डुलणारे गजराज देवाची पालखी नेतात. तेव्हा

मन कसे भारावून येते. भाविकांची अलोट गर्दी श्रीकृष्णाचा जयजयकार करते.

देवाची पूजा ब्राह्ममुहूर्तावरच सुरू होते. तेलाने देवाला माखतात. उटण्याने तेल काढतात. हे तेल व उटणे प्रसाद म्हणून देतात. रोजच कैक जोडप्यांची लग्नकार्ये इथे होतात. व पूजेची रांग इतकी असते की ६००० रु. तिकिटाला देऊनसुद्धा त्यांचा नंबर दोन महिन्यांनी लागतो. देव पावतो म्हणतात. (आता तर केरळच्या मुख्यमंत्र्यांचे उदाहरण देतात की या भक्ताला श्रीकृष्णामुळेच मंत्रिपद मिळाले.)

अशा देवालयातील हत्तींची ऑक्टोबर १९८२ मध्ये दिल्लीला एकाएकी रवानगी झाली. एशियाडकरिता दीड कोटी रुपये खर्चून हे हत्ती तिथे नेले. पण त्या प्राण्यांचा कुणी विचार केला नाही. काही ठराविक वयाचेच हत्ती आगगाडीने नेतात. गाडीचा वेग ठराविक ठेवावा लागतो. बारा तासांवर त्यांना असे कोंडून ठेवू नये. हे सगळे नियम धाब्यावर बसवून भरधाव गाडीत साखळदंडाने जखडून हत्ती दिल्लीत नेले. एक हत्ती मेला. एक अद्याप आजारी आहे. एक माहूत मेला व कैक हत्तींचे पाय, अंग इतके सुजले की काहींच्या पायावर जबर जखमा पण झाल्या. या सर्व गोष्टींचा गाजावाजा झाला. हत्तींना अल्पसाच प्रवेश दिला व त्याकरता इतके कष्ट भोगावे लागले. हे योग्य होते काय ? दिल्ली येथील भारतीय मानक संस्थेने या गोष्टींचा विचार करून अशा प्रवासाला काही मानदंड असावेत म्हणून एक समिती नेमली. त्या समितीची बैठक जानेवारी १९८३ ला त्रिवेंद्रम येथे भरली. त्या समितीकरता सभाध्यक्ष म्हणून मी तिकडचा प्रवास केला.

मद्रासमार्गे, कोईमतूर, पालघाटवरून सकाळी केरळचा हिरवागार प्रांत दिसला. चोहीकडे नारळी पोफळीचे जणू रानच होते. मधूनमधून खाडीचा किनारा लागायचा कधीकधी त्या हिरवळीतच टुमदार बंगली दिसे. भातशेती किनाऱ्यावर होती. वर्षाकाठी तीनदा भात पिकवितात. टॅपियोकाची शेती आता वाढू लागली आहे. नारळ तर कल्पवृक्षच होय. शहाळी खोबरे खावे, काथ्यापासून दोर, पायपोस, तर भुग्यापासून राळ टाकून जाड पुठ्ठे, पानापासून शाकारणी व केरसुणी, कांडापासून जळण हे उपयोग आहेत. कितीतरी प्रकारचे नारळ दिसले. इकडे मिरी, दालचिनी, तेजपान, जायफळ, काजू, केळी, आंबा, फणस. या सगळ्यांची आमदनी निसर्गरम्य परिसर सोडून केरळचे लोक मुंबईच्या बकाल वस्तीत येतात कशाला हा प्रश्न मनाला चाटून जातो.

सकाळी दहाला त्रिवेंद्रम आले. माझे दोन शिष्य तथा मानदसंस्थेच्या संचालकांनी स्वागत केले व आम्ही स्टेशनबाहेर पडलो. रिक्षाच्या रांगापलीकडे मोठी सडक व उंच इमारती होत्या. स्टेशनवरील कुलींनी त्रास का दिला नाही हा प्रश्न मनात घोळत होता. केरळमध्ये कम्युनिझम आहे. कुलीचे भाडे ठरलेले, सामान तुम्ही जरी उचलले तरी ठरलेले भाडे द्यावेच लागणार. एका रिक्षाने ४ रु. सांगितले, तर दुसरा तेवढेच सांगेल. बसा किंवा पायी चला. शहरातील रस्ते अरुंद व वळणाचे. दर चौकावर कम्युनिस्ट कोयता; हातोडा, लाल झेंडा व कार्यक्रमाचा फलक. चळवळीमुळे नोकर मिळणे कठीण झाले असून कामे

होत नाहीत. लोक धंद्याकरिता दुसरीकडे जातात. आमचे रेस्ट हाऊस एका जुन्या वाड्यात, चार नवीन खोल्यांचे होते. इथेसुद्धा नारळ, केळी, शेवग्याच्या शेंगांची रोपे होती. खोली बरी दिसली. महत्त्वाची गोष्ट म्हणजे, बेअररने १६ वर्षे नागपूरला काढली होती, त्यामुळे त्याला हिंदी, मराठी समजत असे व तो महाराष्ट्रीय स्वयंपाक पण करीत असे.

दुपारी चारला माझे शिष्य डॉ. चंद्रन् आले. टॅक्सी आली. मी येण्यापूर्वीच या शहरात मोठी दंगल झाली होती. यामुळे पोलीस बंदोबस्तासाठी बरेच रस्ते बंद होते. गावाबाहेरचा हिरवागार परिसर, कालवे, खाडी पार करीत आम्ही विमान तळाजवळ आलो. दंगलीमुळे बऱ्याच झोपड्या बेचिराख झालेल्या दिसल्या. नुकतेच एक विमान आले होते. बहुसंख्य यात्रेकरू डोई-खांद्यावर रंगीत चटईत, फोम रबरची गादी गुंडाळलेले बोचके, एका हातात टू–इन वन– ट्रॉंझिस्टर, दुसऱ्या हातात परदेशी छत्री, एक कातडी बॅग, असे घेऊन बाहेर येत होते. असे दृश्य मुंबईला पण दिसते व हे सर्व आखाती देशातून येणाऱ्यांचे. या सामानाशिवाय त्यांनी बरीच माया आणली होती. या मायेच्या जोरावर उत्तम सिमेंट-कॉंक्रीटची घरे, खूप महाग जमीन वगैरे घेऊन हे लोक घरे बांधीत आहेत. यामुळे जमिनीच्या किमती वाढल्या आहेत. शिवाय मानसिक रोगाचे प्रमाण खूप वाढले आहे. आल्यावर लग्न करावयाचे व छोटी सुट्टी संपली की पत्नीला एकटे टाकून आखाती देशात जायचे, या चिंतेखाली दोघांना मानसिक रोग लागायचा. या रोगामुळे ३५ ते ४० टक्के लोक आजारी पडले आहेत.

आता टॅक्सी गावात आली. मोठा रस्ता होता. आत २ फर्लांग जाऊन एका भव्य गोपुरमजवळ थांबली. आम्ही पायऱ्या चढलो. पण दारात मज्जाव झाला. मल्याळी भाषेतून बाजूच्या खोलीकडे बोट दाखविले. इथे जोडेच नव्हे तर सर्व कपडे काढावे लागले. नुसती एक लुंगीच, तीसुद्धा भाड्याने दिली. सर्व कपडे ठेवण्याचे भाडे ४० पैसे पडले. काही घरंदाज स्त्रिया वक्ष:स्थल पण उघडे ठेवतात. त्या भव्य पद्मनाभ स्वामींच्या देवळात शिरलो. मोठमोठे कोरलेले स्तंभ व उंच कोरीव छत त्याहाळीत एक फर्लांग आत गेलो मग उजवीकडे, डावीकडे वर-खाली करत गाभाऱ्याजवळ आलो सायंकाळ झाली. पणत्या जळत होत्या. या मुख्य देवाच्या मंदिराला ३ दारे होती. व देवाची शेषशायी मूर्ती तीन दारातून पाहावी लागे. एवढी प्रचंड मूर्ती होती की पहिल्या दाराने देवाचा एक हात व डोकेच दिसे. मधल्या दाराने वक्ष:स्थल व नाभिकमलातून वर येणारे ब्रह्मदेव व तिसऱ्या दारातून देवाचे पाय व जवळच बसलेली श्री महालक्ष्मी यांचे दर्शन होई. त्या रांगेच्या घाईमुळे ध्यान भंग झाले. पुढे खाली उतरल्यावर प्रसाद मिळाला हा अर्धा लाडू सुगंधी चंदनाचा गोळा होता.

दुसऱ्या दिवशी आमची मीटिंग सी. एस. आय. आर. च्या प्रयोगशाळेत भरली. या संस्थेत त्रावणकोरच्या नैसर्गिक पदार्थांवर संशोधन चालले होते. लाल मिरचीच्या घटकांचे पृथक्करण करून एक भडक लाल रंग काढला. त्याचा उपयोग पेन्टस्च्या उद्योगात सुरू

झाला. नारळाच्या पाण्याचे नेहमी टिकणारे पेय झाले. केळीच्या फोकापासून कागद व कृत्रिम रेशमी धागा निघाला. नारळाच्या झावळ्यांना वॉटरप्रूफ व फायरप्रूफ करून गरिबांच्या घराचे स्वस्त छप्पर तयार झाले. तेथील दगड–माती याचे रूपांतर करून खनिज निर्माण झाले. जगातील मोनोझोईट वाळूचा साठा ब्राझील व केरळमध्येच आहे. या मानोझाईट वाळूवर प्रक्रिया केल्यावर युरेनियमप्रमाणे अणुइंधन निर्माण होते.

मीटिंग संपली व आम्हाला प्राणिसंग्रहालय पाहण्यास नेले. डोंगर, दरी, कपारी व जंगलाचा उपयोग करून हे निसर्गसुंदर स्थान सुबक केले आहे. वाघ आणि सिंह समोर खाली खोऱ्यात झाडीच्या मागे उभे आहेत व आपण डोंगरकपारीवरून त्यांना खाली बघत आहोत असा भास होतो.

समोरच वस्तुसंग्रहालय होते. तिथेच आम्ही चार लोकांनी वृक्षारोपण करून आपल्या भेटीची आठवण ठेवली. जवळच असलेल्या यांत्रिकी व स्थापत्य शास्त्रज्ञांची वास्तू होती. तिथे माझे भाषण झाले. मूकघाटी या परिसरात लक्षावधी वर्षांपासून बहरलेल्या वनाची तोड होत आहे व तिथे छोटेसे वीजनिर्मिती केंद्र धरण बांधून तयार होणार आहे. 'जंगलाने पर्यावरण परिस्थिती निर्माण करून विशिष्ट जातीचे प्राणी व दुर्मिळ वनस्पती जगविल्या आहेत. या सर्व जातील व आपण एका पैतृक धाग्याला पारखे होऊ. केरळात निसर्ग-राज्य आहे, त्यालाच जपा व सुखी राहा,' असे मी प्रतिपादन केले.

दुसऱ्या दिवशी मुख्य बाजारपेठेचा दौरा केला व दुपारी एका जुन्या राजवाड्यात स्थापन झालेली प्रयोगशाळा पाहिली. इथे डुकरांच्या हृदयाचा उपयोग करून प्रयोग केले व मानवी हृदयाची कृत्रिम झापड तयार केली. अमेरिकेत प्लास्टिकची झापड कैक हजार डॉलर्सना मिळते. इथे ती फार स्वस्त तयार झाली आहे. केरळ विश्वविद्यालयाचा परिसर गावाबाहेर १२ मैलांवर आहे. हा विभाग पण डोंगराळ असून अद्याप हिरवळ दिसते व नवीन झाडे लावीत आहेत. इथे जीवशास्त्र विभागात माझे प्लेगवर भाषण झाले. माझे दोन शिष्य ज्यांनी मुंबईला पदव्युत्तर शिक्षण घेतले ते इथे प्राध्यापक असून त्यांचे विद्यार्थी आता पीएच. डी. करीत आहेत. इथून नेलेली ज्ञान-ज्योत आता तिकडे तेवीत आहे.

डॉ. प्रसाद यांच्याकडे फराळ जेवण केले. त्यांच्या पत्नीने अक्षरशः २५ पदार्थ केले होते. इडली, दोशा, वडा, पुरणपोळी, नारळवडी, पायसम, चार भाज्या, तीन प्रकारच्या कच्च्या चटण्या, फ्रूटसॅलड आदी जेवण करूण घरी आलो. पुढील प्रवासाची तयारी केली.

सकाळी बसने निघालो. नारळ, सुपारीने नटलेला परिसर, खाडी, कालव्याने बहरलेला निसर्ग, भातशेती, काथ्या, दोऱ्या, पायताण, यांचे उद्योग दोन्हीकडे दर मैलावर दिसत होते. म्हातारे केरळीय पोशाखात, तर तरुण पॅन्ट-शर्ट घालून होते. समशीतोष्ण अशा वातावरणातून प्रवास करीत आम्ही कोवालम चौपाटी गाठली. इथे जरा भटकलो. नारळ पाडणाऱ्यांना गुंगारा देत समुद्रकिनारा गाठला. किनाऱ्याला लागूनच छोट्या मोठ्या टेकड्या होत्या व त्या परिसरात लहानलहान घरकुले विखुरली होती. त्या रम्य नारळी-

पोफळीच्या बनात ही छोटी घरे उठून दिसली. जवळपास वस्ती नाही, पण या सर्व घर. कुलात नूतन जोडपीच दिसली. फार लांबूनलांबून – मुंबई, दिल्ली, बनारस, कलकत्ता वगैरे ठिकाणांहून मधुचंद्राकरिता आलेले हे नवविवाहित शांत व रम्य वातावरणात रमत होते– (कोवालमचे नाव बदलून 'हनीमून आयलँड' ठेवावे.)

आता बस पद्मनाभपूरमला आली. एका भव्य दारासमोर आम्ही उतरलो. या दाराच्या आत ४०० वर्षांपूर्वीचा राजवाडा होता. अगदी लाकडांनी बांधलेला. या राजवाड्यावर कवेलू होते. आतली फरशी तर अगदी आरशाप्रमाणे चकाकत होती. काथ्या चुना, गूळ, डिंक, बेल आदीच्या मिश्रणाने केलेली ही फरशी अद्याप शाबूत तर आहेच, पण त्या चकाकीत प्रतिबिंब स्पष्ट उमटते. वाड्याच्या शिड्या अरुंद व पायऱ्या उंच असल्यामुळे वर जाताना त्रास होतो. पण पडशा इतक्या लांब व भव्य आहेत की कुणाचा खून झाला तरी कळणे कठीण. स्वयंपाकघराजवळ लाखेने लिंपलेले ३८ मोठे रांजण आता रिक्त दिसले. राजेशाहीत ते विविध प्रकारच्या लोणच्यांनी भरून ठेवीत. तिसऱ्या मजल्यावर शयनागार होते. राजेसाहेबांचा पलंग ६४ वनस्पतींच्या लाकडाने बनला होता सर्वांत वरच्या मजल्यावर पद्मनाभ स्वामींचे चित्र असून अखंड दीपमाला तिथे तेवत होती. जुनी कला, लाकडी शिल्पे, विविध घटनांची रंगीत छायाचित्रे कैक खोल्यांतून प्रदर्शित केली होती. हजार लोक एका वेळी जेवणाला बसतील असे मोठे हॉल, पिण्याच्या पाण्याच्या लहान विहिरी, स्नानगृहे, आदी, अद्याप उत्तम स्थितीत आहेत. सगळा वाडा पाहण्यास दोन तास तरी लागतात. तो अद्याप चांगल्या स्थितीत आहे. मला दोनच सूचना कराव्या लागल्या. एकतर सगळा वाडा लाकडी असल्यामुळे अग्नीपासून प्रतिबंध व्यवस्था हवी व दुसरे, येथील काही लाकडाला वाळवी लागलेली दिसली. या दोन गोष्टींपासून बचाव केला तर वाडा आणखी १०० वर्षे टिकेल.

आम्ही दक्षिणेकडे चाललो होतो. नारळ व झाडी संपून शेती व पठार लागले. सूर्याची उष्णता भासू लागली. धुरळा, उष्णता व तहान यांना तोंड देत आम्ही सुचिन्द्रमच्या देवालयाजवळ आलो. मोठे देऊळ आहे व आत ३० फूट उंच मारुतीरायाची प्रतिमा आहे – पण जोडे व सर्व कपडे काढल्याशिवाय आत प्रवेश नाही. लुंगीसुद्धा भाड्याने मिळत नव्हती. मी आत गेलोच नाही. बाहेरील रथ, दुकाने, नारळ, पाणी यातच वेळ घालविला.

कन्याकुमारीला भर दुपारी पोचलो. जेवण तेथील बसक्या हॉटेलात घेणे जीवावर आले. ते केळीचे पान, तो भाताचा डोंगर व त्या डोंगरावरून वाहणारा सारम्चा लोंढा. माझे तरी मन विटून गेले.

देवीच्या देवळाकडे वळलो. मंदिर, पुजारी व अर्चकाने ते इतके ग्रासले होते, की वीटच येत होता पत्नी तर आत गेली. मी जोडे दुकानात ठेवले. सर्व कपडे काढले. नुसती लांडी चड्डीच ठेवली व सर्वांचे गाठोडे खांद्यावर टाकून प्रवेश केला. कपडे चालत नाहीत,

पण अर्धनग्न चालतो असे दिसले. खूप फेरा घालून देवीच्या गर्भगाराजवळ आलो. इथे अंधार होता. तेलाच्या मिणमिणत्या पणत्या लुकलुक प्रकाश देत होत्या. लांब भिंतीशी मध्यावर कन्याकुमारीची काळचा पाषाणाची मूर्ती उभी होती. नाका-कानावरील टपोरे हिरे झगमग प्रकाश देत होते. तिच्याकडे पाहून नमस्कार करणार तोच पुजाऱ्याने धक्का 'दला—" आगे आगे !" तो कोकलत होता.

बाहेर आलो. कपडे घातले व जवळची बोट घेतली. विवेकानंद मंदिराकरता या बोटीनेच जावे लागते. लाटा जोराने आपटतात व कपडे भिजतात. मंदिराच्या भव्य शिळे-जवळ बोट थांबली. सुंदर व्यवस्था, स्वच्छ वातावरण, पिण्याचे शुद्ध पाणी, स्वयंसेवकांची मदत, या सर्व साधनांमुळे परिसर आनंददायक वाटला. "देवीपाद" नामक देवळात शिरलो. शिलेवर दोन पादचिन्हे आहेत. या चिन्हांना काचेच्या चौकटीत बंद केले आहे. या काचेवर फुले टाका, जवळच्या पेटीत दक्षणा टाका व प्रदक्षिणा करा. कपडे असू द्या. जोडे ओळीने खालीच चौकीदाराजवळ ठेवा, अशी सोय होती. समोर उंच भव्य काळ्या पाषाणाचे देऊळ आहे. इथे स्वामी विवेकानंदांचा ब्राँझचा पुतळा उभा आहे. दर्शन घेतले. मागे अध्यात्म्याची पुस्तके, स्वामींचे चरित्र, चित्रे आदींचे स्टॉल होते. खाली मोठा हॉल होता. आत जरा अंधुक प्रकाश दिसला. भिंतीच्या मध्यावर ॐ या प्रणवाचे पितळेचे ४ फूट उंच अक्षर रोवले होते. त्यावर मंदसा प्रकाशझोत फेकला होता. चोहीकडे 'शांतता' असे लिहिले होते. हॉल मोठ्या सतरंजीने भरला होता. बरीच मंडळी पद्मासन घालून ॐ काराचा नाद करत ध्यानस्थ बसली होती. मी पण बसलो. दहा मिनिटे शांत चित्ताने ध्यान केले. थकवा कमी झाला. जरा तजेला आला.

बोटीतून परतलो. रेस्ट हाऊसच्या पलीकडे म. गांधीच्या मंदिरापासून दूर समुद्र-किनाऱ्यावर भारताच्या अगदी दक्षिणेच्या शेवटच्या टोकावर उभे राहिलो. सायंकाळ झाली होती. बरीच गर्दी जमली होती. सूर्यनारायणाची प्रखर उष्णता कमी होत होत आता आकाशात गोल लालीच दिसत होती. हळूहळू ती अरबी समुद्रात विलीन झाली. सूर्यास्त झाला. या दक्षिण टोकावर उभे राहिल्यास डावीकडे सूर्य उगवताना दिसतो व उजवीकडे मावळताना आढळतो. एकाच स्थानावरून उदय आणि अस्त दाखविणारा भारताचा दक्षिण किनारा– कन्याकुमारी– इथेच तीन समुद्रांचा त्रिवेणी संगम आहे. अरबी समुद्र, बंगालचा उपसागर व हिंदी महासागर. तिन्ही समुद्रकिनाऱ्यांवर वेगवेगळ्या आकाराची व रंगाची वाळू आहे. या विविध रंगांच्या, विविध ढंगाच्या वालुकामय किनाऱ्यावर विविध जीव जगतात – आपल्या भारतभूमीच्या विविधतेतील एकात्मतेचे हे स्थान प्रत्येक नागरिकाने पाहावे व या देशाबद्दल अभिमान वाटून धन्यता मानावी.

*( या घटनेचा काल १९८३ )*

# १० : पाँडिचरीच्या मार्गावर

वारकरी पंथाचे भक्तगण आषाढी व कार्तिकी एकदशीनिमित्त दिंडी घेऊन पंढरपूरला जातात. पंढरीनाथाचे दर्शन 'याचि देहि याचि डोळा' घेणे हा एक त्यांचा उद्देश असतो. हरिनामाचा गजर महाराष्ट्रातील खेडोपाडी होत असतो व देवावरील श्रद्धेला त्या मिरवणुकीने तजेला चढतो. काही मंडळी या दिंडीकडे अंधश्रद्धेच्या काचेतून बघतात तरी पण कै. सोनोपंत दांडेकर यांनी अशा यात्रेस जिवंतपणा तर दिलाच, शिवाय वारकऱ्यांची श्रद्धा आणखी बळकट केली.

वारकरी पंथ महाराष्ट्रापुरताच आहे, पण तशी यात्रा व श्रद्धा इतरत्रसुद्धा दिसते व ऐहिक, पारमार्थिक मोक्षाकरता भक्तगण वाटेल तसे कष्ट सोसतात. मकर संक्रांतीनिमित्त शबरीमलाईच्या भगवान अय्यपनच्या यात्रेकरूंचे दृश्य मला नुकतेच गुंटकल ते मद्रास स्टेशनावरील प्लॅटफॉर्मवर दिसले. 'स्वामी शरणम्' या जयघोषात महिनाभर उपवास केलेले यात्रेकरू काळी लुंगी, गळयात पुष्पमाळा, कपाळावर भस्म व डोईवर दोन पुरचुंडी व त्यावर फुलमाळा धारण करून लगबगीने गाडीत बसत होते. या यात्रेत सुस्नात महिलांना मज्जाव आहे. लहान बालिका व वयस्क स्त्रिया तुरळकच दिसत होत्या. केरळमधील कोट्टयायम स्टेशनवर ही मंडळी उतरणार. डोईवरील पुरचुंडीचे दोन विभाग असतात. एकात तांदूळ व छिद्र करून पाणी काढलेले नारळ. तिच्यात तेल, तूप भरून बंद केले जाते. हे पदार्थ देवाला अर्पण करायचे म्हणून एका पुरचुंडीत ठेवतात. व दुसऱ्यात मार्गावरील स्वत:करिता घेतलेला शिधा असतो. सगळया प्रवासात ते गाठोडे डोक्यावरच असते

आगगाडीनंतर बऱ्याच अंतरापर्यंत बसप्रवास असतो, व शेवटी पायीच दोन-तीन डोंगर पार करावे लागतात. रात्री उघडया जंगलात निजावे व स्वत:चे स्वत: शिजवून घ्यावे, असा कार्यक्रम असतो. मकर संक्रांतीच्या सुमारास यात्रिक मंदिराच्या पायथ्याशी येतात. इथे मात्र एक मुस्लिम शिष्याचे थडगे असून गेल्या वर्षी जंगलात काही लाकडी क्रूस पण रोवलेले दिसले. ('सर्वधर्म समभाव') संक्रांतीच्या सुमारास अनंतातून एक ज्योत येऊन मंदिरात प्रवेश करते असा समज आहे. ऐहिक साधनांच्या प्राप्तीकरिता

इतके कष्ट करतात व भगवान अय्यप्पा त्यांना पावतो.

ही यात्रेची गर्दी पाहत आम्ही पण एका 'जत्रे' करिता १ जानेवारी १९८३ ला दादर स्टेशन सोडले. अध्यात्म व विज्ञान यांचा समन्वय कसा होईल व तो कुठे दिसेल काय, अशी या यात्रेपूर्वीची आमची इच्छा होती.

दुसऱ्या दिवशी आम्ही रेणिगुंठा स्टेशनवर उतरलो. स्वयंसेवकांच्या मदतीने सामान बसपर्यंत आले व त्यांनी १२ मैल मार्गक्रमण करून शहराच्या मध्यभागी खूप गर्दीच्या जागी आम्हाला हॉटेलवर सोडले. या प्रशांत हॉटेलचा पहिला मजला गर्दीने तुडुंब भरला होता. दालन सोडले की पलीकडे मोठा हॉल होता व इथे जेवणावळ चालू होती. केळीच्या पानावर द्रवरूप सारम् किंवा रसम् ओतला जाई, भाताचे कडे करून त्या रसाचा लोंढा अडवीत असत व त्या पिष्टमय अन्नाचे लांबट पिंडासारखे गोळे तोंडाकडे जात. तो झेल नेमका टिपून, पोस्टबॉक्समध्ये पत्र जाते त्याप्रमाणे जठराकडे त्याची रवानगी होत असे. या गर्दीतून वाट काढीत आम्ही पहिल्या मजल्याकरिता जाणाऱ्या पायऱ्यांकडे वळलो. दहा पायऱ्या चढणार पण त्या अरुंद पायऱ्यांच्या एका कडेलासुद्धा गर्दी होती. पहिल्या पायरीवर आठ वर्षांचे पूर्ण मुंडण केलेले बालक भिंतीला टेकून निजले होते. दुसऱ्या पायरीवर वीस वर्षांची तरुण स्त्री दिसली. हिरवे पातळ, हातात हिरवा चुडा, पाटल्या, मांडीवर स्तनपान करीत असलेले मूल, गळ्यात मंगळसूत्र, कंठी, कपाळी सुंदर कुंकू–पण डोके पूर्णतया मुंडण केलेले होते. तिच्याकडे पाहून आमची पत्नी म्हणाली, 'हा काय अभद्रपणा!' प्रत्येक पायरीवर मुंडण केलेले स्त्री–पुरुष पहुडले होते. वर गेलो. नाव दप्तरदाखल केले. मग गॅलरीतून खाली पाहिले. समोर बसस्टँड होता. वाहतूक भारी होती, पण पलीकडे दुकानातून सौभाग्यवस्तूंची बाजारपेठच लागली होती. गंगावने या दुकानातील विशेष आकर्षण दिसले. 'देवाला' नवस म्हणून यात्रेकरू डोईवरचे केस अर्पण करतात. केसांचा लिलाव होतो. त्यांचे गंगावन बनते. या केसांना परदेशात मागणी असून या देशाला परकीय चलन आपल्या नवसापायी प्राप्त झाले आहे.

आता जेवणाकरिता धडपडलो. भात आणि सारम् जेवून पोट भरणार नव्हते. दोन-तीन हॉटेल्स पालथी घातली. पोळी–चपातीची मागणी केली. पण त्यांना ती समजेना. मग एकाने स्वत: सांगितले, 'बंबई खाना मांगता'– म्हणजे त्या जेवणात चपाती, पुरी किंवा पोळी असते. चपाती हे उत्तरेकडील खाद्य, पण दक्षिणेत ते मुंबईच्या नावाला चिकटलेय.

आमची यात्रा होती, 'सायन्स कॉंग्रेसची!' अध्यात्म व विज्ञान यांचा समन्वय पाहण्याची. त्याप्रमाणे दुसऱ्या दिवशी यात्रेला प्रारंभ झाला. रिक्षातून पेंडॉलवर पोचलो. पोलीस बंदोबस्त कडाक्याचा होता. हातातील साधी पिशवी पण आत नेण्याची मनाई होती. पाच हजार प्रेक्षकांच्या खुर्च्यांच्या रांगापासून व्यासपीठ ५० फूट लांब होते. मागील कपड्यावर श्री बालाजी देवतेची भव्य आकृती चितारली होती. भोवताली मंगल कलश–

कमळ-चक्र यांच्या आकृत्या होत्या. देवाचे लक्ष व्यासपीठावरच होते. दहाच्या ठोक्याल पंतप्रधान इंदिरा गांधींचे आगमन झाले. त्या स्थानापन्न झाल्यावर शुभ्र धोतर, उपर धारण केलेल्या भस्मार्चित शेंडीधारी ब्राह्मणांनी स्वस्तिपाठ सुरू केला. वेदांच्या ऋचां घनपाठ झाले. उपकुलगुरूंनी श्री बालाजी महाराजांच्या कृपाप्रसादाची अपेक्षा व्यक्त केली व कार्यक्रम सुरू झाला. वैज्ञानिकांना इनामे, परदेशी वैज्ञानिकांचे स्वागत, श्रीमती इंदिर गांधींच्या वैज्ञानिकांकडून अपेक्षा व शेवटी. डॉ. राव यांचे विद्वत्ताप्रचुर आधुनिक वैज्ञानिक संशोधनाने भरलेले अध्यक्षीय भाषण झाले. वेद आणि विज्ञान एकत्रित आले

साडेअकराला कार्यक्रम आटोपला. आता ऐहिक फलांकडे लक्ष लागले. जुन्य मित्रांची भेट, परीक्षक नेमण्याचे आमंत्रण, नवीन नोकऱ्यांचा शोध व एकमेकांची स्तुतं या कार्यातच मंडळी गर्क होती. तिरुमलईची बस तर गच्च भरली. तीन वाजता ती सात डोंगराकडे निघाली. सुरुवातीच्या खिंडीतच ३० फूट उंच सिमेंटची गरुडाची प्रतिमा उर्भ होती, व मध्यावर ४० फूट उंच श्री मारुतीरायाची मूर्ती दिसली. जवळच हरिणांचे खुर अरण्य होते. मंदिरात स्पेशल तिकीट काढून दोन मिनिटे दर्शन झाले. हुंडीचे मोजमाप मा बराच वेळ पाहावयास मिळाले. या हुंडीपायी देवास ४० कोटी रुपयांचे वार्षिक उत्पन्न होते असा अंदाज आहे. भक्तिभावाने दर्शन घेऊन खाली आलो व डॉ. हक्स्ले यांचे विचारगर्भ वैज्ञानिक भाषण ऐकले. भाषण संपताच 'श्रीनिवास कल्याणम्' नामक नृत्य नाटिका सादर करण्यात आली. एकाच कुटुंबाने कैक सोंगे घेऊन फारच आकर्षक नृत्य केले इतकी सुंदर वेषभूषा मुंबईत पण दिसत नाही. भगवान विष्णूला श्री भृगु ऋषींनी छातीवर लाथ मारली, पण विष्णू रागवला नाही. उलट त्याने भृगु ऋषींची माफीच मागितली व पायाला दुःख तर झाले नसेल ना, या आमिषापायी त्या ऋषींचे त्यांनी पाय धरले व मर्दन करू लागला. ही कृती साधी दिसली तरी ती फार धूर्तपणाची होती. पायाचे मालीश करतानाच श्री विष्णूने त्या ऋषींच्या पायात असलेली ('डोळा') दिव्यशक्ती काढून घेतली व भृगु ऋषींच्या बलाचे हरण करून त्यांना नेहमीकरिता हतबल केले. अध्यात्माजवळचे विज्ञान हेच काय ?

अग्रतः चतुरो वेदान्-पृष्टतः शसरं धनुः ।
इदंक्षात्र, इदंब्राह्म-शापादपि शरादपि ।।

हा अध्यात्म व विज्ञानाचा समन्वय ! असे विचार मनात घोळत होते. तितक्यात डॉ. हक्सले यांच्या हस्ते कलाकारांना भेट देण्यात आली व त्या दिवशीचा कार्यक्रम संपला.

दुसऱ्या दिवशी निबंधवाचन व वैज्ञानिक लेखांचा आढावा घेत सरळ रेणिगुंठा स्टेशनवर आलो. मद्रासची गाडी धावतपळत गाठली. ५-३० च्या सुमारास मद्रास स्टेशन आले. तसा मी या स्टेशनावर बरेच वेळा येऊन गेलो. मला तर येथील रिटायरिंग-रूम व स्टेशन स्टाफची वागणूक फार आवडत असे. पण या समयी बराच बदल दिसला.

एक तर बेडरोल मागितल्यास ते केवळ तामीळनाडू एक्स्प्रेसवरच देऊ केले. इतर गाड्यांना मिळत नसे. तसेच पहिल्या वर्गाच्या उतारूंना रिटायरिंगरूम रात्रभर मिळत असे, पण आता तिथे मीटिंगकरिता येणाऱ्या मध्यवर्ती शासनाच्या ऑफिसर्स व त्यांचे कुटुंबीय यांनाच मिळते. फर्स्टक्लास वेटिंग रूमचे रूपांतर अगदी फूटपाथच्या अखंड गर्दीप्रमाणे दिसले.

स्टेशनवर नातवंडे आली होती. तामीळ भाषेत बोलल्यास रिक्षावाला कमी भाडे आकारतो असे तेथील बाचाबाचीमुळे कळले. सायंकाळी ७ ला बस केली व पाँडिचेरीकरिता प्रस्थान ठेवले.

रात्री १२ ला पाँडिचरीला पोचलो. रात्रभर आराम केला. सकाळी खोलीचे दार उघडून बाहेर पडलो. आम्ही जिपमेर संस्थेच्या मेडिकल कॉलेजच्या परिसरात उतरलो होतो. लाल माती व वाळूची जमीन चहूकडे मृदसंहाराने नष्ट झाली होती. पावसामुळे दऱ्या निर्माण झाल्या होत्या. हिरवळ दिसत नव्हती. गुरे त्या दऱ्यातील कचऱ्यावरच चरत होती. लांब ताडवृक्षांच्या चार रांगांतून सूर्यप्रकाश डोकावत होता. या वैद्यक महाविद्यालयाच्या निवासाला 'धन्वंतरी नगर' असे आयुर्वेद महर्षींचे नाव दिले होते. एक-दोन चौरस्ते दिसले व तिथे मध्यावर संगमरवरी पुतळे दिसले. ॲलोपथी पद्धतीचे शिक्षण देणाऱ्या या संस्थेत लिस्टर, पाश्चर, जेनर यांचे पुतळे नसून चरक, सुश्रुत, आदी आयुर्वेद महर्षींचे स्मारक दिसले. या संस्थेचे आद्य संचालक एक मराठीभाषा तज्ज्ञ डॉ. वेंगसरकर होते व त्यांनी आयुर्वेदाचा इथे गौरव केला आहे.

तत्त्ववेत्ते श्री अरविंद, पाँडेचरी इथे आले व त्यांनी आत्मज्ञानाची तपस्या सुरू केली. पुढे त्यांच्या कार्यास हातभार लावणारी एक टघुनिशियन फ्रेंच महिला आश्रमात आली. तिलाच पुढे माताजी (मदर) म्हणू लागले. या माताजींनी ध्यानधारणेला प्रोत्साहन तर दिलेच पण शारीरिक व्यायाम, हस्तव्यवसाय, आंतरराष्ट्रीय शिक्षण व सहजीवन याला खूप हातभार लावला. त्यांची इच्छा होती की एक शांततेचे शहर असावे. सगळ्या राष्ट्रातील लोकांनी तिथे एकत्र राहावे व साधनेला तजेला देऊन महामानव निर्माण करावा. त्यामुळे मानवाची व या संसाराची उत्क्रांती श्री अरविंदांच्या तत्त्वज्ञानाप्रमाणे होत राहील.

पाँडेचरीजवळच मृदसंहार झालेली कैक एकर पडित जमीन त्यांना मिळाली. या जमिनीच्या मध्यभागी एका सिमेंट कॉंक्रीटच्या कलशात बऱ्याच राष्ट्रांतून मूठ मूठभर माती त्या त्या देशातील श्री अरविंद भक्तांनी आणून टाकली. भोवतालचा भाग आकाशगंगेचा आकार देऊन वाढवावा व त्या उत्पन्नातूनच निर्वाह करून साधना करावी, अशी माताजींची इच्छा होती. दुर्दैवाने त्या आता नाहीत.

मी पाँडिचरीला आल्याचे कळल्यावर आरोविल गावातून श्री. पीटर जीप घेऊन आले. कैक देशातील तरुण-तरुणी या वसाहतीत आहे. अगदी जुजबी वस्त्रे परिधान

केलेल्या या तरुणांनी मातादेवींचे स्वप्न साकार करण्याचा विडाच उचलला होता. त्यांनी नेबुला आकारित मृद कलश, मंदिराजवळील परिसर दाखविला. लागूनच मातृमंदिराची उभारणी होत आहे. हे गौरवर्णी तरुण, उभारण्याचे सर्व कार्य इंजिनीयरिंग, मेसन, सुतार आदी स्वत: करीत आहेत. हे मातृमंदिर उंच, गोलाकार होत असून वर मध्यावर भिंगे असतील. आत साधक ध्यान–धारणा करतील व त्या समयी सूर्यप्रकाशामुळे भिंगाचा परिणाम ज्योती निर्माण करील अशी कल्पना आहे.

मृदसंहार झालेल्या जमिनीवर ग्लिरासीडिया, कॅशुरिना व झुडुपे बांध करून पेरलीत. दर वर्षी माती गोळा होऊन अन्न, फले व फुलांची झाडे उगवू लागली आहेत. एवढ्या वृक्षराजीवर एक डच कुटुंब जगले, चार महिने नुसता आंबा (कच्चा व पिकलेला) आणि ताक एवढेच त्यांचे अन्न होते. भांडी स्वत: केली ती मातीचीच होती. घर– शाकारलेली झोपडीच होती. निजण्याला पाचोळा व त्यावर खादीची चादर दिसली. आता त्यांनी वाऱ्यावर प्रयोग सुरू केला आहे. विंडमिल उभारली व तिथून विहिरीचे पाणी काढण्याची शक्ती म्हणजे दोन बल्ब जळतील एवढी वीज आणली. दोन गुरे व एक घोडा आला. शेणाचा बायोगॅस तयार केला. त्याचा उपयोग जळण म्हणून होतो. काही तरुणांनी सौर ऊर्जा घेऊन पंप तयार केले. पाणी गरम झाले, अन्न शिजवता आले. लहान इलेक्ट्रॉनिकचे धंदे सुरू केले. मुलांच्या शाळा सुरू झाल्या. वनस्पतींचा उपयोग करून औषधी निर्माण केली. आता तो परिसर हिरवागार झाला आहे. युनेस्कोच्या नजरेत भरला आहे. त्यांनी मदत सुरू केली आहे. मध्यवर्ती शासनाने आदर्श खेडूत वसाहत म्हणून मान्यता दिली एक ऑफिसर तिथे मदतीला ठेवला. कृषी, फलोत्पादन, औषधी आदींचे वैज्ञानिक संशोधन सुरू झाले व आध्यात्मिक साधकांनी नवजीवन आदर्शाचा पायंडा उभा केला.

मातादेवींच्या स्वप्नाला आधुनिक रूप आरोविल येथे लाभले. पण तिकडे आश्रमात भक्तांनी महामानव निर्माण करण्यात ध्यान–धारणेची परंपराच सुरू केली पाँडिचरी ही फ्रेंच वसाहत होती. श्री अरविंदांनी इथे तपस्या केली व आश्रम सुरू झाला पाँडिचरीला डोळ्यात भरतील अशा दोन-चार गोष्टी आहेत एक तर इथे अद्याप भुरट्या चोरांचा पत्ता नाही. दुसरी, अख्ख्या भारतात नसतील अशा दोनतीन हजार सायकली रांगेनी सडकेच्या कडेला ओळीने दिसतील. तिसरी इथे काजू फार स्वस्त मिळतो. ३० ते ४० रुपये किलो. चवथी म्हणजे, इथे जनसंख्येच्या मानाने सिनेमागृहे पुष्कळ असून सर्व तामीळ चित्रपट दाखवितात.

श्री अरविंद आश्रमात प्रत्येक साधकाला व्यायाम करावा लागतो. काहीतरी विधायक कार्य करणे आवश्यक आहे. कलाकुसरी, हातमाग, उदबत्ती, छपाई, कैक हस्तव्यवसाय कार्यात साधक गुंतलेले असतात. मुला–मुलींची एक शाळा आहे. वर्गात १० पेक्षा जास्त विद्यार्थी नाहीत. विषय अमाप आहेत परीक्षा नसते. एखाद्या विषयात विद्यार्थ्याने प्रावीण्य दाखविले की त्याला पुढील वर्गात घेतात. अगदी कॉलेजच्या दुसऱ्या वर्गापर्यंत शिक्षण

दले जाते. माध्यम फ्रेंच व इंग्लिश असून भारतातील प्रत्येक प्रांतातून, शिवाय जगातील क देशांतून विद्यार्थी इथे शिक्षण घेत आहेत. मला भाषणाचे निमंत्रण आले. 'वृक्ष-वेदना व संगोपन' या विषयावर तासभर बोललो. तो आंतरराष्ट्रीय विद्यार्थीसमूह व यांची प्रगल्भ विचारशक्ती पाहून वाटले, इथेच शिक्षक म्हणून राहावे.

श्री अरविंद यांच्या तत्त्वज्ञानाचे विवेचन श्री. पटेल यांनी केले. 'स्वत:ची साधना करताना सर्व जनमानसाची उत्क्रांती घडवून आणावी, महामानव निर्माण झाला पाहिजे. जगात तत्त्वत: वाईट अशी कोणतीच वस्तू नाही. फक्त त्यांच्या जागा योग्य नाहीत एवढेच. प्रत्येक वस्तू यथायोग्य ठिकाणी ठेवा, म्हणजे जग सुसंवादी झालेले तुम्हाला आढळेल,' असे ते म्हणाले.

फ्रेंच वसाहतीत श्री अरविंद आश्रमातील सुबक रंगीत फुलझाडांनी बहरलेल्या बागेत शिरलो. एका पेल्टो फोरम झाडाखाली रेशमी छतांनी झाकलेला संगमरवरी चबुतरा दिसला. या चबुतऱ्यावर अति उत्तम व सुंदर पुष्पमाला पसरून डिझाईन काढले होते. चहूकडे अगदी नि:स्तब्ध शांतता होती. उदबत्तीचा सुगंध दरवळत होता. साधक डोळे मिटून शांत बसले होते. काही साधकांनी त्या चबुतऱ्यावर मस्तक ठेवले होते. आम्ही पण तसेच बसलो. डोळे मिटले व कवी पाडगावकरांची कविता एकदम आठवली, 'शब्दावाचून कळले सारे– शब्दांच्या पलीकडले' तो कुसुमाच्छादित चौथरा म्हणजे प्रख्यात तत्त्ववेत्ता श्री अरविंद यांची समाधी होती. अध्यात्माची ज्योत तेवत होती. देवी माताजी त्याच समाधीत विलीन झाल्या होत्या. विज्ञान व ऐहिक तपस्येची वात तिथेच विलीन झाली. अध्यात्म व विज्ञानाचा समन्वय इथेच झाला असेल काय ?

*(या घटनेचा काळ १९८३)*

# ११ : काशी : एक प्राचीन शहर

भारतवर्षात गंगा-यमुनेचा प्रदेश फार पवित्र मानला जातो. भगीरथासारख्या तंत्रज्ञाने गंगोत्री आणि यमुनोत्री यांना हिमालयाच्या दरीत धरणे बांधून या नद्या आपल्या देशात सोडल्या. सगळा उत्तर प्रदेश कसा सुजलाम सुफलाम होऊन गेला. पुढे बिहार आणि बंगाल प्रांतात अगदी गंगासरोवरापर्यंत भूभाग सुपीक झाला. या सुलभतेपायी या नदीच्या काठी सुंदर शहरे उद्भवली. अगदी हरिद्वार, मथुरा, दिल्ली, कानपूर, प्रयाग, वाराणसी. पाटणा, कलकत्ता व ढाका ही शहरे कशी भरभराटीस आली. याचे वर्णन इतिहास आम्हाला देत आहे. याच भागात श्रीरामचंद्र, श्रीकृष्ण, भगवान बुद्ध, चैतन्य महाप्रभू, महामुनी व्यास, शुक्राचार्य, भारद्वाज यांच्यासारखे ऋषिमहर्षी व मंत्रद्रष्टे जन्माला आले, त्यांनी दिलेल्या ज्ञानाने भारतीय धर्म व संस्कृती बहरली. याच उत्तर प्रदेशात काशी बनारस हे बरेच प्राचीन शहर गणले जाते. अगदी बुद्धकालापूर्वी या देशात काही उत्तम शहरे स्थापन करण्यात आली. तिथे ज्ञान-विज्ञान-तत्त्वज्ञान बहरले. या शहरांची नावे सकाळच्या पाठात आपण रोज म्हणतो,

**अयोध्या मथुरा माया, काशी कांची अवंतिका ।**
**पुरिद्वारावतिश्चैव अष्टेते मोक्षदायकाः ।**

'काश्याम मरणे मुक्ती' असे एक सूत्र सांगत आहे. त्याप्रमाणे काशी म्हणजे जिला आता वाराणसी म्हणतात, ज्ञान आणि विज्ञान यांचे आगर झाले. अलीकडे तर संत कबीर, संत तुलसीदास यांच्या काव्यांनी येथील लोकसंख्येत आपला धर्म जिवंत राहिला. या सुपीक प्रांतावर कैक परदेशी हल्ले झाले. येथील कला व शिल्प भग्न झाले. तरीपण आपल्या संस्कृतीचा गाभा या संत आणि साधूंनी जिवंत ठेवला. भगवान बुद्धाने धम्मचक्र इथूनच परिवर्तित केले. कबिरांनी हिंदू धर्मावर व मंदिरावर होणारे हल्ले पाहून लोकांना वेदान्त शिकविले. श्रीतुलसीदासांनी संकटमोचन मारुतीची अखंड सेवा करून रामचरितमानस ग्रंथ प्रगट केला. या ग्रंथामुळे भक्तियोग बहरला.

एके वेळी १९६३–६४ साली बनारस येथील विश्वविद्यालयात अखिल भारतीय विज्ञान परिषद भरली होती. या परिषदेत विज्ञानाच्या बऱ्याच शाखा असतात. वैज्ञानिक आपापले संशोधनात्मक लेख इथे वाचतात. याशिवाय रोज सायंकाळी वैज्ञानिक दृष्टिकोनातून एखाद्या प्रतिथयश वैज्ञानिकाचे एखादे भाषण होत असते. इतर देशातून आलेल्या वैज्ञानिकांची ओळख व संशोधन करणाऱ्या तरुण वैज्ञानिकांचा सन्मान पण होतो.

या अशा कार्यक्रमात मला सर्प आणि सर्पविष या विषयावर जाहीर भाषण देण्याचे आमंत्रण आले. मुंबईहून दादर–वाराणशी एक्स्प्रेसने सहकुटुंब या परिषदेकरता निघालो. गाडी रात्री मोगलसराय स्टेशनवर पोहोचली. या स्टेशनची अशी ख्याती आहे की आगगाडीला लागणारा दगडी कोळसा इथे साठविला जातो व त्या कोळशावर तेथील झोपडीतील बहुतांश नागरिक कोळशाची चोरी करून व्यवस्थित जगतात. इथूनच परिषदेच्या स्वयंसेवकांनी आम्हाला काशी विश्वविद्यालयात नेले दुसऱ्या दिवशी पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी परिषदेचे उद्घाटन केले. हा कार्यक्रम सकाळी झाला. दुपारी निबंधवाचन होऊन सायंकाळी माझ्या भाषणाची वेळ आली. जवळपास तीन ते चार हजार वैज्ञानिक व त्यांच्या पाहुण्यांसमोर विषय मांडण्यास मी सुरुवात केली. सर्पाबद्दल जनमानसात बरेच कुतूहल असते. साहजिकच गावातील बरीच मंडळी तिथे उपस्थित होती. पारदर्शिका व फिल्म यांच्या संयोगाने व जिवंत प्रात्यक्षिकासंगे भाषण सुरू झाले. भाषणानंतर प्रश्न व उत्तरे चांगली रंगली. शेवटी त्या परिषदेचे अध्यक्ष डॉ. आत्माराम, ज्यांनी माझी सुरुवातीला ओळख करून दिली होती, ते पुढे आले व शेवटचे दोन शब्द आणि धन्यवाद देण्यास उभे राहिले. मी हात पुढे केला. पण ते मागे सरकले व म्हणाले, की, ‘तुमचा काही भरंवसा नाही. हातात किंवा खिशात साप लपविला असेल व तो माझ्या हाती देण्याची तुमची इच्छा असेल. मला भीती वाटते म्हणून मी हात मिळवीत नाही.’ बराच हशा पिकला व सभा संपली. सभेनंतर बऱ्याच वैज्ञानिकांनी गराडा घातला व प्रश्न आणि सही यांचाच भडीमार सुरू केला. ते काही असो. पण या भाषणानंतर मला जरा काळजी दूर झाल्यासारखे वाटले.

तिसऱ्या दिवशी गावात जावे असे मित्रांनी सांगितले. पण एकाने चक्क सांगितले, “रांड खांड संन्यासी, इनसे बचे तो सेवे कासी” ही म्हण ऐकून बरे वाटले नाही. ज्या काशीत आधुनिक काळात धर्ममार्तंड झाले, जेथील गागा भट्टांनी श्री शिवरायांचा अभिषेक केला, ज्या शहरात नागरी प्रचारिणी सभा आहे, जिथून हिंदीच्या खडी बोलीचा जन्म झाला, ज्या शहरातून ‘आज’ नावाच्या हिंदीच्या आद्य दैनिकाचा जन्म झाला, तिथे असे दिसणार नाही ही भावना मनात आली. तरी पण मनाची तयारी केली व गावात प्रवेश केला. विश्वविद्यालयाच्या बाहेर पंडित मालवीयजींचा पुतळा होता त्यांनी किती अथक प्रयत्न करून या बनारस विद्यापीठाची स्थापना केली. प्रत्येक राजे व संस्थानिकांकडून मोठ्या देणग्या घेऊन त्यांच्या नावे भारतीय कला दर्शविणाऱ्या इमारती उभा-

रल्या. इथे संस्कृत भारतीय तत्त्वज्ञान, वास्तुशास्त्र, पुरातत्त्वशास्त्र व आपला आयुर्वेद यांना त्यांनी प्राधान्य दिले. त्यांना आपल्या संस्कृतीची व शिस्तीची इतकी आवड होती की त्यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला पण छोटीशी इमारत उभारायला जागा दिली. याच विश्वविद्यालयातून कैक देशभक्त निर्माण झाले. कित्येकांनी देश स्वतंत्र करण्याकरता आत्मबलिदान केले. असे हे राष्ट्रभक्तीने ओतप्रोत भरलेले विद्यापीठ आहे. सगळा परिसर कसा हिरवागार असून कैक स्थळी मैदाने आहेत. या परिसराच्या मधोमध महादेवाचे मंदिर आहे. मंदिरात भिंतीवर धार्मिक ग्रंथातील उतारे चितारले आहेत. मंदिराच्या दोहो बाजूस उंच विटांच्या भिंती असून त्या रुंद भिंतीमधून कालव्याचे पाणी न्यावे अशी पंडित मदनमोहन मालवीय यांची एक महत्त्वाकांक्षा होती. गंगेचा एक प्रवाह कालव्यातून या विद्यापीठाच्या परिसरात आणावा व तो कालवा मंदिराभोवती फिरवून परत गंगेत सोडावा. मुद्दा हा की, हल्लीच्या वाराणशीत खूप गर्दी झाली आहे. शिवाय काशी विश्वेश्वराचे दर्शन व्यवस्थित होत नाही. यात्रेकरूंनी या विद्यापीठाच्या मंदिराजवळ यावे, गंगेच्या कालव्याच्या शुद्ध पाण्यात स्नान करावे व तेथील भव्य शिवमंदिरात शांततेने बसून प्रार्थना करावी. यात्रेकरूंची गर्दी पाहिल्यास खरोखर हा प्रकल्प झाला असता तर तेथे येणाऱ्या यात्रेकरूंच्या दक्षिणेमुळे या विद्यापीठाचा खर्च भागला असता. पण दुर्दैवाने तसे झाले नाही, तरी मंदिर फार सुबक आहे व प्रत्येक यात्रेकरूने तिथे बसून शांततेचा लाभ घ्यावा.

पंडित मालवीयजींचा पुतळा बघून एक आठवण आली की, अलिगढ मुस्लिम विश्व-विद्यालयाच्या परिसराच्या मध्यावर एक मोठी मशीद आहे व त्या मशिदीतच त्या विद्यापीठाच्या आद्य स्थापकाची कबर बांधली आहे. हा किती फरक ! एकाने कार्य करून बाहेर थांबावे व दुसऱ्याने आपल्या कार्यातच आपले थडगे येऊ द्यावे.

या मालवीयजींच्या पुतळ्यापुढे विणकरांची वस्ती आहे. इथेच संत कबीर जन्माला आले व इथूनच बनारसच्या रेशमी शालू आणि साड्या निर्माण होतात. डावीकडे वळ-ल्यास एक जुने मारुतीचे मंदिर दिसेल. त्या मंदिराजवळच 'असी' नावाच्या नदीचे छोटे खोरे आहे. हे मंदिर संकटमोचन हनुमानाचे होय. इथेच संत तुलसीदासांनी कष्टमय तपस्या केली व श्रीरामचंद्र आणि लक्ष्मण यांचे साक्षात दर्शन ("तिलक लेन रघुवीर") घेतले. तुलसीदासांनी उगाळलेले गंध प्रभू रामचंद्रांनी घेतले असा भास त्यांनी निर्माण केला. या संतांनी लिहिलेल्या रामायणाच्या प्रती प्रत्येक हिंदूच्या घरात सापडतील व त्यामुळे रामभक्तीला इथे उधाण आले आहे. जवळच अलीकडे एक नवीन इमारत उभारली गेली असून ती पाहण्याजोगी आहे.

परत विणकरांच्या वस्तीवरून मनकर्णिका घाटावर जावे व स्नान करणाऱ्या यात्र-

करूंची गंमत पाहावी. बांबूच्या छत्रीखाली बसणारे कैक पंडचे गंध, फूल, तुळस, दूध, दही यात्रेकरूंना कसे विकतात व कसे लुबाडतात याचे प्रात्यक्षिक इथे दिसते. आता तर विश्वेश्वर मंदिराकडे जाण्याचा मार्ग म्हणजे नुसत्या बोळी होत्या. १० फूट छोटयाशा बोळीत दोन्हीकडे दुकानाच्या ओळी आहेत व चालताना यात्रेकरूंना गुरे, वळू यांचे अक्षरशः धक्के खाऊनच जावे लागते. बाजूच्या दुकानातून बेल, फुले व प्रसादाकरता काही सामान घेतले. फुलांच्या पुडीकडे पाहत कैक गुरे मागेच लागली. कसेबसे त्यांच्यापासून सुटका करून घेऊन मंदिराच्या आत शिरलो. इथे पण आत गुरांचा सुळसुळाट होता. चोहीकडे ओल होतीच, पण गुरांचे शेण पण पडले होते. मुख्य गर्भगृहात खूपच गर्दी होती व अभिषेक करणाऱ्यांची जणू काही चढाओढच लागली होती. अभिषेक संपेपर्यंत बाहेर पोथी वाचावी म्हणून तेथील पडवीत त्या ओल्या जमिनीवर एक लाकडाची फळी टाकली व जुने वर्तमानपत्र अंथरून त्यावर पोथी वाचण्याकरता बसलो. तोच एक गाईने बेलफुलाचा पुडा हिसकावून घेतला. तशातच ४–५ त्रिपुंड्रधारी व रामनामाचे उपरणे पांघरलेले पंडचे माझ्या अंगावर जणू तुटून पडले. ते म्हणाले की, मी सरस्वतीचा अपमान करीत आहे, कारण वर्तमानपत्रावर बसलो होतो. त्यांच्या मते वर्तमानपत्र ही त्यांची सरस्वती होती व मी तिच्यावर बसून तिचा अपमान केला. तोपर्यंत मी उठलो. त्यांनी वर्तमानपत्र हिसकावून घेतले व प्रसादाचा पुडा नैवेद्य दाखवतो म्हणून काढून घेतला व सर्वांत कहर म्हणजे वर दक्षिणा मागू लागले. कसेतरी उठून गर्भगृहाच्या दाराशी उभे राहून प्रार्थना केली व मंदिराबाहेर पडलो. पलीकडे एक भव्य नंदीची दगडी मूर्ती होती व ती मूर्ती एका मशिदीकडे तोंड करून बसलेली दिसली. त्या मशिदीच्या खाली चबुतऱ्यावर आपल्या देवदेवतांच्या मूर्ती व कलेचे दर्शन झाले. अशी आख्यायिका आहे, की काशी विश्वेश्वराचे मंदिर याच मशिदीत होते. ते मंदिर तोडून औरंगजेब बादशहाच्या वेळी तिथे मशीद बांधण्यात आली. मला एका गोष्टीचे आश्चर्य वाटते, की ज्या पंडयांनी दांडगाई करून पोथी बाचण्यापासून मला परावृत्त केले व गावात जे लांब लांब काठ्या घेऊन फिरतात त्यांनी व त्यांच्या पूर्वजांनी काशी विश्वेश्वराच्या देवळाचे रक्षण का केले नाही ?

औरंगजेबनंतर, लांबून मराठे इथे आले व त्यांनी गंगेवर घाट बांधले. शिवाय हल्लीचे जे मदिर आहे ते राणी अहिल्याबाई होळकर यांनी बांधले व त्या मंदिरावर प्रख्यात शीख राजे रणजित सिंग यांनी सोन्याचा पत्रा चढविला. या शूर वीरांनी ती मशीद कशी राहू दिली ? इथलीच नाही, पण जिथे श्रीकृष्णाचा जन्म झाला त्या स्थळीसुद्धा मशीदच उभी आहे. होळकर सरकारने प्रयत्न करून तिथे पण एक मंदिर बांधले होते. प्रख्यात हिंदी कवी भूषण, "शिवाबावनी" या आपल्या काव्यात यथोचित असे लिहितात –

**कासी की कला जाती, मथुरा मसीद होती ।**
**सिवाजी न होते, सुनत होती सबकी ।।**

कवी भूषणचे भाकीत खरे ठरले. रघूजी भोसले यांनी छत्तीसगढ व ओरिसा जिंकून तिथे शासन केले नसते तर आज जगन्नाथपुरीचे देऊळ दिसले नसते. इतकेच काय, जर पेशव्यांनी अडथळा निर्माण केला नसता तर भोसल्यांनी कलकत्त्यापर्यंत धडक देऊन कंपनी सरकारला वेसण घातली असती व परिणामी भारताचा इतिहास वेगळाच घडून आला असता !

या अशा विचारांनी गर्क होऊन त्या बोळीतून घाटाकडे निघालो. त्या बोळीच्या कडेला आणखी लहानलहान वाटा फुटल्या होत्या तिथे काही स्थळी भांग घोटण्याचे कार्यक्रम चालले होते. पुढे एक दोन दुकानासमोर हिप्पी लोकांची वर्दळ दिसली. आत डोकावले तेव्हा अफू आणि गांजाची छोटी छोटी दुकाने लांबून दिसत होती. मोठ्या बोळातून पुढे सरकलो.

प्रसाद, फुले, पितळेची भांडी आदींची दुकाने पार करीत मोठ्या सडकेपर्यंत आलो. इथे मात्र मिठाईची दुकाने तर होतीच, पण भाजीवाल्याची चांगलीच पेठ लागली होती. या पेठेतील मला जे आकर्षण दिसले ते म्हणजे मोठी वांगी ! एकेक वांग्याचे वजन तीन ते पाच किलो असेल. तसेच मोठाले मुळे ठेवले होते. एकेक मुळ्याची लांबी २ ते ३ फूट असेल व रुंदी पाहिल्यास मुसळाची आठवण येत होती ! तिकडेच गोल व गोड मोठाले पेरू विकले जात होते. या सडकेच्या एका कडेला पहिल्या मजल्यावर रेशमी साड्यांची मोठी दुकाने होती. या दुकानात विणकर साड्यांचे गठ्ठे ठेवून जात होते. एका दुकानात आपल्या कुटुंबासह साडी घेण्यास शिरलो. त्या दुकानदाराने अक्षरशः ७५ साड्या उकलून दाखवल्या. यात कैक रंगाच्या साड्या, ज्यांच्यावर कलाकुसरीने काठ-पदर विणले होते. मनाला मोहून घेत होते. पन्नास वर्षांपूर्वी एखाद्या कुटुंबाने एकदा बनारसची साडी घेतली की ती जन्मभर वापरत होते. तसेच पितांबर लग्नात मिळाला की, जन्मभर पुरत असे. त्यांचे सोनेरी काठ प्रथम सोन्याच्या तारेचे व नंतर चांदीच्या तारेचे असावेत, म्हणजे साडी पितांबर फाटू लागले की या तारांची चांगलीच किंमत येत असे. आता मात्र तिकडे प्लास्टिकच्या तारा येऊ लागल्या आहेत. या दुकानदारांना मानवी मनाची चांगली ओळख असते. विशेषत: बायकांच्या आवडीनिवडीची चांगली जाणीव असते. माझ्या पत्नीने ७५ साड्या पाहिल्या. जवळपास दीड तास हे चालले होते. ती शेवटी थकून गेली व याच क्षणाची तो दुकानदार वाट पाहत होता व त्याने स्वतःच्या पसंतीची साडी पत्नीला विकत घ्यायला लावली. मात्र मुंबईपेक्षा या साडीची किंमत अर्धीतरी असेल. पसंत केलेली साडी त्यांनी दुसऱ्या दिवशी देतो असे सांगितले. विणकरांकडून आणलेल्या साडीला विशेष इस्त्री करून दुसरे दिवशी दिली.

हे सगळे वाराणशीचे वैभव बघत मी घाटावर गेलो. बोट करून गंगेच्या प्रवाहात पलीकडच्या टोकाकडे जाऊ लागलो. बोटीवरून काशीच्या घाटाचे, तिथे बसणाऱ्या पंड्याचे, स्नान करणाऱ्या स्त्री-पुरुषांचे दृश्य किती मनोहर होते ! सगळीकडे मंदिर

शिखरे, सोन्याचे कलश, अधूनमधून मशिदीचे मिनार, मोठमोठे वाडे व तो दगडी पायऱ्यांचा घाट हे सगळे कसे चित्रमय दिसत होते. इंग्लंडचे माजी पंतप्रधान चर्चिल इटालीच्या समुद्रतटाकी जाऊन घरांची व गावांची चित्रे रेखाटीत असत. आपल्या देशात असे कोणी चित्रकार राजकारणी असतील त्यांनी काशीला जावे व बोटीतून घाटाचे दृश्य पाहून चितारावे. त्यांच्या मनाला खूप शांती मिळेल. मला वाटते, काशी कशाकरता प्रसिद्ध असेल तर ती या बोटीतून गंगेचे घाट, देऊळ आणि इमारती डोळे भरून पाहाण्यात याकरताच ती प्रसिद्ध आहे.

हे सगळे डोळे भरून पाहून मी मनकर्णिका घाट व दशाश्वमेध घाटाकडे वळलो. केवढे मोठे ते घाट होते ! पण वरच्या चबुतऱ्यावर काही आगळेच दिसत होते. काशीचे सुंदरत्व पाहून या चबुतऱ्यावर जमणाऱ्या घोळक्याकडे वळलो, किती अमंगळ दृश्य आता दिसत होते ! " काश्याम् मरणे मुक्ती ' याचा अर्थ ज्ञानगंगेत डुंबून अध्यात्मात वावरणे म्हणजे मुक्ती असा होतो. पण इथे तर लांबून जनता येत होती, ती कशाकरता, तर या शहरी मरण्याकरता ! प्रेते जाळण्याकरता प्रेतांच्या कशा रांगा लागल्या होत्या. त्या क्रियेकरता तिथे डोम राजा आहे. त्यांनी जळत ठेवलेला अग्नी तो चांगले पैसे घेऊन विकतो व तसेच इंधनाचे लाकूड पण तोच विकतो. कैक प्रेते त्या तुटपुंज्या लाकडामुळे जळत नव्हती व ती अर्धजळलेली प्रेते गंगेत टाकली जात होती. या जलप्रवाहात कितीतरी सुसरी नांदत आहेत. त्यांना हे अन्न मिळत होते. तो सर्व किळसवाणा प्रकार पाहून मी एका टोकाला स्तब्ध उभा होतो. जवळपास काही भिकारी व साधू त्या प्रेताभोवती घोंघावत होते. मी तिथे उभा राहिलेला पाहून एक दाढीवाला गृहस्थ माझ्याजवळ आला व म्हणाला, ' क्या देखते हो ?' मी त्याला या प्रेतदहनाबद्दल व त्या घोंघावणाऱ्या साधूभिकाऱ्यांच्या कार्याबद्दल सांगितले. तो म्हणाला, ' गंगामाई पवित्र है. सब शुद्ध करती है. पानी के अंदर फेंके गये प्रेतोंपर लोग सिद्धी प्राप्त करनेका प्रयत्न करते है. ये तो बहोत मंगलमय दृश्य है !' त्याचे भाषण ऐकून मी जाऊ लागलो. पण त्याने मला थांबवून काशीच्या या दुसऱ्या प्रकारच्या तपस्येची जाणीव करून दिली. तो म्हणाला, जी प्रेते गंगेत फेकली जातात त्यापैकी काही प्रेतांवर काही लोक पिशाच्च-सिद्धी करतात. ज्यामुळे जनतेला ऐहिक जीवनात सुख आणि समृद्धी प्राप्त होते. माझा त्याच्या या गोष्टीवर तेव्हा विश्वास बसला नाही.

१९७२ साली मी मध्यप्रदेशात विलासपूर शहरी गेलो होतो. हे शहर मराठ्यांनी ज्या छत्तीसगढ विभागावर १७४२ ते १८३० पर्यंत राज्य केले, ज्या राज्याची राजधानी रत्नपूर होती. इथून १६ मैल दूर विलासपूर आहे. इकडे बरीच मराठी मंडळी स्थायिक झाली आहेत व या अनुषंगाने आमची पण दोन घरे विलासपूरला आहेत. तिथे बनारसहून शिकून आलेला माझा धाकटा भाऊ आयुर्वेदिक प्रॅक्टिस करत होता. त्याच्या दवाखान्यात बसलो असताना मिश्रा नावाचे (काल्पनिक नाव) एक गृहस्थ आले. माझ्या

बंधूंनी त्यांची ओळख करून दिली व तसे करताना मला सांगितले की यांना सिद्धी प्राप्त झाली आहे. त्यांना मी विचारले की सिद्धी म्हणजे काय ? ती कशी प्राप्त झाली ? व तिचा त्यांच्या कुटुंबियांना व जनतेला काय लाभ होतो ? त्यांनी सांगितले की शासनाच्या पी. डब्लू. डी. खात्यात ते एक साधे क्लार्क आहेत. त्यांना दोन-तीन मुले आहेत. दोन वर्षांपूर्वी घराचा खर्च अगदी जमत नव्हता कर्जबाजारी झाले होते. काय करावे हे त्यांना सुचेना. एकदा कंटाळून सुट्टी घेतली व काहीतरी करावे, ज्यामुळे घराचा खर्च भागेल व कुटुंबाची हालअपेष्टा होणार नाही याबद्दल विचार करू लागले. घरात काही सुचत नव्हते म्हणून काशीयात्रेच्या निमित्ताने वाराणशीला गेले. तिथे देवळात प्रार्थना केली. बरेच भटकले, पण मनाला शांती मिळेना. शेवटी असा विचार करीत एकदा मनकर्णिका घाटावर भटकत होते. तिथे ध्यानस्थ बसलेल्या एका साधूच्या मागे बरीच गर्दी पाहिली. त्या गर्दीत शिरले. त्यानंतर कैक दिवस त्या साधूभोवती अक्षरशः घिरट्या घालत होते. कर्मधर्मसंयोगाने एके दिवशी त्या साधूने माझ्या पाठीवर थाप मारली व म्हणाले, 'जा बेटा गंगा मे कूद और यें मंत्र सिद्ध कर ले' त्याप्रमाणे जास्त विचार न करता मी गंगेत उडी मारली व एका कोपऱ्यात प्रवाहामुळे आलेल्या प्रेताला धरून मंत्रसिद्धतेचा प्रयत्न सुरू केला. सात दिवस त्या कुजलेल्या प्रेताला घेऊन पाण्यात बुडून मी तपस्या करीत होतो. सातव्या दिवशी मला वाटले की प्रेत हलू लागले. मला आनंद झाला. मी आपल्या हाताच्या बोटाला चाकूने चीर दिली व ते रक्त प्रेताच्या उघड्या तोंडात टाकले व थोडे प्रसाद म्हणून मी घेतले. व( आल्यावर त्या साधूला झालेला प्रकार सांगितला. साधू हसला व म्हणाला, 'जाव रघुनाथ, (काल्पनिक नाव) तुम्हारे साथ रहेगा. तुम्हे मदत करेगा, पर उससे पैसे मत कमाना ! या घटनेनंतर मिठाई आणून प्रसाद वाटला व तो प्रसाद घेऊन घरी आलो.'

घरी आल्यानंतर घरची परिस्थिती पाहून मिश्राजींना उद्विग्नता आली. कारण त्यांच्या पत्नीने सांगितले की त्यांचा लहान मुलगा तीन दिवसांपासून घरी नाही. व घरात अन्नाचा कण पण नाही. मिश्राजीने 'ओ' म्हणत डोळे मिटले व कानावर हात ठेवून डोके खाली केले. तो त्यांना आश्चर्याचा धक्का बसला. कारण त्यांच्या कानात कोणीतरी बोलत होते की, 'बच्चा घंटेभरमे घर वापस आयेगा.' असे आवाज त्यांना कधी आले नव्हते व हा आवाज ऐकून ते जरा चकित झाले. सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्यांचे चिरंजीव घरी परत आले. काशीहून मिश्राजी परतले हे ऐकून त्यांच्या जवळपासचे लोक त्यांना भेटण्यास आले. त्यापैकी एकाचे नाव चौबे होते. बोलता बोलता चौबे म्हणाले, हमारे बेटेने नौकरी के लिये तुम्हारे ऑफिसमे अर्जी दी हैं, देखो क्या होता हैं ? या वेळीसुद्धा मिश्राजीने वैतागून डोळे मिटले व कानावर हात ठेवला. एकाएकी त्यांना शब्द ऐकू आले, 'नौकरी मील गयी, चपरासी कागज ला रहा है, कलसे कामपर आनेके लिये आदेश निकल गये है।' मिश्राजीने याबद्दल चौबेंना सांगताच त्यांना आश्च-

र्याचा धक्का बसला. व ते घरी जाताच दारावर चपरासी कागद घेऊन उभा असलेला दिसला. त्यांना खूप आनंद झाला. ताबडतोब त्यांनी ताट भरून जेवणाचा शिधा व मिठाई मिश्राजींकडे आणून दिली.

या गोष्टीला दोन वर्षे झाली. बरीच मंडळी मिश्राजींकडे हरवलेली वस्तू किंवा भविष्याबद्दल विचारणा करण्याकरता येऊ लागली. या अशा येणाऱ्यात बरेच आमदार, खासदार तर होतेच, शिवाय मंत्री पण त्यांना बोलावू लागले. घरी आता अन्नधान्याचा शिधा येऊ लागला. ज्यामुळे घरखर्चाची टंचाई दूर झाली. वाटले की आता घरात सुख व समृद्धी नांदेल पण बायकामुलांची प्रकृती एकाएकी ढासळू लागली. ज्या दिवशी हे मिश्राजी मला भेटले, तेव्हा माझ्या बंधूकडे ते औषध मागण्याकरताच आले होते. रात्री ते स्मशानात जाणार होते. व तिथे मध्यरात्रीपर्यंत शांत वातावरणात यज्ञ करणार होते. मला म्हणाले की, ' चला स्मशानात.' भुताखेतांशी भेटी करून देतो. मी नकार दिला. येईन असे म्हणून त्यांना सांगितले की काही दिवसांनंतर वेळ ठरवावी. ही क्रिया मी अवश्य अवलोकन करीन ! या गोष्टीला सहा महिने झाले नसतील तेवढ्यात मिश्राजींचे मला पत्र आले. त्यात त्यांनी मला लिहिले होते की, एके दिवशी त्या ' रघुनाथाचा शब्द कानी पडला. तो म्हणत होता, ' मैं अब जाता हूं.' बस्स ! याच्यानंतर ते शब्द कधीच कानी पडले नाहीत. त्यांना विस्मय झाला व आता काय करावे असा ते विचार करू लागले. बनारसला जाण्याचे तिकीट काढले. पत्नीचा निरोप घेण्याकरता स्वयंपाकघरात शिरलो, तर ती म्हणू लागली, ' अब मेरी और बच्चोंकी तबियत ठीक हो गयी !' म्हणजे रघुनाथ असेपर्यंत प्रकृती बिघडली होती व तो गेल्याबरोबर ती सुधारली. नंतर काशीला गेलो व त्या साधूला पुन्हा भेटलो. त्या साधूने म्हटले, मैंने रघुनाथको बुला लिया. ज्यादा लोभ मत करो. भगवान तुम्हे सुखी रखेंगे !'

वाराणशी ही धर्म तत्त्वज्ञान व ज्ञानाची गंगोत्री आहे. त्याच अर्थाने त्या अथर्ववेद संहिता मंत्र–तंत्र, जादूटोणा याची पण खाण असावी, या दृष्टिकोनातून वरील उदाहरण समकालीन ठरते.

हा सगळा प्रकार पाहून संध्याकाळी विश्वविद्यालयात पोहोचलो. सायंकाळचे जाहीर व्याख्यान ऐकण्यासाठी सभामंडपात प्रवेश केला. माझ्या सर्पाबद्दलच्या व्याख्यानामुळे बऱ्याच लोकांची ओळख झाली होती. यामुळे व्याख्यानापूर्वी एकमेकांचे अनुभव आम्ही सांगू लागलो. बनारसचे एक प्राध्यापक म्हणाले की, त्यांना पण असे विचित्र अनुभव आले. या गोष्टी होत असताना आमच्या भोवती बराच घोळका जमला व त्या प्राध्यापकाला त्यांनी मनकर्णिका घाट व दशाश्वमेध घाट येथील एक तरी अनुभव सांगावा अशी विनंती करण्यात आली.

त्यांनी सांगितले की, ब्रिटिश आमदानीत एके काळी त्या घाटावर एक इंग्लिश कॅप्टन फिरत असताना, जळत असलेल्या प्रेताजवळ नग्न अवस्थेत बसलेला एक साधू

त्याला दिसला त्या साधूने त्या प्रतावर ठेवलेले कणकीचे गोळे काढले व एका कवेलुवर थापून प्रेतावरील तुपात तो भाजू लागला. त्या मृत देहाचे नातेवाईक ओरडत होते, पण त्या डोमराजाचे लोक या नातेवाइकांना आवरू लागले. हे दृश्य त्यांनी पाहिले व खाली घाटात स्नान करणाऱ्या स्त्रियांची 'ओलेती अंगे बघून त्या इंग्लिश माणसाला आश्चर्य वाटले. कारण हा नग्न साधू तिकडे पण पाहत होता व विकारहीन नजरेने आपले रोट भाजत होता. हा इंग्लिश कप्तान तिथून सरळ आपल्या कॅंपवर गेला व तिथूनच बनारसच्या महाराजांना फोन करून तो सगळा किळसवाणा प्रकार कळविला. त्या महाराजांनी या कॅप्टनला सायंकाळी आपल्या महालात जेवायचे निमंत्रण दिले. पण या कप्तानाने एक अट घातली होती. आणि ती म्हणजे, त्या साधूला पण तिथेच जेवायला बोलवावे, म्हणजे त्याच्या विकारहीन प्रवृत्तीची परीक्षा पण घेता येईल. महाराजांनी कबूल केले व सायंकाळी त्या घाटावर आपली टम्टम् त्याला आणावयाला पाठवली. तो साधू तसाच टम्टम्मध्ये बसून राजवाड्यात गेला. तिथे त्या कप्तानाचे भोजनापूर्वीचे मदिरापान चालले होते. त्या साधूला त्या कप्तानाने एका पेल्यात एक पेग व्हिस्की दिली. त्याने ती एका घोटातच संपविली व स्मित हास्य करू लागला. दुसऱ्या पेल्यात दोन पेग दिले गेले. ती पण दारू त्याने एका घोटातच गट्ट केली. तो कॅप्टन त्याच्या तोंडाकडे पाहातच राहिला व व्हिस्कीची बाटली थट्टेने त्याच्या हातात देऊ लागला. त्या साधूने ती बाटली आपल्या हातात घेऊन सबंध बाटलीभर ती व्हिस्की आपल्या तोंडात पूर्णतया ओतली. हे दृश्य पाहून त्या कप्तानानें राजेसाहेबांना खूण केली व त्याबरोबरच वाद्यांसहित नृत्यांगना याचे समोर नाचू लागल्या. हा साधू विकाररहित अर्धे डोळे उघडून स्मितहास्य करून जमिनीवरच बसला होता. मदिरेचा याच्यावर काही परिणाम होतो का याबद्दल त्याच्या तोंडाकडे व कृतीकडे टक लावून कॅप्टन पाहत होता. विकाररहित तो साधू दिसला व तत्क्षणी त्या कॅप्टनने दुसरी खूण केली. या खुणेनंतर आतून टाळ्या वाजवीत एक सुंदर नृत्यांगना जवळजवळ नग्न स्थितीतच आत आली व सरळ त्या साधूच्या मांडीवर बसली. त्या कप्तानाने हसून 'वाह वाह' च्या टाळ्या दिल्या, पण ती नृत्यांगना किंचाळत मांडीवरून उठली व आत पळाली. तिला तिचे ढुंगण जबरदस्त पोळल्यासारखे वाटले व चटका लागताच ती किंचाळली होती. साधू मात्र विकाररहित होता. इतक्या कामोद्दीपक परिस्थितीत इंद्रियदमन करणारी व्यक्ती या कप्तानाने कधी पाहिली नव्हती व ऐकलीसुद्धा नव्हती. त्याने अक्षरश: त्या साधूला नमस्कार केला व आपली हार मानली.

वाराणसी शहरात धर्म आणि तत्त्वज्ञान याचे आगर तर आहेच, पण याशिवाय इंद्रियदमन करून योगसाधना करणारे भेटतात याची मला अशी माहिती झाली.

भाषण आदी संपले व इतर सर्व मित्रांसह दुसऱ्या दिवशी सारनाथला जायचे आम्ही ठरवले. भगवान श्रीकृष्णांनी गीतेच्या चौथ्या अध्यायात म्हटले आहे की, 'जेव्हा जेव्हा धर्माची ग्लानी होईल तेव्हा तेव्हा मी अवतार घेईन!' या आपल्या वाणीला खरे

करण्याकरता सनातन धर्माच्या मूल्यांची अवहेलना व परकीय आक्रमण झाल्यास धर्मनाश वाचविण्याकरता ईश्वराने बहुतेक भगवान बुद्धाच्या रूपाने अवतार घेतला असावा.

गयेहून बोधिवृक्षाखाली ज्ञान प्राप्त झाल्यानंतर व जवळ असलेले उपास आणि कडक तप करणारे शिष्य गौतम बुद्धाला सोडून गेले असताना, भगवान बुद्ध बनारसजवळ सारंगनाथ नावाच्या मृगाने भरलेल्या उपवनात आले. इथे आल्यावर त्यांनी आपल्या विचारशैलीचा प्रसार सुरू केला. अद्याप या सारनाथला विटांच्या दोनतीन पडिक भिंती व एक चबुतरा दिसतो. इथूनच भगवान बुद्धांनी धम्मचक्र परिवर्तित केले. इथूनच बुद्धम् सरणम् गच्छामि, धम्मम् सरणम् गच्छामि, संघम सरणम् गच्छामि या मंत्राचा आवाज जगभर घुमवू लागला.

या परिसरात जपानी बुद्ध भिक्खूंनी एक सुंदर देऊळ बांधले आहे. तिथे आत भिंतीवर बौद्ध धर्माच्या जातक कथा चितारल्या आहेत. मधोमध भगवान बुद्धाची प्रतिमा ध्यानस्थ बसली असून जगाला शांतीचा संदेश देत आहे. या देवळात तेल, तुपाची आरती नाही-हळद, कुंकू नाही, अक्षता नाहीत, व फुलेसुद्धा गुलदस्त्यात ठेवलेली दिसतात. यात्रेकरूंनी यावे व एकाग्र चित्ताने बसून शांतिमूर्ती बुद्धाच्या प्रतिमेसमोर नतमस्तक व्हावे, ज्यामुळे मनाला शांती मिळेल. त्या सगळ्या परिसरात विचार करणाऱ्या सुशिक्षित लोकांचीच वर्दळ दिसली बोधिसत्वानी प्रत्येकाची मुक्ती त्याच्या हातीच आहे व त्यांनीच यत्न करून ती साधली पाहिजे, हा उपदेश दिला होता. तो सुशिक्षित लोकांना अवश्य पटेल, पण अडाणी लोक बराच वेळ अडखळत राहतील. गीतेमध्ये म्हटले आहे की, चार प्रकारचे लोक माझ्याकडे येतात. यात "आर्तो जिज्ञासू अर्थार्थी ज्ञानीच भरतर्षभ" असे चार प्रकारचे लोक, चार विचाराचे लोक बुद्धाकडे धाव घेतात. भगवान बुद्धांनी जिज्ञासू आणि ज्ञानी या लोकांकरता उत्तम मार्ग शोधून काढला. भगवान बुद्धाने वर्णव्यवस्थेला मूठमाती दिली व यामुळे हिंदू धर्मात आगंतुकपणे शिरलेले हे थोंड आपोआप बाहेर निघाले. पण जे दुःखी आहेत त्यांना दुःखाचे कारण– लोभ सांगितले. भक्ती मार्ग यथोचित उद्धृत केलेला दिसत नाही यामुळे बुद्धानंतर शंकराचार्यांनी सनातन धर्माची परंपरा पुन्हा प्रस्थापित केली.

इथे जवळच एक सुंदर वस्तुसंग्रहालय आहे. भारतवर्षात सगळीकडे सापडणाऱ्या भगवान बुद्धाचे अवशेष व मूर्तिसंग्रह इथे एकत्रित केले आहेत. बुद्धाच्या इतक्या प्रकारच्या प्रतिमा होत्या की बुद्ध कसे होते हे सांगणेच कठीण झाले. मथुरेजवळ सापडलेली बुद्ध-प्रतिमा अतिउत्तम होती. या प्रतिमांकडे पाहून असे वाटले की भारतवर्षात पुरातन काळी जे मोठे लोक, ज्ञानी लोक, राजे, ऋषी-महर्षी होऊन गेले त्यांची इच्छा असावी की ज्ञान व तत्त्वज्ञान चिरकाल टिकावे. पण त्यांची प्रतिमा दिसू नये, हा या देशाच्या तत्त्वज्ञानाचा एक गाभा दिसतो व कुठेही चित्र किंवा प्रतिमा नंतरच काल्पनिक रूपाने केलेल्या आढळतील. श्रीरामचंद्र घ्या, श्रीकृष्ण घ्या, बुद्ध घ्या, शंकराचार्य, कालिदास... कुणाचीही

प्रतिमा त्या काळी निर्माण झाली नाही. आत्मा अमर आहे व शरीर मरणाच्या तोंडी गेलेले आहे त्याची आठवण कशाला ठेवायची ? हेच तत्त्वज्ञान त्या प्रतिमांच्या अभावी असेल काय ?

हा सबंध सारनाथचा परिसर पाहून हजार वर्षांपूर्वी भारतात जी धार्मिक क्रांती झाली त्याच्याबद्दल मनात विचार घोळू लागले व या देशात कालमानाप्रमाणे, धर्माप्रमाणे वागण्यात फेरबदल करता येतो हे दिसले व मनास बरे वाटले. इथून परतल्यावर दुसऱ्या दिवशी रेल्वेचा डिझेल इंजिन तयार करण्याचा कारखाना पाहण्यास गेलो. इथे किती आधुनिकता आली होती व ती पाहून समाधान झाले.

काशीला जिवंतपणा भगवान बुद्धाच्या येण्यापूर्वी आला होता व तो कालानुसार या शहराने टिकविला आणि रेल्वेचा कारखाना पाहिल्यानंतर जिवंतपणा कालानुसार कसा टिकवितो याची जाणीव झाली. यामुळेच काशीचे जीवन गंगेच्या प्रवाहाप्रमाणे सदोदित चालू राहील. म्हणूनच या ज्ञानाने, संपूर्ण विविधतेने परिपूर्ण शहराला प्रत्येक भारतीयाने भेट दिली पाहिजे. सुभाषितात लिहिल्याप्रमाणे

**अयोध्या मथुरा माया काशी कांची अवंतिका ।**
**पुरिद्वारावतिश्चैव अष्टेते मोक्षदायकाः ॥**

या शहरांपैकी आता काशीच काय ती उरली आहे, जिने जिवंतपणा अद्याप ठेवला आहे. वाराणसीला गंगेच्या पाण्याचे शुद्धीकरण करणे सुरू आहे. तसेच मनकर्णिका घाटावर लाकडावर जळणारी प्रेते आता विद्युत्दाहिनीत टाकणार आहेत. यामुळे ते अमंगल दृश्य नाहीसे होणार आहे. आधुनिक युगात आजची काशी नवीन वस्त्र परिधान करून पुढे आली आहे, म्हणूनच हिचा जिवंतपणा आज दिसेल. हा जिवंतपणा २५०० वर्षांपासून अबाधित आहे, म्हणूनच काशीची महत्ता ओळखावी. या शहराला अवश्य भेट द्यावी व जुन्या वाड्याखाली जुन्या वस्तीत, जुन्या काळी असलेली काशी ओळखावी.

(या घटनेचा काल १९६८)

# १२ : गंगा-यमुनेच्या खोऱ्यात

गंगा–यमुनेचे खोरे एक सुपीक विभाग म्हणून गणले जाते. आजच्या दुष्काळी परि-स्थितीला तोंड देण्यासाठी या विभागाची अवश्य पाहणी करावी व पुरातन काली इथे नद्या आणून ज्या तंत्रज्ञाने हा भाग सुपीक केला त्याचे तंत्र विचारात घ्यावे लागेल काय ? असे ध्यानात ठेवावे.

आख्यायिकेप्रमाणे एका प्रख्यात इंजिनीयरने–भगीरथाने या पठाराला व मोकळ्या विभागाला सुजलाम् सुफलाम् तर केलेच पण अगदी समुद्रापर्यंत येथील नद्यांचा प्रवाह वाढविला. उंच पर्वतराजी हिमालयाच्या दहा हजार फुटांवरून हिमनग वितळत असताना त्या पाण्याचा यथोचित तांत्रिक दृष्टचा विचार केला व एक बांध बांधून छोटा कालवा गंगोत्रीजवळून सुरू केला. श्री शंकराच्या जटाभारात गंगा आटोपली गेली. याचा अर्थच हा की, एक बांध शिलेवर बाधला गेला व कडेला कालवा काढून गंगा उत्तर प्रदेशात खेळविली गेली, ही उत्तम तांत्रिक कृती पौराणिक कथेत सुंदररीत्या लिहिली गेली की, ज्यामुळे भविष्यकाळात येणाऱ्या दुष्काळाला उगवते तांत्रिक लोक तोंड देऊ शकतील.

## तीर्थराज प्रयाग

हिमालयाच्या हिमनदीतून येणारी ही गंगा–यमुना कैक खनिज पदार्थ साठवलेल्या दऱ्याखोऱ्यांतून वाहत येते. तिच्यात जंतुमारक पदार्थ बॅक्टिरियोफाज (Bactiriophage) साठले गेल्यामुळे त्या पाण्यात थोड्या प्रमाणात जंतुनाशक शक्ती निर्माण झाली. या करि-ताच गंगेत रक्षाविसर्जन करतात की, जी जंतुविरहित होऊन समुद्रात जाईल. प्रयाग शहरी या प्रक्रियेला विशेष महत्त्व आहे. कारण गंगा आणि यमुनेचा संगम इथे होता. ज्यामुळे पुढील पाण्यातही थोडी प्रतिकारशक्ती वाढेल. अगदी थेट गंगोत्रीपासून प्रयागक्षेत्रापर्यंत कैक ऋषी–महर्षी यांनी गंगेच्या काठी आश्रम काढले. व तिच्या शुद्ध जलाचा उपयोग करून भारतीय संस्कृतीला तजेला दिला.

या विभागाला अशा या पर्यावरण दृष्टिकोनातून भेट द्यावी व निसर्गाचा संदेश प्रत्येक भारतीयाने समजून घ्यावा, ज्यामुळे या देशातील व विभागातील पर्यावरणक्षीणता

थोपण्यास मदत होईल. वैज्ञानिक परिषदा व विद्यापीठाच्या परीक्षा आदींच्या निमित्ताने या विभागात बऱ्याच वेळा प्रवास झाला. एका वेळी सायन्स कॉंग्रेसच्या निमित्ताने या प्रयाग शहराला भेट दिली. हे शहर तसे भारद्वाज ऋषींच्या आश्रमाकरता प्रसिद्ध आहे. तिथेच पंडित मोतीलाल नेहरूंचा आनंदभवन महाल आहे. येथील हायकोर्ट नि:पक्षी निकालाकरता प्रकाशझोतात आहे. इंदिरा गांधीच्या विरुद्ध इथूनच निकाल देण्यात आला. येथील विद्यापीठात डॉ. गंगानाथ झा यांच्यासारखे प्रकांडपंडित व्हाइस चॅन्सलर होऊन गेले. येथील विद्यापीठातून शासकीय सेवेकरता आय. सी. एस. लोकांची एक साखळीच उत्पन्न झाली होती. भारतीय स्वातंत्र्ययुद्धात स्वत:चे बलिदान करणारे चंद्रशेखर आझाद यांच्यासारखे राष्ट्राभिमानी देशभक्त तथा नेहरू घराणे इथेच निर्माण झाले. सकाळी फिरण्यास जावे तेव्हा आखाड्यातून निघालेली मंडळी लोणी आणि बत्तासे खात या गावातच दिसतील. तसेच सकाळी गंगेवर स्नान करणाऱ्यांची एवढी मोठी रांग इथेच दिसेल श्राद्ध-पक्ष करवून घेणाऱ्या पंड्यांचा सर्वांत मोठा घोळका याच शहरी आढळतो, पण इथे अशी मोठी देवालये व जुनी मंदिरे नदीच्या वाळवंटात असलेल्या निद्रित मारोतीशिवाय दुसरी नाहीत !

## त्रिवेणी संगम

अखिल भारतातून यात्रिक इथे त्रिवेणी स्नानाकरिता येतात व सगळा कार्यक्रम पंडे उरकून घेतात. हा त्रिवेणी संगम म्हणजे गंगा आणि यमुना नदी जिथे मिळतात तिथ दिसतो. गंगेचे पारदर्शक पाणी व थोडे उथळ पात्र व त्याच्या कडेला येणाऱ्या यमुनेचे अंधुक जल व खोल पात्र लांबून डोळ्यात भरते. असा हा कृष्णधवल संगम पुढे एकरूप होऊन काशीला रंग ठेवत नाही. याच विभागात विशेषत: यमुनेच्या जलामध्ये सुसरी बऱ्याच प्रमाणात दिसतील व हे प्राणी भारताच्या इतर नद्यात इतक्या प्रमाणात आढळत नाहीत. आता प्रश्न येतो की, त्रिवेणी संगमाचा व इथून स्नान करून गेल्यावर जवळच्या किल्ल्यातील अक्षयवटाच्या पूजेचा अर्थ काय आहे ? हा त्रिवेणी संगम व अक्षयवट प्रत्येक भारतीयाला पर्यावरणाची कशी क्षती झाली आहे याची आठवण करून देतो. नाव जरी त्रिवेणी असले तरी पण गंगा यमुनेशिवाय तिसऱ्या नदीचे पाणी वरून दिसत नाही. ती म्हणे गुप्त झाली. पण खरे पाहता मानवांनीच तिला लुप्त केले आहे.

अगदी अलीकडे म्हणजे चार हजार वर्षांपूर्वी भारताच्या सिंधप्रदेशात मोहेंजोदारो व हराप्पा या नावाची सुंदर शहरे होती. त्या वेळच्या संस्कृतीप्रमाणे या शहरांची ठेवण उत्तमरीत्या आखलेली दिसते. १९३० सालच्या डॉ. व्हिलर यांच्या उत्खननात असे दिसून आले की, हे शहर उत्तम विटांनी बांधलेले होते. शहरेच काय, पण सिंधू नदीच्या मुखाजवळ असलेले बंदरसुद्धा विटांनी उत्तमरीत्या तयार केले होते, ज्यामुळे बोटी व्यवस्थित थांबत होत्या. शहरात घरे तर विटांची होतीच, पण सडकेच्या दोन्ही बाजूंच्या मोऱ्यासुद्धा

विटांनी उत्तमरीत्या बांधलेल्या होत्या. त्या समयी त्या विभागात मोठाली जंगले होती आणि त्या जंगलात गेंड्यासारखे प्राणी पण जगत होते. उत्खननातील काही मातीच्या भांड्यावर व नाण्यांवर गेंड्याचे चित्र मिळाले आहे. तिकडे पाऊस पण बरा पडत असे, त्यामुळे अन्नधान्याची मुबलकता असून लोक सुखी आणि संपन्न होते. उपलब्ध असलेली माती, विटात रूपांतर करून जंगलाची झाडे तोडून त्या भाजल्या गेल्या व भाजलेल्या विटांनी तेथील बांधकाम सुबक केले. विटांचा व इंधनाचा इतका उपयोग झाला, की जंगले सर्रास तुटू लागली. पुढे गुरे तेथे चरायला तिथे येऊन उरलेली हिरवळही नष्ट झाली. वृक्ष नष्ट झाल्यामुळे मृद्संहार झाला. या भयंकर मृद्संहारामुळे वाळवंट निर्माण झाले व हे वाळवंट हळूहळू दक्षिणेकडे पसरू लागले. या वाळवंटामुळे अगदी बिकानेरपर्यंत वाळूचे छोटे छोटे डोंगर तयार होऊन वाऱ्यामुळे ती वाळू लांबपर्यंत पसरू लागली. त्या काळी सरस्वती नावाची नदी बिकानेरजवळून खळखळ वाहत होती व ती दक्षिणेत प्रयागजवळ गंगेत पाणी सोडत असे. वाढणाऱ्या वाळवंटाने या नदीचे पात्रच भरून टाकले व ते इतके की, नदीच पूर्णतया नष्ट झाली बिकानेरजवळ घग्घर नावाचा एक लहानसा ओढा, गंगा कॅनाल आल्यानंतर थोडा वाढू लागला. हीच ती सरस्वती नदी होय. त्रिवेणी संगमात स्नान करताना या लुप्त झालेल्या सरस्वती नदीची आठवण झाली पाहिजे व मानवांनी आपल्या आजच्या फायद्याकरता उद्याचा नाश कसा केला याची जाणीव आली पाहिजे. आज पर्यावरणाबद्दल बरेच लिहून येत आहे. राजस्थानचे वाळवंट व सरस्वती नदीचा नाश ही दोन उदाहरणे प्रत्येकाने लक्षात ठेवली पाहिजेत की, ज्यामुळे भारतीयांना एक संदेश मिळेल की, त्यांनी जंगलतोड थांबवून मृद्संहार थोपवावे.

यमुनेच्या काठीच यवनराजांनी बांधलेला एक मोठा किल्ला दिसतो. या किल्ल्याच्या आत काही पडकी देवालये तर आहेतच, पण एक मोठे लाकडाचे खोड पण दिसते. ज्याची यात्री लोक अक्षयवट म्हणून पूजा करतात. या अक्षयवटाचा अर्थ एकच आहे की, हा वृक्ष जवळ जवळ चिरकाल टिकतो. मुख्य वृक्ष कैक पारंब्या फेकतो व त्या पारंब्या जमिनीत रुतून वृक्षाची वाढ करतात. यामुळे मुख्य बुंधा जरी किडला तरी पारंब्यांमुळे हा वृक्ष नेहमीच जगत असतो. भारतातील संस्कृतीच्या काही द्योतकांमध्ये या वटवृक्षाचे फार महत्त्वाचे स्थान आहे. साऱ्या भारतात या वृक्षाची उन्हाळ्यात पूजा करतात. अलीकडे मुंबईसारख्या मोठ्या शहरात या वृक्षाची तोडलेली व मेलेली फांदी घरी आणून स्त्रिया हा सण साजरा करतात. या सणामागे एक मोठे वैज्ञानिक सत्य दडलेले आहे. कथेप्रमाणे राजकुमार सत्यवान लाकूड तोडण्यास ग्रीष्म ऋतूत जंगलात गेला. त्या वेळी अतिउष्णतेमुळे त्याला घेरी आली (सनस्ट्रोक). त्याची पत्नी सावित्री हिने त्याला उचलून जवळच असलेल्या एका वटवृक्षाखाली नेले. वृक्षाखाली छाया तर होतीच, पण निसर्गाने नियम केल्याप्रमाणे कोणताही पूर्ण वाढलेला वटवृक्ष दर २४ तासात अदमासे ४०० लीटर पाणी बाष्परूपाने आपल्या पानातून बाहेर फेकतो. ही छाया व आर्द्रतेमुळे वृक्षाखाली वाता-

नुकूलता निर्माण होते. कुणीही हा अनुभव घ्यावा. उन्हातून वडाच्या झाडाखाली गेल्यास कसे थंडगार व आल्हादकारक वाटते, या क्रियेचा प्रयोग करून पाहावा. त्या वातानुकूलते" मुळे सत्यवान शुद्धीवर आला व उठून घरी `ला. वैज्ञानिक दृष्टिकोनातून त्या काळच्या लोकांना या वातानुकूलतेची समज नव्हती, म्हणून नुसता अनुभव या दृष्टिकोनातून या वृक्षाची पूजा करावी व रक्षण द्यावे, ही भावना आपल्या परंपरेत रुजली. भारतातील कैक खेड्यात अगदी मधोमध वड किंवा पिंपळाचे वृक्ष लावलेले दिसतील. त्या वृक्षाच्या बुंध्याभोवती एक पार असतो. दुपारीसुद्धा गावातील आबाल-वृद्ध या वातानुकूल छायेत बसतात. या वृक्षावर असंख्य पाखरे त्यांची फळे खाण्याकरता येतात व घरटी करून राहतात. सायंकाळी घरट्यात जाण्यापूर्वी हे विहंग आपल्या पिल्लांकरिता अन्न आणण्याला माळरानातील शेतात जाऊन पिकावरची कीड तोंडात गोळा करतात व पिल्लांना खाऊ घालतात. यामुळे पिकावरची कीड कमी होते. वडाचे झाड वातानुकूलता देते, मृद्संहार थांबविते, पिकावरील कीड खतम करते व कैक वर्षे जगते, यामुळे या वृक्षाची पूजा करावी व त्याला संरक्षण द्यावे, ही आपल्या परंपरेची एक जाणीव आहे. यमुनेजवळील किल्ल्यात असलेला तो वाळलेला खोड याच अक्षयवृक्षाची आठवण देतो व प्रत्येकाला एकच संदेश देतो की, वटवृक्ष लावा, तो चिरकाल टिकेल. प्रयाग, ज्याला आता अलाहाबाद म्हणतात. या शहराने सरस्वतीची लुप्तता व अक्षय वृक्षाची हानी हेच दोन पाठ आम्हाला दिले. वृक्षराजी वाचवा, कारण वृक्ष जगतील तर मनुष्य जगेल हाच मुख्य धडा प्रयाग देत आहे.

## कुंभमेळा

दर बारा वर्षांनी या शहरी महाकुंभ नावाचा मोठा मेळा भरतो. हा अशा प्रकारचा मेळा फार जुन्या काळापासून तिथे भरत आहे. इतिहास सांगतो की, सम्राट समुद्रगुप्त स्वत: अशा पवित्रस्थळी महाकुंभ स्नानाकरता आले होते. गंगा-यमुनेच्या पाण्यात बॅटिरिओफाझ नावाचे जंतुनाश करणारे किण्व काही प्रमाणात सापडले आहेत, याकरता इथे स्नान केल्यास जल शुद्ध असल्यामुळे रोग बरे होतात अशी भावना होती, पण आता अगदी हरिद्वारपासून ते प्रयागपर्यंत गावातील सगळी गटारे गंगेत जात आहेत. मेलेली गुरे, गावातील कचरा व नवीनच सुरू झालेल्या कारखानदारीचे प्रदूषित जल गंगेतच फेकले जात आहे. कानपूरला कातडी कमविणाऱ्या कारखानदारांनी आपले सगळे घाण पाणी गंगेतच सोडले. शिवाय तेथील कोळशावर चालणारे कारखाने हेच करीत आहेत. यामुळे गंगेचे पाणी आता इतके प्रदूषित झाले आहे की, त्यामुळे रोगराई होण्याची भीती निर्माण झाली. मध्यवर्ती शासनाने गंगेचे जल शुद्ध करण्याकरता योजना आखल्या आहेत व त्याबद्दल कार्य पण सुरू झाले आहे. योजनेचे ध्येय स्तुत्य आहे, पण जोपर्यंत जनतेला प्रदूषणाची जाणीव होत नाही, तोपर्यंत या योजना अर्धवटच राहतील. नदीकाठी गेल्यावर सर्वप्रथम यात्री तोंडात पाणी घेतात व गुळणा करून ते पाणी चक्क नदीतच फेकतात.

या मुखमार्जनाने तोंडातील दूषण आपण बाहेर फेकतो व त्यामुळे पाणी दूषित होईल ही जाणीव जनतेत अद्याप आलेली नाही. आंघोळ करायची असल्यास बादलीभर पाणी घेऊन काठावर आंघोळ करावी ही जाणीव नसते. नदीच्या प्रवाहात आपण शरीराचा मळ सोडतो ते वाईट आहे, कारण तेच पाणी कुणी मानव पुढे पिण्याला वापरेल. ही जाणीव जोपर्यंत निर्माण होत नाही, तोपर्यंत प्रदूषण थांबणार नाही. कारखानदार व शेतकरी आपले सांडपाणी गंगेत सोडतात, यामुळे त्या पवित्र गंगेचे पाणी दूषित होते. याचे ज्ञान अद्याप झाले नाही. याने शुद्ध करून जर ते पाणी सोडले तर गंगेचे प्रदूषण थांबेल, पण तसे होत नाही. आपल्या पवित्र मंत्रात स्पष्ट म्हटले आहे की, (यावत् वीचिरतरंगमा, वहति सुरनदी जान्हवी पुण्यतोया) तोपर्यंत मानवाची उन्नती, स्वास्थ्य व आयुष्य टिकेल असे विचार या मंत्रात मांडले आहेत. आपण मंत्र म्हणतो, पण आचरणात ते आणीत नाही.

महाकुंभ दर बारा वर्षांनी येत असतो. त्याला सिंहस्थ पण म्हणतात. या वेळी आपल्या सूर्याचा व्यास एका मैलाने कमी होतो व तेव्हाच सूर्यावर मोठमोठी विवरे निर्माण होतात व काही घातक ज्वाला वर फेकल्या जातात. या घटनांमुळे पृथ्वीवर बरेच परिणाम दिसून येतात. आपल्या रेडिओ लहरी या घटनांमुळे बिघडतात. संदेश व्यवस्थित येत नाहीत. काही जाणकार वैज्ञानिकांच्या मते या १२ व्या वर्षी रोगराईचे प्रमाण वाढते. लढाया, मारामाऱ्या यांना पण १२ वर्षांची ही साखळी भोवते. आम्ही नोंद ठेवल्याप्रमाणे भारतात जी टोळधाड येते त्या टोळधाडीची प्रखरता ११ किंवा १२ वर्षांच्या शृंखलेत मोजता येईल. या वैज्ञानिक दृष्टिकोनातून सिंहस्थ व महाकुंभ या दोन पर्वणीकडे पाहावे लागेल. जरी समुद्रमंथन व देवांनी नेलेला अमृतकुंभ या पौराणिक कथेवर लोक विश्वास करतात तरी तो विश्वास करताना हा वैज्ञानिक दृष्टिकोन लक्षात ठेवल्यास त्या घटना समजू शकतील. प्रयाग (अलाहाबाह) भाविक लोकांचे तीर्थस्थान गणले जाते. गंगा-यमुनेचा संगम इथे आहे, पण येथील पाण्याची स्थिती त्या तीर्थ शब्दाला दूषित करीत आहे. गंगेच्या पाण्यात खरेच स्नान करावे अशी ज्यांची इच्छा असेल त्यांनी हरिद्वारला जावे. ही नदी हिमालयातून कशी खळखळ वाहत या प्रदेशाच्या पठारात येत आहे! काही भाविकांनी या नदीचा मोठा कालवा काढून घाट, मंदिर व घंटाघर केले आहे. या कालव्यात बरेच मासे पण सोडले आहेत. इथे स्नान करावे. गंगेच्या प्रवाहासंगे वर लक्ष्मणझुल्याच्या पुढे खरी गंगा दिसते. इकडेच काही आधुनिक ऋषींची स्थाने व आश्रम दिसतात. "काली कंबलेवाले किंवा स्वामी शिवानंद" यांच्या आश्रमात आधुनिकता डोकावू लागली आहे. तरी पण मनाला शांती व पुढील साधनेकरिता या विभागाला एक प्रथम पायरी म्हणून समजावे. सायंकाळी आरतीच्या वेळी घंटाघराजवळून असंख्य दीप द्रोणाद्रोणातून गंगेच्या प्रवाहात सोडले जातात. या तरंगत्या दीपमालिकेकडे पाहावे, देवळातील घंटानाद ऐकावे, भाविकांच्या करुणाष्टकांकडे लक्ष द्यावे व घाटावर नमस्कार करीत

देवाची आठवण करावी. याकरिताच हरिद्वार प्रसिद्ध आहे. भावनाप्रधान झाल्यास भारावून दोन अश्रू गाळावे.

बँकॉकला गेल्यावर मला कळले की, तेथील राजेसाहेब जिनेव्हाला गेले आहेत. यांचे नाव भूमीपाल अतुलतेज असून त्यांना आठवे राम असे म्हणतात. त्या देशातील अयोध्यानगरी पाहिली. किती सुंदर व बहरलेली होती ! राजवाडयातील बुद्ध मंदिरात पाचूच्या भगवान बुद्धाच्या मूर्तीचे दर्शन घेतले. देवळाच्या भिंतीवर बुद्ध धर्माच्या जातककथा चितारल्या होत्या. पण दाराजवळील भिंतीवर रामायणाचे चित्र होते. या चित्रात 'हनुमान-स्वयंवर' रेखाटले होते. या देशात शरयू नदी आहे. गंधमादन पर्वत आहे व सर्व रामायण जणू काय इथेच घडले असे भासू लागते. देश मात्र बुद्धधर्मीय असून राजाच्या राज्याभिषेकाच्या दिवशी एक ब्राह्मण गंध लावून जातो.

इंडोनेशियामध्ये बहुतांश रहिवासी इस्लाम धर्माचे आहेत, पण बाली या बेटात हिंदू धर्म डोकावतो. इथे ब्रह्मा, विष्णू देवळात दिसतात व ब्राह्मण मंडळी उज्जयनी शंखानी महारुद्राचा अभिषेक करताना दिसतात. या देशात श्रीराम आहेत, सीतामाई आहेत. त्यांची रामायणावरील कथानके आहेत व मशिदीतसुद्धा रामायणाच्या कथेतील काही भाग नृत्यरूपात दर्शविला जातो. जगातील प्रत्येक देशात भारतातील रामायण व महाभारत या ग्रंथाबद्दल किती आदर व किती कुतूहल दिसत आहे. नुकतेच एका फ्रेंच नाटककाराने महाभारतातील काही कथानकांचे नाटयरूपात रूपांतर करून कैक स्थळी हे प्रयोग केले. श्रीकृष्णांनी आपणांस भगवद्गीतेचा उपदेश दिला. प्रेमाचा संदेश दिला व प्रत्येक जीवाभावात ईश्वर वास करतो याची जाणीव करून दिली. लोक म्हणतात की श्रीकृष्ण काल्पनिक व्यक्ती होती. पण नुकतेच द्वारकानगरीच्या सौराष्ट्रातील उत्खननात या नगरीचे अस्तित्व डोकावू लागले आहे. हा देश श्रीराम आणि श्रीकृष्ण यांच्या कथेने भारावून गेला. वाल्मिकी, तुलसीदास, महर्षी व्यास, सूरदास, मीरा, चैतन्य महाप्रभू यांनी या मानवरूपी देवतांचा आपल्या डोळ्यासमोर साक्षात्कार करून दाखविला. घराघरात याचे काव्य दुमदुमत आहे व कैक भारतीयांना मनाची शांती व जीवाचे सुख मिळवून देत आहे. या अशा थोर व्यक्तींचे निवासस्थान पाहावे म्हणून गंगा-यमुनेच्या प्रांतात प्रवेश केला.

फैजाबाद या जिल्ह्यात शहरापासून वीस मैलांवर अयोध्या नावाचे एक गाव आहे कोर्टकचेऱ्यात अवध शब्द येतो. हायकोर्ट अवध या नावाचे आहे. पण ती अयोध्या नगरी मात्र एका खेडयाप्रमाणे पडक्या वाडयांची, गल्लीबोळांची गावखोखजा नगरी दिसली. श्रीरामाने या नगरीवर राज्य केले. शहर कसे सोने, चांदी, हिरे, माणिके यांनी गंधर्व नगरीप्रमाणे सुशोभित केले होते, असे वर्णन आपण वाचतो. मुख्य मार्गावर सडा व पुष्पवृष्टी करून धुरळा नाश करून व सुगंध दरवळणाऱ्या परिसरात लता पताकांनी सुशोभित अशा घरातून आबालवृद्ध रामराज्यात कसे नांदत होते ! पण आता चहूकडे धुरळा;

गटारे, भिकारी, पंडचे व माकडेच नांदतात. रामायणात श्रीरामाला लहानपणी लाडाने घरात कोंडून न ठेवता राजा दशरथाने विश्वमित्रासंगे लक्ष्मणासह शिक्षणाकरता आश्रमाकडे पाठविले. त्या काळात रामाने तंत्रविद्या शिकून धनुर्विद्येत निपुणता मिळवून त्राटिकेसारख्या राक्षसी–राक्षसांचा संहार केला व विद्वज्जन आणि साधुपुरुष यांच्या यज्ञातील अडथळे दूर करून आशीर्वाद घेतला. या शिक्षणामुळे श्रीरामाला शिवधनुष्य उचलता आले व सीतेसारख्या सतीच्या शब्दाला मान देऊन रावण इत्यादी बलीयोद्धे यांचा अभिमान जिरवून स्वयंवराची माळ जिंकता आली. लहानपणी असा पराक्रम करण्याची रामाला संधी मिळाली व त्यांनी त्या संधीचा उत्तम लाभ घेतला–आजतर अयोध्या खेड्यात मुले नुसतीच उनाडपणे हुंदडत आहेत, कौमार्यावस्थेत अनुभव नसताना राज्याची धुरा घ्यावी हे किती अयोग्य आहे, हे श्रीरामानी आपल्या सावत्र आई कैकेयीच्या शब्दाचा मान ठेवून जगाला पटवून दिले. चौदा वर्षे वनात जाऊन जगातील सृष्टीचे निरीक्षण केले. वनात अगदी गरिबाप्रमाणे कष्ट सहन केले, ज्यामुळे गरिबी कशी असते याचा त्यांना अनुभव आला. वाली व सुग्रीव यांचे तंटे त्यांनी सोडविले व रावणासारख्या बलाढ्य शत्रूला एकट्याने तोंड दिले. एवढा अनुभव घेऊनच श्रीराम अयोध्येला परत आले. आता राजधानीला एक अनुभवसंपन्न राजा मिळाला. ज्यामुळे त्या नगरीत, त्या राज्यात रामराज्याचा सूर्य प्रगटला. या मर्यादापुरुषोत्तम रामाने अश्वमेध यज्ञ केला. प्रजाजनांचे गाऱ्हाणे ऐकून 'मी प्रजेचाच माणूस आहे व त्यांचेच ऐकेन' ही भावना ठेवून सती सीतेला ब्रह्मावर्ताजवळ लक्ष्मणासह पाठवून वनात धाडले. अशा आदर्शाचा पुरुष या भारतवर्षात जन्माला आला व याच देही याच डोळी ईश्वरत्व प्राप्त करून शरयू नदीच्या तटावर अनंतात विलीन झाला.

हल्लीच्या अयोध्या नगरीत तो रामचंद्राचा वाडा, त्याची जन्मभूमी, कर्मभूमी व निर्वाणभूमी पाहण्याचा बराच प्रयत्न केला, पण त्याची एकसुद्धा आठवण दिसेल, असे एकही स्थान नव्हते. श्रीरामचंद्रांनी स्वर्गवास पत्करला त्याबरोबर अयोध्या नागरिकांनी त्याच्यासंगे तोच मार्ग अवलंबिला. अयोध्या नगरी लोकरहित झाली. पुढे विक्रमादित्य राजांनी २००० वर्षांपूर्वी रामाचे गुण गाऊन ही नगरी पुनर्स्थापित केली, पण आता अवशेषसुद्धा प्रतीक म्हणून त्या जागा दाखवीत नाहीत. अयोध्येला खरे मंदिर असेल तर ते हनुमानाचे आहे व त्याला हनुमानगढी म्हणतात. या खेड्यात अशा कितीतरी गढ्या आहेत. ज्या बहुतेक पडलेल्या इमारतीवर हजारो वर्षे माती साचल्यामुळे निर्माण झाल्या असाव्यात हनुमान गढी तशीच एक टेकडी व त्याच्यावर एक मारुतीचे देऊळ आहे. त्या देवळाभोवती सर्वांत जास्त घोळका जर कोणाचा असेल तर तो माकडांचा व यात्रेकरूंची झुंबड नेणाऱ्या पंड्यांचा. असे सांगतात की, हे देऊळ रामाच्या वेळचे असावे. खूप जागृत स्थान मानले जाते. पण देवळाकडे पाहून ते फार पुरातन असेल याची जाणीव होत नाही. गावाबाहेर एक भली मोठी मशीद आहे. तिच्या मुख्य दारातून आत गेल्यावर उत्तम

कोरलेल्या खांबावर भारतीय संस्कृतीच्या महराबीने आभूषित भिंती पण आहेत. ही महराब व खांब खरोखरच जुन्या काळचे असावेत. पण त्या भव्य परिसरात लांब एका कोनाड्यात धर्मग्रंथ ठेवण्याची जागा दिसली. उजवीकडे मशिदीच्या चहूकडील उघड्या असलेल्या जागेत व कंपाऊंडच्या भिंतीला लागून टिनच्या पत्र्याने झाकलेले एक मंदिर-वजा खोपटे आहे. आत श्रीरामचंद्र, सीतामाई व लक्ष्मणाच्या पितळेच्या मूर्ती विराजमान आहेत. समोरच नमाज पढण्याला जाण्यापूर्वी पाय धुण्याकरता पाणी साचलेली एक रुंद मोरीवजा टाकी दिसेल. हे टिनचे छप्पर असलेले श्रीराम मूर्तीचे स्थान म्हणजेच राम-जन्मभूमी असावी हा समज आहे. कडेच्या दारांनी आत जावे व रामभूमीचे दर्शन घ्यावे ही प्रथा रूढ झालेली दिसते. कुठे थायलंडची अयोध्या व रामायणकालीन कथा व कुठे खऱ्या रामभूमीतील रामजन्मस्थान! कडेच्या दाराने लोक आत येतात, या मूर्तींची पूजा करून त्यांना चोराप्रमाणे या एकीकडील दाराने निघून जावे लागते. श्रीरामाने शरयू नदीकाठी जिथे देवत्व प्राप्त केले व जिथे त्या काळी नागरिकांनी त्यांची शेवटची पूजा केली त्या स्थळीसुद्धा एक मशीद आहे. रामाच्या राजवाड्याजवळ व त्यांच्या राहत्या घराजवळ–ते लोक सांगतात तिथेसुद्धा एक मशीद आहे. या अखंडकीर्तीच्या मर्यादा-पुरुषोत्तम रामाच्या गावी त्यांची पूजा करावी अशी काही जी स्थाने आहेत, ती एकतर नष्ट झालीत किंवा तिथे मशिदी आल्यात. केवढा हा दैवदुर्विलास की, ज्याची आम्ही पूजा करतो व ज्याचे जीवन आम्हाला आदर्श आहे तिथे मशिदीचा आघात समोर दिसतो! जणू सत्य या मशिदीखाली झाकून ठेवले आहे. गावात भटकलो. लठ्ठधारी, त्रिपुंड्रधारी बरेच सज्जन चहूकडे फिरत होते, फरशीने मढलेले लहानलहान बोळ होते, दुकाने होती यात्रेकरू भटकत होते, पण त्या पूज्य पुरुषाच्या आठवणीची जाणीव हनुमान गढीशिवाय दुसरीकडे भव्यतेने दिसली नाही. इतकेच म्हणावे लागेल की, या शहरी यात्रे व दोन अश्रू गाळावे, हीच त्या परमपुरुषाला श्रद्धांजली आहे.

## कंस राजाची राजधानी मथुरा

मथुरा ही कंस राजाची राजधानी होती. या राजाने आपल्या प्रतापी सासऱ्याच्या-जरासंधाच्या– मदतीने हे शहर कसे सुशोभित व सुव्यवस्थित केले होते. या शहराची ख्याती फार जुन्या काळापासून उल्लेखिली गेली आहे. आपण रोज सकाळी मोक्ष देणाऱ्या शहरांची नामावली गात असतो ती अशी–

अयोध्या, मथुरा, माया, काशी, कांची, अवंतिका ।
पुरी, द्वारावतिश्चव, अष्टता मोक्षदायिका: ॥

या आठ शहरांपैकी तीनच शहरे जिवंत स्थितीत दिसत आहेत. ती म्हणजे काशी, जगन्नाथपुरी व मथुरा. बाकीची शहरे मरगळलेलीच आहेत.

मथुरेला भगवान श्रीकृष्णाने मोठा पराक्रम केला व दुष्ट कंसाचा वध करून त्याच्या पित्याला-म्हणजेच उग्रसेनाला ते राज्य अर्पण केले. जरासंधाने राज्य परत मिळवण्या-करता व जावयाच्या वधाचा बदला घेण्याकरिता लढाया केल्या. पण ते हल्ले परतविण्यात आले. शेवटी कालयवन राक्षसाच्या मदतीने जरासंधाने प्रखर हल्ला केला. त्या वेळी श्रीकृष्णाने आपले धूर्त स्वरूप प्रगट करून सर्व यादवांसहित मथुरा सोडली. लांब सौरा-ष्ट्राच्या टोकाला द्वारकानगरी स्थापून तिथे एका नवीन राज्याची मुहूर्तमेढ रोवली. या जुन्या राज्याचे अवशेष नुकतेच समुद्राच्या अवघ्या सहा फूट खोल पाण्यात सापडले आहेत व ते जुन्या द्वारकेच्या वैभवाची आठवण देत आहेत. जरासंध व कालयवनांनी मथुरेची थोडी नासधूस केली. पण तेथील देवळांना संरक्षण दिले. मथुरा हे शहर अगदी दिल्ली-जवळ असल्याने वायव्य प्रांतातून येणाऱ्या परकीय हल्लेखोरांनी दिल्लीबरोबर मथुरा पण कैक वेळा लुटली. हूण आणि शक लोक आले, त्यांनी लुटण्याचा प्रयत्न केला. पण शेवटी ते इथेच स्थायिक झाले व येथील समाजरचनेत विलीन होऊन गेले. महंमद गझनीने भार-तीय देवळांतील संपत्तीची चांगलीच नोंद घेतली होती. तो या संपत्तीकरता अधाशीपणे कैक वेळा भारतात शिरला. एका काळी त्याने मथुरेतील देवळे लुटली. श्रीयुत रा. भि. जोशी, यांच्या 'मजल दरमजल' पुस्तकाप्रमाणे या लुटीत त्याला सोन्याचे देव तर मिळालेच पण मोठाल्या चांदीच्या मूर्ती त्याने उंटावरून गझनीस नेल्या. तो फार काळ इथे राहिला नाही व त्याने धर्मप्रचारात वेळ घालविला नाही. मथुरेचा पुनर्जन्म झाला.

सगळी मथुरा व वृन्दावन हा विभाग कृष्णमय आहे. येथे व्यासमुनींनी भागवताची रचना केली. तिथे सुरुवातीलाच आपल्या पुत्राचे-शुक्राचार्यांचे जे वर्णन केले आहे, ते किती हृदयस्पर्शी आहे. शुकमुनी ध्यानस्थ स्थितीत अगदी नग्नावस्थेत ब्रह्मानंदात विलीन होऊन चालत होते. त्यांना पित्याने हाक मारली, पण त्या हाकेचे उत्तर आजूबाजूच्या वृक्षांनीच दिले. परमात्मा प्रत्येक जीवसृष्टीत, अणुरेणूत भरला आहे. श्री ज्ञानेश्वरांनी लिहिल्याप्रमाणे 'विचरे विश्वामाजी विश्व होऊनी' अशी स्थिती झाली. याच स्थितीचे हे उतम उदाहरण होय. सर्वसंगपरित्याग करणारे शुकमुनी एका सरोवराच्या कडेने जात होते. त्या सरोवरात कैक ललना वस्त्र सोडून स्नान करीत होत्या; पण त्या ललनांनी या ध्यानमग्न ब्रह्मचारी पुरुषाकडे लक्ष दिले नाही. थोडयाच वेळाने दुसरे मुनी त्याच रस्त्याने येत आहेत हे पाहताच स्त्रिया भराभर वस्त्रे परिधान करण्यास धावल्या. त्यांना मुनींनी विचारले असता त्या ललना म्हणाल्या की, शुकमुनी सबंध संसारात एकजीव झाले आहेत. त्यांच्या मनात कुठेही भेदभाव नाही. त्यांनी इंद्रियदमन केव्हाच साधले असून विषयवासनेकडे त्यांचे लक्ष नाही. अशा पुरुषाला आम्ही एकरूपच समजतो. भागवताच्या शेवटी दहाव्या अध्यायानंतर व्यासमुनींनी श्रीकृष्णचरित्र गायिले. श्रीकृष्णाच्या लीला

खूप वर्णन केल्या . श्रीकृष्णाने लहानपणीच कैक राक्षसांचा नाश केला. गोपी–गोपजनांना मोहित केले. शेतीसंगे जोडधंदा म्हणून गोरक्षण व गोपालन यांना प्रोत्साहन दिले. राधे-सारख्या आपल्यापेक्षा मोठ्या स्त्रीला मोहीत करून त्याने दाखवून दिले की, ईश्वर प्रत्ये-कात अखंडरूपाने स्थित आहे. त्याचेच ध्यान करावे, त्यालाच भजावे, त्याच्यावर प्रेम करावे व त्यालाच आपल्या अंत:पुरात ओळखावे. श्रीकृष्णाला नेण्याकरता उद्धव वृन्दावनात आला. गोपी कृष्णविरहित होत्या. उद्धवाने त्यांना ब्रह्मज्ञान सांगण्याचा प्रयत्न केला. पण गोपी म्हणाल्या की, हे तुमचे ब्रह्मज्ञान तुमच्याजवळच ठेवा. आम्हाला श्रीकृष्ण हवेत व श्रीकृष्णाचे प्रेम हवे. श्रीकृष्णाच्या भक्तिरसानेच आम्हाला मुक्ती मिळेल. रासलीला करताना इतक्या गोपिकांच्या घोळक्यात एकदा कृष्ण नाचताना दिसतो, पण त्या भगवंताने आपल्या मायेने दाखवून दिले की, तो एकटा नसून प्रत्येकीजवळ आहे व या रासक्रीडेच्या चित्रात कैक कृष्ण प्रत्येक गोपीबरोबर नाचताना चितारले गेले आहेत. नरकासुराच्या बंदिवासातून काढलेल्या कैक स्त्रियांशी त्याने लग्न केले असे भासविण्यात येते. पण भाग-वतात द्वारकेचे वर्णन करताना या असंख्य स्त्रियांचे वेगवेगळे वाडे दाखवले व प्रत्येक वाड्यात एक कृष्ण होता. मानव देह एक मंदीर आहे. या मंदिराची देखभाल व्यवस्थित केली पाहिजे, कारण या मंदिरात परमात्मा वास करतो. त्या जगन्नियंत्याची अहर्निश आठवण झाली पाहिजे म्हणून नित्यप्रेमाचा व भक्तीचा संदेश भगवंतांनी दिला आहे. संत कबीर म्हणतात की, ज्याप्रमाणे पाणी आणणारी ललना डोक्यावर दोन–तीन घागरीचा तोल सांभाळून हावभाव, बोलणे, चहूंकडे पाहणे, चालणे आदी व्यवहार व्यवस्थित करीत असते व हे सगळे व्यवहार करताना तोलाची ती काळजी घेते, असेच मानवाने अवश्य करावे. संत कबीर यालाच ‘ जिमिघागर पनिहार ’ असे म्हणतात.

मोठे झाल्यावर भगवान श्रीकृष्णांनी कितीतरी धूर्तपणा दाखविला. सगळे महाभारत त्याने घडवून आणले व त्या महाभारतात अर्जुनाला भगवद्‌गीता सांगितली. आज भारतीय संस्कृतीचा आद्यग्रंथ म्हणून ही गीता वाखाणली जात आहे. भारतात घरोघर श्रीकृष्णाचे नाव दुमदुमत आहे. सूरदास, संत मीराबाई आणि चैतन्य महाप्रभू हे तर श्रीकृष्णगायनात अक्षरश: वेडे झाले. आजमितीला हा श्रीकृष्णमहिमा ‘श्रीकृष्ण कॉन्शसनेस ’ या संस्थेने जगभर पेरला आहे. पण हे कृष्णमय जग झाले तरी या श्रीकृष्णाचे जन्मस्थान आम्हाला दिसत नाही. केशवदेवकी टेकडी ’ इथे कृष्णाचा जन्म झाला असे म्हणतात. त्या विभागा-वर कैक वेळा देवळे बांधण्यात आली. ती तोडली पण गेली, पण देवळे येतच होती. आम्हाला आता त्या श्रीकृष्ण भूमीवर एक मोठी मशीद औरंगजेबाने बांधलेली दिसत आहे. मथुरेत कैक देवालये आहेत, पण जिथे त्यांनी जन्म घेतला तिथे काहीच नाही. जन्माष्टमीच्या दिवशी त्या मशिदीच्या भिंतीवरच एक खोपटे करून कृष्णजन्माचा सोहळा गोड करण्यात येतो. जगात ज्याची ख्याती दुमदुमली, भारतातील प्रत्येक घरात कृष्णमय वातावरण झाले तरीपण या श्रीकृष्णाची जन्मभूमी दूषितच ठेवलेली दिसते. वृन्दावन, कुंजवन इकडे त्यांच्या रासलीला

झाल्या. बाललीला झाल्या, तिकडेच बादशहा अकबराच्या वेळी काही मंदिरे उभारण्यात आली. ती अद्याप टिकून आहेत. पण मथुरेला तसे काही नाही. मशिदी जरी आल्या तरी त्या परमपुरुषाला भक्तीने लोक गात आहेत व अशांची संख्या या देशात भरभक्कम आहे. परदेशी हल्ले झाले. त्यांनी लूटमार केली. देवळे फोडली. पण त्यांच्या मोहिमेचा धर्म बदलण्यावर फारसा परिणाम झाला नाही. लूटमार करणाऱ्या लोकांनी हे सगळे लोक बाटविण्याचा प्रयत्न केला असता तर श्रीकृष्णाची पूजा करणारे उरले नसते.

पण आता मथुरेला जी उरलीसुरली देवळे आहेत त्यांच्यावर एक गंडांतर येत आहे. भारत सरकारने उत्तर प्रदेशात तेल शुद्धीकरणाचा एक कारखाना तीन वर्षांपूर्वी चालू केला. हा प्रकल्प मथुरा शहरापासून ८ ते १० मैलांवर आहे. प्रकल्पाबद्दल बऱ्याच लोकांनी हरकत घेतली होती. त्यांचे मते या कारखान्यातून निघणाऱ्या धुरामुळे इतके वायुप्रदूषण होईल की, (आग्रा शहर इथून ४० मैल दूर आहे, अभ्यास आणि विचारांती असे दिसले की, आग्र्याजवळील आगगाड्यांच्या लोकोशेडमधील इंजिनाचा धूर, विटांच्या भट्ट्यांचा धूर व रोज इंधन म्हणून जळणाऱ्या दगडी कोळशाच्या धुरामुळेच ताजमहालची हानी होत आहे.) मथुरेच्या तेलशुद्धीकरण कारखान्यामुळे जे वायुप्रदूषण होईल त्याचा प्रभाव तेथील घरे, मंदिरे, मूर्ती, कपडे यांच्यावर होणार आहे. गावाच्या अगदी लगतचा हा कारखाना व तिथून निघालेल्या वायुप्रदूषणाचा परिणाम जवळपासच्या बागांतील फल-धारणेवर होणार आहे. गव्हाचे उत्पादन घटेल, वाहतुकीची वाढ होऊन रस्त्यात धुरळा व अपघात यांचे प्रमाण वाढेल. या कारखान्यातील रासायनिक सांडपाणी व तिच्यातील डांबरासारखे स्निग्ध पदार्थ यमुनेत जातील व तिथून ते गंगा–यमुनेच्या संगमात शिरतील. तीर्थराज प्रयाग येथील त्रिवेणी संगमात स्नान करताना हे डांबरसदृश पदार्थ मानवी शरीरावर चिकटतील. आपल्या सगळ्या शुद्ध भावनेवर केवढा आघात होत आहे !

या आघातामुळे मथुरेची जेवढी हानी होईल तेवढी या ३–४ हजार वर्षांत कधी झाली नव्हती. या घटनेकडे आजच्या व पुढील येणाऱ्या पिढीने अवश्य लक्ष दिले पाहिजे. श्रीकृष्ण-जन्मभूमीवर होणारा हा आघात थोपविण्याकरता प्रत्येक भारतीयाने कटिबद्ध झाले पाहिजे.

भारतात जेवढे यात्रेकरू परदेशातून येतात त्या प्रत्येकाची आग्रा पाहावा हीच इच्छा असते. या आग्रा शहरात लोक ताजमहाल पाहाण्याकरता जातात. डॉ. ओक यांच्या पुस्तकात नमूद केले आहे की, शहाजहान बादशहापूर्वी या जागेवर तेजोमहाल नावाचा रजपूत लोकांचा प्रासाद होता. त्यांनी हिंदू संस्कृतीची काही चिन्हे ताजमहाला-वरती दाखवली आहेत. ते काही असो. पण ताजमहालची शोभा आज त्या परिसरात आहे. या वास्तूची सुंदरता व मनात ठसणारी आकृती या वास्तुशास्त्रज्ञांच्या कल्पनेत आहे. यमुनानदीच्या एका किनाऱ्यावर असलेल्या या वास्तुशिवाय दुसरी इमारत इथे नाही. मागे यमुना नदीचे अफाट पात्र आहे. जिथे काही दिवस पाणी तर काही दिवस नुसती

वाळू असते, त्या नदीच्या दुसऱ्या टोकापर्यंत काहीच नसलेल्या अफाट परिसरातून आकाश बर येते व या आकाशाच्या खालून ही सुबक पांढऱ्या संगमरवरी दगडाची इमारत समोर उभी राहते. जणू काय कुणीतरी शिंपल्याचे वरचे झाकण उघडावे व त्यातून आतील मोती दिसावा, तसा हा ताजमहाल दिसतो. पौर्णिमेच्या रात्री तर ढगाळ आकाशातून स्पष्ट दिसणारी ही पांढरी इमारत स्वप्नातून प्रत्यक्षात येणारी जागृतीच वाटते. समोरील बागा, कारंजे, हिरवळ या सगळ्या त्या पांढऱ्या इमारतीसमोर इतक्या उठून दिसतात की, जणू त्या स्वप्नातील घरासमोर निसर्गाने वाढलेले सौंदर्याचे ताटच होय ! ताजमहालची महत्ता याच कल्पनेत ओतलेली दिसते. आत जरी शिल्पकारी व जडाऊ दगडांच्या भिंती दिसल्या तरी कुठेही मानव किंवा इतर प्राण्यांची चित्रे नाहीत. फुले-पाने यांचीच चित्रे रेखाटली आहेत व ती रत्नभण्यांनी जडलेली होती. गजबजलेल्या मानव किंवा प्राणी यांच्या संगतीत ही वास्तू नसून शांत वनश्रीत उभी आहे. आपणास तिथे स्तब्धता उपलब्ध होते. त्या शांत वातावरणात बसावे व त्या दोन मृत आत्म्यांची आठवण व्हावी असाच हा परिसर निर्माण करण्यामागचा उद्देश असावा. लॉर्ड कर्झन याने एक झुंबर व त्याखाली लागणारा दिवा या इमारतीतील थडग्यावर ठेवला आहे. जणू काही रात्रीच्या अंधारातच तो एक प्रकाशज्योत शांततेला जागृती देत असावा. अगदी खाली पुन्हा खरी दोन थडगी आहेत, तिथे मात्र कलाकुसरीचे चिन्ह दिसत नाही.

अगदी ताजमहालाच्या पलीकडील यमुनेच्या तिरक्या तीरावर आग्र्यातील प्रसिद्ध किल्ला आहे, या किल्ल्यातील खोलीत बादशहा शहाजहान याने कैदेत दिवस घालवले. त्या बुरुजाच्या एका टोकाला आरसा आणि मणी लावले होते. त्या आरशात ताजमहालचे प्रतिबिंब दिसत होते. या प्रतिबिंबाकडेच मन लावून एकटक पाहत या वृद्ध बादशहाने दिवस काढले व तिथूनच तो अल्लाला मंजूर झाला.

या किल्ल्याची आठवण झाली म्हणजे प्रत्येक महाराष्ट्रीयानेच काय, पण प्रत्येक भारतीयाने मान उंचावून विचार करायला हवा. १२ मे १६६६ रोजी छत्रपती शिवाजी यांनी याच किल्ल्यात प्रवेश केला होता. औरंगजेबाने त्यांची मानहानी केली. त्यांना कैदेत डांबून ठेवले. पण श्री भवानीच्या कृपेने १७ ऑगस्ट रोजी श्री शिवाजी फिरोजखान यांच्या मकबऱ्यात मोठ्या सैन्याच्या कचाट्यात ठेवले असतानासुद्धा शत्रूच्या हातावर तुरी देऊन निसटले. इतिहासात नमूद केले आहे की, ते मिठाईच्या पेटाऱ्यात बसून गेले. पण ही नोंद खोटी आहे. एवढा मोठा योद्धा शत्रूला पाठ दाखवणार नाही. ऐतिहासिक कागद, पत्रावरून आता सिद्ध झाले आहे की, वेष पालटून पेटाऱ्यांच्या गर्दीतून ते निसटले. ही १७ ऑगस्टची तारीख भारतीय इतिहासात सुवर्णाक्षराने लिहावी लागेल. ज्या दिवसापासून शिवाजी निसटले त्या दिवसापासून मुगल साम्राज्याची उतरती कळा सुरू झाली. औरंगजेबाने प्रयत्नांची पराकाष्ठा केली. लाखो शिपायांचे सैन्य घेऊन ३६ वर्षे तो लढला. दक्षिणेत मराठी राज्याला जिंकण्यास स्वत: आला. या ३६ वर्षात त्याच्या सैन्याची धूळधाण

झाली. त्याची बायको व तो स्वत: अहमदनगरजवळ मेला व मुगल साम्राज्याचा इथूनच अंत झाला. पुढे मराठ्यांनी याच मुगल सम्राटांना पेन्शन देऊन दिल्लीच्या तख्तावर बसवून आपल्या मुठीत ठेवले. लाल किल्ल्यावर मराठ्यांचा भगवा ध्वज १७८९ पासून १८०३ पर्यंत फडकला. मराठी राज्याची सीमा चंदीगढपासून तुंगभद्रा व द्वारकेपासून मेदिनापूरपर्यंत होती. कवी भूषण म्हणत होते :

**'कासी की कला जाती, मथुरा मसिद होती।**
**सिवाजी न होते तो सुनत होती सबकी ॥**

हे अगदी खरे वर्णन आहे. शिवाजी जर झाले नसते तर आज भारताच्या एका भागात पाकिस्तान झाले ते सबंध भारतात झाले असते. या परमपुरुषाला भारतात अग्रगण्य स्थान दिले पाहिजे, व ज्या घटनेमुळे मोंगल साम्राज्याचा अंत जवळ आला त्याची आठवण म्हणून आग्र्याजवळील या फिरोझखानच्या मकबऱ्यातील बागेत शिवाजीचा पुतळा उभारला पाहिजे.

(या घटनेचा काळ : १९२१–१९६६)

# १३ : बिहारची सफर - आगगाडीने

१९७१ साली डॉ. रुद्रमूर्ती यांचा मला फोन आला की त्यांना ताबडतोब भेटावे. राष्ट्रीयकृत झालेल्या बँकांनी कैक प्रांतांतील शासनाला त्यांच्या काही प्रगतीशील कामासाठी कर्जाऊ पैसे देण्याचे ठरविले होते, पण या पैशाची परतफेड कशी होईल, किंवा नाही याच्या चाचणीसाठी बऱ्याच बँकांनी काही तज्ञांच्या समित्या नेमल्या व त्यांच्या अहवालानंतर ही रक्कम देण्यात येई. श्री. रुद्रमूर्ती एका बँकेचे अधिकारी होते.

बिहार प्रांतात सोननदी दरवर्षी आपले पात्र बदलत असे. यामुळे भयंकर पूर येऊन मनुष्यहानी होई. या नदीवर व्यवस्थित बांध बाधून पुराचे नियंत्रण करावे व सिंचन झालेल्या भागात शेतीचे उत्पन्न करून कर्जफेड करावी असे त्या शासनाचे मत होते. डॉ. रुद्रमूर्ती याच प्रकल्पांच्या नियोजन आणि उद्दिष्ट याबद्दल सोक्षमोक्ष करण्यासाठी उत्सुक होते. त्याच्याशी भेट झाली. सर्व आकडेवारी दिल्या. माझे प्रयाण ठरले. मुंबईहून प्रथम पाटण्याचे तिकीट मी काढले. परतीच्या तिकिटाची शाश्वती नव्हती, म्हणून महिन्यापूर्वी मी पाटण्याच्या स्टेशनमास्तरना मनीऑर्डर करून आक्षणासाठी विनंती केली. त्यांच्याकडून पैशाची पावती आली. पाटण्याला सकाळी नऊ वाजता पोचलो. तेथील शासनाधिकारी स्टेशनवर आले होते. सर्वप्रथम स्टेशनमास्तरला भेटलो. पावती दाखविली व परतीच्या आरक्षणाबद्दल विचारले. त्यांनी पैसे मिळालेच नाहीत असे उत्तर दिले. माझ्या हाती पावती व त्यांची सही असून त्यांनी असे का वागावे याचे मला प्रथम आश्चर्य वाटले. शेवटी हे प्रकरण मी पोलीसठाण्यावर नेण्यास निघालो, तेव्हा कुठे स्टेशनमास्तरनी पैसे मिळाल्याचे कबूल केले व परतीचे आरक्षण दिले. जाताना तो चहापाण्याला मागणी करीतच होता. पाटण्याला एका छोटया हॉटेलात माझा मुक्काम होता. येथील हॉटेलचालक खोलीचे कुलूप देत नाहीत. मला प्रथम कुलूप आणावे लागले व कपडे बदलून त्या शासनअधिकाऱ्याच्या समवेत त्यांच्या मंत्रालयात गेलो.

सोबत अधिकारी असतानादेखील त्या मंत्रालयातील शिपायाने आम्हाला अडविले. व 'हमारा क्या हिसाब ?' म्हणत दहा मिनिटे त्रास दिला. आता राजस्व सेक्रेटरी यांची भेट घेतली. त्यांनी सर्व नकाशा दाखविला. माझी त्या सोननदी विभागात होणारी यात्रा

यशस्वी होवो म्हणून आशीर्वाद दिला. व तेथील कमिशनरला पत्र धाडले. तेथून परत येताना रॅव्हेनशा कॉलेजात गेलो व जीवशास्त्र विभागात माझे ठरलेले भाषण संपविले, संध्याकाळच्या गाडीने सोनविभागाकडे प्रयाण केले. दुसऱ्या दिवशी दुपारी ठराविक स्थळी पोहोचलो. तेथील डेप्युटी कमिशनर एक कोकणी गृहस्थ होते. त्यांच्याशी मराठी बोलून घरोबा निर्माण केला.

ते पावसाचे दिवस होते. आगगाडीच्या प्रवासात कैक स्टेशनांवर यात्री प्लॅटफॉर्मवरच भोजन करताना दिसले. ते भोजन कसले ? पाण्यासाठी यात्रीगुंफात मी प्रवेश केला. एका भांड्यात सातूचे पीठ, पाणी व गूळ या मिश्रणाची लापशी होती. डाव्या हातात आंबा होता. आंबा चोखत जायचे व सातूचे पीठ ओरपत जायचे असे हे भोजन होते. त्या पिक-लेल्या आंब्यावर असंख्य माशा घोंघावत होत्या. तसेच पीठ व गुळावर माशा कशा तुटून पडत होत्या. एका हाताने माशा हाकलायच्या व आंबा चोखायचा, पुन्हा पिठावरील माशा हाकलायच्या व ते ओरपायचे. दृश्य कसे घृणास्पद दिसत होते. तरी पण सबंध प्लॅटफॉर्मवर या माशांच्या झुंडीशी निकराने तोंड देत यात्री दुपारची न्याहरी करत होते. हा देश इतका सुपीक आहे की, जिथे बी टाकाल तिथे खताशिवाय अन्न येईल. पाणी मुब-लक आहे. खनिज पदार्थांची सुबत्ता आहे, कोळसा, तांबे, लोखंड आहे. जंगल आहे, तरी लोक कसे ? शेतीकरता या माशांचे अन्न गिळत होते. सम्राट अशोकाचा देश किती उत्तुंग विजय शिखरावर पोचला होता ! आता या साम्राज्याचे शिलालेख व भग्न अवशेष दिस-तात व ज्या लोकांनी लढाईत सम्राटाला यश मिळवून दिले ते लोक आता या सुवर्णभूमीत दारिद्र्य आणि बेशिस्त याच परिस्थितीत जगत आहेत.

त्या सोननदीचा सर्व परिसर तपासला. खेडोपाडी लहान तळी होती. तिथे रेडे-म्हशी डुंबत होते. काही रेडे पाण्यातून निघाले की त्यावर स्वारी करणारे लोक यम-राज्याच्या दूताप्रमाणे घरी चालले होते. शेते कशी हिरवीगार होती, व गावात गवताने शाकारलेली घरे व बोळात लहान मुले उघडीनागडी धावत होती. लहान मुली आपल्या छोट्या भावांना अंगाखांद्यावर घेऊन आम्ही पोचलो तिथे यायच्या पण तिथेसुद्धा त्या लहान मुलांच्या तोंडावर माशाच घोंघावत होत्या. महात्मा गांधींनी नीळप्रकरणी जो सत्याग्रह केला, तो विभाग पण पाहिला. नीळ रंग साठविण्यासाठी मोठमोठे चिरेबंद वाडे होते. ते ब्रिटिशांनी बांधले होते. गरीब शेतकऱ्यांना भातशेतीपासून वंचित करून नीळ पेरण्यास उद्युक्त करत होते. त्या चळवळीचा सर्व इतिहास लोकांनी इत्थंभूत सांगितला. आता त्या नीळ पिकविणाऱ्या शेतात भात, गहू आदि अन्नधान्ये पेरली जात होती. शासना-तर्फे खत व कीटकनाशके शेतकऱ्यांना देण्यासाठी केंद्रे उभारली होती. तीन-चार दिवस सगळीकडे दौरा केला व सर्वांचा निरोप घेऊन सायंकाळी ५–३० ला स्टेशनवर पाटण्या-कडच्या प्रवासासाठी आलो. गाडी उभी होती. मी फर्स्टक्लासचे तिकीट काढले व आरक्षणा-बद्दल विचारले, तेव्हा बुकिंग क्लार्क म्हणाला, 'रिझर्वेशन की जरूरी नहीं है।' गाडी

प्लॅटफार्मवर उभी होती व तिथे पहिल्या वर्गाचा एकच कोच होता. कुलीने माझे सामान त्या डब्यात नेले पण कुठे ठेवावे ह्याचा विचार करीत मी सगळ्या कुपेत पाहू लागलो, तेव्हा दिसले की त्या आठ कुपेपैकी एकात पण कोणताही प्रवासी नव्हता. मला जरा शंका आली म्हणून मी स्टेशनमास्तर व गार्डला बोलावून म्हटले, 'मी काय एकटाच प्रवास करणार ? तरी तुम्ही सर्व कूपे तपासा, ज्यायोगे मला सुखरूप प्रवास करता येईल.'

संध्याकाळचा अंधार दाटत होता. टॉर्च घेऊन गार्डने कूपे तपासण्यास सुरुवात केली. एका बेंचाखाली दोन तंगड्या बाजूला सरकल्या. टॉर्च मारून त्या माणसाला बाहेर काढले. 'तू कोण रे ?' असे विचारताच तो पेंगणारा डाव्या हातात बाटली धरलेला माणूस अर्ध-वट तोंड उडून म्हणाला, 'मी तिकीट कलेक्टर आहे.' 'अरे, पण बेंचाखाली काय कर, तोस ?' तो काही उत्तर देईना. त्याला ओढून काढले व डब्याबाहेर हाकलले. कूपे तपास-ताना संडासाजवळ आलो. पण संडास बंद होते. जोराने ठोठावले व दरडावून उघडण्यास सांगितले. दार जेमतेम उघडताच दुसरे गृहस्थ अस्ताव्यस्त कपडे घातलेले पेंगत पेंगत बाहेर आले. 'तुम्ही कोण ?' विचारताच तो म्हणाला, 'मी एक्साइज इन्स्पेक्टर आहे.'

'अरे, पण संडासात काय करतोस ?' असे म्हणून त्याच्या मानगुटीचे कपडे धरले व गार्डने त्याला डब्याबाहेर केले. अशी तपासणी संपल्यावर मी त्या गार्डला विनंती केली की दर दोनचार स्टेशनानंतर दार ठोठावून मला उठविण्याचा प्रयत्न करावा. ते दोघे बाहेर गेले व मी सर्व खिडक्या बंद केल्या. दारांना आतून कड्या घातल्या व एका कूपेत जेमतेम बसलो. पुन्हा उठून सगळ्या कूपेचे दिवे लावले. दार बंद केले व सामान ठेवलेल्या कुपेत अंथरूण टाकले. दारे–खिडक्या बंद होत्या व आत पंखा व लाईट चालू होते. गाडी सुरू झाली. पण मला झोप काही येईना. तशात काही स्टेशनावर लोक दार व खिडक्या ठोठावत होते. एकाने तर चक्क दगड फेकून एका कूपेची काचेची खिडकी फोडली. मी दारे–खिडक्या उघडल्या नाही. या प्रत्येक स्टेशनच्या ठोठावण्यामुळे झोप येईना. मध्यरात्रीनंतर अर्धवट झोपेत जरा डोळा लागला. कुणीतरी समोरच्या बाकावर बोलत आहे असा भास झाला. अर्ध्या झोपेतच होतो. एक विचार झाला की ते शक्य नाही. तरी पण पांघरुणाखालून डोळे जरा उघडले, तो काय आश्चर्य ! समोरच्या बाकावर चार स्त्रिया बसल्या आहेत. त्या सगळ्या सवाष्ण दिसल्या व त्यात एक स्त्री जी वयस्क दिसली ती अगदी माझ्या माते-प्रमाणे होती. तिने हात वर केला व घाबरू नको असे ती म्हणाली. मी डोळे विस्फारले व पटकन उठलो. पाहिले तो समोर कुणीच नव्हते. माझी आई कैक वर्षांपूर्वी वारली व ती सवाष्ण होती. 'घाबरू नको, आम्ही येथे आहोत,' हे आवाज कुठून आले ? ह्याचा विचार करीत मी उठलो व पुन्हा सगळे कूपे तपासले पण कुठेही मनुष्य दिसला नाही. एका कूपेत दगड आणि फुटलेल्या खिडकीच्या काचा पसरल्या होत्या.

अशा भासातून विचार करीत अर्धी भीती आणि अर्धी विचारशक्ती यांच्याशी झग-डत मी सबंध रात्र जागून काढली. सकाळी बरौनी स्टेशन आले. तिथे तेलाची शुद्धी कर-

ण्याचा कारखाना आहे. त्यामुळे जवळपास कामगारांची बरीच वर्दळ दिसत होती. गाडी थांबताच गार्ड स्टेशनकडे जाऊ लागला. त्याला गाठले व विचारले की वचन दिल्याप्रमाणे त्यांनी माझी विचारपूस का केली नाही ? त्याने उत्तर दिले, " इधर कोई फर्स्टक्लासमे प्रवास करता नही " असे म्हणून तो हसला व म्हणाला, " आप जिंदा है, इसलिए आपको बधाई. " असे म्हणत त्याने माझ्या पाठीवर हात ठेवला व हसत निघून गेला. तो जाई-पर्यंत इतर प्रवाशांची आमच्याभोवती गर्दी जमली होती. गार्ड जाऊ लागला तेव्हा बरेच लोक म्हणाले, " गार्ड साहब ठीक कहते हैं, तुम्हारा दिमाग तो ठीक है न ? जो तुमने बडे किलासमें अकेला प्रवास करनेका धीरज दिखाया । भगवानकी प्रार्थना करो की तुम्हें एक-दो पत्थरों के सिवा और कुछ नही हुआ. "

असाच दुसरा प्रवास १९७७ साली मला गयेहून करावा लागला. बौद्ध गया हे फार मंगलमय व पवित्र स्थान होय. जगातले बरेच बौद्धधर्मीय यात्री इथे बोधिवृक्षाच्या दर्शनास येतात. याच गावी भगवान बुद्धाला एका अश्वत्थ वृक्षाखाली (पिंपळाखाली) महाज्ञान प्राप्त झाले होते. त्या वेळचा वृक्ष अद्याप आहे किंवा नाही याबद्दल जरा शंकाच वाटते, पण तिथे एक मोठा पिंपळ आज तरी दिसतो. या पिंपळाच्या झाडाला बुद्धधर्मीय यात्री रंगीत चिंध्या गुंडाळतात व वृक्षाची पूजा करतात. वृक्षाच्या समोरच एक जुने मंदिर आहे. त्या मंदिरात भगवान बुद्धाची सुवर्ण रंगाने लिंपलेली कमलासनस्थ व ध्यानस्थ मूर्ती दिसते. त्या बागेत दोन-चार आणखी पिंपळाची झाडे आहेत व काही भग्न प्रासादांचे अवशेष पण दिसतात. जवळच जपानमधील बुद्ध भिक्खूंनी उभारलेला एक विहार आहे. याची मांडणी सुबक असून तेथील काही खोल्यांत अत्याधुनिक साधनांनी आभूषित राहण्याची व्यवस्था आहे. तिथे आम्ही दोन दिवस राहिलो. भगवान बुद्ध यांना ज्या अश्वस्थ वृक्षाखाली ज्ञान प्राप्त झाले त्या पिंपळाच्या पानाला व्यवस्थित कागदरूप देऊन त्यावर काढलेली सुंदर चित्रे या विहारात तयार करतात. या सबंध परिसराजवळ मगध विश्वविद्यालयाचे परिसर आहे. इथेच आमची परिषद भरली. भारतातून बरेच प्राणिशास्त्रज्ञ आले होते व त्या परिषदेचे उद्‌घाटन बिहार राज्याच्या राज्यपालांनी केले. सोहळा तोकडाच होता, तरी पण त्याला भारदस्तपणा आला होता. दुपारचे जेवण संपवून आम्ही गावात गेलो. भुयारी गटारे नसलेल्या या गावात माशांचा चांगलाच सुळसुळाट होता. खाद्यपेये बरीच स्वस्त होती व हातमागाचे कापड व त्यावर कलाकुसरीने काढलेली चित्रे आकर्षक होती व ती माफक दरात विकली जात होती.

गावाच्या एका टोकाला विष्णुपाद नावाचे देऊळ आहे तिथे सर्व हिंदू पिंडदान करतात. ह्या देवळालगतच मोठी फलगू नावाची नदी त्यासमयी खळखळ वाहत होती. मंदिरातील वातावरण मंत्रांनी गोंधळल्यासारखे झाले होते. गर्भगृहात एका शिलेवर उजव्या पायाचा ठसा उमटला होता व त्यावर पिंडदान करण्याची यात्रेकरूंची चढाओढ लागली होती. ह्या मंदिराचा पुजारी दक्षिणी महाराष्ट्रीय देशस्थ ब्राह्मण होता. त्याच्या

पत्नीने ताटात आणलेला नैवेद्य दाखवत असताना आम्ही त्याला भेटलो व त्याने नागपूर आपले जन्मगाव सांगून त्या मंदिराची सगळी माहिती दिली. 'नागपूर' नाव ऐकून बरीच आपुलकी निर्माण झाली व आम्ही त्यांचा निरोप घेऊन बाहेरील जागेत आलो. तिथे पंड्यांची चांगलीच वर्दळ होती. चांगले शर्ट, धोतर किंवा पॅन्ट घातलेले हे पंडे यजमानाकडून पिंडदान करवीत होते. पण हे पिंड भाताचे नसून सातूच्या पिठाचे होते. पिंडदान झाले की जवळच असलेल्या फलगू नदीत हे पिंड शिरवीत होते.

हा सर्व प्रकार बघून मला फार जुनी आठवण झाली. जवळपास पन्नास वर्षांपूर्वी माझे वडील येथे आले होते व त्यांनी असेच पिंडदान केले. तेव्हा इथे दिसणारी वस्ती नव्हती व विष्णुपाद मंदिराभोवतालची गर्दीही कमी होती. याशिवाय फलगू नदी त्या वेळी अगदी ठणठणीत दिसली. जाताना वडिलांनी आम्हाला लाह्यांचा लाडू दिला होता व त्यावर घोंघावणाऱ्या माशांचा थवा मला अस्वस्थ करीत होता. ती आठवण चघळीत आम्ही रिक्षातून स्टेशनकडे गेलो. माझ्या परतीच्या प्रवासाचे तिकीट मला हवे होते. त्याची विचारपूस करताच स्टेशनमास्तरनी सांगितले की माझे आरक्षण कलकत्त्याहून झाले आहे. ते बघून बरे वाटले व मी परतताना पुन्हा बोधिवृक्षाकडे गेलो.

आता मला बरीच पिंपळाची झाडे दिसली. ज्या वृक्षाखाली भगवान बुद्धाला ज्ञान प्राप्त झाले, त्या वृक्षाचे पुन्हा दर्शन घेतले. पिंपळाचे झाड पूर्णतया वाढल्यावर २४ तासात १२०० लिटर प्राणवायू हवेत सोडते, यामुळे तो परिसर आल्हादकारक तर असतोच व पानांची छाया सूर्याच्या तापदायक उन्हापासून रक्षण करते. अशा वृक्षाखाली बुद्ध बसले असताना त्यांना ज्ञान प्राप्त झाले. त्यांची जी हल्ली तिथे प्रतिमा ठेवली आहे, त्या प्रतिमेत त्यांचे हात जगाला शांततेचा संदेश देत आहे असे दिसते व दुसऱ्या हाताने पृथ्वीला साक्षी ठेवत आहेत. इथे हळद, कुंकू, तेल, अक्षता दिसल्या नाहीत किंवा मूर्तीवर फूलमाळा पण नव्हत्या. एका गुलदस्त्यात काही देठासहित फुले ठेवली होती. गोंगाट नव्हता. यामुळे अगदी मनाला शांती मिळत असून दर्शन घ्यावे, बोधिसत्वापुढे नतमस्तक होऊन स्वस्थ चित्ताने परत जावे, असेच वाटले. प्राचीनकाली इथे असलेल्या अश्वत्थ वृक्षाची फांदी सम्राट अशोकाच्या कन्येने-श्रीमती संघमित्राने श्रीलंकेला त्या समयी नेली होती. त्याचे वृक्षात रूपांतर होऊन श्रीलंकेत त्या वृक्षाखाली अद्याप लोक नतमस्तक होऊन शांतता प्राप्त करतात.

तिथे पण आता दोन-तीन वर्षांपासून बुद्ध धर्माचे आदेश झुगारून अशांतता पसरली आहे.

आपल्या विहारात जाऊन सामान गोळा केले व स्टेशनवर पोहचलो. पुन्हा स्टेशनमास्तरना विचारून आरक्षणाबद्दल खात्री केली व रिटायरिंग रूममध्ये रात्री नऊलाच पहुडलो.

कलकत्ता-मुंबई मेल सकाळी ३ वाजता येणार होती. गाडी येण्यापूर्वी २-३०

वाजता प्लॅटफॉर्मवर आलो. गाडी आल्यावर स्टेशनमास्तरनी आरक्षणाचा तक्ता कंडक्टरला दिला व माझा डबा सांगून तो परतला. मी डब्यात शिरलो तेव्हा कंडक्टर दारातच उभा होता. त्याने सांगितले की जागा नाही. मी आरक्षणाचे तिकीट दाखविले तरीही तो आत शिरू देईना. बळजबरीने आत शिरलो. तोपर्यंत गाडी सुटली. त्या कंडक्टरला आरक्षणाबद्दल सांगितले व तक्ता पाहण्यास विनवणी केली. ते महाशय चिक्कार प्यायले होते व काहीच ऐकण्याच्या मनःस्थितीत नव्हते. मी सामान ठेवण्याच्या कक्षेत बसलो तेव्हा हे महाशय पुन्हा एकदोन घोट ढोसून आडवे झाले. त्या भल्या पहाटे साडेतीन वाजता कुडकुडत तिथे उभा असताना एका स्टेशनवर एक रेल्वे ऑफिसर चढला. त्याला सगळी हकीगत सांगितली व अटेंडंटकडून तक्ता मागून माझे नाव दाखविले. त्याने अटेंडंटला दरडावले व मला माझ्या कुपेपर्यंत नेले. माझी जागा कुणालातरी विकली गेली होती. मोगलसरायपर्यंत बसूनच वेळ काढला व गाडी थांबताच तेथील स्टेशनमास्तर, गार्ड तथा पोलिसांना या कंडक्टरबद्दल रिपोर्ट दिला. पोलीस म्हणाले, "ठाण्यावर चला." गाडी सुटायची वेळ झाली आणि स्टेशनबाहेर ठाण्यावर कसे जावे? कसेतरी गार्डच्या डब्यापर्यंत धावत गेलो व त्यांच्या नोटबुकात आपली तक्रार नोंदविली. मुंबईस आल्यावर कलकत्त्यास कमर्शिअल मॅनेजरला तक्रार दिली. चार महिन्यांनी हे कंडक्टर एके दिवशी सायंकाळी मुंबईला कलकत्त्याहून आले व सरळ माझ्या दाराशी उभे राहिले. या वेळीसुद्धा ते महाशय चिक्कार प्यायले होते. त्यांचे म्हणणे होते की माझी तक्रार मागे घ्यावी. कारण त्यांची आर्थिक परिस्थिती चांगली नाही. मुलगा नक्षलवादी असल्याने जेलमध्ये आहे व मुलगी इंजिनियरिंग कॉलेजात शिकत आहे. यासाठी त्यांना पैशाची फार अडचण होती. त्यांना विचारले की तक्रार त्यांच्या हाती कशी आली? तेव्हा त्यांनी ऑफीसमध्ये कळल्याचे सांगितले. त्यांना परत पाठविले. जाताना ते म्हणाले की याबद्दल विचारपूस होणार व ती गयेला होईल व आपण गयेला येऊ नये. मला महिन्याभरात इन्क्वायरीचे पत्र आले. त्या सोबत गयेचे तिकीट होते. मी येण्याबद्दल नकार दिला व चौकशी मुंबईला करावी असे कळविले. चार महिन्यांनी मुंबईला चौकशी ऑफिसर आले व बोरीबंदरला चौकशी केली. कंडक्टरने, "मला काही माहीत नाही," सांगितले. पुन्हा ही चौकशी कमिटी कलकत्त्यात भरली. तिथे जाण्यास मी नकार दिला व रेल्वे बोर्डाला कळविले. सर्व प्रकरण थंडावले व या घटनेच्या नंतर दोन वर्षांनी मला पत्र आले की ही चौकशी कमिटी बरखास्त केली व यथायोग्य शासन त्याला दिले गेले.

या अनुभवानंतर दुसरीकडचा अशाच प्रवासाचा एक सुखद अनुभव आगगाडीच्या प्रवासात मला आला.

त्याचे असे झाले की, एकदा परदेशात असताना आगगाडीने प्रवास करण्याची हुक्की आली. त्या देशात ६० वर्षांवरील गृहस्थांना सिनियर सिटीझन म्हणतात व त्यांना प्रवास व मनोरंजन आदीच्या खर्चात बरीच सूट दिली जाते. याशिवाय परतीच्या

तिकिटावरसुद्धा सूट मिळते. या सगळ्या गोष्टीचा फायदा घेऊन मी शिकागो ते न्यूऑर्लेन्स व परतीला न्यूयॉर्कतर्फे शिकागो असे तिकीट काढले.

ते हिवाळ्याचे दिवस होते व उत्तर अमेरिकेत बराच हिमपात झाला होता. न्यूयॉर्क ते क्लीवलेंड माझा प्रवास संपला व क्लीवलेंडहून शिकागो व तेथून पुढे गेल्सबर्गला जावयाचे होते. गेल्सबर्गला आमचे चिरंजीव राहतात. क्लीवलेंडहून शिकागो प्रवास करण्यासाठी सकाळी पावणेसातला स्टेशनवर पोचलो. आगगाडी सातला येणारी होती. बाहेरील तपमान शून्याच्या तीस डिग्री खाली होते. हिमपात झाल्यावर तपमानामुळे चहूकडे कडक बर्फाचा सडा पडला होता. त्या गुळगुळीत बर्फावरून चालणे म्हणजे हातापायाला इजा होण्याचे आमंत्रणच होय. गाडीतून सामान काढून वेटिंगरूममध्ये बसलो. थंडीपासून जरा ऊब आणण्यासाठी स्टॉल मशीनमध्ये पैसे टाकून गरमगरम कॉफी एका कागदाच्या पेल्यात घेतली. याचा स्वाद घेत असतानाच कळविण्यात आले की गाडी उशीरा येणार आहे. किती उशीरा येणार याबद्दल खात्री नव्हती. अर्धा तास तिथे गाडीकरिता थांबलो. तेव्हा स्टेशनमास्तर स्वत: आमच्याकडे आले व म्हणाले की गाडी केव्हा येणार याचा नियम नाही. कारण थंडी बाहेर बरीच आहे व त्यामुळे आगगाडीचे रूळ थिजून गेलेले दिसतात. मग आम्ही काय करावे असे विचारताच तो म्हणाला,

'तुम्हाला चार वाजताची शिकागोहून गेल्सबर्गला जाणारी गाडी पकडावयाची आहे. या स्टेशनवर येणाऱ्या गाडीची वाट पाहू नका. कारण ह्या गाडीने तुम्ही शिकागोला केव्हा पोहचणार याची खात्री नाही. यासाठी तुम्ही ग्रेहाऊंड बसने जावे.' ते कसे जमेल असे मी विचारताच तो 'नो प्रॉब्लेम ' म्हणत 'चला,' म्हणाला. त्याने स्वत:ची गाडी आणली व आमचे सामान त्या मोटारीत भरले व आम्हाला ग्रेहाऊंड बसस्थानकापर्यंत पोचविले. त्याने आमचे सामान खाली ठेवले व तेथील मॅनेजरला भेटून सांगितले की आम्ही रेल्वेचे तिकीटधारी प्रवासी आहोत. त्यामुळे आमचे वेगळ्या बसतिकिटाचे पैसे घेऊ नयेत. पाच डॉलरची पावती दिली. आम्ही टॅक्सीतून युनियन स्टेशनच्या परिसरातील दुसऱ्या भुयारात शिरलो. या स्टेशनवर मात्र बरेच चांगले प्रामाणिक कुली होते. एकाला सगळे सामान दिले व त्या स्टेशनमास्तरकडे गेलो. आमची गेल्सबर्गची गाडी केव्हाच निघून गेली होती. त्या स्टेशनमास्तरला रेल्वेचे तिकीट काढल्याने जो त्रास व खर्च झाला याची तक्रार केली. त्याने पटकन एक कागद समोर ठेवून म्हणाला,

'आपली गाडी चुकली, तरी साडेसातला दुसरी गाडी तिकडेच जात आहे. त्यावर तुम्हाला आरक्षण देतो. शिवाय तुम्हास त्रास झाल्याबद्दल माफी मागतो व जो काही खर्च झाला असेल तो या कागदावर लिहावा व आम्ही तेवढे पैसे तुम्हाला देऊ.' मी टॅक्सीभाडे व कुलीभाड्याचे पैसे लिहिले व त्यांनी तेवढे पैसे ताबडतोब दिले. पुढे प्रश्न निघाला की आमच्या घरची मंडळी काळजीत असतील. म्हणाला, 'नो प्रॉब्लेम ' व माझ्या समोर त्याने फोन ठेवला. मी घरी गेल्सबर्गला फोन लावला व काळजीत असलेल्या मंडळींना

रात्रीला येतो असे सांगितले. त्याने क्लीवलॅंडला सारखी विचारपूस केली होती. म्हणून भाच्यास तिकडे फोन करून त्याचीही काळजी दूर केली. टेलिफोनचे बिल त्याने स्वत: दिले. हे बिल व वरील खर्चाचे पैसे व आदरयुक्त भाषण भारतातील कुणी रेल्वे कर्मचारी देईल काय ?

(या घटनांचा काळ १९७३-१९८२)

७९५६७
१५/५/८९

# १४ : विदर्भाचा प्रवास

सन १८८५ ते १८८६ साली भारत सरकारला १८ हजार कोटी रुपयांची मिळकत टुरीझम या नावाखाली मिळाली. परदेशी पाहुणे भारतात येतात व ठरलेल्या स्थळीच जातात. महाराष्ट्रात मात्र अजिंठा, वेरूळ, घारापुरी यांची लेणी पाहण्याकरता काही पाहुणे मुंबईला थांबतात, व इथे पैसा खर्च होतो, पण आपल्या महाराष्ट्राचा इतिहास इतका उज्ज्वल आहे की इतर स्थळीसुद्धा त्यांना जाता येईल व तेथील रहिवाशांना थोडे उत्पन्न मिळेल. या निमित्ताने महाराष्ट्रातील तीन विभागाबद्दल मी विचार केला व शासनातर्फे प्लेग आणि सर्पसंशोधन करताना या विभागाला भेट दिली. त्यापैकी काही ठळक नोंदी वाचकांसमोर प्रवास या दृष्टिकोनातून मांडल्या आहेत. हे तीन विभाग म्हणजे विदर्भ, मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्र.

आपल्या महाराष्ट्राची पूर्वेची सीमा डोंगरगड या शहराला लागून आहे. इथे लहान लहान टेकड्यातील गुंफेत बोंबलाई देवीचे देऊळ असून कैक यात्री साधनेला या गुंफेजवळ बसतात. डोंगरगडला जाताना एक बोगदा लागतो व त्याच्या दोन्ही बाजूंस सालेकसा व दरेकसा अशी दोन स्टेशन आहेत. हा विभाग लहान लहान टेकड्यांचा असून मोठमोठ्या शिला चहूकडे पसरल्या आहेत. या शिला अशा काही दिसतात, जणू कुणी वरून रस ओतला असेल व तो थिजून ह्या निर्माण झाल्या. जवळपास चांगलेच घनदाट जंगल आहे. दुर्भाग्यवश ते तुटले आहे. हा विभाग भंडारा जिल्ह्यात मोडतो. इंग्लंडमध्ये Lake district नावाचा एक जिल्हा आहे. तिथे सरोवर व जवळपास हिरवळ खूप दिसते यामुळे बरेच लोक आनंद लुटण्याला तिकडे जातात, महाराष्ट्रातील Lake district म्हणजे हा भंडारा जिल्हा होय. या जिल्ह्यात खूप तळी असून उत्तम जंगल आहे. तांदूळ चांगला पिकतो. मँगनीजच्या बऱ्याच खाणी असून लोखंड, कोळसा व काही इतर खनिजें या जिल्ह्यात सापडतात. इतका सुपीक असून त्याची माहिती अद्याप चोहीकडें पसरली नाही. या जिल्ह्यापासूनच विदर्भाची सीमा सुरू होते. फार पुरातन काली अमरावती जवळ रुक्मांगद राजाचे राज्य होते. त्यांची मुलगी रुक्मिणी. हिचे अपहरण श्रीकृष्णाने केले असे आपण वाचतो. सौराष्ट्रातील द्वारका शहरातून रथात बसून श्रीकृष्ण ११००

मैल आले. चेदी वंशाचे राजे शिशुपाल यांची सत्ता जबलपूरजवळ होती. त्यांना झुगारून रुक्मिणीला याच विभागातून पळविण्यात आले. ही महाभारतकालीन कथा आहे. अलीकडे सालेकसा दारेकसाजवळ जे आमगाव शहर आहे तिथे प्रख्यात संस्कृत कवी भवभूती राहात होते.

आमगावला लहान लहान टेकड्यांवर बुद्ध व जैन मूर्तिच्या प्रतिमा तर आहेतच, शिवाय गावाच्या मध्यावर मोठी गणपतीची प्रतिमा दिसते. रामटेक गावाला कविकुलगुरू कालिदास यांनी ' मेघदूत ' लिहून अजरामर केले. इथे लक्ष्मणाचे प्रख्यात देऊळ असून लांब एका पर्वताच्या गुहेत भारतातील प्रख्यात रासायनिक नागार्जुन यांची समाधी आहे. इथें नागवंशी राजे होते व पुढे वाकाटक घराण्याच्या राजांनी राज्य केले. अलीकडे भंडाऱ्या-जवळ जे देवगड ते नागपूर–चिंदवाडा मार्गावर आहे तिथे ज्यातबा पुरुषाचे गोंड घराणे हरियागडपासून राज्य करीत होते. या देवगडच्या राजाने नागपूर येथील जुन्या शहरा-जवळ किल्ला बांधला जो अद्याप दिसतो. दुर्भाग्यवश गढमंडला येथील गोंड राजघराणे जिथें राजा जदुराय, संग्रामशहा, दलपतशहा, चंद्रशहा आदी राजे झाले किंवा राणी दुर्गा-वतीची ख्याती गरजली, पहाडसिंग यांचे दोन पुत्र यांनी गढामंडला परत घेण्याला औरंग-जेबची मदत मागितली. औरंगजेब एका अटीवर कबूल झाला. ती अट म्हणजे त्या दोन्ही मुलांनी मुसलमान व्हावे. ती मुले कबूल झाली व त्यांनी स्वतःची अट घातली की जरी इस्लाम धर्म स्वीकारला तरी बेटी विवाह किंवा लग्न गोंड घराण्याच्या वंशाशीच त्यांचे वंशज करतील.

धर्म बदलून त्या मुलांनी आपले नाव अब्दुल रहमान हजिज असे ठेवले. यांच्या-पैकीच देवगडचा प्रसिद्ध राजा बक्तबुलंद झाला. (याचे पहिले नाव बखतशहा होते.) या बख्तबुलंदने नागपूरचा किल्ला बांधला. त्यांच्यानंतर त्याचा मुलगा चाँदशहा आला. त्याने वर्धा पवनार आदी गावे मोंगलाकडून घेतली. हा चांदशहा १७३८ मध्ये मरण पावला. त्याच्या मुलांची भांडणे सुरू झाली. चांद सुलतानची बायको रतनकुँवर हिनं रघुजीला पाचारण केले. त्यासमयी रघुजीचे ठाणे यवतमाळ जिल्ह्याच्या भांम गावी होते. रतनकुँवरने रघुजीला मदतीबद्दल आपला मुलगा मानून राज्याचा तिसरा हिस्सा दिला व तिथूनच मराठ्यांचा शिरकाव या राज्यात सुरू झाला. रघुजी नागपूरला १७४० साली राहावयाला आले. नागपूर शहराचा जन्म चांदशहाच्या सुमारास झाला होता व पुढे पुढे रघुजीने त्यांना पेन्शन देऊन नागपूरहून राज्यकारभार सुरू केला. डोंगरगडहून महाराष्ट्रात येत असताना आमगाव येथे संस्कृतचे प्रख्यात कवी भवभूती यांचे जन्मस्थान पाहावे. जवळपासचे जंगल व वितळत्या धातूप्रमाणे थिजून पडलेल्या मोठमोठ्या शिला या डोंगरकपारीवर आहेत. त्यांना भेट द्यावी. पुढे तुमसर लागेल. जिथून संत्रे आणि पेरू या फळांचे मोठ्या प्रमाणात दर्शन होते, थारस्याला तर पिवळ्या केळींच्या कैक बागा आहेत. तुमसरच्या रेल्वेयार्डावरून कैक मालगाड्या मँगेनीजने भरलेल्या पाहून या खनिज

धातूचे किती साठे इथे आहेत याची जाणीव होते. हाच मँगेनीज धातूचा पट्टा तुमसरहून मनसळ व पुढे रामटेकपर्यंत गेला आहे. रामटेक तर श्रेष्ठ कवी कालिदास यांच्या मेघदूत काव्यात आलेले स्थान होय. येथील डोंगरावरून बहिष्कृत झालेला यक्ष आपल्या प्रेयसीला पावसाळ्यातील उडणाऱ्या ढगासंगे संदेश पाठवितो. केवढी सुंदर कल्पना ! रामटेकच्या डोंगरावर आता कालिदासाचे स्मारक झाले आहे. प्रथम तेथे श्रीलक्ष्मणाचे देऊळ होते व पुढे मराठ्यांच्या काळी श्रीरामचंद्र आणि सीतेचे देऊळ निर्माण झाले. या टेकडीपलीकडे एक सरोवर आहे. याला लोक फार पवित्र मानतात व कैक धर्मकृत्ये या सरोवराजवळ होत असतात. पलीकडील डोंगरावर एक छोटीशी गुंफा आहे. या गुंफेच्या आत गेल्यास समोरच एक शिला लागते. या शिलेचा खालील भाग अगदी फूटभर तुटलेला दिसतो. या तुटलेल्या भागातून यात्री सरपटत भुयारात शिरतात. इथेच प्रसिद्ध रसायनतज्ञ नागार्जुन यांची समाधी आहे. समाधीजवळ उभे राहता येते. पण निघताना पुन्हा त्या फूटभर रुंदीच्या शिलेखालील छिद्रातूनच बाहेर पडावे लागते. रामटेकला असेच सरपटून जाण्याचे दुसरे स्थान म्हणजे श्रीरामचंद्राच्या देवळासमोर असलेला एक नंदीवजा दगडाचा डुक्कर दिसतो. यात्री याच्या पोटाखालून सरपटत निघतात. ती जागा इतकी लहान आहे की, चांगल्या ढेरपोटचा माणसाला तिथून निघणे शक्यच नसते. भंडारा जिल्ह्याच्या चार तहसीली आहेत. याहोत, गोंदिया, साकोली उमरेड आणि ब्रह्मपुरी. या सगळ्या गावात गोंदियाच एक सधन गाव दिसेल. जिथे सगळ्या जिल्ह्याचा व्यापार साठलेला दिसतो. जवळच्या जंगलातून आणलेल्या तेंदू नावाच्या झाडाची पाने इथे मोठ्या प्रमाणात तोडून आणतात. या पानांना व्यवस्थित वाळवून भारतभर त्याची निर्यात होते. बिडी या व्यसनाकरता हेच पान उपयोगी पडते. बिडी तयार करणारे कैक घरगुती धंदे इकडे व महाराष्ट्रातील इतर भागात पुष्कळ आहेत. पण तेंदूची पाने इथूनच निर्यात होतात. दुसरी निर्यात इमारती व जळाऊ लाकडाची इथूनच होते. तिसरी निर्यात तांदळाची आहे. इथे तांदूळ चांगला पिकतो व काही भागात वर्षातून हे धान्य दोनदा पिकवतात. याकरता इकडे शेकडो तळी गावोगाव दिसतील. अर्जुनी व नवेगाव येथे मोठे बंधारे बांधून शेत शिंपण्याची व्यवस्था केली आहे. शासनाने नुकतेच नवेगावच्या तळ्याजवळ एक सुंदर रेस्ट हाऊस बांधले आहे. गोंदिया ते नवेगाव हा सगळा विभाग जंगलमय आहे. जंगल घनदाट होते. व तिकडे बरेच वन्य पशु विशेषतः वाघ आणि चित्ते नांदत होते. आता जंगल नष्ट झाले. चित्ते तर गेलेच. पण वाघसुद्धा नामशेष झाले. ब्रह्मपुरीला उत्तम पोहे बनवतात. तिकडे आणि उमरेडच्याजवळ कोळशाच्या खाणी आहेत. लोखंड पण काही प्रमाणात इकडे सापडते. उमरेडला हातमागाची चांगली बाजारपेठ होती व उमरेडी धोतर व उपरणे प्रसिद्ध होते. आता नायलॉन आणि रेयॉनच्यापायी हा धंदा बंद पडत आहे. कैक तळी

असल्यामुळे मासेमारीचा धंदासुद्धा बराच भरभराटीत असून कोळी समाज ऊर्जावस्थेत आहे. नायगाव नागझिरा इथे उत्तम विश्रामगृहे शासनाने बांधली आहेत. तिथे सरोवर आणि दाट जंगलात असल्यामुळे प्रवाशांना निसर्गाचे सुंदर दर्शन होते. नागझऱ्याला विश्रामगृहातूनच असंख्या पाखरे, हरिणे व माकडे दिसतात.

पुढचा जिल्हा नागपूर होय. या जिल्ह्याची महत्ता कापड गिरण्या आणि संत्री यात आहे. भारतात कुठेही संत्री दिसली की नागपूरची संत्री असे संबोधितात. आसाममध्ये व काही प्रमाणात दक्षिणेत संत्री मिळतात. पण ते फळ लहान व टणक असते. त्याला टँजरीन किंवा मँडरीन म्हणतात. नागपूरसारखी संत्री व त्याची चव भारतात दुसरीकडे कुठेही मिळणार नाही. या शहरात भोसल्यांचे राज्य होते व त्याची जाणीव स्टेशनजवळील सीताबर्डीचा किल्ला अद्याप देत आहे. अशी आख्यायिका आहे की, या किल्ल्यातून गावात येण्यासाठी तीन मैलपर्यंत एक गुप्त भुयार होते या किल्ल्याजवळच ब्रिटिश रेसिडेंट रहात होता. पण आता त्या जागी मॉरिस कॉलेज आले आहे. गावातील तीन तळी चांगलीच प्रेक्षणीय आहेत. एकतर शुक्रवार तलाव, जो शुक्रवार दरवाजाजवळ असून एम्प्रेस मिलला पाणी देतो. चांगले बांधकाम याच्या कडेला असून, गावाला एक चांगलीच शोभा आली आहे. दुसरे तळे आहे तेलंखेडीला. हे तळे काठाला अगदी ४०–५० फूट खोल असून पाटाच्या खाली सुंदर बाग व जवळच छोटेसे दाट जंगल दिसते. अशा प्रकारचे तळे व जवळच असलेला जंगलाचा भाग भारतात इतरत्र कुठेही दिसणार नाही. दुर्भाग्यवश जेव्हा भारताला शहरी वनीकरणाची गरज भासते तेव्हाच या जंगलाची तोड होऊन तिथे आता मानवी वसाहत स्थापन होत आहे. तिसरा तलाव आंबेझरी. याच्या जवळपास बऱ्याच छोट्यामोठ्या टेकड्या आहेत. या टेकड्यांवरील पावसाळ्यातील ओहोळ या तळ्यात सोडले जात होते. नागपूर शहर महाराष्ट्रातील विदर्भ विभागाची राजधानी होय. हे वैदर्भीमराठी भाषेकरता प्रसिद्ध आहे. इथे महाराष्ट्र स्वतंत्र होण्यापूर्वी मध्यप्रदेश विभागाची राजधानी होती. यामुळे गावात तुटक्या फुटक्या हिंदीचा बराच सुळसुळाट दिसतो. गावात ज्याला महाल म्हणतात, तिथे चांगले विद्वान पंडित होऊन गेले व अद्याप वेदअभ्यासाच्या एक दोन पाठशाळा आहेत. शुक्रवार दरवाजाजवळ राजा रघुजीने बांधलेला राजवाडा दिसतो. इथूनच १८१८ नंतर इंग्रजांनी मराठ्यांना हरवून त्यांची संपत्ती लुटली. पुढे सक्करदरा नावाच्या विभागात रघुजीने दुसरा वाडा बांधला होता. रस्त्यावर तुळशीबाग नावाचा वाडा व त्याचे अवशेष अद्याप दिसतात. रघुजी हे फार धर्मसहिष्णु होते. शेवटच्या रघुजीने पदरी संगीतज्ञ तर ठेवलेच; पण ताजुद्दीन नावाच्या एका अवलिया फकिराला पण आश्रय दिला होता. या फकिराजवळ कैक गरीब व श्रीमंत लोक आशीर्वाद घेण्याला येत असत. असे सांगतात की, याच्या आशीर्वादाने भरभराट होत असे. अशी वंदता आहे की, भारताचे एक माजी उपराष्ट्रपती बॅरिस्टर हिदायतुल्ला नागपूरला प्रॅक्टिस करत असताना या फकिराकडे गेले होते व त्याने या

बॅरिस्टर साहेबांकडे ओढत असलेली विडी फेकली होती. ती विडी बॅरिस्टर हिदायतुल्लांनी उचलून घरात फोटोप्रमाणे फ्रेम करून ठेवली आहे. कारण त्या घटनेनंतर हे हायकोर्ट जज्ज झाले व पुढे सुप्रीम कोर्टाचे मुख्य न्यायाधीश आणि भारताचे उपराष्ट्रपती झाले. नागपूरपासून वऱ्हाड प्रांताचा प्रादुर्भाव होतो. हा प्रांत म्हटला की कापूस, ज्वारी, तूर-डाळ व तेलबिया यांचीच शेती डोळ्यासमोर येते. विदर्भातील नागपूर, अमरावती, वर्धा आणि अकोला या जिल्ह्यांतून बऱ्याच प्रमाणात कापसाची निर्यात होत असे. अमरा-वतीला तर कैक पाश्चिमात्य देशातील व्यापारी ठाण देऊन बसत होते व येथून कापूस नेत होते. यामुळे सुताच्या व कापडाच्या गिरण्या या जिल्ह्यात मुंबईप्रमाणे निघाल्या व त्यापैकी बऱ्याच चालू आहेत. या कापसापायी या विभागातील बरेच लोक श्रीमंत झाले.

ज्वारीचे पीक इकडे बरेच निघत असल्यामुळे ज्वारीच्या भाकरी घरोघरी दिसतील. हिवाळ्यात शाळू नावाच्या ज्वारीला भाजून येथील रहिवासी मोठ्या सहलीत फराळ करतात. त्या पार्टीला हुरडा असे म्हणतात. गरमगरम भाजलेल्या कोवळ्या शाळूचे दाणे खावे व त्याच्यासंगे कोवळा मुळा, घट्ट गोड दही व वांग्याचे भरीत हे ह्या पार्टीचे मुख्य आकर्षण होय. काही वर्षांपूर्वी कपाशीच्या बिया म्हशींना देऊन त्यांचे सकस दूध, दही आणि उत्तम लोण्याचे तूप करीत असत. हे तूप फारच पांढरे व दाणेदार होते. या तुपाचा गोळा, ज्वारीची भाकरी आणि लसुण–कांद्याची चटणी हे एक नेहमीचे आकर्षण झाले होते. तसेच इकडील दुसरे आकर्षण म्हणजे, चणा डाळ व उडीद, मूग डाळ यांना वाटून केलेले विशिष्ट प्रकारचे वडे होय. यांना कुस्करून भातासंगे मिसळावे व त्यावर खूप मोहरी, तिखट व हिंग टाकलेल्या तेलाची फोडणी द्यावी. हा तिखट वडाभात मोठमोठ्या पंगतीतील अग्रगण्य आकर्षण समजला जात असे. मुंबईला बटाटेभात करतात; पण वऱ्हाडातला वडाभात याची सर मुंबईच्या भाताला कधीच येणार नाही.

नागपूर शहराचे आकर्षण मुंबईकरांना जर हवे असेल तर त्यांनी नागपूरच्या महाल भागात जावे. इतवारीची बाजारपेठ, रेल्वेस्टेशनच्या मागे संत्रामार्केट व नुकतीच झालेली कॉटन मार्केटची इमारत पाहावी. सिताबर्डीवरून महालात जाताना एम्प्रेस मिलच्या दोन तीन गिरण्या तर दिसतीलच व त्याच्यापुढे एकीकडे गणेश पेठ व दुसरीकडे शुक्रवार तलाव दिसेल. या तळ्याच्या काठापलीकडे लोकमान्य टिळकांचा पुतळा उभा आहे. इथून शुक्रवार दरवाजा दिसतो. याच्या पलीकडे सगळी जुनी वस्ती व जुने वाडे दिसतील. तिक-डेच चिटणीस पार्क असून त्याच्या जवळच व्यंकटेश थिएटर आहे. याच थिएटरमध्ये बाल गंधर्वांनी नाटकाचे प्रयोग करण्यास स्वतःवर बंदी घातली होती. इथेच न्यू इंग्लिश हायस्कूलची इमारत आहे व त्याच्या मागे तीन फर्लांगावर सिटी स्कूल व कॉलेज अगदी जुन्या फरशीबंद वाड्याजवळ दिसतील. न्यू इंग्लिश स्कूलच्या पुढे चौकापर्यंत गेल्यावर सरळ रस्ता जुन्या देवळाकडे जातो. उजवीकडे सिटी कोतवाली आहे व डावीकडे चितार-ओळ दिसेल. या चितारओळीत गणपतीच्या सुबक मूर्ती तयार करतात व पुढे महालक्ष्मीचे

मुखवटे बनवतात. इकडच्या महालक्ष्मी कोथळ्यावर मुखवटा ठेवून भरजरी पातळाने नटून व कैक स्थळी हिरे-माणकांनी सजून दिसतील. विशेषत: सिताबर्डीचे श्री. बुटी यांच्या घरची अशी सजलेली महालक्ष्मी पाहायला चिक्कार गर्दी जमते. या चितारओळीत जी चिकणसुपारी मिळते, अशी महाराष्ट्रात कुठेही मिळणार नाही. या बोळीचे तिसरे वैशिष्टच म्हणजे, रांगोळ्याची विक्री व रामटेकच्या विड्याच्या पानाची दुकाने. हे विड्याचे पान इतके मुलायम असते की तोंडात लोण्याचा गोळा ठेवल्याचा भास होतो!

नागपूरच्या सणांपकी पोळ्याचा सण एका विशिष्ट रूपाने साजरा होतो. या दिवशी बैलांना सजवून त्यांची मिरवणूक काढतात व सकाळपासूनच गावातील लोक वेड्या-वाकड्या राक्षसरूपी कापडाच्या मूर्ती घेऊन 'जारे मार्बत' असे ओरडत गावात फिरतात या मार्बतबरोबर गावातील रोगराई नेण्याचे ओरडणेसुद्धा होते. सायंकाळी घराघरातून लाकडाचे सजविलेले बैल मिरवणुकीतून देवळात लहान मुले घेऊन जातात. त्या दिवशी प्रत्येक घरातील बहीण आपल्या भावाच्या पाठीवर कोवळी काकडी फोडते. ही बहीण पोळ्याला अशा प्रकारे काकडी फोडल्याशिवाय ते फळ खात नाही. १९३६ पर्यंत पेन्शन-वर असलेले रघुजीराजे दसऱ्याच्या दिवशी मिरवणुकीतून हत्तीवर बसून रेशमबागकडे जात होते. इथे जिवंत रेड्याचे मुंडके कापले जाते. ही बळीची प्रथा आता बंद झाली. दसऱ्यानंतरच्या पौर्णिमेला घरातील पहिल्या बालकाची 'आसनी' होते. या निमित्ताने त्या बालकाला त्या दिवशी ओवाळतात. अशा दोन-चार प्रथा नागपुरचे वैशिष्ठ्य होय. आता तर इकडे अगदी गावाबाहेर विश्वविद्यालय व त्यांच्या इमारती आल्या असून तिकडच्या बाजूला डी. लक्ष्मीनारायण यांच्या नावाची एक संस्था उभी राहिली आहे. या संस्थेला देणगी देणारा माणूस फार कर्तबगार होता. हे श्री. डी. लक्ष्मीनारायण लहानपणी फार गरीब होते. त्यांची आई एका मँगेनीज खाणीच्या व्यापाऱ्याकडे स्वयंपाक करीत असे. बालक डी. लक्ष्मीनारायण आईला भाजीपाला आणण्यास मदत करीत होते. पुढे त्यांनी मँगेनीज दगडाला वाहण्याचा प्रयत्न केला. नंतर बैलगाडी आली. नंतर ते स्वत: मोठे मँगनीजचे व्यापारी झाले. अपत्य नसल्याने त्यांनी तीस लक्ष रुपयांची देणगी नाग-पूर विश्वविद्यालयाला तर दिलीच, पण जवळच असलेली संत्र्याची बागसुद्धा दान केली. सिकंदराबाद इथे त्यांच्या राहत्या घरी जपून ठेवलेले सोनेसुद्धा त्यांनी विश्वविद्यालयाला दान दिले. हे सोनें दोन मण होते व त्या काळी वीस रुपये तोळा सोने असताना त्यांनी खरीदलेला साठा ठेवला होता. आता नागपूरची भरभराट होत आहे. पण येथील तपमान उन्हाळ्यात खूपच वाढते. विश्वविद्यालयाच्या ऑफिसच्या कडेला एक सुंदर बाग होती. याला महाराज बाग म्हणत. इथे चांगले प्राणीसंग्रहालय होते व इथूनच नागपूरकरांना 'लंगडा' आंब्याच्या फळाचा आस्वाद मिळत असे. इथे पुढे शेतकी कॉलेज आले. डेअरी निघाली व अगदी रामदास पेठेच्या पलीकडे पण शेती होती. या सुंदरबागेची आता नास-धूस झाली. प्राण्यांची संख्या फारच रोडावली आहे व शेते व बागा संपत आल्या.

शेतकी कॉलेजच्या इमारतीच्या पहिल्या मजल्यावर सुंदर हॉल होता व खाली लायब्ररी. जवळच शेतीसंशोधनाची इमारत होती. तिच्या जवळच १९२९ साली बांधलेले सायन्स कॉलेज उभे आहे. कॉलेजच्या बाजूला विश्वविद्यालयाचा हॉल आहे. या हॉलच्या आठवणीत सर सी. व्ही. रामन, सर जगदीशचंद्र बोस आणि सर प्रफुल्लचंद्र रे, डॉ. मालवीयजी या प्रख्यात व्यक्तींच्या दर्शनाची व व्याख्यानाची आज पण आठवण येते. येथील पदवीदान समारंभात पदवी घेणाऱ्या विद्यार्थ्यांचा नंबर तीन किंवा चार रांगा खुर्च्यांपर्यंत पोहचत असे. आम्ही एम. एस्सी.ची पदवी घेतली तेव्हा अवघे आठच विद्यार्थी होते. बी. एस्सी.ला तर आम्ही १६ जणच होतो. आता विद्यार्थ्यांच्या रांगा इतक्या लांब असतात की त्यांना पदवीदान लांबूनच करावे लागते. नागपूरहून अमरावतीला जावे. त्यामध्ये वर्धा हे स्थान लागते. या गावाची प्रसिद्धी म्हणजे इथे दोनतीन गिरण्या तर होत्याच, पण गांधीजींनी एका खेड्यात–सेवाग्राम येथे– बरेच दिवस वास्तव्य केले होते. आम्ही त्यांना एकदोनदा भेटावयाला गेलो होतो. लांब बांबूची काठी घेऊन पायात नुसत्याच चपला घातलेले व अंगावर पंचा आणि अंगवस्त्र घातलेले गांधी दिसले. या वेळी चर्चा करणारे व इतके झपाझप चालणारे फारच थोडे गृहस्थ दिसत होते. आश्रमातील गोशाला व सर्वांच्या कवेलुवजा झोपड्या खेड्याचीच आठवण देत होत्या. चोहीकडे तर शेतीच होती, पण त्या वेळी सामाजिक वनीकरणाची टूम निघाली नव्हती. म्हणून बाभळीच्या झाडाशिवाय दुसरे झाड दिसत नव्हते. गांधीजींनंतर श्री. विनोबा भावे यांनी पवनार येथील आश्रम बरेच दिवस गाजविला. वर्धा स्टेशन येताच गाईच्या गरम दुधाची हाकारी ऐकतो. असे ताजे व चांगले दूध दुसरीकडे मिळत नाही. अमरावती रस्त्यावर श्री संत तुकडोजी महाराजांचा आश्रम आहे व पुढे ज्वारीची व कपाशीची शेती मुबलक दिसते. अमरावतीत कपाशीच्या विक्रीची बाजारपेठ अद्याप आहे कैक परदेशी कंपन्यांचे एजंट कपाशीची खरेदी करण्याकरता ऑफिस थाटून इथे रहात होते. इतका पैसा इथे असून या गावात पाण्याचे दुर्भिक्ष्य चिरकाल टिकून आहे. फिरावयाला छोटीशी मालटेकडी आहे. पण त्या टेकडीवरील एकदोन खुरटलेली झाडे सोडून सबंध परिसर कसा उजाड दिसतो. या भकास परिसराचे परिमार्जन अमरावती जिल्ह्याने हिंगणघाटकडे जाताना लागणाऱ्या जंगलामुळे केले आहे. परतवाडा, कोळखाज येथील जंगले अगदी तापी नदीच्या काठापर्यंत पसरली आहेत. इथे अद्याप वाघ दिसतात, पण याकरिता अमरावतीहून ८० ते १०० कि. मी. बऱ्हाणपूरकडे जावे लागते. हा परिसर फार रम्य आहे व सगळा रस्ता दुतर्फा चिंच, जांभूळ व कडूलिंब या झाडांनी गच्च भरलेला दिसतो. असा भरलेला रस्ता दुसरीकडे दिसणार नाही. अमरावती जवळच कौंडिण्यपूर आहे. हीच रुक्मांगद राजाची राजधानी असावी. अमरावतीला देवीचे देऊळ असून प्रख्यात व्यायामशाळा पण ऊर्जावस्थेत आलेली दिसते. या देवळाचा उगम श्रीकृष्णकाळापासून असावा असे सांगतात. शिशुपाल जबलपूरकडून आला असेल व श्रीकृष्ण गुजरातेच्या टोकाला वसलेल्या द्वारकेकडून आले होते.

त्या काळी इथे निबिड अरण्य होते, व त्या अरण्यातून काही वाटा जात असाव्यात, ज्यामुळे यांची वाहने इथपर्यंत आलीत. आज कोंडिण्यपूर एक उजाड लहानसे गाव दिसते. पण इथे उत्खनन झाल्यास श्रीकृष्णकालीन इतिहास उजेडात येईल. द्वारकेजवळ उत्खननात बुडालेल्या द्वारकेचे अवशेष दिसू लागले आहेत. असेच इकडे पण दिसतील. पुढे मुख्य रेल्वेमार्गावरून या गावी उतरल्यास बुलढाण्यापर्यंत छोटाशा टेकडीने गुंडाळलेला मार्ग दिसेल. लोक म्हणतात की, बुलढाणा फार थंड गाव आहे. पण येथील पाणी इतके जड आहे, की लोक अन्न पचवतात कसे याची मला शंकाच येते. बुलढाण्याहून पुढे चिखलीकडे जावे व इथे मराठ्यांचा इतिहास डोकावतो.

देऊळगावराजा हे गाव जरी लहान असले तरी इथली बाजारपेठ जुनी असून व्यापारी खूप असल्यामुळे चांगला व्यापार होतो. एका इमारतीत श्री बालाजींचे देऊळ फार प्रख्यात आहे. या देवाची मूर्ती अगदीच लहान असली तरी व्यापारामुळे देवस्थान चांगले गर्भश्रीमंत झाले आहे. जुन्या पिढीतील बरेच अग्निहोत्र घेतलेले ब्राह्मण या गावी मला भेटले व त्यांनी सर्पाच्या मंत्राबद्दल मला बरीच माहिती सांगितली. या गावावरून पुढे सिंधखेडराजा या गावाला जाण्याचा चांगला रस्ता लागतो. गावातील मध्यावर एक किल्लेवजा वाडा आहे. या वाड्यातच छत्रपती शिवाजीची आई जिजाबाई हिचा जन्म झाला असे सांगतात. दुर्भाग्यवश या वाड्याच्या भिंतीवर व मोठ्या लाकडी दारावर निवडणुकीचे चिन्ह नेहमीप्रमाणे साग्रसंगीत चितारले होते व आत ज्या खोलीत जिजामातेचा जन्म झाला तिकडे रासायनिक खताची पोती भरलेली दिसली. जिजामातेचे वडील लखुजी जाधव यांची एक समाधीपण आहे. त्या सुबक वास्तूत फारच ओसाडपणा आलेला आहे. आणि तिथे गाढवे व डुकरे यांचेच वास्तव्य आम्हाला दिसून आले. या दोन्ही गोष्टी सुधारण्याला कुणीतरी पावलं टाकली पाहिजेत. या गावाच्या भोवताली बऱ्याच शिळा पडल्या आहेत व त्यापैकी काही कोरलेल्या दिसतात व त्या कोरीव कामावर अजंठा व वेरूळ यांच्या शिल्पाची दाट छाया पसरली होती. इथून पुढे जळगावजामोद गावी गेल्यास घनदाट जंगल लागते. हे जंगल थेट बुऱ्हाणपूरकडे जाणाऱ्या रस्त्यापासून अवघे ३२ मैल आहे. इथून पुढे मार्ग अकोल्याकडे वळतो. आणि आता भारतात जे परकीय लोकांचे सैन्य आणि राज्य आले त्याची चाहूल लागते. बाळापूरला तर ही चाहूल जास्तच जाणवते. अकोला शहर तेलबियाकरता प्रसिद्ध आहे. इथे बाजारपेठ चांगली आहे. पण पाण्याचे दुर्भिक्ष्य अखंड डोकावत असते. ह्या जिल्ह्यात डावीकडे वाशीमला जाणारा रस्ता आहे. वाशीम इथे पण मशीद आणि मंदिराचा चांगलाच संगम दिसतो. अशी एक आख्यायिका आहे की, रामायणातील श्रावणबाळाचा या गावाजवळच राजा दशरथाने चुकीने बाण सोडून जीव घेतला होता. येथील बालाजीचे देऊळ व आवार सुबक आहे व देवळाची ख्याती बरीच पसरलेली दिसते. या गावीसुद्धा पिण्याच्या पाण्याचे दुर्भिक्ष्य चांगलेच जाणवते. इथून पुढे शेगावला जावे व या गजानन महाराजांच्या समाधीचे दर्शन घ्यावे. जव-

ळच खामगाव आहे. तिथली एक मोठी व्यापारपेठ फार जुन्या काळापासून प्रसिद्ध आहे. येथून चांगली शेती पार करीत मार्ग मेहेकरकडे जातो. हे स्थान प्रवाशांनी अवश्य पाहावे. कारण मराठ्यांनी या गावी श्रीशारंगधराची एक जुनी मूर्ती स्थापन करून देऊळ उभारले आहे. मूर्ती चांगली ६–७ फूट उंच काळ्या पाषाणाची सुंदर कोरली असून या चतुर्भुज मूर्तीच्या हातात शंखचक्रगदा आहेत. या मूर्तीचे विशेष म्हणजे गदा ही वरील हातात घेतलेली दिसे. देवळाच्या अवतीभोवती मातीच्या भिंतीची बरीच घरे दिसतात व या भिंतीतून कैक वेळा विविध प्रकारचे सर्प डोकावताना आढळले आहेत. गावाबाहेर भले मोठे एक कबरस्तान आहे. तेथील थडगी तुटक्या फुटक्या अवस्थेत असल्यामुळे मधूनमधून इथून पण सर्प गावाकडे यात्रा करताना दिसतात. या सर्पबाहुल्यामुळे या गावात एका साधूने पद्मासनस्थ नागसर्पाची मूर्ती स्थापन करून देऊळ उभारले आहे. अशी आख्यायिका आहे की हा साधू सर्पदंशाने बाधित झालेल्या रोग्यांना बरा करतो. इतकेच नव्हे, तर भूतपिशाच्च व्याधीतूनसुद्धा त्यांची सुटका करतो. मेहेकरहून १२ मैल लांब लोणारगाव आहे. हे गाव फार पुरातन असले पाहिजे व प्रत्येक यात्रेकरूने या गावाला भेट द्यावी. त्याचे सर्वात महत्त्वाचे कारण म्हणजे, इथे फार पुरातन व खूप मोठे खाऱ्या पाण्याचे तळे गावाबाहेर दिसते. या तळ्याची लांबी–रुंदी अदमासे मैलभर असून तळ्याच्या पाण्यापर्यंत जाण्याला ५०० ते ६०० फूट खाली उतरावे लागते. मधे ते खारे पाणी असून कडेला हिरवळ व झाडेझुडपे दिसतात. एका टोकाला खाली देवीचे देऊळ पण दिसते. जवळपासची गुरे या हिरवळीवर चरण्याला येतात, पण तळ्यातील पाणी कुणी पीत नाही. जॉर्डन आणि इस्त्रायल देशात जसा मृतसमुद्र (Dead sea) आहे, तसेच हे सरोवर होय. शास्त्रज्ञांच्या मते फार पुरातन काली अंतराळातून उल्कापात झाले व त्या उल्केने हे सरोवर निर्माण झाले. जगातील उल्कापाताने निर्माण झालेल्या तीनचार सरोवरांपैकी हे एक सरोवर होय. या पाण्यात इतके क्षार व घनता आहे की मनुष्य सहजरित्या बुडणार नाही. पाण्यात सोडिअम, पोटॅशियम, सिलीका, आयोडीन हे क्षार तर असतीलच, पण याशिवाय या लक्षावधी वर्षांपासून जन्मलेल्या सरोवरात आणखी काही नवीन क्षार मिळण्याची शक्यता आहे. मध्यवर्ती शासनाची एक तुकडी या पाण्याचे विश्लेषण करण्याला काही दिवसांपूर्वी तिथे आली होती. जवळपास वरच्या बाजूला मोठी झाडे फार कमी दिसतात. पण काही लोकांना जंगली गांजाची झुडपे सापडली आहेत. याशिवाय एका बाजूला काही देवदेवतांची छोटी छोटी मंदिरे कोरलेली दिसतात. अशा एकाच मंदिरातून गोड्या पाण्याचा एक झरा सतत वाहताना आढळतो. या गोड्या पाण्याचा उपयोग गावातील लोक इथे रांगा लावून करतात. नुकतेच या देऊळ व झऱ्याच्या मालकीबद्दल मुकदमे दाखल झाले आहेत. मुसलमान राजाच्या राजवटीत मेहेकर आणि लोणार येथील बऱ्याच घरांची व देवळांची नासधूस झाली होती. ३० वर्षांपूर्वी एक टेकडी जिच्यावर मुसलमान अमदानीत पोलीस चौकी होती, तिचे

उत्खनन झाले, तेव्हा त्या टेकडीखाली एक सुंदर लक्ष्मीनारायणाचे देऊळ उकरून काढण्यात आले. या देवळाच्या खांबावर आणि भितीवर नक्षीकाम असून देवतांच्या प्रतिमा कोरलेल्या दिसतात. या देवळाच्या मालकीबद्दल हिंदू आणि मुसलमान समाजाने कोर्टात दावा दाखल केला. या गावी लोणारचे सरोवर व हे देऊळ पाहण्याला या विभागाला अवश्य भेट द्यावी.

अकोल्यातील दुसऱ्या रस्त्यावरून बरेच लांब गेल्यास महानुभाव पंथाचे उगमस्थान व त्या स्वामींची समाधी आदि दिसेल. जवळच एका डोंगरावर चांगल्या घनदाट वनात एक प्रख्यात देऊळ आहे. हे देऊळ श्री रेणुकादेवीचे होय. काही वर्षांपूर्वी जंगल इतके दाट होते, की देवळात सायंकाळी हटकून वाघ दिसत असे व त्याचे दर्शन होण्यापूर्वी यात्री खाली सुखरूप येत असत. या देवालयाचे प्रमुख आकर्षण म्हणजे श्री रेणुकादेवीची भव्य मूर्ती होय. त्या देवीचे नुसते शीर अदमासे १०–१२ फूट उंच आहे. खालील धड नाही. देवीचे तोंड जरासे उघडे असल्यामुळे प्रसाद म्हणून देवीच्या तोंडात कुटलेला विडा ठेवतात. ही भव्य सिंदूरर्अचित मूर्ती परशुरामाने आपल्या आईचा वध केल्याची साक्ष देत आहे. इथूनच आणखी पुढील डोंगर व जंगलामध्ये दत्तात्रेयाचे वास्तव्य आहे, अशी भाविकांची श्रद्धा आहे. या परिसरातसुद्धा पाण्याचे दुर्भिक्ष्य असल्याने पाणी वर वाहून आणतात. प्रवास मात्र डोंगरशिखरापर्यंत पायीच करावा लागतो. अकोल्याच्या पूर्व बाजूला अगदी नरनाळ्यापर्यंत जावे. हा किल्ला सातपुड्याच्या पर्वतश्रेणीवर बांधला आहे. या किल्ल्यातून पूर्व व उत्तरेकडे लांब खोल दऱ्या दिसतात. पूर्वी इथे घनदाट जंगल होते. पण आता सगळीकडच्या जंगलाप्रमाणे येथील जंगलही नष्ट होत आहे. या किल्ल्यांजवळूनच मुसलमान सैन्याच्या झुंडीच्या झुंडी दक्षिणेत उतरल्या. हिंगणघाट, बाळापूर इकडे तर त्यांची चांगलीच वसाहत होती. आतासुद्धा या भागात त्यांच्या लोकसंख्येचे बाहुल्य आहे. आकोटहून या किल्ल्याकडे जाण्याचा लहानसा मार्ग आहे व किल्ल्याच्या पायथ्यापर्यंत हत्ती चढण्याची पायवाट होती. आता जीप चढेल असा मार्ग केलेला दिसतो. या किल्ल्यातील वेगवेगळ्या वाड्यात जो इतिहास घडला त्याचे साग्रसंगीत येथील रहिवाशी सांगतात. एक दंतकथा अशी आहे की, याच वाटेने नेपाळहून काही लोक कस्तुरीचा साठा घेऊन आले. आकोट दारव्हामार्गे ते जात होते. मुगलांचा थाटमाट त्याना इथे दिसला नाही. कारण येथले सावकार श्रीमंत जरी असले तरी ते समाधानाने राहात होते व श्रीमंतीचा भपका दाखवत नव्हते. या कस्तुरी व्यापाराला इकडच्या एका श्रीमंत माणसाने कस्तुरीची किंमत विचारली. त्या नेपाळी माणसाला वाटले, हा साधा दिसणारा मनुष्य आपला माल घेऊ शकणार नाही. म्हणून त्याला त्याप्रमाणे उत्तर दिले. श्रीमंताला जरा राग आला व त्याने सगळ्या कस्तुरी भरलेल्या मालाला विकत घेतले व ती सर्व कस्तुरी जवळच बांधत असलेल्या घराच्या गिलाव्यात म्हणजे मातीत ओतण्यास सांगितली व मागितली ती किंमत दिली. या घराची माती कस्तुरीमिश्रित असल्याने जवळपासचे लोक

ती माती औषधाकरता कैक वर्षे नेत होते. या विभागात श्री नृसिंहसरस्वती व गजानन-महाराज यांच्यासारखे संत महात्मे जन्मास आले व त्यांनी जनतेला अध्यात्माचा घडा देऊन त्यांचे जीवन सुख व समाधानाचे केले. कपाशीच्या उत्पादनामुळे श्रीमंत झालेला हा विभाग व रघुजी भोसल्यांच्या अमदानीत बहरलेले हे विदर्भराज्य एक आगळी लोक-संख्या नजरेसमोर आणते. येथील लोक फार दिलदार व पुढील आयुष्याची कमी काळजी करणारे दिसतील. दान देताना कासेची लंगोटी पण देण्याला मागेपुढे पाहणार नाहीत. आदरातिथ्य इकडच्यासारखे महाराष्ट्रात दुसरीकडे मिळणार नाही. या विभागाचा दौरा करण्याला डोंगरगडजवळ आमगावला यावे. भवभूति, कवी कालिदास व रसायनतज्ञ नागार्जुन यांच्या स्मृतींचे दर्शन घ्यावे. नागझिरा व नवेगाव येथील जंगल आणि सरो-वरातील निसर्गाचा आनंद लुटावा व नागपूरची संत्री खात, कोळखाज येथील वाघाचे दर्शन घेत, मेहेकरजवळील लोणार सरोवर पाहावे. अकोल्याजवळील नरनाळा किल्ल्या-वरून मुगलांच्या झुंडीच्या झुंडी महाराष्ट्रात कशा शिरल्या यावर विचार करावा व शेवटी चंद्रपूरच्या घनदाट जंगलातील ताडोबा येथील रक्षितवनात वन्यप्राणी पाहावे व चांद्याच्या देवीचे दर्शन घेऊन अल्लापल्ली येथील फार जुनी ( ग्लोरी ऑफ अल्लापल्ली ) सागवानाची भव्य वनश्री पाहावी व तिथून पुढे वनवासी क्षेत्रात बाबा आमटे यांनी निर्माण केलेल्या संस्थांना भेट देत गोदावरी व प्राणहिता या नदीच्या संगमात स्नान करून आंध्रप्रदेशात प्रवेश करावा.

(या घटनांचा काल : १९६६ ते १९७१)

# १५ : वाघ गेला पण चित्ता दिसला !

सन १९३६ साली भातावरील एका किडीवर संशोधन करण्याकरिता माझी नेमणूक झाली. शेतात प्रयोग करावयाचे ठरवले व भंडारा जिल्ह्यातील अर्जुनी या गावी मी बिऱ्हाड थाटले. गावाबाहेर एका शेतानजीक जिल्हा परिषदेची एक धर्मशाळा होती व तिथेच मी मुक्काम केला. या धर्मशाळेत दोन्हीकडे दोन खोल्या असून मधे भली मोठी बंद केलेली पडशी होती. या पडशीत आमचा स्वयंपाक, रात्रीची झोप व येणाऱ्या–जाणाऱ्यांशी गप्पा होत असत. जोराचा पाऊस आला की पडवीत पाणी शिरे व त्या पाण्यासंगे सर्पसुद्धा मोकाट फिरत. बाहेर शेतात आम्ही भात पेरला व रात्रीला दिवा लावून त्या प्रकाशात येणाऱ्या किडयांची तासातासाने मोजदाद घेत होतो. रोज रात्रीला हटकून वाघाच्या गर्जनेचा आवाज येत असे व मला तरी सोबत असलेल्या ३० विंचेस्टर रायफलवर भरंवसा ठेवून लोकांना (सोबती) धीर देण्याची संधी मिळे.

दिवसभर तपासणी केल्यावर स्टेशनवर जाणे हीच माझी करमणूक होती. हे रेल्वे-स्टेशन धर्मशाळेपासून अवघे २ फर्लांगावर होते. तेथील स्टेशनमास्तर हाच माझा एकमेव स्नेही होता. त्याला भेटून जुन्या नाट्यसंगीताच्या रेकॉर्डस् ऐकून मी धर्मशाळेत परत येत असे. त्या दोन फर्लांग रस्त्यावर त्या काळी दिवे नव्हते; आणि चांगले घनदाट जंगल अर्ध्या मैलाच्या आतच होते. त्यामुळे कधी श्वापद काळोखात या रस्त्यावर दबा धरून बसलेले कैक गावकऱ्यांनी पाहिले होते. कुत्री, मांजरं नेहमीच विशेषत: सायंकाळी रस्त्यावर गोंगाट करत फिरत, व त्याकरिता वन्य श्वापदे येत असत. मी नेहमी एक मोठी काठी घेऊनच बाहेर पडत होतो.

एके दिवशी सायंकाळी असाच काठी फिरवीत त्या रस्त्यावरून स्टेशनकडे चाललो होतो. नेहमीच्या सवयीनुसार काठी मागेपुढे फिरवू लागलो. थोडा काळोख झाला होता व कडेला काही गावकरी सायंविधी उरकत होते. कुत्र्यांचा आवाज मात्र फार लांबून म्हणजे गावातून ऐकू येत होता. मला कुणी तरी 'आखाबू–आखाबू' असे मंद स्वरात ओरडताना ऐकू आले. त्या सभोवतालच्या झाडीत कुणी खोकत असेल म्हणून मी लक्ष दिले नाही, पण नेहमीच्या नियमाप्रमाणे काठी मात्र मागे पुढे फिरवीतच होतो. माझी काठी कुणाला तरी

लागली व 'आखावू' चा आवाज जोराने ऐकू येऊ लागला. मागे वळून पाहिले तर समोरील पाय उंच असलेला एक प्राणी जबडा फाकून मोठ्ठाले दात दाखवत खेकसत उभा होता. देवाने मला कुठून बळ दिले माहीत नाही, पण मी काठी खूपच जोराने स्वतःभोवती फिरवू लागलो. त्या प्राण्याकडे पाहण्याची मला उसंत नव्हती. तिकडे कडेला सायंविधी पार पाडत बसलेले लोक एका हाती धोतर व एका हाती लोटा घेऊन धूम पळू लागले, तेव्हा कुठे मला चेव आला. तो प्राणी तरस होता व माझ्या मागे लागला होता. काठीचा तडाखा बसला व जोराची काठी फिरताना पाहिली आणि तो कडेला पळाला. तिथे सायंविधी चालला होता. कसाबसा स्टेशनवर गेलो पण परत येताना दोन कुली दिवा-बत्तीसंगे माझ्या सोबतीला घेऊन आलो. दैवाने साथ दिली व मी वाचलो.

आमच्या या 'तरस–भेटी' ची वार्ता गावात पसरली. एकदोन खेडूत शिकारी धर्मशाळेत मला भेटण्यासाठी आले व म्हणाले, 'साहेब, तुमच्याकडे रायफल आहे, तर चला एकादा हरिण, डुक्कर मारून आणू !' दिवसभर कामात असल्यामुळे मी नकार दिला तसे म्हणाले, 'साहेब, तीन दिवसानी पौर्णिमा येईल. रात्रीला जंगलातील प्राण्यांची शोभा तर बघा !' मी रुकार दिला व तीन दिवसांनी रायफल घेऊन रात्री तीनच्या सुमारास जंगलात शिरलो. थंडीचे दिवस होते, व दवबिंदू पडून झाडापानावर ओलावा आला होता. रायफलमध्ये पाच गोळ्या होत्याच व माझे बोट चापावर ठेवून मी इकडे तिकडे गर्द झाडीत काही 'आहे का' याची अपेक्षा करीत होतो. दवबिंदूमुळे चाप ओला झाला की रुमालाने पुसून पुन्हा पुढे कूच, हाच माझा कार्यक्रम होता. थंडीमुळे बोटे गारठू लागली, व एकाएकी मला सरपटताना दिसले व चापावरचा ताबा सुटून तो दाबला गेला व गोळी सुटली. समोर कुणीच नव्हते. जोराच्या आवाजामुळे कैक हरणे, डुक्करे मागून पळताना दिसली. आश्चर्य एकच की हे सर्व प्राणी बऱ्याच वेळापासून आमच्या मागून येत होते व आम्ही त्यांना समोर शोधत होतो. शिकार हुकलो व शेवटी एका रानकोंबडीवर गोळी घालून त्या गावकऱ्यांची समजूत घातली.

अर्जुनीपासून बोंडगाव १०–१२ मैल दूर होते. पण मार्ग चांगल्या घनदाट जंगलातूनच होता. रोज रात्रीला जो वाघाचा आवाज येत असे तो तिथूनच येत होता. माझ्या खोडकिडयाच्या प्रयोगाला जवळच्या शेताशिवाय जगलाजवळची शेती पण हवी होती. या निमित्ताने बोंडगावला निरोप धाडला व बैलगाडीने बोंडगावच्या कच्च्या रस्त्यावर मार्गस्थ झालो. रात्रीचे १० वाजले होते. चोहीकडे निबिड अंधकार तर होताच, शिवाय दाट वृक्षांनी भरलेले ते जंगल कसे भयाण वाटत होते. मी गाडीत होतो. समोर हाती भाला घेऊन कंदील हालवीत एक शिपाई चालला होता. दुरून वाघाची डरकाळी ऐकू आली. गाडीचे बैल बिथरले. शिपाई व गाडी हाकणाऱ्यांनी चांगलीच आरडाओरड केली व काही वेळाने डरकाळी थांबली. तो काय, आमच्या मागून हरिणांचा एक कळप भर्रकन जंगलात पळाला. एक अस्वल आडवं गेलं व पुढे एक नीलगाय गाडीसंगे बराच वेळ चालत आली.

दोन तासांनी मला झोप लागली. पाखरांचे आवाज व गुराख्यांचे ओरडणे ऐकून जेव्हा जाग आली तोपर्यंत पहाट झाली होती. लोकांची गर्दी पाहून गाडीतून डोकावलो तेव्हा दिसले की कडेला एका चित्त्याने गावातील गाईचे वासरू आणले होते व गावकरी त्याचा पाठलाग करत इथपर्यंत आले. चित्त्याने जखमी वासरू तिथेच टाकून लांब झाडावर आरोहण केले. प्रकाश इतका अंधुक होता की मला तरी चित्ता दिसला नाही. गावकऱ्यांनी जखमी वासरू उचलले व आमच्याच गाडीत टाकले आमची ही गाडी भोवतालच्या लोकांसहित गावात आली. दिवसाचा प्रकाश आता वर आला होता.

गावाच्या टोकालाच एक उत्तम पार बांधलेले तळे होते. तळ्यामध्ये उंच खांब दिसला. खेड्यात 'तळ्याचे' लग्न करतात व असा खांब मध्यावर पुरतात. पारावर बरीच मंडळी जमली होती. या बोंडगावी लांबून महारोगी येतात व या तळ्यात स्नान करतात. पुढे तेथील देवीची पूजा करतात. आख्यायिका अशी आहे की असे केल्याने त्यांचा रोग बरा होतो. बोंडगावच्या धर्मशाळेत गाडी थांबली. जखमी वासरू आत्तापर्यंत मरायाला टेकले होते. त्याला लोकांनी अलगद उचलून घरात नेले. माझे सामान खाली येईपर्यंत गावातील कोतवाल, मालगुजार, तलाठी, मंदिराचे व्यवस्थापक व काही प्रतिष्ठित मंडळी धर्मशाळेत आली. आमचे त्यांनी चांगले स्वागत केले व भातावरील किडीबद्दल व होणाऱ्या नुकसानीबद्दल सविस्तर माहिती दिली. दूध, खमंग पोहे आदीचा नास्ता झाला व आम्ही किडीची पाहणी करण्यास शेतावर गेलो. बरीच शेते तपासल्यानंतर जंगलाजवळची शेते तपासू लागलो. तिथे चिखलात रुतलेली, ठसा उमटलेली चित्त्याची पावले, विष्ठा आदि दिसल्या. तोपर्यंत १२ वाजले. लोकांनी देवीच्या मंदिराच्या भगताला आणले होते व सर्वांनी मंदिरात आरतीकरिता चलावे अशी गळ घातली. मंदिरात गेलो. मंदिर लहानच होते. शिल्प ७५–८० वर्षांचे असावे. सभामंडप छोटासा होता पण गर्भगृहा भोवती चांगली रुंद पडवी होती. देवीचा मुखवटाच दिसत होता. डोईवर चांदीचा मुकुट होता व शरीरावर उत्तम लाल लुगडे दिसले. भगत पाय धुऊन आत शिरला. फुले उधळली. नैवेद्य आला. मी आणलेल्या नारळाने ओटी भरली व आरती सुरू झाली. दोन मोठे नगारे खूप जोराने लोक बडवीत होते. मृदंग पण दिसला. झांज-टाळ दिसले. पण त्यांचा आवाज व कर्कश ओरडणाऱ्या स्वरामुळे जोराचे ध्वनिप्रदूषण होऊन रक्तदाब जणू वाढतच होता. आरती संपली. भगताने कपाळाला हळद–कुंकू फासले. देवीवर वाहिले व मूठभर कुंकू आम्हा सर्वांवर उधळले. असे करतानाच तो थरथर कापू लागला व थोड्याच वेळात मोठ्याने 'जय अंबे'ची डरकाळी फोडली. तो अवतार व ती डरकाळी कशी धासकन आम्हावर आदळली व एक प्रकारचे भय उत्पन्न करून गेली. डोळे मिटलेलेच होते, हातात कुंकू होते व बोला ..बोलावू भगत म्हणू लागला. कुणीतरी काही बोलले. मी तर गांगरल्यासारखा झालो होतो. एकदम 'साहेबा आलास, लई बेस केलं' म्हणत भगताने माझ्या अंगावर कुंकू फेकले. 'जाणार...जाणार ..साता समुंदर पार जाणार. लई तरास

व्हईल...लई मानुसं मरतील...पन तू येसील...आईची खना नारनानी वटी भर...मवूठा साहब होसील...वहाघ मिरनार नाही...चितरा दिसंल...पाहून घेशील...जा तुझं भलं होईल.' असं म्हणत त्याने पुन्हा माझ्या कपाळाला कुंकू फासले. या घटनेनंतर मी खरोखरच इंग्लंडला गेलो व दुसऱ्या महायुद्धाची दोन वर्षे तिथे काढली. हालअपेष्टा बऱ्याच झाल्या व नंतर अदमासे १४ वर्षांनी मुंबईला स्थायिक झालो.

आता माझे संशोधन प्लेगवर चालले होते, शिवाय सर्पसृष्टीचा अभ्यास सुरू केला होता. महाराष्ट्रात प्लेगची लागण, उंदराची प्रतिकारशक्ती याबद्दल पाहणी करण्यास पुन्हा विदर्भाचा दौरा सुरू केला. कर्मधर्मसंयोगाने नवेगाव, अर्जुनी व बोंडगाव या विभागात फिरलो. जंगल तर पार खतम झाले होते. उत्तम डांबरी रस्ते अर्जुनी-बोंडगाव गावांना जोडत होते. कुत्र्या-कोल्ह्याशिवाय दुसरे प्राणीच दिसले नाहीत. तरी बोंडगावला गेलो. तळ्यावर महागोग्यांची वर्दळ अगदी तुरळक होती. देवीच्या देवळात गेलो. भक्ताचे देहावसान झाले होते. त्याचा नातू आता पूजा करीत होता. त्याला लुगडे, खण, नारळ वगैरे देवीची ओटी भरण्यास दिले. वाटले, हा ओटी भरेल व अंगात देवी येईल. पण त्या नातवाने लुगडे-खण पेटीत ठेवले व म्हणाला. "देवी दौऱ्यावर गेली आहे!" जुन्या आठवणी जागृत झाल्या. मी जरा खट्टू झालो. मी पुढील प्रवासाला लागलो.

शहरापासून लांब जंगलातील उंदरांची प्रतिकारशक्ती किती असते व त्याचे प्रमाण गजबजलेल्या शहरात सापडणाऱ्या उंदरांच्या तुलनेत किती भरते याचा मागोवा घेत मी चंद्रपूरच्या ताडोबा जंगलात ठाण मांडले. ताडोबाच्या झाडावरच आमचे शस्त्र म्हणजे रायफल जमा करावी लागली. हाती काठी व छत्री हीच 'शस्त्रे' घेऊन आम्ही त्या अरण्यात प्रवेश केला. आम्ही जीपमध्ये होतो, मी समोर व मागे दोन शिपाई बसले होते. उंच वृक्षराजी, वेली, बांबूने परिवेष्टित या जंगलात अर्ध्या तासाने आम्हांस एक हरिणांचा कळप दिसला. गाडीचा वेग कमी केला. कळप स्तब्ध उभा राहिला. गाडी थांबविली, तोच कळप भरकन् पळाला. पुढे एक रानडुकरांचा कळप दिसला. पाण्याच्या डबक्यात एका कडेला सगळे डुंबत होते. गाडी मंद मंद चालू केली. बस्स्! तर डुक्कर समोर आला. त्याला तोंडासमोर दोन मोठे सुळे होते. समोरच्या पायांनी चिखल तुडवू लागला. आमची गाडी थांबली तशी त्याने मान खाली केली. डरकाळी फोडली व उडी मारणार इतक्यात आमची जीप भर्रकन पुढे निघाली.

गेल्या महायुद्धानंतर भारताच्या जंगलसंपत्तीचे आतोनात नुकसान झाले होते. वाघासारखा प्राणी जंगलात राहिल्यास तो जंगलाचे रक्षण करतो व शाकाहारी प्राण्यांची संख्या कमी करून वृक्षसंपत्तींना अभयदान मिळते. पण या शतकाच्या सुरुवातीला भारतातील सर्व जंगलात मिळून वाघांची संख्या ५५ हजार होती ती १९६४ पर्यंत अवघी १९८० ते दोन हजारावर आली होती. तरस आणि चित्ते (बिबळ्या वाघ) यांची ठराविक मोजमाप झाली नव्हती. भारतात बिबळ्या वाघ व चित्ता असे दोन मांसाहारी प्राणी

आहेत. आता बिबळ्या वाघ आहे, पण चित्ता या देशातून शिकारीपायी पार नष्ट झाला. राजे-रजवाडे चित्त्याच्या, हरिणाच्या शिकारी करता करता शेवटी ते तसेच नष्ट झाले. महाराष्ट्रात कोल्हापूर–फोंडाघाट इकडे १९४८ पर्यंत चित्ता होता. आता दिसत नाही. बिबळ्या वाघ ५ फूट लांब असतो व त्याचे शेपूट ३ फूट भरते. तो झाडावर उत्तम चढतो व माकड, कुत्री हे त्याचे नेहमीचे भक्ष्य होय. वासरू, लहान गायी, हरिणे, कधी कधी पाखरे व घोरपडी पण खातो. माणसापासून जरा हटकूनच राहतो. वाघ संपल्यावर हाच प्राणी जंगलात राहील असे दृश्य त्या समयी झाले आहे.

ताडोबा जंगलाची वाट पार करत आम्ही सायंकाळी तळ्याजवळील स्टेट हाऊसवर आलो. अंधार नुकताच सुरू झाला व पाखरे कलरव करीत घरट्यात जात होती. जीपचा ड्रायव्हर म्हणाला, " या समयी श्वापदे तळ्यावर पाणी पिण्यासाठी येतात. चला, एक चक्कर मारू ! " आम्ही फिरू लागलो. हरिण, भेकर, अस्वल व नीलगाय एवढेच प्राणी दिसले. वाघ दिसणे कठीण. पण चित्ता दिसावा या निमित्ताने तळ्याजवळील मचाणावर चढलो. काळोख होता, डास चिक्कार चावा घेत होते. तळ्याजवळील झोपडीतील कुत्री सारखी भुंकत होती. आम्हाला वाटले की कुत्र्याकरिता चित्ता यावा. काळोखात जेमतेमच दिसले. एक कुत्रा जवळ आला होता. त्याच्या मागे कुणीतरी श्वापद लागले असावे, म्हणून कुत्रा तळ्याकडे पळाला. तर एकदम ' क्याँव क्याँव 'चा आवाज आला आणि पाणी जोराने खळबळले. कुत्र्याला मगराने नरड्यात धरले व सरळ पाण्याखाली ती मगर गेली. क्याँव क्याँव बंद झाले. मगराला भक्ष्य मिळाले व कुत्र्याचा जीव गेला.

रात्रीला सर्च लाईटच्या प्रकाशाने जंगल धुंडाळले. पण हरिणांच्या कळपाशिवाय दुसरे प्राणी दिसले नाहीत.

सकाळी वॉचमन आला व सांगू लागला की रात्रीला एका म्हशीला वाघाने घायाळ केले आहे. ती मेलेली म्हैस तळ्याजवळच पडली आहे. सकाळचे ५–३० वाजले होते. तसाच काठी व छत्री घेऊन निघालो. अंधुक प्रकाशात दूरवर म्हशीचे धूड अस्पष्ट दिसत होते व जवळच एक चतुष्पाद प्राणी तिचे मांस कुरतडत होता. बरेच धाडस करून जवळ जाऊ लागलो. तो ' म्याँऊ ' असा जोराचा आवाज आला व तो प्राणी पळून गेला. चित्ताच होता. थोडे आणखी धाडस–शक्ती एकवटवून जवळ गेलो. तिथे कुणीच नव्हते. मी सरळ उघड्या जंगलात फिरलो. म्हशीच्या धुडाशेजारचे झुडूप हालले व तिथून एक तरस निघाला. तो आता त्या मृत प्राण्याची हाडे चघळू लागला. चित्ता असेतोपर्यंत हा तिथे लपूनच होता. जंगलात दोन फर्लांग गेलो तो ममोरून वरून जांभळ्या रंगाचे आठदहा कुत्र्याच्या उंचीचे व आकाराचे प्राणी येताना दिसले. त्यांचा पण रोख त्या म्हशीकडेच होता. मला पाहताच त्यांनी आडवी रांग केली. हे जंगली कुत्रे होते. शिकार करताना अशी रांग करतात व एक एक कुत्रा वेगवेगळ्या दिशेकडून सावजावर तुटून पडतो.

वाघालासुद्धा हे जेरीस आणतात. एक कुत्रा शेपटावर, दुसरा मागील पायावर, तिसरा त्याच्या कानावर व चवथा पाठीवर असे येतात. हे सगळे नर कुत्रे अशी शिकार करतात. मादी मात्र पिल्लांसहित गुहेत असते. नर कुत्री शिकार करून येतात. खाल्लेले अन्न मादी-जवळ ओकतात व मादी त्या वमनावर गुजराण करते.

ती रांग पाहताच मी जवळच्या झाडाआड गेलो व वर चढणार तोपर्यंत त्या रांगेने तरसाकडे मोर्चा वळविला. ते दृश्य पाहून तरस पळत सुटले.

आणखी जास्त धाडस न करता मी रेस्ट हाऊसवर परत आलो. दुपारी बांबूच्या वनात नीलगाय व जंगली गवा पाहिला. या नर गव्याचे लक्ष आमच्याकडे वळले. पायांनी माती उकरू लागला. शिगांनी माती फेकू लागला. विस्फारीत नाकपुड्यांनी जोराने श्वास सुरू झाला व आम्ही जीपमधून धूम पळालो. तो गवा त्याच्या थव्याचा स्काऊट होता.

असा प्रवास करीत आम्ही अल्लापल्ली विभागात आलो. येथील रेस्ट हाऊसमध्ये सामान ठेवले. पेटी उघडली व नहाणीतून दोन मिनिटात आलो. तोपर्यंत एक आश्चर्य घडले. असंख्य उंदीर पेटीत शिरले होते. जेमतेम त्यांना हाकलले व रात्रीला या विभागातील अत्यंत दाट जंगलात प्रवेश केला. इथे फार जुनी सागवानाची झाडे आहेत. ती कधीच तोडत नाहीत. फांद्यासुद्धा कापत नाहीत. यामुळे त्या अमाप वाढल्या व घनदाट जंगल निर्माण झाले. या विभागाला ' ग्लोरी ऑफ अल्लापल्ली ' म्हणतात. इथे हिंस्र प्राणी असा-वेत. पण आमची निराशा झाली व आम्हाला चार सशांशिवाय कोणतेच प्राणी दिसले नाहीत.

दुसऱ्या दिवशी आम्ही सिरोंचाकडे निघालो. लाल मातीचा रस्ता सगळे कपडे रंगवीत होता मी तर डोक्यावर टॉवेलच बांधले होते. कैक मैल पार करीत दिवस बुडू लागला. जरा अंधुक प्रकाश आला व जीपच्या कडेला काही तरी आवाज आला. पाहिले, तर एक नीलगाय जीपसंगे धावत होती. आम्ही जीप २५ मैल दर ताशी केली व ती नीलगाय १० मैल आमच्या जीपसंगे धावत आली. आता सायंकाळचे सहा झाले आम्ही सिरोंचाजवळ येऊ लागलो. कडेला घनदाट जंगल होते व समोर दोन डोंगर दिसले. त्या डोंगरामधील दरीतून जीप जाऊ लागली. मला एका उतारावर सडकेच्यामध्ये एक प्राणी बसलेला दिसला. वाटले, गाय-बैल असेल. जवळ येऊ लागलो तो प्राणी उठेना. हॉर्न दिला तरी उठेना. अगदी १५ फुटांवर आलो. गाडी हळू केली, गाडी कडेला उभी करणार तोपर्यंत त्या प्राण्याने बाजूला झेप घेतली. ती झेप येऊ नये म्हणून जीप अगदीच हळू केली होती. त्या प्राण्याची झेप सडकेच्या कडेला पडली. झेप सांभाळून, नि शेपूट आपटत जोराने ' म्याँव म्याँव ' करीत तो प्राणी रागाने उडी घेण्याच्या पवित्र्यात बसला होता. मी जीप-मध्ये समोर कडेलाच बसलो होतो. काठीच काय ती हातात होती. त्या अंधुक प्रकाशात चकाकणारे डोळे पाहिले. टॉर्च फेकला तो चित्ता होता व उडी घेणार इतक्यात जीपच्या एक्सिलेटरवर पाय दाबला. जीप धूम पळविली. तो चित्ता दरीत शाकाहारी प्राण्यांच्या

आगमनाची वाट पाहत होता. आम्ही त्याला व्यत्यय आणला व तो खवळला होता. वाटले, जीपवर उडी घेईल. पण उडी जीपच्या मागे गेली व आम्ही वाचलो.

(या घटनेचा काल १९३६ ते १९७६)

# १६ : कलचुरी राजांच्या देशात

मला माझ्या अगदी लहानपणच्या एका प्रवासाची आठवण आहे. तेव्हा आम्ही मध्यप्रदेशातील द्रुग या गावी राहत होतो. माझे वय त्या समयी ५–६ वर्षांचे असावे. पण तेव्हाच्या आठवणी ज्या स्मरणात भिनल्या त्या अद्याप तशाच आहेत. द्रुग हे गाव कलचुरी राज्याच्या छत्तीस किल्ल्यांपैकी एका किल्ल्याजवळ वसलेले होते. गाव आजच्या मानाने त्या वेळी जुनाट असेच होते. आम्ही ज्या घरी राहात होतो, तो एक वाडाच होता. आमच्याकडे जरी तीनचार खोल्या असल्या तरी अंगण व त्या पलीकडील परिसर हजार-बाराशे यार्डांचा असावा. या उभ्या परिसरात एक मोठे पिंपळाचे झाड होते व त्या झाडापलीकडे आमचे तट्टीवजा शौचकूप आणि पाण्याची विहीर होती. यामुळे आन्हिक आणि पाण्याकरता आम्हाला पावसात उघड्यावर चांगलीच रपेट करावी लागे. त्या वयातील व त्या गावाच्या त्या वेळच्या आठवणी ज्या दडून बसल्या आहेत त्याचे मुख्य कारण म्हणजे एकदा पावसाळ्याच्या दिवसात आमची आई स्वयंपाकघरात सकाळी चूल सारवायला गेली, तेव्हा जोराने किंचाळली. वडिलांसंगे मी त्या स्वयपाकघरात शिरलो तेव्हा आईच्या सबंध हातावर कैक सर्प वेटाळताना दिसत होते. ही घटना त्या चार वर्षे वयात इतकी जबर स्मरणात बसली, की तेथील त्यानंतरच्या आठवणी पण त्यापुढे मेंदूत रेघाटल्या गेल्या. तसेच त्या घरातील समोरील खोलीच्या दाराजवळ बाहेरच्या बाजूला एक दगडी ओटा होता. त्या ओट्यावर बसून त्या बोळीतून जाणाऱ्या बैलगाड्या व उडणारा धुरळा मी पाहत असे. पण एके दिवशी जवळच राहणारे काशाचे भांडे करणारे लोक घाईघाईने आले व ती ओट्यावरची शिळा उचलावी असे म्हणू लागले. माझ्या गंमतीची ती जागा होती. तिथे बसून मी कितीतरी गम्मत पाहत होतो व खेळत होतो. यामुळे ती शिळा काढताना मला जरा दुःख झाले व का काढतात हे पाहण्यास मी तिथेच उभा होतो. शिळा जरा उचलली व त्याबरोबर खालून एक भुरक्या रंगाचा नागसर्प फणा काढीत बाहेर पडला. लोकांनी त्या सर्पाला चिमट्यांनी पकडले व गावाबाहेर सोडून

आगमनाची वाट पाहत होता. आम्ही त्याला व्यत्यय आणला व तो खवळला होता. वाटले, जीपवर उडी घेईल. पण उडी जीपच्या मागे गेली व आम्ही वाचलो.

(या घटनेचा काल १९३६ ते १९७६)

# १६ : कलचुरी राजांच्या देशात

मला माझ्या अगदी लहानपणच्या एका प्रवासाची आठवण आहे. तेव्हा आम्ही मध्यप्रदेशातील द्रुग या गावी राहत होतो. माझे वय त्या समयी ५–६ वर्षांचे असावे. पण तेव्हाच्या आठवणी ज्या स्मरणात भिनल्या त्या अद्याप तशाच आहेत. द्रुग हे गाव कलचुरी राज्याच्या छत्तीस किल्ल्यांपैकी एका किल्ल्याजवळ वसलेले होते. गाव आजच्या मानाने त्या वेळी जुनाट असेच होते. आम्ही ज्या घरी राहात होतो, तो एक वाडाच होता. आमच्याकडे जरी तीनचार खोल्या असल्या तरी अंगण व त्या पलीकडील परिसर हजार-बाराशे यार्डांचा असावा. या उभ्या परिसरात एक मोठे पिंपळाचे झाड होते व त्या झाडा-पलीकडे आमचे तट्टीवजा शौचकूप आणि पाण्याची विहीर होती. यामुळे आन्हिक आणि पाण्याकरता आम्हाला पावसात उघड्यावर चांगलीच रपेट करावी लागे. त्या वयातील व त्या गावाच्या त्या वेळच्या आठवणी ज्या दडून बसल्या आहेत त्याचे मुख्य कारण म्हणजे एकदा पावसाळ्याच्या दिवसात आमची आई स्वयंपाकघरात सकाळी चूल सारवायला गेली, तेव्हा जोराने किंचाळली. वडिलांसंगे मी त्या स्वयपाकघरात शिरलो तेव्हा आईच्या सबंध हातावर कैंक सर्प वेटाळताना दिसत होते. ही घटना त्या चार वर्षे वयात इतकी जबर स्मरणात बसली, की तेथील त्यानंतरच्या आठवणी पण त्यापुढे मेंदूत रेघाटल्या गेल्या. तसेच त्या घरातील समोरील खोलीच्या दाराजवळ बाहेरच्या बाजूला एक दगडी ओटा होता. त्या ओटयावर बसून त्या बोळीतून जाणाऱ्या बैलगाड्या व उडणारा धुरळा मी पाहत असे. पण एके दिवशी जवळच राहणारे काशाचे भांडे करणारे लोक घाईघाईने आले व ती ओटयावरची शिळा उचलावी असे म्हणू लागले. माझ्या गंमतीची ती जागा होती. तिथे बसून मी कितीतरी गम्मत पाहत होतो व खेळत होतो. यामुळे ती शिळा काढताना मला जरा दुःख झाले व का काढतात हे पाहण्यास मी तिथेच उभा होतो. शिळा जरा उचलली व त्याबरोबर खालून एक भुरक्या रंगाचा नागसर्प फणा काढीत बाहेर पडला. लोकांनी त्या सर्पाला चिमटयांनी पकडले व गावाबाहेर सोडून

आले. द्रुग गावातील काशाचे भांडे करणारे लोक सर्पांना मारीत नसत, त्यांनी विशिष्ट प्रकारचे चिमटे तयार केले होते. व त्या चिमटयांनी सर्पाला धरून त्याला ते गावाबाहेर सोडून देत. असेच एके दिवशी आमच्या शेजारच्या घरात एक मांजर जोराने केविलवाणे ओरडू लागले. लोक हातात कंदिल घेऊन तिकडे धावले. वडिलांबरोबर मी पण त्या स्थळी गेलो. तिथे एका अजस्त्र अजगराने त्या मांजरीला तिच्या मागील पायाकडून धरले होते व तिच्या अंगावर वेटोळे घालून गुदमरून मारीत होता. ओरडाओरड झाली लोक काठया घेऊन आले. त्याबरोबर अजगराने मांजरीला सोडले व आपली शेपटी तोंडात धरून चाकाप्रमाणे आकार केला व लोकांच्या अंगावर धावून येऊ लागला. त्या लोकांनी या अजगराला पण पकडले व चिमटयात धरून गावाबाहेर नेले. अवसे–पौर्णिमेला आमच्या घरात त्या पिंपळाच्या झाडावरून ओरडणाऱ्या घुबडांचा आवाज येत असे व घरात शिरलेल्या उंदरांचा त्या समयी चांगला थयथयाट व आवाज होत असे. या घटनांच्या मनात रुजलेल्या आठवणी मला अद्याप स्मरतात.

पावसाच्या दिवसात आम्हाला द्रुगहून बिलासपूरचा प्रवास करावा लागला. त्या वेळी तिकडे अत्याधुनिक आगगाडया नव्हत्या. आमचा प्रवास आम्ही ज्या गाडीने केला त्याचे नाव होते, "लंगडी गाडी." या गाडीमध्ये ९० टक्के मालगाडीचे डबे असत व उतारूंकरता एक किंवा दोनच कोच लावण्यात येत. प्रवासीसुद्धा इतके कमी होते की या दोन डब्यात बरीच जागा उरत असे. आम्हाला एका आत्येभावाच्या नवीन घराच्या वास्तूशांतीचे आमंत्रण आले होते व बिलासपूरची यात्रा त्या निमित्ताने सुरू केली. बहुतेक सकाळची वेळ असेल. आम्ही स्टेशनवर गेलो. प्लॅटफॉर्म असा काही नव्हता, यामुळे शिडीप्रमाणे पायऱ्यांवरून आम्ही डब्यात चढलो. आमची पार्टी म्हणजे मी, माझे आई-वडील व दीड वर्षांचा माझा लहान भाऊ होता. स्टेशनवरून गाडी आरामात सुटली व जवळच्या भिलाई स्टेशनवर एक तासाने पोहचली. आई–वडिलांचे सोवळे होते. यामुळे ते खाली उतरले व त्या स्टेशनवरील नळाच्या पाण्याने हातपाय धुऊन तिथेच फराळ केला. गाडी मात्र तास दीड तास तशीच उभी होती. दुपारी तर एका स्टेशनवर उतरून शेकोटी पेटवून दूध गरम केले व भात पण शिजवला. दूधभाताचे हे जेवण करून त्या गाडीत पुन्हा बसलो. असा हा आरामाचा प्रवास. अवघी आठच स्टेशन्स पार करीत रात्री दहाच्या सुमाराला बिलासपूरला ती गाडी आली. रेल्वे यार्डीत कुठेतरी ती गाडी उभी होती. व त्या अंधारात, (कारण त्या समयी चोहीकडे दिव्यांची व्यवस्था नव्हती.) रेल्वेच्या डब्यातून त्या शिडीप्रमाणे पायऱ्यांवरून येताना माझ्या आईचे हात आणि पाय घसरले व तिने धरलेला माझा भाऊ खाली पडला. नशिबाने तो पडला तिथे खोल डबके होते. यामुळे त्याला शारीरिक इजा झाली नाही पण आम्ही त्याला शोधून काढेपर्यंत त्याच्या नाकातोंडातून बरेच पाणी गेले होते. त्या काळी आजच्याप्रमाणे स्टेशनवर चोहीकडे कुली दिसत नसत. यामुळे आमचे सामान आम्हीच अंगाखांद्यावर घेऊन भावाला सांभाळीत

बाहेर पडलो. स्टेशनाच्या बाहेर बैलगाड्या उभ्या होत्या. त्या वेळचे तेच मुख्य वाहन गावात होते. घरी पोचलो व भावाचे औषधपाणी केले. दुसऱ्या दिवशी बरीच गर्दी जमली व कैक ब्राह्मणवृंदांनी वेदघोषमंत्र म्हणून तो वास्तुपुरुषाच्या स्थापनेचा सोहळा पार पाडला. त्या वेळची एक घटना माझ्या आठवणीत आहे. ती अशी की; वास्तुपुरुष त्या खड्ड्यात ठेवल्यानंतर कैक कळश्या पाणी वरून टाकले, तरी तो खड्डा भरत नव्हता. तासभर पाण्याची भर जात होती, तरी तो रिकामाच दिसत असे. काही ब्रह्मवृंद म्हणाले की वास्तुपुरुषाची स्थापना तर झाली. पण हा खड्डा रिकामा आहे असे दिसते. त्यामुळे या घरात अपत्य होणार नाही असे दिसते. आश्चर्याची गोष्ट ही की त्या घरात अपत्यच झाले नाही. आमच्या आत्येभावाने कैक साधू आणि गुरु घरात ठेवले व त्यांची इच्छा होती की वंशाचा दिवा यावा. साधूंपैकी एका साधूची मला थोडी आठवण आहे. बिलासपूरला गेल्यानंतर आमच्या आत्येभावाची इच्छा होती की मला त्यांनी दत्तक घ्यावे. याकरता मला दोन वर्षे घरीच ठेवून घेतले होते. माझे त्यांनी खूप लाड केले दागदागिने घातले, पण आईवडिलांनी दत्तक दिले नाही. श्री. गुलाबराव महाराज यांची आठवण त्या घरात चिरस्थायी राहिली. हे महाराज जवळपास दोन महिने त्या घरात राहिले. त्या घराजवळच डॉ. मुंजे यांचे वडील राहात होते. यामुळे डॉ. मुंजे व त्यांचे कनिष्ठ बंधू यांचा आमचे आत्येभाऊ व आत्या यांच्याशी फार घरोबा होता. गुलाबराव महाराज ज्या वेळी घरात वास्तव्याला राहिले, त्याच सुमारास डॉ. मुंजे लंडनहून डी. ओ. एम्. एस ही पदवी घेऊन नुकतेच आले होते व नेत्रतज्ञ म्हणून प्रॅक्टिस सुरू करणार होते. एके दिवशी डॉ. बाळकृष्ण शिवराम मुंजे कुतूहलाने गुलाबराव महाराजांकडे आले. या महाराजांनी त्यांच्या पाठीवर हात ठेवून विचारले, 'तू काय काय शिकला ? किती पुस्तकं वाचलीस ?' डॉ. मुंजे म्हणाले, 'खूप वाचावे लागले. मोठमोठ्या पुस्तकांचे पारायण करावे लागले.' महाराज म्हणाले, 'तुझे एखादे पुस्तक बघू का ?' डॉ. मुंजेनी महाराजांच्या डोळ्याला हात लावला व तपासून पाहिले, की यांना अजिबात दिसत नाही. गंमत म्हणून पुस्तक आणतो असे म्हणत डॉ. मुंजे घरी गेले व एक भले मोठे पुस्तक घेऊन ते महाराजांच्या हाती दिले. महाराज जरा हसले व म्हणाले, 'किती जड पुस्तक आहे रे ! याच्यातल्या काही अध्यायातील मुख्य मुख्य विधानाखाली तू रेघोट्या मारून हे पुस्तक इथेच माझ्या उशीखाली ठेव. उद्या आपण त्या विधानाबद्दल चर्चा करू !' डॉ. मुंजेंना आश्चर्य वाटले, की इतके पूर्ण अंधत्व असल्यावर हे वाचतील कसे ? व ही चर्चा तरी काय होणार ? महाराज म्हणाले, ते पुस्तक माझ्या उशीखाली ठेव, व उद्या रेघा मारलेली वाक्ये वाचून तुला चर्चा करण्याकरता उद्युक्त करीन ! डॉ. मुंजे यांनी डोळे पुन्हा तपासले व अंधत्वाची खात्री केल्यानंतर ते पुस्तक त्यांच्या उशीखाली ठेवून घरी आले. दुसऱ्या दिवशी डॉ. मुंजे आले व त्यांना महाराजांनी पुस्तक काढल्यानंतर रेघोट्या मारलेली पाने उघडताच महाराजांनी त्या पृष्ठांची संख्या व रेघोट्या मारलेली वाक्ये म्हणून दाखविली. सगळ्या

लोकांना आश्चर्य वाटले. डॉ. मुंजेंनी त्यांची तारीफ केली. नमस्कार केला. आशीर्वाद देताना महाराज म्हणाले, ' नेत्र–चिकित्सा थांबवून तू राजनीतीत पडशील. देवाचे नाव घेत रहावे. तोच तुला सहाय्य करील !'

हे महाराज कात्यायिनी व्रत करीत होते. कपाळाला कुंकू आणि गळ्यात मंगळसूत्र नेहमी असे. दोन-तीन महिने राहून हे महाराज परगावी जाऊ लागले. जाताना आमच्या आत्येभावाने विचारले की, आता पुढे भेट केव्हा होईल ? महाराज म्हणाले, ' होळीनंतर !' ते दिवस भाद्रपद–आश्विनाचे होते. यामुळे होळीची आठवण तशीच दडून राहिली. मूल-बाळ तर झाले नाहीच, पण पुढील वर्षीचा होळीचा सण आला. एप्रिलच्या महिन्यात होळीनंतर आमचे आत्येभाऊ आपल्या वकिली व्यवसायाच्या ऑफिसात बसले असताना एक ब्राह्मण सहज आत शिरला. तेथील प्रथा अशी होती की जेवणापूर्वी कुणी ब्राह्मण दाराशी आला की, त्याला भोजनाचे आमंत्रण द्यावे. याप्रमाणे आमंत्रण दिले. वेळ झाल्या-वर त्यांच्या संगे जेवावयास बसले. जेवताना बऱ्याच वेळा आमचे बंधू त्या शांतपणे जेव-णाऱ्या ब्राह्मणाला हिंदीत म्हणत होते, की तुमचे रूप आणि बांधा गुलाबराव महाराजां-सारखा आहे. पण ब्राह्मण ' होगा ' या शब्दाशिवाय दुसरा शब्द बोलतच नव्हता. जेवण झाले. तांबूल दिल्यानंतर आमचे बंधू कपडे बदलण्यास वर गेले. तेवढ्यात तो ब्राह्मण निघून गेला. कपडे घालताना कॅलेंडर पाहून आमच्या बंधूला आठवण झाली की, गुलाब-राव महाराजांनी होळीनंतर भेटू असे म्हटले होते. ते तर खरे करून दाखविले नाही ? ते ताबडतोब खाली आले, पण तोपर्यंत तो ब्राह्मण अदृश्य झाला होता. या घटनेनंतर ६०–७० वर्षांनी आमचे बंधू आजारी पडले व गावात जेव्हा होळी पेटली त्या समयी गुलाब-राव महाराजांची आठवण करून होळीनंतर त्यांनी प्राण सोडला.

हा बिलासपूरचा पहिला प्रवास म्हणून आठवतो. याच्यानंतरचा दुसरा आठवणीचा प्रवास तिथूनच दोन वर्षांनी सुरू झाला. तोपर्यंत आमच्या वडिलांची बदली द्रूगहून बिलासपूरला झाली होती. बिलासपूरचे घर जरी ८–१० खोल्याचे होते तरी द्रूगपेक्षा आवार जरा लहानच होते. या बिलासपूर शहरापासून आम्ही एका उन्हाळ्यात रतनपूर नावाच्या गावी जाण्यास निघालो. हा प्रवास त्या काळी बैलगाडीनेच करीत असू. सोळा मैल सडक चांगली दगडविटांनी भरलेली होती व दोन्ही कडेला आंबा, वड, पिंपळ, चिंच आदींची मोठी वृक्षराजी वाढलेली होती. रात्री दहा वाजता त्या बैलगाडीत भाताचा तूस भरला होता. त्यावर गोणपाट अंथरले व वर व्यवस्थित बिस्तारा अंथरून आम्ही लोळलो. त्या गाडीला बांबूच्या तट्ट्याचे आवरण होते व गाडी हाकणारा समोर बसला होता. बैलांच्या खांद्यावर जे ' जू ' होते, त्यामधूनच एक पेटता कंदील टांगलेला होता. बैलांच्या गळ्यात मोठाले घुंगरू होते. गाडी चालली की घुंगरांचे आवाज व त्या डोलणाऱ्या कंदीलाचा आकार पाहून असे वाटे, की कुणी त्या आवाजात भरभर नाचत असावे. रात्री घर सोडले व बिलासपूरच्या वेशीपर्यंत गावातील सडकेच्या कडेला रॉकेलच्या

दिव्यांचा मिणमिणता प्रकाश होता. वेशी ओलांडल्यावर अंधारच पसरला. त्या अंधाऱ्या रात्री कंदिलाच्या प्रकाशातच आमची गाडी चालली होती. अधूनमधून असाच प्रकाश घेतलेल्या गाड्या भेटत होत्या. एकदा तर दोन रेडे जुंपलेल्या गाडीसमोर कंदील घेऊन एक मनुष्य चालत होता. रेडे त्या माणसाच्या मागे चालायचे. तो घुंगरूंचा आवाज, गाडीच्या चाकाचा आवाज व खाचखळगे यातील धस्कन बसणारा धक्का सर्व सहन करताना झोप लागली. गाडी किती वेळ चालली हे काही आठवत नाही, पण जेव्हा मी डोळे उघडले तेव्हा गाडी चढावावरून खाली उतरत होती व बैल बिथरून समोर जाईनात. गाडी एकाएकी थांबली. मला असे वाटले की गाडी आता उलटणार, तेवढ्यात गाडीवाल्याने जोराने आरडाओरड सुरू केली. त्या ओरडण्यासंगे 'आँव आँव' असा जोराचा आवाज आला. आम्ही तोपर्यंत खडबडून उठलो होतो व समोरून एक वाघ आँव आँव ओरडत त्या खिडीच्या एका कडेच्या डोंगरावर हळू हळू चालला होता. ही खिड त्या रतनपूर गावाच्या वेशीवर होती व तिथे भैरोबाचे एक मोठे देवालय होते देवालयाजवळ मोठा तलाव व पलीकडे मोठी जंगलझाडी होती. नंतर मला कळले की या खिडीच्या टोकाला या देवळाजवळ तळ्यातील पाणी प्यायला हटकून वाघ येत असतो व त्या खिडीच्या उतारावर दडून बसतो. त्या मार्गावरून सावज उतरले की त्याला भोजनाची आठवण येते. आमच्या बैलगाडीच्या बैलाचा त्याला वास आला व तो दडून बसला. पण बैलांना वाघाचा वास आला व ते बिथरले. आणि ओरडाओरडी ऐकून वाघ निघून गेला. या ओरडण्याच्या आवाजाने काही लांबवरचे लोक मदतीलासुद्धा आले, पण तोपर्यंत वाघ निघून गेला होता. आम्ही देवळाजवळ थांबलो. कारण तोपर्यंत दिवस उजाडताना दिसला. त्या अंधुक उजेडात भैरोबाचे दर्शन घेतले व पुढील प्रवासाला गाडी सडकेवर आणली हा असा प्रवास आणखी दोन मैल केल्यानंतर आम्ही आईच्या आजोळी येऊन थडकलो

रतनपूर हे खेडेगावच होते, पण त्या गावात जवळपास २०० तळी होती. एक तळे तर मैलभर लांब होते व सगळ्या तळ्यात कमळाची फुले व काही तळ्यात शिंगाडा होता. पण कुठे कुठे मगर पण होती. आम्ही आमच्या मामाच्या घरी आलो. त्या खेड्यातील त्यांचे घर सर्वांत उंच होते. त्या घरात जवळपास २० ते २२ खोल्या असाव्यात आणि मला आठवते, की सर्वांत खालच्या मजल्यात एक माजघर होते व त्या माजघरात कैक गाडे भरून आंबे ठेवलेले असत. आंबे खाणे म्हणजे एक आंबा खायचा नसून टोपली भर आंबे बाहेर न्यावे व पडवीत बसून ते चोखत बसावे. अंगण तरी केवढे मोठे होते व त्याच्या पलीकडे १०० गुरे मावतील एवढे मोठे गोठे होते. सकाळपासून आंबे खाणे हाच उद्योग व वरून गोठ्यातील गाईचे धारोष्ण दूध पिणे हा दुसरा उद्योग होता.

दुपार झाली व घरची मंडळी डुलक्या देऊ लागली, की मी आणि आमचे मामेबंधू तळ्याकडे फेरफटका करण्याकरता निघायचो. हे बंधुराज फार हूड होते. एके दिवशी तळ्याच्या कडेला चरणाऱ्या एका घोड्याला त्याच्या आयाळीला धरून केसाने पकडले व

लगाम लावण्यासाठी माझे धोतर खेचून काढले व त्या घोड्याच्या खालील जबड्याला कसून ते बांधले आणि हा लगाम घेऊन त्यांनी रपेट सुरू केली. त्यांची रपेट संपेतोपर्यंत माझे धोतर त्या घोड्याने अर्धे चावून टाकले होते. घरासमोरच काही शेतकरी होते. ते चणेफुटाणे, मुरमुरे, लाह्या हे तर रोज भाजायचेच, पण सकाळपासून पोहे कुटण्याचे आवाज आम्हाला ऐकू येऊ लागले की आम्ही सरळ त्या घरात शिरत होतो. अशी दिनचर्या चालली होती. या रतनपूरच्या वस्तीला करैयापारा असे नाव होते. इथून आम्ही एके दिवशी पायी मैलभर चालून रतनपूरच्या किल्ल्यात गेलो. या किल्ल्यात मुख्य दारा-जवळ लक्ष्मीनारायणाचे देऊळ होते व ते अद्याप आहे या देवळात नागसर्पांच्या फण्यावर गरुड बसलेला दिसतो व गरुडाच्या खांद्यावर श्री नारायण विराजमान आहेत व त्यांच्या डाव्या मांडीवर श्री लक्ष्मीची मूर्ती दिसते. अशी लक्ष्मीनारायणाची मूर्ती भारतात इतरत्र कुठेही सापडणार नाही. जवळच मोठा वटवृक्ष होता व त्याच्या पलीकडे एक जुना वाडा तेव्हा निर्मनुष्य स्थितीत दिसला. असे सांगतात की या वाड्यात मराठ्यांच्या शासनाच्या वेळी कमाविसदार राहात होते व इथेच आमच्या आई आणि मामांचा जन्म झाला. किल्ल्याच्या मुख्य दारासमोर मोठा गणपती विराजमान होता. शिवाय कितीतरी जुन्या शिल्पांचे अवशष इतरत्र पसरले होते. त्या किल्ल्याची आठवण ठेवून आम्ही पलीकडे एका विठ्ठल मंदिरात गेलो. या मंदिराच्या मूर्ती श्री. काशीकर नावाच्या संताने अदमासे सन १६७३ साली इथे स्थापन केल्या होत्या. जवळच एका टेकडीवर श्रीरामाचे देऊळ आहे व त्या मूर्तीसमोर राजा बिंब्राजी व त्यांची पत्नी आनंदीबाई यांच्या दोन मूर्ती हात जोडून उभ्या आहेत. रामाच्या दारासमोर एक चंदनाचा हनुमान ठेवला होता व लग्न-कार्याच्या वेळी ही मारुतीची मूर्ती आमच्या मामाकडे आणत असत. या परिसरातून खाली उतरल्यावर उजवीकडे महामाया देवीचे एक देऊळ होते. त्या देवीची मूर्ती सिंहावर आरूढ असून तिला तीन मुखे आहेत. एक महाकाली, दुसरी महादुर्गा व तिसरी महा-सरस्वती. पण त्या तीन शिरांपैकी महाकालीचे शिर तिथून कैक वर्षांपूर्वी गायब झाले व असे सांगतात की, त्या मस्तकाची स्थापना अंबिकादेवी म्हणून सरगुजा संस्थानाच्या राजधानीत म्हणजे अंबिकापूरला अद्यापही दिसते. देवळावर जैन आणि बुद्धकालीन शिला व स्तंभ आढळून येतात. हे स्थान सिद्ध स्थान मानतात व कैक यात्री जवळील कुंडात स्नान करून तपस्या करताना दिसतात.

इथून पुन्हा बैलगाडीतून आम्ही रतनपूरच्या जुन्या शहराला गेलो. इथे आमच्या मोठ्या मामांचे वास्तव्य होते. हा परिसर भैरोबाच्या देवळाजवळून डावीकडे आहे. त्या देवळाजवळील डोंगरावर लक्ष्मीदेवीची एक भव्य मूर्ती असून एक शिलालेख पण दारा-जवळ आढळतो. डोंगराखाली जुन्या काळच्या कलचुरी राजाचा एक महाल आहे. त्या महालाच्या दुसऱ्या मजल्यातील शय्यागारातून हे लक्ष्मीदेवीचे देऊळ स्पष्ट दिसते. पुढे दुसरा भग्न महाल दिसला. त्याच्यासमोर एक भुईवाट होती. या वाटेतून खाली गेल्यावर

सरळ पायऱ्या एका मोठ्या बावडीत म्हणजे विहिरीत जात होत्या. पण कडेला दोन मोठे हॉल होते. सुंदर चुनखडीने बांधलेल्या हॉलवर पांढरा रंग दिला असून सोनेरी रंगाने भिंतीवर रेघा मारल्या होत्या. या हॉलमध्ये उन्हाळ्यात आम्हाला दुपारची निद्रा करावी लागे. कारण विहिरीवरून येणारा वारा त्या दोन्ही खोल्यांना वातानुकूलित करीत असे.

असे उन्हाळ्याचे दोन महिने रतनपूरला काढले व परत विलासपूरला येण्याकरता निघालो. जून महिना संपला, जुलै लागला होता व मार्गात आम्हाला पाऊस लागला. यामुळे आमच्या गाडीची गती बरीच मंदावली. ते १६ मैल पार करीत आम्ही विलासपूरच्या वेशीवर सकाळी आठला पोचलो. विलासपूर हे शहर आरपा नदीच्या काठी वसलेले आहे. त्या काळी नदीवर पूल नव्हता. बैलगाड्या नदीच्या वाळवंटातूनच जात होत्या. पण पावसाळा सुरू झाल्याने नदी दुथडी भरून वाहताना दिसली. गाडीवाला गाडी नदीच्या कडेला उभी करून स्तब्ध बसला. जोपर्यंत पूर ओसरत नाही तोपर्यंत इथेच थांबावे लागेल असे म्हणाला. पण त्या पावसात तिथे तिष्ठत राहण्यापेक्षा कसेतरी घरी जावे असे आमच्या आईने ठरवले. पण तो गाडीवाला तयार होईना. सरते शेवटी आमच्या आईने त्या गाडीवाल्याला आत बसण्यास सांगितले व बैलाचे दावण घेऊन त्या दुथडी वाहणाऱ्या नदीत गाडी झुगारून दिली. पाण्यात शिरल्याबरोबर बैल पोहू लागले. गाडीत पाणी शिरले. व आम्ही जेमतेम गाडीच्या टपाचा तट्टा धरून मागे उभे होतो. त्या वाहणाऱ्या प्रवाहात गाडी इकडे तिकडे गिरकी घेत होती. पण आमच्या आईने खूप हिम्मत दाखवून हंबरडे फोडणाऱ्या बैलांना सांभाळले व एकदाची गाडी पैलतीरी नेली. असा हा माझा या भागाचा पहिला आठवणीचा बैलगाडीचा प्रवास झाला.

यानंतर बऱ्याच वेळा मला तिकडे यात्रा करण्याचा योग आला व दर वेळी या विभागाबद्दल मला काहीतरी नवी माहिती मिळत असे. एकदा महामहोपाध्याय डॉ. मिराशी यांच्यासंगे रत्नपूरचा प्रवास केला, तेव्हा त्या लक्ष्मी मंदिराच्या दाराजवळ संस्कृत भाषेत कोरलेला शिलालेख मिळाला. रत्नपूरजवळील पाली गावाजवळील मंदिरात तिसरा शिलालेख मला वाचून दाखविला. या शिलालेखामुळे मला या विभागाची आणखी माहिती जाणून घ्यायची उत्कट इच्छा झाली. दोन दशकांपूर्वी प्यारेलाल गुप्ता यांनी ‘छत्तीसगढ का इतिहास’ असे पुस्तक प्रकाशित केले. या प्रकाशनानंतर डॉ. मिराशी यांचे ‘कलचुरी वंश का इतिहास’ हे पुस्तक पण वाचले आणि माझ्या डोक्यात एक नवीन जागृती उत्पन्न झाली. या विभागात कलचुरीवंश राजांचे राज्य होते. भारतात सातशे सत्याहत्तर वर्षे सलग राज्य करणारा हा एकच वंश नमूद केलेला दिसतो. पण या वंशाच्या नंतर त्या छत्तीसगढ विभागावर मराठ्यांचे ११२ वर्षे राज्य होते याची कल्पना महाराष्ट्रात अजिबात नाही. शिवाय ओरिसाची राजधानी कटक इथून मराठ्यांचा झेंडा ५४ वर्षे फडकला व शिवरामपंत साठे हे मराठ्यांचे पहिले सुभेदार होते ही माहिती मिळाली. प्यारेलाल गुप्ता यांच्या पुस्तकात ‘मराठे लुटेरे थे’ असा शब्दप्रयोग केलेला

आढळतो. या शब्दांनी मला डिवचले व त्या विभागाचा त्रोटक इतिहास वाचावा व जनते समोर ठेवावा अशी उत्कट इच्छा निर्माण झाली. छत्तीसगढ विभागात विलासपूर, रायपूर आणि द्रूग हे जिल्हे मोडतात, याच्यासंगे बरीच संस्थाने गुंतलेली होती.

शासकीय गॅझीटियर १९७८ यात नमूद केले आहे या विभागात फार पुरातन काली प्रभू रामचंद्र यांचे पुत्र युवराज कुश राज्य करीत होते. तथा, कवी वाल्मिकी यांचा आश्रम द्रूगजवळील बलोदाबाजार या गावाजवळील घनदाट जंगलात असावा.

ऐतिहासिक दृष्टया ४७५ साली इकडे नागसेन हरीसेन हे राजे असावेत. कारण त्या कालीन सोन्याची नाणी आरंग इथे सापडली आहेत. यानंतर सम्राट समुद्रगुप्त यांच्या काली इकडे राजा महेंद्र यांचे राज्य होते व त्याच्या राज्यातील तकथपूर आणि मलार या गावी झालेल्या उत्खननात मौर्य आणि नंद वंशाची नाणी मिळाली आहेत. मलार या गावी तर युरोपातील रोमन वंशातील राजाची नाणी काही वर्षांपूर्वी सापडली. सन ५१० मध्ये इकडे राजा प्रसन्नमात्र याचे राज्य होते. त्याच्या सुवर्णमुद्रेवर शंख व चक्र अंकित आहेत. सहाव्या शतकात शरभपूर वंशाच्या राजाने राज्य केले. यानंतर हैहयवंशी कलचुरी राजे आले.

या कलचुरी राजवंशाचा उगम मालवा प्रांतातील महेश्वर गावी झाला. त्यांचे प्रथम नृपती कृष्णराज (५५०–५७५) होते. त्यानंतर त्यांचे नातू बुद्धराज (६२०) व तदनंतर वामनदेवराज (६७५) असे तिकडे राजे झाले. या वामनदेव राजाने त्रिपुरीचे राज्य जिंकून चेदी वंशाचा नाश केला. शिवाय धारनृपती यांना हरवून सगळा माळवा काबीज केला. याच वंशात महाप्रतापी राजा कर्ण जन्माला आले. यांनी चालुक्य, बंगाल, पल्लव, कुंतल आदी राजांना हरवून अगदी कांगडा म्हणजे हिमाचल प्रदेशपर्यंत आपले सैन्य नेले.

त्याच वेळी भारतात यवनराजे आले होते. त्यांचा त्यांनी प्रखर पराभव केला. हे कर्णराजे कला आणि साहित्य यांचे भोक्ते होते. काशी येथे त्यांनी कर्णमेरू नामक उत्तुंग शिवालय बांधले; तसेच कर्णावती नामक अग्रहर तिकडे त्यांच्या नावाने बराच काल प्रसिद्ध होता. मंबईजवळील घारापुरी येथील लेणी याच राजांच्या आज्ञेने इकडील मांडलीक संस्थानिकांनी बांधली. याच्या ताम्रपटावर गजलक्ष्मीचे चित्र अंकित होते. साहित्य क्षेत्रात कैक साहित्यकार व कवी गाजले. कवी राजशेखर ज्यांनी बालभारत व स्वप्नदशानन लिहिले ते याच काळात होते.

याच प्रसिद्ध वंशाचा राजा प्रथम कोकल्यदेव याचे द्वितीय पुत्र शंकरगण (८२५) याने दक्षिण कौशलवर स्वारी केली. पाली येथील मंदिराच्या दरवाजावर याच्या नावाचा शब्दांकित लेख कोरलेला दिसतो. या राजाने तुम्माण इथे एक नवीन राजधानी स्थापन केली व आपल्या भावाला तिकडील राज्य सांभाळण्याकरिता ठेवून माळव्याला परत नेले. द्वितीय कोकल्यदेव यांच्या वेळी कलिंगराज नामक राजपुत्राने इसवी सन ९५०–१०१५

साली तुम्माणावर स्वारी करून स्वर्णपूरचे सोमवंशीय राजे यांना हरवून आपली राजधानी पुन्हा परत घेतली. कलिंग राजचे पुत्र कमलराज (इसवी सन १०२०) यांनी राजा भांगेदेव यांना सोबत घेऊन ओरिसा प्रांतावर स्वारी केली. आणि तो विभाग कलचुरी वंशाच्या राज्यात सामील केला. कमलराजचे पुत्र प्रथम रत्नदेव (इ. सन १०२५–१०६५) यांनी कोमोमंडलचे अधिपती वजवर्मन याची कन्या नोन्नला हिच्याशी विवाह करून छत्तीसगढवर आपला अधिकार दृढ केला व तेव्हापासून कलचुरी वंशाचे राज्यशासन छत्तीसगढवर सुरू झाले व ते सलग १७४२ पर्यंत म्हणजे ७७७ वर्षे चालले.

राजा रतनदेवने तुम्माण इथे बऱ्याच बागा लावल्या; पण तिथे त्याचे मन लागेना म्हणून तिथूनच दूर असलेल्या व पर्वत व वनराजीने वेष्टिलेल्या एका गावी आपली राजधानी नेली व त्या शहराला मणीपूर हे नाव दिले. पुढे याचे नाव रतनपूर झाले. या रतनपूरहून एकीकडे काशी व दुसरीकडे जगन्नाथपुरीला मार्ग जात असे. यात्रेकरूंची झुंबड पाहून राजा रतनदेवने प्रतिकाशी निर्माण करण्याकरता बृहदेश्वर नामक महादेवाचे मंदिर व इतर शिवालय स्थापन केले. या बृहदेश्वर मंदिरात शिवाचे लिंग अगदी अंगुष्ठमात्र असून ते तांब्याच्या आवर्तनाने वेष्टिले आहे. तिथे कितीही पाणी टाका; तरीही ते पाणी अंगुष्ठापेक्षा वर जात नाही. त्याने गावाबाहेर भैरवनाथाचे मंदिर बांधले व गावात कैक तळी व सरोवरे निर्माण केली. जवळपासच्या मांडलिक राजांना जिंकून द्रुगपासून सरगुजापर्यंत त्याने आपल्या राज्याची सीमा वाढवली. रेशीम, रेशमाचे तागे व काशाच्या धातूची भांडी निर्माण करण्याला प्रोत्साहन दिले. त्या काळची एक सुंदर वैष्णवी देवीची मूर्ती विलासपूर येथील राममंदिरात आता ठेवण्यात आली व ती देवी अभय व वरदहस्त प्रदर्शित करून खडावांवर उभी आहे. अशी मूर्ती दुसरीकडे दिसत नाही. ही मूर्ती विलासपूरला अद्याप दिसते.

या कालचे राजे शैव व शाक्त होते, तरीपण प्रथम जाज्वल्यदेवने जांजगीर इथे श्री विष्णूचे मंदिर पुनर्वसित केले. द्वितीय जाज्वल्यदेव (११३५) याने आपले सेनापती जगपाल यांना आज्ञा देऊन रायपूरजवळील राजिम गावच्या–राजीवलोचन या देवाच्या मंदिराचा जीर्णोद्धार केला, तसेच शिवरीनारायण इथे चंद्रचूड देवाचे मंदिर बांधले. तृतीय रतनदेव यांचे मंत्री गंगाधर याने खरोदगावी लक्ष्मणाच्या मंदिराचा जीर्णोद्धार केला. रतनपूर शहराजवळील श्रीलक्ष्मीचे (एकवीरा देवीचे) मंदिर उभारले व ते असे की राजमहालाच्या शयनगृहापासून उठल्याबरोबर देवीचे दर्शन व्हावे. इकडेच ग्रीष्म काली आराम करण्याकरता वापिका निर्माण करून कडेला निद्रेकरता खोल्या बांधल्या, ज्या १९३५ पर्यंत आम्ही पाहिल्या आहेत. या कलचुरीवंशीय राजाच्या काळात जातीबद्दल भेदभाव नव्हता. रतनपूरचे नगराध्यक्ष वैश्य होते. रतनसिंग नामक कायस्थ गृहस्थाने मलार इथे शिवमंदिर बांधले. देवपालक नामक मोची जातीच्या माणसाने खलवाटिका (खलाडी) या गावी श्रीविष्णूचे मंदिर निर्माण केले. देवळात सगळ्या जातीच्या

माणसांना प्रवेश मिळत असे. त्या काळी बांधलेली देवळे व अवशेष व तेथील भग्नमूर्ती आजसुद्धा रतनपूर, बडद, दुर्ग, विकर्णपूर, आरंग, श्रीपूर, मलार, धनपूर, पद्मपूर आणि पेड्रा इथे दिसतात. काही शिल्पावर खजूराहो येथील मैथुन शिल्पाची छाप आढळते. शाक्तपंथी देवीच्या मूर्तीमध्ये वैष्णवी, वाराही, नारसिंही, ऐन्द्री, चामुंडा, पार्वती, एकवीरा तथा महामाया अशा देवता आहेत.

राजा रतनदेवचे पुत्र पृथ्वीदेव (१०६५-१०९२) हे गादीवर आल्यावर त्यानी स्वतःच सकलकौसलाधिपती असे बिरूद धारण केले. त्यांचे पुत्र जाज्वल्यदेव यांनी बस्तरचे राजा सोमेश्वर यांना हरवले व सारंगगड, भ्रमरगड, कांकेर आदी जिंकून छत्तीसगढचे राज्य मजबूत केले. एका शिलालेखात यांच्याबद्दल संस्कृतमध्ये खालील श्लोक आढळतो.

" बूत स इव्रिशः क्षितीपत्ति दृष्टः क्षितो बाश्रूतः ।"

द्वितीय रत्नदेवचे पुत्र तृतीय रत्नदेव (११७५ ते १२००) आले व त्यानंतर प्रतापमल्ल (१२००-१२२५) व पुढे लक्ष्मीदेबी आणि सिंहणराज १२२५ ते १३०० गादीवर बसले. या समयी गृहकलह सुरू झाला व या वंशाची एक शाखा खलवाटिका (खलाडी) इथे राजा रामचंद्रने नेली व रत्नपूरला राजा डंभीर राज्य करीत होते. डंभीरनंतर मदनब्रह्म तथा रत्नसेन १४८० व पुढे त्यांचे पुत्र राजा बहारदेव १५०० ते १५२५ हे राज्यावर आले. या राजा बहारदेवने रत्नपूर येथील महामाया देवीच्या मंदिराची स्थापना केली. या मंदिराच्या सभामंडपात बुद्ध आणि जैनकालीन प्रतिमा तेथील स्तंभावर कोरलेल्या दिसतात. या महामाया मंदिरातील मूर्ती तीन मुखवट्यांनी सजविली होती. त्यांची नावे महाकाली महालक्ष्मी व महासरस्वती अशी आहेत. परंतु आजमितिला तिथे दोनच शिरे दिसतात. हे देवालय सिद्धस्थान मानले जाते व इकडे यात्री बऱ्याच प्रमाणात येतात.

राजा बहारदेवच्या शेवटच्या कालापर्यंत या वंशाच्या राज्यात पूर्वेकडे ओरिसापर्यंत या राज्याची सीमा गेली होती व राज्यात ४८ किल्ले होते.

छत्तीसगढला वघेलखंडपण म्हणत. या राजांनी यवनराजे-पठाण यांच्या आक्रमणाला तोंड दिले व त्यांना हाकलून लावले. राजा बहारदेवानंतर राजा रणजित सहाय गादीवर आले. या समयी दोन महत्त्वाच्या घटना घडल्या. या घटनांमुळे असे दिसते की हे राजे किती धर्मसहिष्णू होते व हिंदूत्वाचा त्यांना किती अभिमान होता !

पहिल्या घटनेत असे दिसते की, महाराष्ट्रातून काशीकर नावाच्या संताने श्रीविठ्ठल व रखुमाईच्या मूर्ती घेऊन जगन्नाथपुरीचा प्रवास करताना रत्नपूरला मुक्काम केला. शैव आणि शाक्त भक्ती बघून ते जरा कचरले पण शेवटी १६७३ साली त्यांना विठ्ठल-रखुमाईचे मंदिर बांधण्याची कलचुरी वंशीय राजाने परवानगी दिली. प्राकृतिक सुंदरता, अन्नधान्याची सुबत्ता, देशातील शांतता व हिंदू धर्माचा अभिमान पाहून काशीकर संत तिथेच स्थायिक झाले व तिथे त्यांनी बांधलेले विठ्ठल रखुमाईचे मंदिर अद्याप दिसते. नगरकर कुटुंब मराठी पद्धतीने पूजाअर्चा करतात. कार्तिक महिन्यातील सकाळची काकड

आरती करण्याला गावातील हिंदीभाषी लोकसुद्धा या सोहळ्यात फार उत्साहाने भाग घेतात.

दुसरी घटना फार महत्त्वाची आहे. कारण या घटनेमुळे आपल्या भारतवर्षाच्या इतिहासाला नवीन दिशा मिळाली. ही घटना म्हणजे मार्च १६६६ मध्ये श्री शिवाजी महाराज यांनी मराठवाड्यातील निलंगा गावाहून आग्र्याकडे प्रवास सुरू केला व ते ११ मे १६६६ रोजी आग्रा शहराबाहेरील ग्वाल्हेरच्या रस्त्याच्या उजवीकडे सेवलाजाट गावाजवळील श्री. मूलचंद यांच्या धर्मशाळेत येऊन पोहोचले. दुसऱ्या दिवशी म्हणजे १२ तारखेला कुंवर रामसिंग यांनी त्यांना बादशहा औरंगजेबच्या दरबारात नेले. शिवाजी महाराजांचा तिथे अपमान झाला व ते जोराने गरजले;-त्यामुळे सगळा मुगलदरबार हादरला. शेवटी औरंगजेबाने मनात राग ठेवून श्री रामसिंग यांना शिवाजीला घेऊन जाण्यास सांगितले. आग्र्याहून १ किलोमीटर दूर फिरोजाखोजा यांची एक अष्टकोनी कबर आहे. कबर आहे तिथे बागा पण आहेत. तिथेच शिवाजीला एक तंबू ठोकून ठेवण्यात आले. रामसिंग याने त्यांच्याजवळ आपला डेरा ठोकला. महाराजांनी बरेच अर्ज करून घरी जाण्याची परवानगी मागितली. पण ती नाकारली, शेवटी आपले सैनिक व उपदेशक यांना घरी जाण्याचे परवाने मिळवून दिले. पण तोपर्यंत रामसिंगच्या छोट्या सेनेशिवाय त्या मकबारीभोवती बंदूकधारी मुगलसेना, तीपुढे मीना जातीच्या शिपायांची सेना, तीपुढे बादशहाचे शिपाई व शेवटी पोलादखानचे शिपाई महाराजांच्या भोवती पहारा करीत होते.

आग्र्याच्या उन्हाळ्यात महाराजांना बरे नव्हते. तरीपण त्या सगळ्या सेनेच्या कैदेतून निसटण्याचे प्रयत्न चालूच होते. खबर पसरली की महाराज आजारी पडले. औरंगजेबने शाही हकीम पाठविण्याचे ठरवले पण शिवाजीने नकार दिला. श्री तुळजा भवानीची पूजा करावी व कौल मागावा याच विचारात ते होते. त्यांच्या संगे असलेल्या दोघातिघा मंत्र्यांनी कैक प्रकारचे उपाय सुचविले. तसेच शिवाजीजवळचे काही सैनिक व गुप्तहेर गावात फिरून येतच होते. या शिवाय पहारेकरी यवन सैनिकांना नाच–गाण्यात रिझवीत होते. एकदाची कल्पना सुचली व महाराजांनी ठरवले की पूजा करावी आणि गावभर प्रसाद वाटावा. याप्रमाणे ऑगस्ट महिन्याच्या सुरुवातीपासून प्रसादाचे पेटारे महाराजांच्या तंबूपासून बाहेर जाऊ लागले. शेवटच्या दारापुढे गावातील बऱ्याच लोकांची गर्दी प्रसाद घेण्याकरता जमत असे, व पुढे प्रसादाच्या निमित्ताने ती आणखीच वाढू लागली. याशिवाय औरंगजेबाच्या कैक सरदारांच्या घरी मेवामिठाईची ताटे भरून प्रसाद जाऊ लागला. हे असे एकीकडे चालले असताना दुसरीकडे औरंगजेब ठरवीत होता की शिवाजीला या तंबूतून काढून एका वाड्यात ठेवावे व तिथे त्याचा अंत करावा. गुप्तहेराने ही खबर महाराजांपर्यंत पोहचवली. श्री भवानीदेवीचा कौल मिळाला व त्याप्रमाणे शिवाजीमहाराज १७ ऑगस्ट १६६६ रोजी सकाळी उठले व काही मेवामिठाई खाल्ली आणि वेश बदलून

त्या मिठाई नेणाऱ्या पेटाऱ्यांच्या गर्दीतून निसटले. आतापर्यंत इतिहासात शिवाजी महाराज व युवराज संभाजी हे पेटाऱ्यात लपून निसटल्याचा उल्लेख आहे. पण 'आलमगीरनामा' चा लेखक मोहम्मद कासम तसेच भीमसेन सक्सेना यांचे तारीखे दिलखुशी, 'Travel in Mugal Empire' लेखक फ्रान्स्वा बर्नर तथा काफीखान यांचा 'मुगलांचा इतिहास' यात सगळ्या संदर्भाचा उल्लेख करून श्री. सेतुमाधवराव पगडी आपल्या 'श्री छत्रपती शिवाजी नि त्यांची प्रभावळ' (१९७६) या पुस्तकात स्पष्ट लिहितात की महाराज शत्रूला पाठ दाखवणार नाहीत व अशा कुचंबित स्थितीत पेटाऱ्यात बसणार नाही. ते बाहेर जात असलेल्या पेटाऱ्यांच्या गर्दीतून वेश बदलून निसटले... श्री शिवाजी आग्ऱ्याहून मथुरेला गेले व तिथे मोरोपंत यांचे साडू कृष्णाजीपंत यांच्या घरी युवराज संभाजीला ठेवून यमुना नदी पार केली. पुढे अल्लीगढ, कानपूर, इटावा, प्रयाग, वाराणशी करीत ते मिरजापूरहून दक्षिणेकडे वळले व सरगुजाच्या घनदाट जंगलातून अंबिकापूर येथील देवीचे दर्शन घेत रत्नपूरला आले. मार्गात त्यांना इटावा इथे अलिनखी नावाच्या फौजदाराने पकडले; परंतु काही धन व हिऱ्याची अंगठी देऊन सुटका केली. तसेच वाराणशीला महाराज घाटावर तर्पण करीत असताना सरकारी घोषणा त्यांच्या कानी पडली व त्यांनी लगेच त्या मंत्र सांगणाऱ्या ब्राह्मण मुलाला मूठभर मोहरा देऊन स्वतः पसार झाले. हा ब्राह्मण मुलगा गुजरातहून काशीला वैद्यक विद्या शिकण्याला आला होता, व मोहरा हाती पडल्यावर शिक्षण सोडून गुजरातला परतला. काफीखानने या मुलाची मुलाखत घेऊन हा संदर्भ त्यांनी लिहिलेल्या मुगल वंशाच्या चरित्रनाम्यात लिहिला आहे. त्या वेळी रत्नपूरला राजा रणजितसहाय राज्य करीत होते. त्यांच्या कारकीर्दीत यवनांचा शिरकाव झाला नव्हता. शिवाय रत्नपूरचे महामायामंदिर हे सिद्धस्थान होते. यात्रेकरूंची झुंबड जात असे. याचा फायदा घेऊन महाराज अंबिकापूर, रतनपूर, कवर्धा, डोंगरगड, चंद्रपूर, करिमनगर, नळदुर्ग, मंगळवेढा, पार करीत राजगडला आले व पुढे १९ नोव्हेंबरला घरी पोहचले. १७ ऑगस्टपासून १९ नोव्हेंबरपर्यंत त्यांनी अदमासे १७०० मैलांचा प्रवास केला. ही घटना फार महत्त्वाची आहे. कारण ज्या दिवसापासून शिवाजी महाराज निसटले तेव्हापासून मुगल साम्राज्याची क्षती सुरू झाली. औरंगजेबाने दक्षिणेत जाऊन ३६ वर्षे मराठ्यांशी लढा दिला, पण तो, त्यांची पत्नी व बरेच सैन्य महाराष्ट्रातच संपले. कलचुरी वंशाच्या इतिहासात ही घटना फार महत्त्वाची आहे.

राजा बहारदेव यांचे काळी राज्यशासन थोडे ढिले झाले होते व पुढे राजा रणजितसहायच्या काळी याला आणखी अवकळा आली. राजा बहारदेवचे पौत्र राजा रघुनाथसिंग (१७४०) यांचे वेळी या दुर्व्यवस्थेने आणखी उग्र रूप धारण केले. रत्नपूरहून जगन्नाथपुरी आणि काशीला जाण्याचा मार्ग होता. एकदा कलचुरी वंशाची राज्यव्यवस्था ढिली पडली की पुढे मांडलीक राजे स्वतंत्र हाऊ लागले. यामुळे यात्रेकरूंना रत्नपूर ते जगन्नाथपुरी असे कैक स्थळी यात्रेचा जकात कर द्यावा लागे. शिवाय लुटारूंचा पण त्रास होऊ लागला.

तिकडे बिहारमध्ये मुगलांचा सुभेदार मुर्शिद कुलीखान हा यवनांचा कारभार पाहत होता. त्याने आपले जावई सुजाद्दीन यांना ओरिसाचा नायब नाझीम नेमला. मुर्शिदकुलीखान वयोमानाप्रमाणे म्हातारे होऊ लागले, तसे त्यांनी आपले नातू सर्फराजखान याला नायब नाझीम पद देण्याचे ठरवले होते. पण सुजाउद्दीन यांनी आपले एक उपदेशक अलिवर्दिखान व बिहारचे प्रसिद्ध सावकार राय आलमचंद व शेठ फतेचंद यांच्यासंगे करार करून बिहारची सुभेदारीच मिळविण्याचा प्रयत्न सुरू केला. या गडबडीत मुर्शिदकुलीखानने आपल्या दुसऱ्या पत्नीच्या मुलाला टाकीखानला ओरिसाचे नायब नाझीम पद दिले. हा टाकीखान फार लोभी मनुष्य होता, व ओरिसाचे जगन्नाथपुरी मंदिर, जिथे वार्षिक उत्पन्न दहा लाख होते, ते त्याने काबीज करण्याचा प्रयत्न सुरू केला. पुजाऱ्यांनी जगन्नाथ मंदिराच्या मूर्ती चिल्का सरोवरात एका टेकडीवर लपवून ठेवल्या. मूर्ती गायब होताच हिंदू समाजात हाहा:कार माजला. शिवाय बिहारची सुभेदारी व ओरिसाचे नायब नाझीम पद यांच्या मारामारीमुळे गृहकलह सुरू झाला. तिकडे अलिवर्दीखानने सुभेदारी पद मिळवले व तो ओरिसावर चाल करून आला. अशा गडबडीच्या वेळी कलचुरी वंशाची राज्यव्यवस्था ढासळत होती. शिवाय या राज्यावर अलिवर्दीखानची वाईट दृष्टी होती. एकदा छत्तीसगढ गेले की मोगलांचा शिरकाव भोसल्यांच्या नागपूर येथील राज्याजवळ येईल याची जाणीव रघुजीराजांना झाली. ओरिसाचे कारभारातील मीर कासीम नावाच्या एका कारभाऱ्याने या जाणीवेची पूर्ण कल्पना करून दिली. गैरव्यवस्था व येणारे संकट दूर व्हावे व यात्रा हिंदूंना सुकर व्हावी याकरिता राजे रघुजी भोसले यांनी आपले एक विश्वासू सरदार भास्करपंत कोल्हटकर यांना २० हजार सैन्य देऊन रत्नपूरकडे बंदोबस्त करण्यासाठी पाठविले. मराठी सैन्य सन १७४२ ला रत्नपूरला येऊन थडकले. त्यांनी राजा रघुनाथसिंगला भेटीचे आमंत्रण दिले व येणाऱ्या संकटाची त्यांना जाणीव करून देण्याचा प्रयत्न केला. राजे रघुनाथसिंग हे निपुत्रिक होते व राज्यकारभारात ते फारच कमी लक्ष घालत होते. त्यांची पत्नीच कारभार पहात असे. मराठी सैन्याच्या आमंत्रणाला झुगारून विस्कळीत कलचुरी सैन्याने रत्नपूरच्या किल्यातून प्रतिकार सुरू केला. भास्करपंत कोल्हटकराच्या सैन्याने तोफेने किल्याच्या भिंती फोडल्या व श्री रघुनाथसिंग यांची राणी पांढरा ध्वज घेऊन शरण आली. भास्करपंतांनी नुकसानभरपाई घेऊन राजा रघुनाथसिंगला मराठ्यांतर्फे कलचुरीची राज्यव्यवस्था सांभाळण्यास सुभेदार म्हणून नेमले व भास्करपंत जगन्नाथपुरीकडे निघाले. त्याने अलीवर्दीखानचा कैक वेळा पराभव केला व जगन्नाथपुरीच्या देवळातील देव राजा दंडदेव यांच्या मार्गदर्शनाखाली पुन्हा प्रस्थापित केले. मांडलीक राजांना वठणीस आणले व प्रत्येक जागी घेणाऱ्या जकाती बंद केल्या व यात्रा सुकर केली. दुर्दैवाने अलीवर्दीखानने लढाई जिंकलेल्या भास्करपंतास तहाच्या निमित्ताने कट्रा इथे बोलावले व त्यांचा व त्यांच्या वीस मराठी सरदारांचा कपटाने खून केला. रघुजीराजे फार खवळले. त्यांनी दुसरी सेना पाठवून अलिवर्दीखानचा बंदोबस्त तर केलाच, पण

त्यांच्याकडून १२ लक्ष रुपये नुकसानभरपाई घेतली व त्या जगतशेठ आलमचंद कायस्थ व फत्तेचंद मारवाडी यांच्या पेढ्या लुटून अडीच कोट रुपये मराठी खजिन्यात आणले. भास्करपंतांच्या खुनाचा सूड इथेच थांबला नाही. पण मराठ्यांनी मोदिनापूरपर्यंत मुस्लिम सैन्याला व अधिकाऱ्याना व काही प्रमाणात तेथील जनतेला धाक बसविण्याला त्राही त्राही करून सोडले अद्यापसुद्धा मोदिनापूर जवळील बंगाल देशात लहान मुलाला निजविताना बोरगी आला अशी भीती घालतात. बोरगी म्हणजे घोडेस्वार व घोडेस्वार म्हणजे मराठी सैनिक.

इकडे राजा रघुनाथसिंग मराठ्यांचे एजंट म्हणून काम पाहत असताना त्यांनी इतर राजे, यवन अधिकारी यांच्याशी संपर्क साधून मराठ्यांना तोंड देण्याकरता तयारी करीत आहेत असे दिसून आले. तेव्हा रघुजींनी त्यांना बरखास्त केले. नंतर मोहनसिंग भोसले हे रत्नपूरचे राज्य पाहू लागले. हे वर्ष १७४९ होते. म्हणजे १०६५ पासून सुरू असलेल्या कलचुरी वंशाचा राज्यकारभार १७४९ साली समाप्त झाला. मराठ्यांनी बरेच मांडलीक राजे काबूत आणले. सरगुजा, जसपूर, उदयपूर हे तर वार्षिक तीन हजार रुपये खंडणी देत होते. नंतर संवळपूर, बस्तर, कालाहंडी, कांकेर, खैरागड, सोनपूर, सारंगड, भामरागड, बोनाई, पाटणा, नवागड, फुलझर, बोरासांभार आदी राज्यांना आपल्या छत्राखाली घेतले. लहानलहान जमीनदाऱ्या होत्या. पेंड्रा, केंदा, लाफा मानीन, उपरोरा, छुरी, कोरबा, सोनाखान, भटगाव, बिलाईगड, कटगी, कोरिया, बिरकोनी, आदींचा समावेश आहे. तिकडे ओरिसा राज्य मराठ्यांनी हस्तगत केले व कटक ही त्यांची राजधानी होती. कटकेवर भगवा झेंडा फडकला. आपण म्हणतो की, राघोबादादांनी अटकेपर्यंत झेंडा नेला, पण तो तिथून परत आला आणि इकडे रघुजींनी कटकेपर्यंत मराठ्यांचे राज्य नेले व ओरिसावर १८०३ पर्यंत मराठ्यांचे राज्य होते. मराठ्यांचे पहिले सरदार शिवारामपंत साठे होते व शेवटचे सरदार बालाजीपंत कोन्हेर हे १८०३ पर्यंत होते. मराठ्यांचे म्हणजे रघुजी भोसल्यांचे राज्य त्या समयी कटकपासून चंद्रपूरपर्यंत पसरले होते राजा रघुजी यांच्या मृत्यूनंतर त्याचे कनिष्ठ पुत्र राजा बिंबाजी यांनी छत्तीसगढचे राज्य दिले. यांनी १७७८ पर्यंत छत्तीसगढचे राज्य सांभाळले. यांची पत्नी राज्यकारभारात फार धुरंदर होती. तिने रत्नपूरजवळ राणीगाव नावाचे खेडे वसविले. रत्नपूरच्या किल्ल्यात लक्ष्मीनारायणाची मूर्ती स्थापना केली. ही एक आगळी मूर्ती आहे या नागसर्पाच्या फण्यावर गरुड बसलेले दिसतात व गरूडाच्या खांद्यावर श्रीनारायण बसले आहेत. व नारायणाच्या डाव्या मांडीवर इवलीशी लक्ष्मी विराजमान आहे. अशा प्रकारची मूर्ती भारतात कुठेच सापडणार नाही. हे राणीगाव व किल्ल्यातील मूर्ती अद्याप दिसते. पण ती किती काळ टिकेल याची शाश्वती नाही. राजा बिंबाजीचा काळ या विभागात सुवर्णयुग मानला जात असे. रत्नपूरच्या जवळपास दोनशे तळी होती व त्या तळ्यांचा उपयोग करून वर्षातून तीनदा शेतकरी पिके घेत होते. ह्या विभागातून नागपूरकडे एक लक्ष गाडे तांदूळ

निर्यात होत असे. या काळी रायपूर, बिलासपूर आणि रतनपूरला कासे या धातूपासून होणाऱ्या भांड्यांनी खूप प्रोत्साहन मिळाले, तसेच कोसा नामक रेशीम यांच्या उत्पादनाला बरीच मदत झाली. फळफळावळ खूप होती. रत्नपूर आणि बिलासपूरजवळील पेरू अद्याप प्रख्यात आहेत, आंबे, केळी, सिताफळ, उस, गूळ मुबलक मिळत असे. जंगलातून औषधी निर्माण होत होती. विड्याच्या पानांची पेठ इकडे बरीच मोठी होती. जंगलांना खूप संरक्षण दिले, यामुळे जंगले खूप घनदाट झाली. तिथे असलेल्या तळ्यात डास वाढत होते. विशेषत: कमळे असलेल्या तळ्यात त्यांचे प्रमाण खूपच होते. यामुळे मलेरिया, फायलेरिया यांची साथ वाढू नये म्हणून त्यांनी वैद्यकीय विभाग सुरू केले. वनौषधीचा उपयोग करून रस व रसायने निर्माण झाली. गावागावातून सडका काढल्या व त्यांच्या कडेला फळांची झाडे लावली व ती अद्याप दिसतात. कलचुरी वंशाचे राजे शाक्त व शैव होते. भोसल्यांनी श्रीरामचंद्र व हनुमानाची उपासना सुरू केली. रतनपूरच्या किल्ल्याजवळील एका टेकडीवर श्री रामचंद्राचे मंदिर आहे. तिथे रामाच्या सिंहासनाजवळ गुडघे टेकून बसलेला चंदनाचा मारुती होता. देवासमोरच राजा बिंबाजी व त्याची पत्नी असे दोन नतमस्तक असलेले पुतळे आहेत. असेच रामाचे व हनुमानाचे मंदिर बिलासपूरला निर्माण केले. राज्यशासन फार छान होत असे. राजस्व बारा लक्षपर्यंत पोहचला होता. कर्नल ब्लँड २८ जानेवारी १७९५ ला रतनपूरला आल होते. त्यांनी आपल्या डायरीत लिहून ठेवले की रत्नपूर व रायपूर विभागात शासन व बंदोबस्त चांगला आहे. सगळ्या प्रकारच्या अन्नाची सुबत्ता आहे. तांदूळ खूप पिकतो. रत्नपूरहून एक लक्ष गाडे तांदूळ नागपूरला जात होते. याबरोबरच ओरिसाकडून आलेले नारळ, सुपारी, रेशीम, काशाची भांडी याची निर्यात होत असे, (लोक राणी आनंदीबाईला खूप मान देत असत.)

दुसरा युरोपियन यात्री जो १७९० ला आला होता तो लिहितो : Ratanpur in general is a fine country from the plenty-full produce of rice. During Bimbajies time the annual revenue rose from six to tweleve lakhs and the people were markedly civil." त्या काळी राज्यशासनाला धर्मसहिष्णुता खूप होती. अकबर अली नावाचे यवन सरदार मराठ्यांचे शिलेदार होते चतुर्थीच्या वेळी गौरीची स्थापना होत असे, पण देवीला नैवेद्य आणि भोजन देण्याचा प्रथम मान अंत्यज कुटुंबाला दिला जात असे. ही प्रथा तिकडील महाराष्ट्रीय मंडळीत अद्याप रूढ आहे. उत्तर प्रदेशहून मराठ्यांनी बरेच लोक प्रशासक म्हणून आणले. नागपूरकडून धार्मिक विधी जाणणारे काही वैदिक ब्राह्मणपण रत्नपूरला राजगुरु म्हणून स्थायिक झाले. त्यापैकी शास्त्री घराण्यातल्या एका कुटुंबाचे वंशज दिग्रसकर हे बिलासपूरला अद्याप सापडतात व त्यांना गनियारेवाले असे संबोधिले जाते. या समयी संस्कृत पाठशाळा व काही मराठी शाळा छत्तीसगढमध्ये स्थापन झाल्या. शेती आणि गुरांचे संरक्षण करण्याकरता एक खातेच त्यांनी स्थापन केले होते.

राजा बिंबाजीने १७८७ पर्यंत राज्य केले. त्यानंतर त्यांची धर्मपत्नी आनंदीबाई हिने व्यंकोजी सुभेदार, विठ्ठलपंत, कारूपंत, भिका भाऊ यांच्याच मदतीने दोन वर्षे चांगल्या रीतीने राज्यकारभार चालविला. आनंदीबाईनंतर भोसले वंशाचे चिमणाबापू कारभार पाहू लागले. याच समयी रामपूरहून महिपत दिनकर राज्यशासन चालवीत. २८–१–१७९५ साली जानेवारी महिन्यात पेंढारी लोक शिरले व त्यांनी या विभागात लूटालूट सुरू केली. पण विठ्ठल दिनकर सुभेदार यांनी त्यांचा पराभव करून हाकलून लावले. चिमणाबापू नंतर रत्नपूरला कमाविसदार येऊ लागले. सदाशिव गणपत हरपाळ हे रत्नपूरचे पहिले कमाविसदार होते व व्यापाराचे शहर म्हणून रायपूर मोठे केंद्र बनले. व तिथून सुभेदार काम पाहू लागले. सन १८१७ साली राजा आप्पासाहेब भोसले यांना इंग्रजांनी नागपूर इथे हरवले व यानंतर नागपूरला भोसले सरकार नाममात्र राजा म्हणून राहिले, तेव्हाच कॅप्टन ' एडमंट ' हा रत्नपूरला आला व त्याने कमावीसदारसंगे छत्तीसगढचा कारभार पाहण्यास सुरवात केली. या कॅप्टनने या सुपीक विभागात अफू आणि नील या मुबलक पैसे देणाऱ्या पिकाचे उत्पादन करण्याचा प्रयत्न केला. हरपाळ वंशज रत्नपूरच्या किल्ल्यातच होते. १८३० साली कॅप्टन एडमंटनंतर कर्नल ॲग्न्यू आले. व त्यांनी रत्नपूरहून छत्तीसगडची राजधानी रायपूरला नेली. तिकडे नागपूरला राजा परसोजी जेमतेम ब्रिटिशांच्या देखरेखीखाली राज्य सांभाळात होते. त्यांना औरस पुत्र झाला नाही.म्हणून ईस्ट इंडिया कंपनीच्या धोरणाप्रमाणे नागपूरचे राज्य खालसा झाले. त्या वेळी रायपूरहून रेसिडेन्ट जेंकिन्स हे राज्यशासन चालवीत होते. सन् १८५४ मध्ये मराठ्यांचा छत्तीसगढ हा विभाग ब्रिटिशांनी काबीज केला. याप्रमाणे सन १७४२ पासून १८५४ पर्यंत म्हणजे ११२ वर्षे मराठ्यांनी छत्तीसगडवर राज्य केले. ब्रिटिश सरकारच्या महाराणी व्हिक्टोरियाने ईस्ट इंडिया कंपनीकडून भारताचा राज्यकारभार हाती घेतला. ते वर्ष होते १८५८ व ब्रिटिश राज्य हिंदूस्थानातून १९४७ साली संपले, म्हणजे ब्रिटिश लोकांनी ८९ वर्षे व्यवस्थित राज्य केले. हे आकडे महत्त्वाचे आहेत. कारण मोगल साम्राज्य संपल्यानंतर ब्रिटिश राज्य येईपर्यंत भारतात मराठेशाही होती याची आम्हां लोकांना जाणीव नाही. छत्तीसगढवर तर त्यांनी ११२ वर्षे राज्य केले व हा राज्यकारभार आजच्या दृष्टीने फार महत्त्वाचा आहे. मराठे जर छत्तीसगढवर गेले नसते तर जगन्नाथ पुरीचे देऊळ नष्ट झाले असते व कलचुरी वंशाने स्थापन केलेले ७७७ वर्षांचे हिंदू राज्य संपून संपूण भारताची जी फाळणी १९४७ साली झाली त्या फाळणीत पूर्व पाकिस्तानचा विभाग, बंगाल, बिहार, ओरिसा आणि नागपूरपर्यंत आला असता. मराठ्यांना श्रेय देण्याकरता आग्र्याच्या फिरोझखान मकबऱ्याजवळ शिवाजीचा पुतळा उभारला पाहिजे व रत्नपूरच्या किल्ल्यात कलचुरी राजे आणि राजा बिंबाजी यांचे पुतळे ठेवले पाहिजेत. या विभागात मराठी–भाषिक लोकांनी एकदा तरी लवकर जावे व तेथील शिल्प बघून रेशमी कापड, काश्यांची भांडी, लाकडी लाखेनी रंगवलेली खेळणी व उत्तम पेरूचा

आस्वाद घ्यावा. या विभागातूनच नर्मदा नदीचा उगम होतो व या नदीवर गुजरातजवळ बरीच धरणे उभारण्यात येणार आहेत. यामुळे मध्यप्रदेश, गुजरात आणि महाराष्ट्राला सिंचनाकरता थोडे पाणी मिळेल, तेवढीच आठवण राहून जाईल.

प्यारेलाल गुप्ता यांचे उद्‌गार अद्याप मनात बोचत आहेत. मराठ्यांच्या ऊर्जितावस्थेत मराठी राज्य चंदिगढपासून तुंगभद्रा नदीपर्यंत व द्वारकेपासून मिदिनापूरपर्यंत पसरले होते. मुगलांचे शेवटचे राजे मराठ्यांचे पेन्शनर होते व मराठ्यांचा भगवा ध्वज लाल किल्ल्यावरून सन १७८०–१८११ पर्यंत फडकत होता. इतकेच काय, वॉरन हेस्टिंग्ज याला ब्रिटिश पार्लमेंटने दोषी ठरवण्याकरता इंग्लंडला परत बोलावले, तेव्हा जाताना त्यांनी शिंदे सरकारजवळून आपल्या चारित्र्याचे सर्टिफिकेट घेतले. यावरून त्या काळी मराठ्यांची किती महत्ता होती हे लक्षात येईल.

ही यात्रा संपविताना नुकत्याच झालेल्या माझ्या एका भेटीची आठवण येते. रत्नपूरचे जंगल तर आता नष्ट होत आले आहे पण रत्नपूरच्या पुढे मराठ्यांच्या हाताखाली असलेले मांडलिक राजे यांचे कोखा येथील घनदाट वन पूर्णतया नष्ट झाले असून तिथे आता वीजनिर्मितीकरता पाच मोठी जनित्रे बसविण्यात आली आहेत. या कोळसा इंधन वापरणाऱ्या जनित्रामुळे त्या विभागात आजमितीला प्रतिदिन ३५ हजार टन राख फेकली जाते व सगळा विभाग प्रदूषणामुळे जर्जर झाला आहे. नर्मदा नदीचे पवित्र उगमस्थान अमरकंटक इथे फार घनदाट जंगल होते. तिथे आता कारखानदारी येऊन वनश्री संपत आली आहे.

सृष्टीसौंदर्याने नटलेला हा विभाग कारखानदारीमुळे नष्ट होईल काय, हीच परिस्थिती निर्माण झाली आहे !

(या घटनेचा काल १९१३–१९२९)

# १७ : देवाचे दर्शन होते का ?

महाराष्ट्रातील अकोला जिल्ह्यात बरीच प्रेक्षणीय स्थाने आहेत. अकोल्याहून वाशिमला जाताना मार्गात एका जुन्या साधूची समाधी आहे. ती काही फार जुनी नसून गेल्या ५० वर्षांपूर्वी स्थापन झाली असावी. एका मोठ्या देवळाच्या गर्भगृहात एका साधूची मूर्ती व फोटो असून त्या खाली पायऱ्याने उतरून तळघरात गेल्यास एक विहीर लागते. विहीर फार खोल नाही व तिचा तळ स्पष्ट पिवळ्या चुनखडीचा दिसतो. तिचे पाणी जेमतेम फूट–दीड फूट असेल. तेसुद्धा अगदी स्वच्छ व पारदर्शक आहे. ह्या पाण्याच्या मधोमध त्या चुनखडीवर एक चांदीची नागसर्पाची प्रतिमा आढळते. लोकांचा असा समज होता की तेथील साधू ज्यांचे नाव श्री नगेनाथ असे होते, ह्यांची भेट घेतल्यास सर्प-विषाचा उतारा होतो. बरीच पाहुणे मंडळी अद्याप इथे येतात व त्या साधूच्या समाधीचे दर्शन घेऊन जातात. त्या देवळाच्या दाराजवळ भिंतीवर एक मोठा फोटो लावला आहे. असे सांगतात की, या साधुमहाराजांनी जेव्हा समाधी घेतली तेव्हा त्यांना तात्पुरते एका स्थळी पुरून ठेवले होते. नऊ-दहा महिन्यांनी ते उकरून आता दिसत असलेली नवीन समाधी बांधली. दाराजवळ असणारा फोटो दहा महिन्यांनी उकरून काढलेल्या त्या महाराजांच्या शरीराचा होय. फोटोत ते अगदी झोपल्याप्रमाणे दिसत आहेत. इथून पुढे वाशिमपर्यंत चांगला मार्ग आहे. वाशिम गावाबाहेर एक छोटे तीर्थस्थान दिसेल. तेथील पुजारी सांगतात की, रामायणातील श्रावण बालकाची कथा त्या स्थानी घडली. तिथेच एक तळे होते व श्रावण त्या तळ्यात आपल्या मातापित्यांसाठी पाणी आणायला गेला व राजा दशरथाने त्याची हत्या केली. या गावचे श्री. बालाजी मंदिर फार प्रख्यात आहे, काळ्या पाषाणाची ती सुबक मूर्ती यवनराज्यात कशी सुखरूप राहिली हा एक प्रश्नच पडतो. या देवालयात पूजाअर्चा व्यवस्थित होत असते, व मलासुद्धा एका शुक्रवारी त्या गर्भगृहात बसून पोथी वाचण्याची संधी मिळाली. लोक अंधश्रद्धेनं वाटेल ते मानायला तयार होतात. पण मला दोन देवळात असे काही विक्षिप्त अनुभव आले; ते इथे नमूद करावेसे वाटतात. या देवळात गर्भगृहात एका कोपऱ्यात बसून मी पोथी वाचत होतो. डोके खाली करून चित्त एकाग्र करण्याचा मी बराच प्रयत्न केला; पण लोकांची

ये–जा इतकी होती की त्या गोंधळात फार काही जमले नाही. तरी पण डोके खाली ठेवूनच पोथी संपविली. ती संपल्यावर डोळे बंद करून नमस्कार केला.

डोळे उघडताच खरोखरच एक सवाष्ण ब्राह्मण स्त्री समोर आपल्या छकुल्या बालकासह उभी होती. तात्रडतोब तिला खाली ब्रसण्याचा आग्रह केला व हळदकुंकू देऊन तिच्या हाती प्रसाद दिला व दक्षिणा देऊन नमस्कार केला. जागृत देवतांचे दर्शन असे कधीकधी घडत असते. कारण ईश्वर सर्वाभूतीस्थित आहे. श्री बालाजीच्या पाषाणमूर्तीने हा एक साक्षात्कारच घडवून आणला नसेल का ? कारण माझी पोथी श्री लक्ष्मीनारायणाबद्दलची होती. असेच मला एकदा पंढरपूरला झाले. तेथील देवालयात गेल्यावर गर्दी तर दिसलीच, पण विशेष म्हणजे देवमूर्ती जवळ उभे असलेले बडवे यात्रेकरूंना खुशाल शिव्या देऊन व्यवस्थित लुबाडत होते. माझ्यासंगे असलेल्या एका पोलीस अंमलदाराने त्यांच्या अवाच्य शब्दाबद्दल हटकले व मला स्वतःच अर्चन करू देण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी पांडुरंगाच्या मूर्तीच्या डावीकडील लहानशा उघड्या कट्ट्यावर बसलो, व पोथी वाचू लागलो. गर्दी चालूच होती व बडवे यात्रेकरूंना इथे रुपया ठेवा, इथे मस्तक ठेवा, असा आदेश व शिव्या देतच होते. त्या गोंधळात खाली डोके करून जेमतेम मी पोथी संपविली. डोळे बंद करून नमस्कार केला व कडेला उतरण्यासाठी डावा पाय खाली टाकला तो काय, माझा पाय चक्क एका चांदीच्या घंगाळात पडला. जिथे पंचामृतमिश्रित पांडुरंगाचे तीर्थ भरले होते. माझे पाय त्या तीर्थात का पडावे हा एक गूढ प्रश्नच होता ! असाच एकदा बनारसला गेलो असताना काशी विश्वनाथाच्या देवळात गेलो. हातात काही फुले होती. त्यामुळे तिथे वावरणारी गुरे मागे लागली. त्यांनी ती फुले हिसकावून घेतली. आत गेल्यावर दोन बैल त्या लहानशा पडवीत मलमूत्र विसर्जन करताना दिसले. गर्भगृहात चिक्कार गर्दी होती, म्हणून जवळच पडलेली एक लाकडाची फळी घेतली व त्या पडवीत पसरलेल्या ओलाव्यावर टाकली. त्या फळीवर एक जुने वर्तमानपत्र टाकले व त्यावर बसून पोथी वाचू लागलो. पोथी जेमतेम दोन पानंसुद्धा वाचली नसेल की, एकदम तीन-चार त्रिपुंड्रधारी पंड्यांचा घोळका अंगावर धावून आला. ते म्हणाले की, या काशी–विश्वेश्वराच्या देवळात, पवित्र स्थानी सरस्वतीचा अपमान ते सहन करणार नाहीत. त्याचा अर्थ एकच होता की ते लिखित वर्तमानपत्रांना सरस्वती समजत होते व मी त्यावर बसलो असताना मानहानी व अनादर करीत होतो, अशी त्यांची भावना होती. पोथी सोडून तसेच उठावे लागले व कडेला उभे राहून पोथी संपविली. पण त्या देवळात पोथी वाचण्याचे भाग्य लाभले नाही. ही देवाची इच्छा होती काय ? असेच एकदा तिरुपतीला गेलो असताना दर्शनासाठी मोठ्या रांगेत उभे रहावे लागले. तास दोन तास झाले तरी आत शिरण्याचा माझा नंबर लागेल असे दिसत नव्हते. मी रांग सोडली व चक्क बाहेर गेलो. देवळाबाहेर एक छोटे तळे आहे. या तळ्याजवळ जाऊन पाय धुतले व डोक्यावर थोड पाणी शिंपडले. वर येऊन एक तुळशीमाळ विकत घेतली. त्यात १०८ मणी होते. तिथे

बसून जप करावा असा विचार असतानाच त्या तिरुमलाय देवस्थानचे पेशकार समोरून पुढे आपल्या घरी जाताना दिसले. हातात माळ घेऊन मी त्यांच्या मागे गेलो. त्यांचे घरी जाऊन त्यांना सांगितले की मी सरकारी नोकर आहे व सायंकाळच्या गाडीने मला शासकीय कामासाठी मदनपल्लीला जाणे जरूरीचे आहे. दर्शन घडवून दिले तर आभारी होईन. माझ्याजवळील कागद पाहून ते मला देवळात घेऊन गेले व रांगेच्या अगदी पुढे बसवून 'करा तुमचा जप' म्हणत हसत निघून गेले. मी जप पूर्ण केला व देवतेला नमस्कार करून बाहेर पडलो. काय ईश्वराची इच्छा होती की, मी हातपाय धुऊन हाती माळ घेऊन आलो तरच दर्शन होईल. हा एक आगळा अनुभवच होता. त्या दिवसानंतर त्या माळेवर मी नियमित जप करू लागलो. मुंबईला परत आल्यावर त्या देवालयाची व मूर्तीची सदोदित आठवण करीत होतो. कैक वेळा स्वप्न पडले. मंदिर, द्वार, पडवी, रांग सगळे दिसायचे. पण गर्भगृहाची मूर्ती अंधुकच दिसे; व कधीकधी तर दिसतच नव्हती. एके दिवशी असेच स्वप्न पडले व गर्भगृहापर्यंत दृश्य दिसत असताना श्री ज्ञानेश्वराची मूर्ती समोर आली व त्या अंधुक मूर्तीच्या जागी ज्ञानेश्वरी हा ग्रंथ त्या गर्भगृहाच्या दाराजवळ एका चौरंगावर ठेवलेला दिसला. त्या दिवसापासून मी ज्ञानेश्वरी रोज वाचू लागलो. त्याची आतापर्यंत अनेक पारायणे झाली. अद्याप मधूनच मला तिरुपतीच्या तिरुवनमलाय डोंगराचे स्वप्न पडते. यात्री दिसतात, पडवी दिसते, यात्रेकरूंची रांग दिसते. देवळाबाहेरील काही शिल्प दिसतात, पण गर्भगृहापर्यंत मी जरी पोचलो तरी मूर्तीचे दर्शन पूर्णतया होत नाही.

का देवतेची इच्छा होती की दर्शनाबद्दल ज्ञानेश्वरी वाचावी ?

एकदा केरळ राज्यात फिरतीवर असताना त्रिवेन्द्रम येथील पद्मनाभस्वामींचे दर्शन घेण्याची इच्छा झाली. माझ्या अंगावर पॅंट–शर्ट होता. मंदिराच्या दाराजवळ पहारेकऱ्यांनी हुकूम केला की या वेषाने आत जाता येत नाही. पलीकडच्या खोलीत जाऊन कपडे काढावे. नुसती लुंगी किंवा साधे धोतर घालूनच आत प्रवेश मिळेल. त्या खोलीवर गेलो, भाड्याने लुंगी घेतली. सर्व कपडे तिथे ठेवले व आत प्रवेश केला. या देवीची मूर्ती इतकी भव्य आहे की, ती पहायला तीन दारातून डोकवावे लागते. चंदनाचा प्रसाद मिळाला व केरळच्या महाराजांचे कुलदैवत पाहिले. पद्मनाभस्वामी म्हणजे शेषशायी भगवान. कन्याकुमारीला गेलो तेव्हा माझे कपडे पाहून दारातच मला हटकले. देवीच्या दर्शनाला लुंगी किंवा मुंडु घातल्याशिवाय आत जाऊ देईनात. मी कडेला झालो. सर्व कपडे–शर्ट पॅंट–कोट–मोजे जोडे काढले. त्याचे उपरण्यात बांधून एक गाठोडे केले. साधी चड्डी व तिच्यावर टॉवेल गुंडाळला आणि ते गाठोडे घेऊन आत प्रवेश घेतला. डोक्यावर ते गाठोडे, खांद्यावर यज्ञोपवीत व कमरेला टॉवेल, असा माझा अवतार होता. देवीचे दर्शन झाले. आत तेलाच्या पणतीच्या प्रकाशात देवतेच्या कानात व नाकात परिधान केलेले हिऱ्यामाणकांचे दागिने कसे चमकत होते !

बोर्डिंगवर आलो. थकल्यामुळे गाढ झोप लागली. सकाळी स्वप्न पडले की, एका देवळात मी उभा आहे व माझ्या समोरून भव्य कुंकू लावलेली मंगळसूत्र आदी दागिने परिधान केलेली मध्यवयीन सवाष्ण स्मित हास्य करीत निघून गेली. जागा झालो तेव्हा विचार आला की हेच का देवीचे दर्शन ? सर्व भूतमात्रात ईश्वर आहे, तो देवळातच आहे असे नाही–सवाष्ण बाईने दाखवून दिले की देव मानवातच पाहावा, असे सुचविले असावे.

" वासनात् वासुदेवस्य, वासितं भुवनत्रय ।।
सर्वभूत निवासोसी, वासुदेवं नमोस्तुते ।। "

वरील श्लोक आम्हाला हाच संदेश देत आहे. 'भारतवर्षात तेहतीस कोटी देव आहेस,' असे जे आपण ऐकतो त्याचा अर्थ एवढाच, की या देशातील ३३ कोटी जनतेत देव पाहावा. प्रत्येक मानवात स्वामी विवेकानंद म्हणतात त्याप्रमाणे ईश्वरत्व आहे.

" EVERY HUMAN SOUL IS ESSENTIALLY DIVINE."

या ईश्वरत्वाला प्रकट करणे हेच प्रत्येक धर्माचे कर्तव्य होय.

# १८ : मृत्यूच्या समीप

महायुद्धाचे दिवस होते. ऑगस्ट–सप्टेंबरच्या महिन्यात लंडनवर जर्मन वैमानिक रोज रात्री बाँबगोळे फेकत असत. नंतर त्यांनी हा बाँबवर्षाव भर दिवसासुद्धा केला. तो गुरूवारचा दिवस असावा. तीन-चार मित्रांसंगे मी सोहोजवळील भोजनगृहात चहापाणी करण्यास गेलो, हा एक इटालियन रेस्तॉरंट होता. तेथील मॅनेजर जिराल्डी आमच्या चांगल्या परिचयाचे होते.

दुपारचे चार वाजले व आम्ही कॉफी आणि पिट्झा मागविला. भारतीय स्वातंत्र्या-बद्दल हे इटालियन आम्हाला नेहमी प्रोत्साहन देत व ब्रिटिश शासनाचा द्वेष आणि मत्सर करून शिव्या देत असत. आज त्याच गोष्टीची चर्चा करीत होतो. तेवढ्यात ‘ एयर रेड ’ सायरनचा भोंगा सुरू झाला. नेहमीच्या सवयीप्रमाणे आम्ही निघालो. मॅनेजर हिशेब करण्यात गर्क होता. ‘ मला काही होणार नाही, तुम्ही जा,’ म्हणत त्याने एक हात वर केला. भोंगा थांबण्यापूर्वीच आम्ही एयर रेड शेल्टरकडे धाव घेतली. बरीच मंडळी तिथे गोळा झाली होती. सगळ्यांच्या तोंडावर चिंता आणि भय स्पष्ट दिसत होते. आम्ही एका बेंचावर बसताच वर सूंऽसूंऽसूंऽ असा जोराचा आवाज सुरू झाला. बाँब कुठे पडणार याचा विचार करण्याचेसुद्धा भान उरले नव्हते, इतके भीतीचे वातावरण चहूकडे दिसले. कुणी किंचाळ्या फोडीत, कुणी थरथर कापत, कुणी उगीच जोराने हसत, तर कुणी चांगले जोराने रडत होते. आम्ही चौथे बेंचावर बसलो होतो, पण इतके स्तब्ध व विचार-शून्य होतो की कुठे आहो याचे भान पण नव्हते. बाँब पडण्याचे आवाज जोराने येत होते. एक अगदी जवळच पडला. आमचे शेल्टर अगदी हादरून गेले. दुसरा बाँब पुन्हा जवळच पडला असावा. तो शेल्टरच्या छपराला जबर हादरा मारून गेला. आम्ही कसे अगदी चूप, चिटकून बसलो होतो. ‘ कॉल क्लीयर ’ चे सायरन झाले व आम्ही भानावर आलो. आम्ही मेलो की जिवंत आहोत हे पाहण्यासाठी एकमेकांना हालवू लागलो. कारण पलीकडे एक म्हातारा भीतीने हृदय बंद पडून निस्तेज पडला होता. कुणी रडत होते, तर कुणी मदत मागत होते. आम्ही एकमेकाला हलविले व घाबऱ्याघाबऱ्या दाराकडे वळलो. धुराचा वास व लोट आत आला. दारापलीकडे येताच समोरची इमारत कोसळल्याचे

दिसले. त्या ढिगाऱ्यावरून जाताना एक जोडा व एक मोजा असलेला पाय विटांमधून वळवळ करताना दिसला. त्याला स्पर्श करताच दिसले की कुणीतरी ढिगाऱ्याखाली अडकले आहे. ती एक जिवंत स्त्री होती. तिच्यावर घराच्या तुळया पडल्या होत्या. जवळपास आणखी आक्रोशाचे शब्द ऐकू आले. तोपर्यंत फायर ब्रिगेड व ॲम्ब्यूलन्सचा घंटा आली.

ढिगाऱ्यावरून उड्या मारीत आम्ही हॉटेलजवळ आलो. दारे व खिडक्या अगदी सताड उघड्या होत्या. तावदाने फुटली असून काचांचे तुकडे सभोवार विखुरले होते. आत शिरताच जिराल्डी दिसला. खुर्चीवर बसून जणू हिशेब तपासत होता. डोळे उघडे होते व अवस्था विचारमग्न होती. 'हॅलो बॉस, कसे काय बॉंब पडले ?' आम्ही ओरडत होतो, पण तो उत्तर देईना. आमच्यापैकी एकजण सरळ जवळ गेला व चक्क त्याच्या डोक्याच्या केसांना धरूनच विचारू लागला. पण केसांचा बुचकाच त्याच्या हाती आला ! किती भयानक दृश्य होते ! डोळे उघडून खुर्चीवर बसलेला जिराल्डी मेला होता. बॉंब पडले त्याच्या दबावानेच घरे पडली व माणसे मेली. आम्ही शेल्टरमध्ये मृत्यूची वाट पाहिली. वर मृत्यू त्या बाईला फक्त चाटून गेला. आणि जिराल्डीच्या अपघाताने मृत्यूने आपला पराक्रम प्रत्यक्ष दाखविला.

## मृत्यूचा थुईथुई नाच !

नागपूरला तेलंगखेडी येथील तळे पोहण्याचे एक आद्य स्थान होते. ४० वर्षांपूर्वी त्या तळ्याच्या पलीकडे चांगली झाडी होती व तळ्याला लागूनच बागेच्या कडेला एक छोटेखानी सागवानाचे जंगल होते. याला लागूनच पोलोग्राऊंड असून तिकडे वस्ती विरळ व नुसती झोपड्यांची व काही बंगल्यांची होती. या अशा तुरळक वस्तीतून त्या तळ्यावर पोहणारे अगदी महाल भागापासून येत. दिवसा वर्दळ असे, पण सायंकाळी मात्र तिकडे इतका शुकशुकाट होता की हाक मारली तरी माणूस येणार नाही. अपघाताचे प्रमाण मात्र बरेच होते. या तळ्यात वर्षाकाठी चार तरी जीव खतम होत, शिवाय नागसर्प चावून मेलेला एखादातरी पेशंट असे. इतके असूनसुद्धा त्या तळ्याला पोहण्याची पंढरी म्हणत असत, व आमच्यापैकी बरेच तरुण पोहण्यासाठी तेथे जात होते.

नोव्हेंबरच्या महिन्यात एखादे कॉलेजचे गॅदरिंग किंवा मे महिन्यात कॅंपचे लोक साऊबाई मोहिते यांच्या वाड्याजवळील विहीर सोडून इकडे येऊन गर्दी करीत. असेच एकदा आमच्या कॉलेजचे गॅदरिंग झाले. पोहण्याच्या शर्यतीही झाल्या. धंतोलीचे श्री. जोशी यांचे धावून सूर मारण्याचे प्रयोग झाले. या सर्वांचा परिणाम म्हणून अनेक लोकांना पोहण शिकण्याची हौस निर्माण झाली. माझ्या वर्गात एक श्रीवास्तव होते. दिसायला स्मार्ट आणि घरचे एकुलते एक असल्यामुळे नटून सजून वर्गात येत असत. त्या पोहण्याच्या

प्रात्यक्षिकाचे निरीक्षण केल्यावर पोहणे शिकण्याची त्यांनाही उत्कट इच्छा झाली. तीन दिवस माझ्या मागे लागले होते. चौथ्या दिवशी रविवार होता. त्यांना धरून चांगला मजबूत दोर घेऊन तळ्यावर बोलाविले. सुट्टीमुळे तळ्यावर चांगलीच गर्दी होती. ट्यूब घेऊन पोहणारेही पोहत होते. एकदोघांना पाचारण करून यांची इच्छा कळविली, 'चला येऊ द्या' म्हणत किनाऱ्यावर ट्यूब घेऊन आले. श्रीवास्तवांच्या कमरेला गच्च दोर बांधला. व ओढाताण करून पाहिला व टोक हाती धरून त्या ६० फूट खोल पाण्यात उडी मारण्यास सांगितले.

नवशिके असे एकाएकी उडी घेण्यास घाबरतात ! खालून 'चले आव' असे आवाज, येत असताना यांनी उडी घेतली. जसे ते पाण्यात गेले तसा दोरीला हिसका बसला व दुर्दैवाने दोरी तुटली. तुटलेली दोरी हातात व अर्धी दोरी बांधलेले श्रीवास्तव पाण्यात ! ट्यूबवाले लांब जाऊ लागले. इकडे 'अरे गेला' असे आवाज ऐकू आले. मला अंधारी आली व संवेदना बधीर झाल्या. बुडणारे श्रीवास्तव एकदा वर आले, पण त्यांना ट्यूबवाल्यांनी धरले नाही. मी अवाक् होऊन किनाऱ्यावर फस्‌कन बसलो. तुटलेली दोरी व तो हात मात्र तळ्यावर हालत होता. कुणीतरी माझी कंबर धरली व मला ओढले. मी आता सपाट पडलो, पण हात तसा पुढेच होता. अकल्पितरीत्या बुडणारे श्रीवास्तव पुन्हा घाबऱ्या घाबऱ्या वर आले. हात वर होते. फक्त त्यांचा एक हात दोरीला शिवून गेला. पुन्हा बुडणार तोच त्यांच्या दुसऱ्या हाताने दोर धरला. माझ्या हाताला हिसका बसला.

'सोडू नको, सोडू नको,' असे लोक ओरडत होते. एकाने चक्क माझ्या पाठीवरच बैठक मारली. बरे झाले, नाही तर हिसक्यासरशी मी तळ्याकडे घसरत होतो. एका हाताने दोरी धरून श्रीवास्तवांनी डोके जरा वर केले. नाकातोंडात चांगलेच पाणी गेले होते व घाबऱ्या घाबऱ्या काहीतरी ते बरळत होते. माझा हात जबर दुखू लागला. आता दोरी सुटेल किंवा तुटेल असे वाटत असतानाच ट्यूबवाले जवळ आले व त्यांनी श्रीवास्तवला वर घेतले. शिडी पार करीत काठावर आले. उपडे निजवून पाठ दाबली. नाकातोंडातून थोडे पाणी निघाले व ते भिंतीला टेकून बसले. माझ्याकडे त्याचे डोळे होते व मी तर लोळलो होतो. 'अरे कहाँ हो' म्हणत त्यांनी माझी विचारपूस सुरू केली. पाठीवरचे विद्यार्थी उठले, कंबर धरणारे बाजूला झाले व एकाने मला उठवले. हात ताठ झाला होता. त्याला झटक्याने खाली आणले. मी अवाक् होऊन बसताच श्रीवास्तव म्हणाले, 'खूब रही, पहिले दिन जरा जल्दी खींचा नही, इतना नही डुबाते !' मी चूप होतो. आता सायंकाळ झाली होती. कपडे परिधान केले व सायकलवर बसून अमरावती रोडने घराकडे निघालो. तो प्रश्न विचारी व मी चूपच होतो. शेवटी 'अरे क्या हो गया ? जवाब क्यो नही देते ?' म्हणाला. मी त्याच्याकडे पाहिले. मागून एक म्हणाला, 'काय बोलेल, दोरीच तुटली !' हे ऐकताच श्रीवास्तवची सायकल थांबली. 'चक्कर आती है' म्हणत ते बाजूच्या

पुलावर बसले. बरीच सारवासारव करून त्यांना घरी पोचविले. रात्रभर मला झोप नाही. मृत्यू समोरच थुईथुई नाचत होता व मी अवाक् होतो.

## मृत्यूने हिसका दिला

गेले महायुद्ध संपताच मी मुंबईला आलो. कीटकनाशक औषधी निर्माण करणाऱ्या एका कंपनीचा सल्लागार होतो. त्यांची प्रयोगशाळा बॅलार्ड इस्टेट येथे होती. ती व्यवस्थित करावी व यथोचित प्रयोग व्हावेत याकरिता एका तळघरात जागा मिळाली. खोली जेमतेम १० फूट X ६ फूट असावी. तिथे विशेष कार्य करण्याचे ठरले. मोठ्या तळघराशी व तेथील औषध व रसायनाशी संबंध नसावा म्हणून भित बांधून एकच दार ठेवले व प्रकाश येण्याला वर एक लहान खिडकी बांधली. त्या अंधुक प्रकाशात विजेशिवाय कामच होत नसे.. विजेच्या तारा जिन्याखालून आणल्या. त्या अद्याप कार्यालयात नव्हत्या. एका जीवाणू व जीवपेशीवर निरीक्षण चालले असता दिवा उघडझाप करू लागला. अटेन्डन्ट जवळच होता. त्याला बटन नीट दाबण्यास सांगितले. त्याने बटन दाबताच वायर सरळ केली. तसे होताच, दिव्यापासून ती निसटली व सरळ माझ्या हाती आली. मी डोळे विस्फारले, समोरील अटेन्डन्ट तोंडावर हात देऊन ओ ऽ ओ करताना दिसला. पुढे काही आठवत नाही. ओरडाओरड झाली, मी डोळे उघडले तेव्हा वर मॅनेजरच्या ऑफिसमध्ये सोफ्यावर पडलो होतो. एकदोन डॉक्टर इंजेक्शन देण्याच्या तयारीत होते. उठून बसलो, तेव्हा दिसले. मी नुसती बनियन व चड्डी घालून होतो व अंग घामाने ओथंबले होते.

त्याचे असे झाले की त्या खोलीत पंखा नव्हता. उकाडा फार झाला म्हणून कपडे काढले व काम सुरू केले. वायर सरळ करताना उघडी वायर हाती आली, तो ४३० व्होल्टचा करंट शरीरात जाताच धक्का बसला, त्या खोलीत उष्मा होतो म्हणून जमिनीवर पाणी सोडले होते. धक्का बसताच चप्पल घसरली व मी खाली पडलो. पडल्याबरोबर हातातली तार सुटली व करंट बंद झाला. पण त्या एकाच धक्क्याने शुद्ध गेली होती. वर शुद्ध आली तेव्हा अटेन्डट सांगू लागला, की तो इतका घाबरला की काय करावे हे त्याला सुचेना. म्हणून तो सारखा बोंबलतच होता. बटन बंद करावे हे पण त्याला सुचले नाही. हॉटेलवर आलो, कॉफी घेतली व पडून राहिलो. दोन तासांची झोप झाल्यावर सरळ डेक्कन क्वीन गाठली व पुण्याला निघालो. कारण माझी मंडळी तिथे होती. गाडीत बसल्यावर अपघाताची तीव्रता ध्यानात आली. बोट व पाठीचा एक भाग (जो पडताना जमिनीला लागला होता) दुखू लागले. सायंकाळपर्यंत तिथे जळल्याचे लांबट डाग आले. ते दुःख व डाग १५ दिवस होते. पण आठवण जन्माची झाली. मृत्यूने झटका दिला पण पुढे जगण्याला सोडून दिले.

## दाराच्या पलीकडे

डॉ. मुडी यांनी दोन वर्षांपूर्वी एक अभ्यास पूर्ण करून त्याचे परिणाम घोषित केले, मृत्यू आला की मरणाऱ्याला कसे वाटते, मेल्याबरोबर काय दिसते, या दोन्ही प्रश्नांची उत्तरे काढण्याचा त्यांनी प्रयत्न केला. मरणाची भीती सर्वांनाच आहे. याचे एक कारण 'पुढील भावनेची अनिश्चितता' व 'या शरीराशी असलेल्या संबंधाची होणारी ताटातूट.' पहिल्याचे उत्तर नाही; पण दुसऱ्याचे उत्तर मिळू शकेल. डॉ. मुडी यांनी अगदी मरणोन्मुख आलेल्या रोग्यांची यादी दिली आहे. यापैकी जे रोगी त्यांच्या मते मेले होते. (ज्यांचे श्वसन, हृदय व शरीराची हालचाल बंद झाली होती.) त्यापैकी काही जगले, शुद्धीवर आले व त्यांनी आपले अनुभव कथन केले. कैक रोग्यांनी सांगितले की, 'मला मेलेला ठरविला' त्याच क्षणी तो रोगी त्या खोलीच्या सीलिंगजवळ पोहोचला व मृत देहाकडे व डॉक्टरांच्या प्रयत्नाकडे बघत होता. डॉक्टरांनी हृदय सुरू केले व त्यांनी शरीरात पुन्हा प्रवेश केला. मरताना जणू एका भुयारातून पलीकडे गेल्याचा मृत लोकांना भास झाला. त्या भुयारापलीकडे खूप उज्ज्वल प्रकाश होता व लांबून कुणीतरी एक दैदीप्यमान व्यक्ती त्यांचेकडे येत होती. बहुतेकांना ही व्यक्ती येशू खिस्त असतील असे भासले होते.

साधु वासवानी यांनी 'लाईफ आफ्टर डेथ' या त्यांच्या व्याख्यानमालिकेत सांगितले की, या अन्नमय शरीराबरोबर प्राणमय शरीर राहते. दोघांचा संबंध रुपेरी नाळेने बांधलेला असतो. मृत्युसमयी प्राणमय शरीर बाहेर पडते. इच्छा, आसक्ती असलेले आत्मे या प्राणमय शरीरात आसक्ती पूर्ण करण्यास वावरत असतात. ही ती भुते पिशाच्चयोनी होय. त्यांच्या भावना व आसक्ती तृप्त झाल्या किंवा जे संन्यस्त आहेत ते पुढे आकाशमय शरीरात (एस्ट्रल बॉडी) प्रवेश करून आपआपल्या कर्माचे फळ भोगतात. त्यांनी बजावले की हे जीवन नश्वर आहे येथील कोणतीच वस्तू टिकणार नाही. इथे जोडलेले काही नाते येणार नाही. याकरिता ज्यांना शांती हवी त्यांनी राग, द्वेष, लोभ, अभिलाषा यांना आवरून एखाद्या देवाच्या चरणी चित्त स्थिर करावे. मरण येताच ही देवता दारापलीकडे मृत्यूनंतर भेटेल व पुढील मार्गदर्शन करील.

## आकाशमय शरीर–प्रात्यक्षिक

या दोन विचारसरणीचे काही प्रात्यक्षिक पाहावे असे मनात आणून सन १९४० साली न्यूकॅसल शहरी एका स्पिरिचुएल सोसायटीतर्फे उत्तम 'मीडियम' घेऊन मृत आत्म्यांशी प्रत्यक्ष हितगुज करावे म्हणून मिस जेम्सकडे पोचलो. ती जाडीभरडी मीडियम

लवकर आली. मी स्वतः व एका नर्सने तिला पूर्णतया तपासले. एका ओव्हरकोटाशिवाय तिच्या शरीरावर एकही वस्त्र नव्हते. दारे-खिडक्या अंधारलेल्या खोलीत गेलो. इथे ४० वॅटचे दोन बल्ब होते. पण त्यावर काळे कापड टाकण्यात आले. यामुळे जरा अंधुक व लालसर प्रकाश पडत होता. एका कोपऱ्यात काळा पडदा लावला होता. त्या पडद्यामागे एक खुर्ची होती. आम्ही त्या विवस्त्र मीडियमला या खुर्चीवर बसविले. प्रार्थना झाल्या कुंथत कण्हत आतून बरेच संभाषण आले. नंतर मधून पडदा हळुहळू बाजूला सारताना दिसला. पलीकडे चकाकणारे डोळे असलेला चेहरा दिसला. त्या चेहऱ्याभोवती शुभ्र आवरण होते. हातापायापर्यंत हे आवरण लोळत होते. हा सगळा प्रकाशाचा उगम त्या मीडियमच्या तोंडाजवळून होत आहे असे दिसले. कैक प्रकारचे चेहरे व शब्द आले. मधेच एक 'सालोमन' आले. त्यांनी 'तुमच्या' म्हणत माझ्याकडे अंगुलिनिर्देश केले. 'मी नेहमी तुमच्या संगे असतो.' 'तुम्हाला ट्रामरस्त्यावरून जाताना अपघातातून मी वाचविले-' असे शब्द ऐकले.

काही वेळाने एक डॉक्टर आले. मी त्यांना स्पष्ट विचारले- 'तुम्हाला मरण कसे आले व तिथे काय दिसते ते सांगाल काय?' यावर तो आकाशमय शरीराचा डॉक्टर म्हणाला, 'कसा मेलो सांगता येत नाही, पण माझे सगळे दुःख व पीडा उडून गेल्या. मी पलीकडे अगदी दारातून दुसऱ्या खोलीत जावे असे चाचपडत जाऊ लागलो. कुठे आलो, कसा आलो काही समजेना. तसाच हताश, सारखा अंधारातून चाचपडत होतो. तोच कैक वर्षांपूर्वी मेलेले माझे नातेवाईक जवळ आले. त्यांनी माझे सांत्वन केले व हात धरून लांब प्रकाशाकडे घेऊन गेले.'

'पण या समयी तुम्हाला कसे वाटते व तुम्हाला या संसारात प्राप्त केलेल्या ज्ञानाचा काही उपयोग होतो काय?'

'आम्हाला कसे वाटते हे सांगणे जरी सोपे असले तरी तुम्हाला कळणार नाही. आमची यात्रा फार लांबची आहे. इथे तुमचा काळ व वेळ याची सीमाच नसते. असे बोलावून आमच्या यात्रेत आपण खंड पाडीत आहात. तसे करू नका. संसारी ज्ञानाचा लाभ मी कधी संसारी डॉक्टरांना करून देतो. त्यांना काही कठीण समस्या आली व काही सुचेनासे झाले की मी हळूच सुचवितो. एकाएकी सुचलेल्या तुमच्या कैक कल्पनांच्या मागे आमची अशी प्रेरणा असते. तिकडे जास्त जीव लावू नका. दारापलीकडे आल्यावर त्रास होईल.'

असा आमचा संवाद रात्री ११ पर्यंत चालला. मी फाउंटनपेन घेऊन त्यांचे हस्ताक्षर घेण्यास उठलो. पण मला लोकांनी खाली बसविले, दम दिला. सगळे आकाशमय शरीर गेल्यावर आतून एक वाणी बोलली, "त्यांच्यावर रागावू नका, त्यांच्या आध्यात्मिक वलयामुळे व इच्छाशक्तीमुळेच आज हे आकाशमय शरीर प्रकट झाले!" मी सगळे लिहून काढले होते.

भगवद्गीता व विशेषत: श्रीज्ञानेश्वरीत मृत्यू केव्हा यावा याचे आठव्या अध्यायात चांगले विवेचन केले आहे.

या जगात जी काही घटना निश्चित आहे ती म्हणजे मृत्यू. प्राणी जन्माला येताच नियतीने सोडलेला हा बाण वाऱ्यावादळातून आपल्या लक्ष्याकडे–म्हणजे मृत्यूचकडे जात असतो. निरागस जीवन जगताना आपणाला कळत नसते की मृत्यू 'काळ' आपले बोट धरून सोबतीने मार्गक्रमण करीत आहे. तो बाजूला केव्हा ओढून नेईल याची शाश्वती नसते. एका दृष्टीने हे अज्ञान जीवनाला आनंद देते. मृत्यू उद्या येणार हे कळताच, तो आजच मरेल. फाशीला जाणारे मृत्यूपूर्वीच अर्धमेलेले असतात.

शैशव, यौवन, वृद्धावस्था या जशा शरीराच्या वेगवेगळ्या अवस्था होत, तसेच जन्म आणि मरण या असाव्यात. मरणाचे अज्ञान, इथून एकटेच जाणे हे सगळे नियतीने बहाल केले आहे. आम्ही सर्व या नियतीच्या बुद्धिबळाची प्यादी का आहोत ?

या आयुष्यात येऊन या जीवनाचे, या शरीराचे आम्ही काय केले, असे आम्ही कधी विचारतो काय ? हाच प्रश्न मरणानंतर डॉ. मूडी किंवा साधू वासवानी यांच्या मताप्रमाणें तिकड आम्हाला कुणी विचारणार आहे ?

हे शरीर नियतीने काही साधन साध्य करण्याला दिले. वेळ फार थोडा आहे. मग तो काळ अशा कार्यात घालवावा की आमची पावले काळाच्या वाळूवर भविष्यात दिसतील. मानवाचे उत्थान होऊ लागेल. इथूनच आदिमानवापासून महामानवाकडे जाणारा मार्ग दिसू लागेल. आमचे कार्य पुढे नेण्यास कुणी भविष्यात यावे याकरिताच मृत्यूची आवश्यकता आहे.

या शरीरात पंचतत्त्वे खेळतात. आपल्या प्रभावाने या शरीराला जीवनत्वाचा तजेला देतात. वृद्धत्व किंवा व्याधिस्थ शरीरात आपली उर्जा शक्ती प्रदर्शित करू शकत नाही, ते खेळणे बंद करतात व आम्ही 'मृत्यू' आला असे म्हणतो.

प्रख्यात तत्त्ववेत्ता कै. जे. कृष्णमूर्ती म्हणतात, "जीवन म्हणजे कळत न कळत सतत चालू असलेली स्मृतीच होय. या अनुभवांचा अंत म्हणजे मृत्यू. जगत असताना अज्ञानाचा अनुभव घेता येत नाही, म्हणून मृत्यूचे भय वाटते. ज्यात सातत्य असते त्यात नूतन, नवसृजन असे काही होऊ शकत नाही. जेव्हा सातत्य संपते तेव्हाच चिरनूतन ज काही आहे ते अस्तित्वात येण्याचा संभव आहे, पण याच अंत पावण्याला आपण भितो. जिवंतपणीच मरण येणे शक्य आहे काय ! सर्व आठवणी, सुख शोधण्याचे व भावनांचे ओझे टाकून देता येईल काय ! म्हणजे झाले गेले, संपले. उद्याचा दिवस नवा प्रसन्न येईल असे झाले तरच जिवंतपणी मरण जाणता येईल. अशा मृत्यूत सातत्याचा शेवट करण्यात, संपून जाण्यात–नवजीवन असते, सनातन चिरंतन सृजन असते."

याच विचाराला कठोपनिषदात नचिकेत व यम यांच्या संवादात उपनिषदकारानी अध्यात्माचा साज चढवून सांगितले आहे की जिवंतपणीच आत्म्यास परब्रह्मी

विलीन करावे.

**" यदा सर्वे प्रमुच्यन्ते कामा येऽस्य हृदिश्रिताःऽ**
**अथ मर्त्योऽमृतो भवत्यत्र ब्रह्म समश्नुते ॥ "**

*(" जेव्हा हृदयात असलेल्या इच्छा, आशा, आकांक्षा सारल्या जातात, तेव्हाच मर्त्य अमर्त्य होतो आणि ब्रह्मत्व इथेच पावतो. ")*

REFBK-0025979
REFBK-0025979

# आमची खालील सर्व प्रकाशने पाऊणपट किमतीत खरेदी करा!

●

| | | |
|---|---|---|
| **प्रभाकर दिघे** | | |
| | नीरक्षीर | ३२ |
| | फुल्लनदेवी | २१ |
| **प्रमोद नवलकर** | | |
| | धुमाकूळ | २५ |
| | प्रहार | २२ |
| **अंजली संभूस** | | |
| | पर्व | २१ |
| | क्षिप्रा | २८ |
| **अशोक व्हटकर** | | |
| | आथर्वीय जग | ६० |
| **चिंतामणी लागू** | | |
| | क्रांतिदूत | २८ |
| **प्रफुल्ल दत्त** | | |
| | आळसावलेले क्षण | १५ |
| **सौ. पुष्पा चिणे** | | |
| | उन्हाचं वेड | ३५ |

**कुमुदिनी रांगणेकर**

| | |
|---|---|
| पुनर्जीवन | २० |
| रस्सीखेच | ३० |
| शकुनी मोहर | ३५ |
| अजब बदला | ४० |
| निरागस पोरगी | ७० |

**सौ. उज्ज्वला पिंपळखरे**

| | |
|---|---|
| चेहेरे | २५ |

**चंद्रकांत काकोडकर**

| | |
|---|---|
| रसिका | ३० |
| मायाविनी | ३५ |
| उन्माद | २२ |
| अन्नपूर्णा | ४० |
| सुधीरा सेन | ५० |
| नशीब | ३५ |
| आनंदभैरवी | ६० |

**मंदाकिनी भारद्वाज**

| | |
|---|---|
| जाग | २८ |
| धोक्याचं वळण | ३० |

**पु. ज. देवरस**

| | |
|---|---|
| अनुभवाचं जग | ४५ |

**मामा वरेरकर**

| | | |
|---|---|---|
| | लांडग्याची शिकार | २५ |
| | दुर्जनांचा काळ | २५ |

**हेमंत सावंत**

| | | |
|---|---|---|
| | अफलातून | ४० |
| | शिकार | ४५ |

**सौ. शैलजा राजे**

| | | |
|---|---|---|
| | भोवळ | ६० |
| | चौकट | २८ |
| | सौदा | ४५ |

**दीपक**

| | | |
|---|---|---|
| | वळण | ३० |
| | प्रतिसाद | ४० |

**गुरुनाथ नाईक**

| | | |
|---|---|---|
| | बेसूर सुरांची भैरवी | ४० |
| | मत्स्यकन्या | ४० |
| | चंबळा वाहते आहे | ६५ |

**एस. एम. काशीकर**

| | | |
|---|---|---|
| | स्वप्नभेद | ४० |
| | रेड सर्कल | ४० |

□


# वसंत बुक स्टॉल

**न. चिं. केळकर रोड, हनुमान मंदिराशेजारी,**

**दादर, मुंबई २८**